
म. ग्रं. सं. ठाणे
[illegible]
नं. [illegible]

# कलकत्त्याचा वाटाड्या



प्रकाशक :

तमंडळ, बृहन्महाराष्ट्र परिषद
अधिवेशन आठवें, कलकत्ता

१९३८

REFBK-0005831

# ईस्ट इंडियन रेल्वे

## प्रेक्षणीय स्थळांचा रेल्वे-मार्ग

## हिंदुस्थानांतील पुरातन, इतिहासप्रसिद्ध व पवित्र स्थळें पहा.

| | |
|---|---|
| आग्रा | फत्तेपूर शिक्री |
| दिल्ली | लखनौ |
| हरिद्वार | बनारस |
| अलाहाबाद | अयोध्या |
| पाटलीपुत्र | नलांडा |

**वृंदावन धाम**

**जलद गतीच्या गाड्या व बेताचे दर**

**अधिक माहिती व प्रवास-वाङ्मयासाठीं**

**ची[illegible]र,**

ई. REFBK-0005831 ता

याना लिहा.

टेलिफोन नंबर

बड़ा बझार ४,०२१

# भारत ग्लास वर्क्स

पत्ता—

अंबिका मुकर्जी रोड,

**बेलघुरिया,**

ई. बी. रेल्वे

# पातळावरील हें लेबल

## त्याबद्दलच्या संपूर्ण संतोषाची व समाधानाची गॅरंटी देतें.




★

हें लेबल असलेलीचें पातळे आपल्या आव-डत्या कापड—दुकान-दाराकडून आग्रहानें घेऊन ती वापरून होणाऱ्या संतोषाचा व समाधानाचा प्रत्यक्ष अनुभव घ्या.

★

आमचीं पातळें कलकत्ता येथेंही खालील ठिकाणीं मिळतील.

" महाराष्ट्र मंडळ "
८५।१।१ बेलताला रोड,
कालीघाट

रा. रा. एस.के. दातार,
४६ हाय स्ट्रीट, श्रीरामपूर

# बेंगॉल-नागपूर रेल्वे

## मुंबई—कलकत्ता

प्रवास

**नागपूर मार्गानें करा.**

**सर्वांत जवळचा व स्वस्त मार्ग**

- सुखसोयी
- आराम
- जलद गती

**जगन्नाथपुरीची यात्रा करा**

कलकत्त्याहून फक्त एक रात्रींचा प्रवास. हिंदुमात्रांस शतकानुशतकें पूज्य व वंदनीय तीर्थ

**पूर्व किनाऱ्यावरील हवा खाण्याचें चित्ताकर्षक ठिकाण**

विशेष माहिती

**स्टेशन मास्तरांकडे मिळेल.**

# केसांचें सौंदर्य

# संजीवनी हेअर टॉनिकनें

## टिकतें व वाढतें



हें टॉनिक केसाच्या विकारांवर गुणकारी असून त्यानें गेलेले केस पुन उगवतात बाटली कि १ रु पोस्टेज व पॅकिंग निराळें. व्यापाऱ्यास भरपूर कमिशन ठिकठिकाणी एजंट्स् नेमणें आहेत

**कांहीं निवडक अभिप्राय—**

" आता केस जायचे थावले असून नवे केस डोकावयाला लागले आहेत...... —सौ **राधाबाई वर्तक**, बी ए, रेवारी, (पंजाब)

" संजीवनला मागणी आहे केस गळणें थाबतें .....

—**प्रो. ना ग नारळकर, पुणें**

" माझ्या भगिनीनें संजीवन हेअर टॉनिकची एक बाटली वापरली केसाची लांबी दीड इंच वाढली —**डी. वाय मराठे**, व्यापारी, अहमदाबाद

**आमचे एजंट्स् व डिस्ट्रिब्यूटर्स**

**कलकत्ता**—महाराष्ट्र समाज स्टोअर्स, **नागपूर**—सेंट्रल मेडिकल स्टोअर्स; **मुंबई**—माधव एजन्सी व पॉप्युलर फार्मसी, **कराची**—एस् आर सावंत, **अकोला**—बॉंबे मेडिकल स्टोअर्स, **अमरावती**—बेरार मेडिकल स्टोअर्स, **इंदूर**—पी. जी निवसरकर ५८ जेल रोड, **बडोदें**—मराठे ब्रदर्स

**पुणें—सोल डिस्ट्रिब्यूटर्स—**

दास्ताने ब्रदर्स होम सर्व्हिस ( स्वावलंबी विद्यार्थ्यांची व्यापारी संस्था ),
४५६ रविवार, फडके हौदासमोर, पुणें नं २

**संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, एलीस ब्रिज, अहमदाबाद.**

# वेस्टर्न इण्डिया इण्डस्ट्रीज

१३७ कॅनिंग स्ट्रीट, कलकत्ता

इंजिनिअर्स व मशिनरी डीलर्स

## सोल डिस्ट्रिब्यूटर्स :—

**मेसर्स किर्लोस्कर ब्रदर्स :**—सर्व प्रकारचे पंप, शेतीचें सामान, चरक, साखर बनविण्याचीं यंत्रें, फर्निचर, हॉस्पिटल फर्निचर, वगैरे.

**मेसर्स जी. जी. दाण्डेकर अँड कं. :**—तांदुळाच्या गिरण्या व त्याची सुटीं यंत्रें.

**मेसर्स बाटली भाई अँड कं. :**—विटे इंजिन्स, लेयस् प्रेस यंत्रें, वगैरे, व सर्वसाधारण यंत्रें.

शाखा—लॉटूश रोड, कानपूर.

# कलकत्त्याचा वाटाड्या

# कलकत्त्याचा वाटाड्या

प्रकाशक

स्वागत मंडळ, बृहन्महाराष्ट्र परिषद,

अधिवेशन आठवें, कलकत्ता

१९३८

प्रकाशक :—रं रा देव व स. के दातार, चिटणीस स्वागत मंडळ,
बृहन्महाराष्ट्र परिषद्, अधिवेशन आठवें, कलकत्ता
मुद्रक :—शं. रा दाते, व्यवस्थापक लोकसंग्रह छापखाना, ६२४
सदाशिव पेठ, पुणें

# प्रस्तावना

दर वर्षी कलकत्त्यास अनेक महाराष्ट्रीय स्त्री-पुरुष विविध कारणानीं येतात त्यास येथील प्रेक्षणीय स्थळें व संस्था याबद्दलची माहिती देताना त्याविषयीचे मराठी भाषेंत पुस्तक नसल्यानें फार अडचण पडते कलकत्त्यास येऊन गेलेल्या अनेक गृहस्थानीं वेळोवेळी मराठी नियतकालिकांत प्रवासवृत्ते व वर्णनात्मक लेख लिहिले आहेत यातील माहिती बहुधा अपुरी व कित्येकदा चुकीची आढळून आली कलकत्त्याचें वर्णन, त्याचें ऐतिहासिक महत्त्व, तेथील व्यापार, शिक्षणसोयी, प्रेक्षणीय स्थळें व तेथील संस्था याबद्दल एक लहानसें पुस्तक लिहावे असे येथील कित्येक गृहस्थाचे मनात आज पुष्कळ दिवस आहे यंदा येथें बृहन्महाराष्ट्र परिषदेचें आठवे अधिवेशन भरणार असल्यानें या विचारास महत्त्व येऊन हें काम त्या परिषदेच्या स्वागत-मंडळाने करावें असें ठरलें व त्याप्रमाणे हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध होत आहे पुस्तक एका विशिष्ट वेळेस तयार व्हावयास पाहिजे यामुळें तें लिहिण्यास व तपासून निर्दोष करण्यास जेवढा वेळ हवा तेवढा मिळाला नाहीं व त्यामुळें ते आहे याहून जास्त चागलें करितां आलें नाही याबद्दल खेद होतो तथापि प्रवासी मंडळीची अडचण दूर करण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे, हें पुस्तक पाहिल्यावर कळेलच दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग आल्यास जरूर त्या सुधारणा करण्याची व्यवस्था करण्यांत येईल

हें पुस्तक मुख्यत स्वागत-मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद श्री द्वा वि गोगटे यानी लिहिलें व या कामीं त्याना डॉ शं पु आघारकर व सौ लीलावतीबाई गोगटे याचें बहुमोल साहाय्य झालें याबद्दल स्वागत-मंडळ या त्रिवर्गाचे अत्यंत आभारी आहे

**रं. रा. देव**

**स. के. दातार**

चिटणीस स्वागत मंडळ,

बृहन्महाराष्ट्र परिषद, अधिवेशन आठवें,

कलकत्ता

# अनुक्रमणिका

पृष्ठें

प्रकरण पहिलें शहराचें स्थान व विस्तार :

वायुमार्ग, लोहमार्ग, ट्राम, बस, टॅक्सी व घोडागाडी, रिक्षा, कलकत्यातील रुग्णालयें, सिनेमागृहें, नाटकगृहें १–१०

प्रकरण दुसरें : शहराचा इतिहास :

पौराणिक, ऐतिहासिक, सर्जन हॅमिल्टन, जॉब चारनॉक, चार्लस् आयर, १८०३ नंतर, १८१३ नतर, तत्कालीन इंग्रज समाज, नवीन धार्मिक चळवळी, नव्या सामाजिक चळवळी, राजकीय चळवळ . . ११–२३

प्रकरण तिसरें कलकत्ता कॉर्पोरेशन [ नगरसभा ] २४–२९

प्रकरण चौथें : कलकत्ता युनिव्हर्सिटी व शिक्षणसंस्था

शिक्षणाची सद्य स्थिति, कलकत्ता विश्वविद्यालय, स्थापना, पदव्या, विद्यापीठाच्या इमारती, अधिकारक्षेत्र, १९०४ चा कायदा, अभ्यासक्रमाची सुधारणा, स्टूडट्स् वेलफेअर कमिटी व इन्फर्मेशन ब्यूरो, सॅडलर कमिशन, सशोधनकार्याकरिता शिष्यवृत्या व बक्षिसे, विद्यापीठाचा छापखाना, ग्रथालय, ट्रेनिंग डिपार्टमेंट, लॉ कॉलेज, मायनिंग स्कूल, विद्यापीठाचें कॉलेज ऑफ सायन्स आणि टेक्नॉलॉजी, कलकत्यातील प्रमुख कॉलेजे प्रेसिडेन्सी कॉलेज, ८६–१ कॉलेज स्ट्रीट, सेंट झेवियर कॉलेज, ३० पार्क स्ट्रीट, स्कॉटिश चर्च कॉलेज, ४ कॉर्नवॉलिस स्क्वेअर, विद्यासागर कॉलेज, ३९ शकर घोष लेन, बेथूर कॉलेज ३०–४०

प्रकरण पांचवें : वैद्यकीय शिक्षणसंस्था

मेडिकल कॉलेज ऑफ बेंगॉल, कार मायकेल मेडिकल कॉलेज, १ बेलगाछिया रोड, स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन, सेंट्रल

ॲव्हेन्यू, पाश्चर इन्स्टिटयूट ऑफ बेंगॉल, ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ हायजीन अँण्ड पब्लिक हेल्थ, सेंट्रल ॲव्हेन्यू, स्टेट मेडिकल फॅकल्टी, अष्टांग आयुर्वेदिक कॉलेज, १०७ राजा दिनेंद्र स्ट्रीट, कलकत्ता डेंटल कॉलेज व हॉस्पिटल, ११४ लोअर सर्क्युलर रोड, बेंगॉल ॲलन होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, १६९ बहुबझार स्ट्रीट ४१–४९

प्रकरण सहावें धंदेशिक्षणाच्या संस्था

बेंगॉल इंजिनियरिंग कॉलेज, (शिवपूर), बेंगॉल टेक्निकल इन्स्टिटयूट, जाण्याचा मार्ग, बालीगंज इंजिनियरिंग कॉलेज, बेंगॉल व्हेटरिनरी कॉलेज, बेलगाछिया, गव्हर्मेंट स्कूल ऑफ आर्ट, २८ चौरंगी रोड, मुके व बहिरे यांच्या शिक्षणाची शाळा, अंधविद्यालय, कलकत्ता स्कूल ऑफ म्यूझिक, ८४३ पार्क मॅन्शन, पार्क स्ट्रीट, संगीत सम्मीलनी, ७४ घरमताला स्ट्रीट, संगीत संघ, वासंती विद्यावीठी, ८७ कॉर्नवॉलिस स्ट्रीट, गव्हर्मेंट वीव्हिंग इन्स्टिटयूट, श्रीरामपूर, जाण्याचा मार्ग, सरोज नलिनी दत्त इंडस्ट्रियल स्कूल ५०–५८

प्रकरण सातवें प्रेक्षणीय स्थळें

एस्प्लनेडचें मैदान, राणी व्हिक्टोरियाचें स्मारक, जाण्याचा मार्ग, जादूघर (इंडियन म्यूझियम), पुराणवस्तुसंग्रह, भूशाखा, कलाविभाग, उद्यमविभाग, प्राणिविभाग, जाण्याचा मार्ग, मल्लिक पॅलेस, जाण्याचा मार्ग, बेलूर मठ, जाण्याचा मार्ग, दक्षिणेश्वर, जाण्याचा मार्ग, कालीचें देवालय, जाण्याचा मार्ग, जैन मंदिर, जाण्याचा मार्ग, मराठा डिच, न्यू मार्केट, जाण्याचा मार्ग, ऑक्टर्लोनी मॉन्युमेंट, जाण्याचा मार्ग हाव-ऱ्याचा पूल, फोर्ट विलियम, झूऑलॉजिकल गार्डन (चिडिया बाग), जाण्याचा मार्ग, शिवपूर रॉयल बोटॅनिकल गार्डन ५९–७७

प्रकरण आठवें कारखाने

ब्रिटानिया बिस्किट कंपनी, १० बिरपारा लेन, डमडम, बेंगॉल

इम्युनिटी कंपनी, वरानगर, जाण्याचा मार्ग, बेंगॉल केमिकल ॲण्ड फार्मास्युटिकल वर्क्स जुन्या कारखान्यास जाण्याचा मार्ग, नव्या कारखान्यास जाण्याचा मार्ग, बेंगलोर व्हाइटलेट सिंडिकेट, जाण्याचा मार्ग, टिटाघर येथील कागदाचा कारखाना, जाण्याचा मार्ग, टाकसाळ, जाण्याचा मार्ग, कलकत्ता फास्ट कलर डाय वर्क्स, २४ तातीपारा लेन, सालकिया, हावरा, भारत ग्लास वर्क्स, जाण्याचा मार्ग ७८–८७

प्रकरण नववें संशोधन संस्था :
दि रॉयल एशिआटिक सोसायटी ऑफ बंगॉल, १ पार्क स्ट्रीट, जाण्याचा मार्ग, अलीपूर येथील हवाखात्याची वेधशाळा, जाण्याचा मार्ग, बोस इन्स्टिटयूट, ९३।१ अपर सर्क्युलर रोड, जाण्याचा मार्ग, गव्हर्मेंट टेस्ट हाऊस, १२ जज्ज कोर्ट रोड, अलीपूर, जाण्याचा मार्ग, इंडियन असोसिएशन फॉर दि कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, २१० बाऊबझार स्ट्रीट, जाण्याचा मार्ग .. .. ... ८८–९८

प्रकरण दहावें . इतर संस्था, क्रीडामंडळें, क्लब, पुस्तकालयें, वर्तमानपत्रें, नियतकालिकें इ.
रॉयल ॲग्रिहॉर्टिकलचरल सोसायटी, १ अलीपूर रोड, कलकत्ता मॅथमॅटिकल सोसायटी, मायनिंग ॲण्ड जिऑलॉजिकल इन्स्टिटयूट ऑफ इंडिया, अन्थ्रापॉलॉजिकल सोसायटी, इंडियन केमिकल सोसायटी, इन्स्टिटयूशन ऑफ केमिस्ट्स्, रामकृष्ण मेडिकल एज्युकेशन सोसायटी फॉर वुइमेन, क्रीडामंडळें फूटबॉल, क्रिकेट, टेनिस, पोहणें व वल्हवणें यांचे सामने, घोडदौड, कलकत्ता युनिव्हर्सिटी इन्स्टिटयूट, पुस्तकालयें व नियतकालिकें : इंपीरियल लायब्ररी, वर्तमानपत्रें व नियतकालिकें ... ९९–१०९

प्रकरण अकरावें . कलकत्त्यांतील महाराष्ट्रीय संस्था
महाराष्ट्र समाज, महाराष्ट्र मंडळ, ८५।१।१ बेलताला

रोड, महाराष्ट्र भगिनी समाज, ८५।१।१ बेलताला रोड; माडगावकर मराठी शाळा, ८५।१।१ बेलताला रोड, महाराष्ट्र इंडस्ट्रियल असोसिएशन १२ बी।६ इंद्ररॉय रोड, महाराष्ट्र निवास .. ... ... ११०–१३०

प्रकरण बारावें : बंगाली भाषा :

बंगाली लिपीचा उगम, बंगाली भाषा, बंगाली या नावाची उत्पत्ति, बंगाली वाङ्मय ... .. १३१–१३६

प्रकरण तेरावें : व्यापार व उद्यम :

पूर्वेतिहास, पोर्चुगीझ लोकांची माहिती, कापडाचा धंदा . सद्य:स्थिति तागाचा धंदा : लागवड व पूर्वेतिहास; वाढ व सद्य:स्थिति, चहा पूर्वेतिहास, सद्य:स्थीत, चहाचे प्रकार; नीळ कलकत्ता बंदराचें महत्त्व व त्याचीं कारणें; कलकत्ता येथें देशी वस्तू तयार करणाऱ्या कंपन्यांचीं नावें व पत्ते. ... ... ... ... १३७–१५२

प्रकरण चौदावें : कलकत्त्याच्या आसपासचीं प्रेक्षणीय स्थळें :

१ शांतिनिकेतन, २. दार्जालिंग, ३ पहाडपूर, ४. भुवनेश्वर, ५ जगन्नाथपुरी .. ... १५३–१६०

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८ | २ | व्हिक्टोरिया | व्हिक्टर |
| ११ | १७ | इ स १४९४ | इ स. १४९५ |
| १३ | ३ | १६७२ | १६९२ |
| ,, | ७ | १६७३ | १६९३ |
| १६ | ५ | १०० | ८०० |
| १९ | २४ | १८७३ | १८७६ |
| ३० | १६ | १५०० | १५००० |
| ३१ | १ | वद्यापीठाचें | विद्यापीठाचें |
| ,, | १३ | ३८ हजार | ३४ हजार |
| ३३ | ६ | विद्यार्थ्यांना | विद्यार्थ्यांच्या |
| | ११ | काढली आहे | काढला आहे |
| ३६ | ८ | स्कल | स्कूल |
| ४३ | ९ | इंडियन टीसर्च | इंडियन रीसर्च |
| ,, | १० | ,, | ,, |
| ४८ | ९ | १९१६ | १९२० |
| ८९ | १९ | ५०० | ५००० |
| १०० | २ | इ स १८०८ | इ स १९०८ |
| ११३ | २६ | बाबंनी | बाबूनीं |
| ११५ | ६ | मुख | मुख्य |
| १३३ | १५ | लखोदररे | लखिदरेर |
| १४१ | २ | बोनियो | बोर्नियो |
| ,, | ८ | ४२ | ४३ |
| १४५ | १८ | व साखर | साखर |
| १४६ | ९ | कारखान | कारखाने |
| १४९ | २० | (२) पनिहाटी | पनिहाटी |
| १५६ | ५ | ३ पहाडपूर | ३ पहाडपूर |


(रा व का ना दीक्षित याचे लेखावरून)

## बोटॅनिकल गार्डनला जाण्याचा मार्ग

(पान ७७ चे शेवटी)

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ उत्तरेकडे जाणाऱ्या ट्राममध्ये बसावे व हायकोर्टचे टिकिट घ्यावे. डलहौसी स्क्वेअरला ट्राम बदलावी लागते हायकोर्ट हें ट्रामचें टर्मिनस आहे येथून सरळ स्ट्रँड रोड ओलांडून नदीकडे गेलें म्हणजे फेरीबोटीचा धक्का लागतो याला चपालघाट, बाबूघाट किंवा हायकोर्टघाट असे म्हणतात येथून पोर्ट कमिशनर्सच्या फेरी-बोटी दक्षिणेकडे नियमित वेळीं जा ये करतात याचें टाईम-टेबल व टिकिटें धक्क्यावर बुकिंग ऑफिसमध्ये मिळतात येथें बोटॅनिकल गार्डनचें टिकिट घ्यावें स्टीमरमध्ये बसल्यानंतर अर्ध्या तासाचे आंतच आपण बोटॅनिकल गार्डनच्या धक्क्यावर येतो चपालघाटाचे विरुद्ध दिशेला बोटॅनिकलचा धक्का आहे

# कलकत्त्याचा वाटाड्या



## प्रकरण पहिलें

## शहराचें स्थान व विस्तार

कलकत्ता शहराचे अक्षांश व रेखांश पुढीलप्रमाणें आहेत

उत्तर अक्षांश —२२°–३३′–४७″

पूर्व रेखांश. —८८°–२३′–३४″.

अक्षांशाच्या आकड्यावरून कलकत्ता जवळजवळ कर्कवृत्तावरच आहे असें म्हणण्यास हरकत नाही तसेंच कलकत्ता मुंबईच्या पूर्वेस असल्याने मुंबईपेक्षा कलकत्त्यास सूर्योदय ६३ मिनिटें अगोदर होतो. कलकत्त्याची स्थानिक वेळ स्टँडर्ड टाईमपेक्षा २४ मिनिटें पुढें आहे गंगानदीच्या मुखापासून जवळजवळ शंभर मैल आंत हुगळीच्या डाव्या किनाऱ्यावर कलकत्ता शहर दक्षिणोत्तर पसरलें आहे बंगाल प्रांतात पाणी विपुल असून देश फार सुपीक आहे त्यामुळें कलकत्ता शहरांत व शहराच्या आजूबाजूस रुक्षपण वाटत नाही झाडेंझुडपें हिरवीगार व टवटवीत दिसतात

गंगेचा डेल्टा (त्रिकोण) व तिचें खोरें केव्हा उत्पन्न झाले, त्या ठिकाणीं मनुष्यवस्ती केव्हापासून झाली, त्यापूर्वी या ठिकाणी काय होतें, वगैरे प्रश्नाचा अभ्यास भूस्तरशास्त्रज्ञांनी व इतिहाससंशोधकांनी केला आहे इ स १८३५ ते १८४० चे दरम्यान येथील फोर्ट विलियममध्यें भूगर्भाची माहिती मिळविण्यासाठी जमिनीत भोंक पाडण्याचे प्रयोग करण्यांत आले त्यापासून मिळालेल्या माहितीवरून फार प्राचीन काळी (गंगानदीचे उत्पत्तीपूर्वी) या ठिकाणी ग्नाइसिक प्रस्तराच्या टेंकड्या होत्या कालांतरानें त्या नष्ट होऊन राजमहालच्या डोंगरापर्यंतचा हा प्रदेश दलदलीचा झाला असें आढळून आलें आहे इसवी सनाच्या पूर्वी ३००० वर्षांपासून हिमालयाचा पायथा

व गंगानदीच्या खोऱ्यातील यमुना व सतलज नद्यामधील प्रदेश येथेंच वस्ती होती. आर्य लोकांनी हिंदुस्थानात प्रवेश केला तेव्हा त्यांच्या वसाहती फक्त स्थानेश्वर व समाना या ठिकाणीच होत्या (आता हीं दोन्ही ठिकाणें नामशेष झालीं आहेत) त्यानंतर यमुना व सतलज याच्या खोऱ्यातील वस्ती हळूहळू आग्नेय दिशेकडे पसरून अयोध्या, हस्तिनापूर, मथुरा, कनौज, वगैरे शहरें अस्तित्वात आली. त्याप्रमाणें हिमालयाच्या पायथ्याची वस्तीही दक्षिण दिशेला पसरून लखौली व तराईमधील टेकड्याचे आसपास श्रावस्ती, कपिलवस्तु, कुशीनगर, जनकपूर पाटलीपुत्र, वगैरे शहरें वसली ज्या वेळेस अयोध्या सर्व हिंदुस्थानची राजधानी होती, त्या वेळेस जनकपूर ही वंग देशाची राजधानी होती यानंतर जवळजवळ १००० ते १२०० वर्षें पाटलीपुत्राच्या पूर्वेला मोठाली नवीन शहरें वसल्याचा कोठें उल्लेख सांपडत नाही पुढें गौर शहर बंगालची राजधानी झाली १६०४ च्या सुमारास गौर मागें पडून डाक्का राजधानी झाली व १७०४ च्या सुमारास मूर्शिदाबादेस महत्त्व आलें १७३३ साली जेव्हां इंग्रजाना गंगानदीतून वर उत्तरेकडे येऊन व्यापार करण्याची परवानगी मिळाली तेव्हा सप्तग्राम (हुगळी गाव) हें बंगालचे बंदर होतें या सुमारास ॲडमिरल वॉटसन यानें आपलीं लढाऊ जहाजें थेट चंद्रनगरपर्यंत नेली होती परंतु गंगेचें पात्र हळूहळू अरुंद व उथळ होत चालल्यानें मोठालीं जहाजे आज कलकत्त्याच्या वर जाऊ शकत नाहींत असें ऐकिवांत आहे की, हल्ली गंगेच्या मुखाजवळ असलेल्या गंगासागर बेटाची जमीन संक्रांतीचे सुमारास समुद्राचे वर येते व कांही दिवसानीं ही स्थिति बदलून पुन्हा बेटावर समुद्राचे पाणी खेळू लागतें

हल्लींचें कलकत्ता शहर हुगळीनदीच्या डाव्या किनाऱ्यावर दक्षिणोत्तर १० मैल लांब व ३ मैल रुंद पसरलें आहे या ३० चौरस मैलाचे विस्तारांत मुख्य कलकत्ता शहर व त्याचीं उपनगरें याचा समावेश होतो शहराची चतुःसीमा पुढीलप्रमाणें आहे पश्चिमेस हुगळीनदी, उत्तरेस मराठ्यांचा खंदक व अपर सर्क्युलर रोडचा थोडा भाग, पूर्वेस अपर सर्क्युलर रोड व थोडा लोअर सर्क्युलर रोड, व दक्षिणेस लोअर सर्क्युलर रोड व आदिगंगेचा किदरपूरच्या पुलाच्या पुढचा भाग या चतुःसीमेमध्यें, शामबझार, निमताला, ठणठणिआ, कॉर्नवॉलिस व कॉलेज स्क्वेअर, बडा बझार, चित्तपूर, बहूबझार,

डलहौसी स्क्वेअर, धरमताला, चौरंगी प्लेस, वेलस्ली, एस्प्लनेड, फोर्ट विलियम व त्यापुढील सर्व मैदान हा भाग समाविष्ट होतो मुख्य शहराशिवाय कॉशी-पूर, माणिकतला, एन्टाली, बालीगंज, किदरपूर, अलीपूर, भवानीपूर, कालीघाट, टॉलीगंज, इत्यादि उपनगरे असून या सर्व भागात सुमारे तेरा लक्ष लोकवस्ती आहे कलकत्ता शहर जरी समुद्रापासून सुमारें १०० मैल दूर असलें तरी हुगळीनदीमुळें गलबताच्या वाहतुकीस फार सोयीस्कर आहे येथून ब्रह्मदेश, सयाम, इंडोचायना, चीन, व जपान, वगैरे देशांशीं व्यापार चालतो

## वायुमार्ग

येथून वायुमार्गानें अलाहाबाद, जोधपूर, कराची, रंगून, सयाम या ठिकाणी जातां येतें इंपीरियल एअरवेचें कलकत्ता हें मोठें स्टेशन आहे कलकत्त्यापासून १० मैलावर डमडम येथें विमानांना उतरण्यासाठीं मोठा एअरो-ड्रोम बांधला असून येथें राहण्याची सोय आहे कलकत्त्याच्या उतारूंना त्यांचे घरीं पोहोंचवून देण्यासाठीं कंपनीच्या बसेस आहेत हल्लीं येथून विलायतेला आठवड्यातून पांच वेळा वायुमार्गानें टपाल जातें पाण्यावर उतरणारीं जलविमानें उतरण्यासाठी हुगळीनदीवर बालीपुलाच्या उत्तरेस व्यवस्था केली आहे

## लोहमार्ग

ईस्ट इंडिया रेल्वे, ईस्ट बेंगॉल रेल्वे व बेंगॉल नागपूर रेल्वे या तीन लोहमार्गांनीं कलकत्ता सर्व हिंदुस्थानला जोडलें गेलें आहे बेंगॉल नागपूर व ईस्ट इंडिया रेल्वेचें मुख्य स्टेशन हावरा आहे हावऱ्याहून कलकत्त्यास येण्यासाठी हावरा पूल ओलांडावा लागतो मोठ्या गलबतांना पुलाच्या उत्तरेस जाण्यासाठी रोज या पुलाचा मधला भाग वेगळा करून बाजूस काढून टाकतात अशा वेळीं पुलावरील रहदारी बंद असते वद्य व शुद्ध अष्टमी, नवमी व दशमी या सुमारास हा पूल सकाळी ७ ते ९ पर्यंत उघडा असतो. या वेळेस येथे येणाऱ्या गाड्यांच्या उतारूंना दीड दोन तास स्टेशनवर बसून राहावें लागतें नदी पार करण्यासाठीं पोर्ट कमिशनर्सची बोट असते परंतु

सामान व मंडळी बरोबर असल्यास बोटीनें जाणें सोयीचे होत नाही ईस्ट बेंगॉल रेल्वेचें येथील मुख्य स्टेशन शिआलधा हें शहराच्या पूर्वेस आहे येथून दार्जीलिंग, डाक्का, शिलाँग, चित्तगॉंग, वगैरे शहरांकडे जाणाऱ्या गाड्या सुटतात पश्चिमेकडून येणाऱ्या गाड्यांना हावरा स्टेशनला न आणता विलिंग्डन पुलावरून ई बी. रेल्वेच्या शिआलधा स्टेशनवर आणण्याचा पूर्वी विचार होता, परतु हा विचार बदललेला दिसतो कारण हावरा कलकत्त्यातील दळणवळणासाठी हल्लीच्या हावरा पुलाचे उत्तरेस एक दोन फर्लांगवर नवीन हावरा पूर बाधण्याचें काम सुरू आहे

मुबईप्रमाणें येथे लोकल गाड्यांची उत्तम व्यवस्था नाही तिन्ही रेल्वेच्या लोकलगाड्या आहेत परतु फार थोड्या आहेत कारण बाहेर राहून व्यवसायानिमित्त शहरात येणारांची सख्या येथें फार कमी आहे मुबईच्या लोकलगाड्या जवळजवळ शहरांतूनच जात असल्यामुळे मुबईच्या कोणत्याही भागांत जाण्यास लोकलगाडी सोयीची पडते, तशी स्थिति कलकत्याला नाही कलकत्ता शहराच्या आजूबाजूस शहराच्या वाढीसाठी पुष्कळ जागा असल्यानें त्याची वाढ पत्रावळीप्रमाणें सर्व बाजूनीं होत आहे बाजारपेठ व मुख्य कचेऱ्या शहराच्या मध्यभागी असल्यानें येथील वाहतुकीचीं साधनें म्हणजे ट्राम, बस, मोटारगाड्या, घोडागाड्या, बैलगाड्या, रिक्षा, इत्यादि होत

## ट्राम

ट्रामगाडी शहराच्या सर्व मोठमोठाल्या रस्त्यांवर आहे तिची सुरुवात १८८१ साली झाली त्या वेळी फक्त एकच लाईन असून मधूनमधून समोरून येणाऱ्या ट्रामला वाव देण्यासाठीं वळणें ठेविलेलीं असत. त्या वेळेस या ट्रामगाड्या घोड्याच्या होत्या. सुमारें १९०० सालापासून विजेच्या ट्राम अस्तित्वांत आल्या आज सुमारें चाळीस मैल लांबीचा ट्रामचा रस्ता असून पंचवीस निरनिराळे मार्ग आहेत येथें मुबईप्रमाणें सरसकट एक आणा दर नाहीं लाबीप्रमाणें भाड्याचे दर ठरविले आहेत येथील ट्राम गाड्यामध्ये पुढील डबा पहिल्या वर्गाचा (फर्स्ट क्लास) व मागील डबा दुसऱ्या वर्गाचा (सेकड क्लास) ठेविल्यामुळें पहिल्या वर्गानें जाणारास

गर्दीचा त्रास विशेष होत नाही फर्स्ट क्लासच्या नवीन गाड्यातून गाद्या, विजेचे पखे, वगैरे सुखसोयीची साधनें आहेत मुंबईच्या लोकलगाड्यांप्रमाण ट्रामचा महिन्याचा पास येथें मिळतो त्याचप्रमाणें शनिवार, रविवार व इतर सुटीच्या दिवशीं अबध दिवसाचे टिकिट सहा आण्यास व इतर दिवशीं दुपारी बारा ते तीनपर्यंत स्वस्त दराची तिकिटें वगैरे सवलती कपनीनें लोकांना दिल्या आहेत.

## बस

ट्रामप्रमाणे मोटारबस हें पण येथील एक उपयुक्त सार्वजनिक वाहन आहे जेथे ट्राम जाते तेथे मोटारबस जातेच पण जेथें ट्राम नाहीं अशा शहराच्या इतर भागातूनही बससर्व्हिस आहे बसची सुरुवात १९२४ सालीं झाली व आज या वाहनाची वाढ फार झपाट्यानें होत आहे पूर्वी बसच्या टिकिटांचे दर जरी एक असत तरी प्रत्येक बस स्वतत्र असल्याने पुढें जाऊन उतारू आपल्याकडे ओढून घेण्याचे बाबतीत त्याची आपसात चढाओढ लागे व त्यामुळें बरेच अपघात होत या प्रकाराना आळा घालण्यासाठीं " बेंगॉल बस सिंडिकेट " ही संस्था स्थापन झाली व बसगाड्या जरी निरनिराळ्या मालकांच्या असल्या तरी त्याच्या जाण्यायेण्याचे बाबतीत त्याच्यावर सिंडिकेटचें नियत्रण आहे वेळेवर गाड्या चालण्यासाठी सिंडिकेटनें ठिकठिकाणीं स्वतःचे टाईम कीपर्स व इन्स्पेक्टर्स ठेवलेले आहेत ट्रामप्रमाणें सिंडिकेटनें पण महिन्याच्या पासाची सवलत दिली आहे येथील विविध स्थळी जावयाचें असल्यास भवानीपूर पोलिस स्टेशनपासून कोणती बस घ्यावी ही माहिती त्या त्या ठिकाणच्या वर्णनात " जाण्याचा मार्ग " या सदराखाली पुढें येईल. बस सिंडिकेटच्या नियत्रणाखालीं चालणाऱ्या बसेसचे मार्ग खालीं दिल्याप्रमाणे आहेत —

| बसचा नंबर | बसचा जाण्याचा मार्ग |
|---|---|
| २ | कालीघाटहून निघून, रस्सारोड, चौरगी, डल्हौसी, बहूबझार, कॉलेज स्क्वेअर, कॉर्नवॉलिस स्क्वेअर, व शेवटीं शामबझारला जाते. |
| २ ए | लेकहून निघून कालीघाट, रस्सारोड, चौरगी, घरमताला, वेलिंग्टन |

स्ट्रीट, कॉलेज स्क्वेअर, कॉर्नवॉलिस स्ट्रीट व शेवटीं शामबझारला येते (एक सोडून एक बस लेकला जाते व लेकहून निघते )

३ किदरपूरहून निघून डायमड हार्बर रोड, अज्जकोर्ट रोड, हजरा रोड, अशुतोष मुकर्जी रोड, चौरंगी, धरमताला, लोअर व अपर सर्क्युलर रोड व शेवटी शामबझार.

३ ए शाकेरबझारहून निघून डायमड हार्बर रोड, डफरीन रोड, ऑक्टर लोनी रोड, गव्हर्मेंट प्लेस ईस्ट, डलहौसी, बहुबझार स्ट्रीट, अपर सर्क्युलर रोड, व शेवटी शामबझार

४ बागबझारहून निघून अपर व लोअर चितपूर रोड, लालबझार, डलहौसी, ऑक्टर लोनी रोड, चौरंगी, अशुतोष मुकर्जी रोड, रस्सारोड, व शेवटीं टॉलिगज रेल्वेपुलापर्यंत

४ ए बागबझारहून निघून अपर व लोअर चितपूर रोड, बेंटिंक स्ट्रीट, चौरगी, अशुतोष मुकर्जी रोड, रस्सारोड, व शेवटी टॉलिगज पुलापर्यंत

५ कालीघाटहून निघून रस्सा रोड, अशुतोष मुकर्जी रोड, चौरगी, डलहौसी स्ट्रँडरोड, व शेवटीं हावरापूल ओलांडून हावरास्टेशनपर्यंत

१० बालीगज स्टेशनहून निघून पार्क सर्कस, लोअर सर्क्युलर रोड, हॅरिसन रोड, हावरापूल व शेवटी हावरास्टेशनपर्यंत

११ शामबझारहून निघून अपर सर्क्युलर रोड, हॅरिसन रोड, हावरापूल व शेवटी हावरास्टेशनपर्यंत

११ ए शामबझारहून अपर सर्क्युलर रोड, माणिकताला स्पर, विवेकानंद रोड, जगन्नाथ घाट रोड, स्ट्रँड रोड, हावरापूल व शेवटीं हावरा-स्टेशनपर्यंत

१२ डफरीनहून निघून गार्डनरिच माटिया बुरुज व शेवटी राजा बझारपर्यंत

१२ बी डफरीन रोडहून निघून गार्डनरिच माटिया बुरुज व शेवटी बरतोलापर्यंत

१३ बेंगॉल केमिकल व फार्मास्युटिकल वर्क्सहून निघून माणिकताला, बिडन स्ट्रीट, सेंट्रल ॲव्हेन्यू, एस्प्लेनेड ईस्ट व शेवटीं डलहौसी स्क्वेअरपर्यंत

## टॅक्सी व घोडागाडी

टॅक्सीचा दर एक मैलाला आठ आणे असा आहे तेव्हा तशीच गरज पडल्याशिवाय साधारण मनुष्य टॅक्सीच्या भानगडीत पडत नाही जाण्याचें ठिकाण किती दूर आहे याची कल्पना आपणास असल्यास घोडागाडीप्रमाणे भाडें आधी ठरवून टॅक्सी घ्यावी म्हणजे मीटरपेक्षा स्वस्त पडते किती लाब जावयाचें आहे याची कल्पना आपल्याला नसल्यास मीटरमधील एक रुपयाला दहा किंवा बारा आण्याप्रमाणें प्रथम ठरवून मग टॅक्सी घ्यावी टॅक्सी जर मबध दिवसासाठी हवी असेल तर बारा तासाच्या तहिनातीला टॅक्सीवाला चारपासून पाच रुपये घेतो याप्रमाणे ठरविल्यास पेट्रोल आपण द्यावयाचें असतें पड्याचा रिवाज येथे असल्यामुळें मेण्यासारख्या बद घोड्याच्या गाड्या येथें भाड्यानें मिळतात या गाडीला ठिकागाडी (भाड्याची गाडी) असें म्हणतात मुबईतील व्हिक्टोरियासारख्या गाड्या आता बऱ्याच दिसू लागल्या आहेत या गाड्यांमध्यें कॉर्पोरेशनने ठरवून दिलेल्या भाड्याचे नक्ते लाविलेले असतात, परंतु प्रत्यक्ष भाडे ठरवून गाडी घेणें जास्त उत्तम

## रिक्षा

हे वाहन आपल्याकडे नाही ही गाडी मनुष्य ओढतो यामुळे मुबई-हून आलेल्या मडळींना पूर्वीच्या गुलामगिरीच्या काळाची आठवण होते व मनुष्याच्या गाडीत बसणें बरे वाटत नाही जपानसारख्या स्वातंत्र्याच्या शिखरावर चढलेल्या राष्ट्रामध्यें सुद्धा रिक्षाची पद्धति अद्याप रूढ आहे एखाद्या धडधाकट माणसानें कामाच्या अभावी भुकेनें मरण्यापेक्षा स्वकष्टाने स्वतंत्रपणें रिक्षा ओढून पोट भरलें तर त्यात काय वावगें आहे ? खरें पाहतां आपण त्याचेकडे सहानुभूतीनें पाहून त्याच्या कष्टाचा मोबदला थोडा फार सढळ हाताने दिला पाहिजे रिक्षामध्ये साधारणपणे दोन माणसे बसतात व पायाजवळ थोडें सामान ठेवतां येते जवळपास जाण्यास व बाजार करण्यास हें वाहन फार सोयीचें असते या वाहनाची चाल महाराष्ट्रात पाडली तर बेकार मजूरवर्गाला पोट भरण्याचे एक साधन होईल

## कलकत्ता येथील रुग्णालयें

| नांव | पत्ता |
|---|---|
| १ अलबर्ट व्हिक्टोरिया हॉस्पिटल (महारोगासाठी) | १८ गोब्रा रोड |
| २ अलीपूर पोलिस हॉस्पिटल | ३२।३३ बेलव्हेडियर रोड |
| ३ अष्टांग आयुर्वेद विद्यालयाचें हॉस्पिटल | १७० राजा दिनेंद्र स्ट्रीट |
| ४. इडन हॉस्पिटल (स्त्रियांचेसाठीं) | ८८ कॉलेज स्ट्रीट |
| ५. इंडियन स्टेशन हॉस्पिटल (सैन्याचें) | अलीपूर |
| ६ कलकत्ता होमिओपाथिक कॉलेज व हॉस्पिटल | २६५ अपर सर्क्युलर रोड |
| ७. कलकत्ता मेडिकल इन्स्टिटयुशन | २०१।३ अपर सर्क्युलर रोड |
| ८ कॅम्बेल हॉस्पिटल | १३८ लोअर सर्क्युलर रोड |
| ९ कार मायकेल हॉस्पिटल (उष्ण प्रदेशातील रोगासाठीं) | सेंट्रल अव्हेन्यू |
| १० कार मायकेल मेडिकल कॉलेजचें हॉस्पिटल | १ बेलगाछिया रोड |
| ११ टयुबरक्युलॉसिस हॉस्पिटल (क्षयरोग्याकरिता) | जाधवपूर, लेकच्या दक्षिणेस |
| १२ डफरीन हॉस्पिटल (स्त्रियांचे करिता) | १ अम्हर्स्ट स्ट्रीट |
| १३ पाश्चर इन्स्टिटयूट | २ स्टोअर रोड |
| १४ पोलिस हॉस्पिस्टल | ७७ सभुनाथ पंडित स्ट्रीट |
| १५ प्रतापचंद मेमोरिअल होमिओपॅथिक हॉस्पिटल व कॉलेज | १४।१ नारकेल डागानार्थ स्ट्रीट |
| १६. प्रिन्स ऑफ वेल्स हॉस्पिटल | ८८ कॉलेज स्क्वेअर |
| १७ प्रेसिडेन्सी जनरल हॉस्पिटल | २४४ लोअर सर्क्युलर रोड |
| १८. बेंगॉल मेडिकल इन्स्टिटयूशन | २४, ३ री सुरालेन |
| १९ ब्रिटिश स्टेशन हॉस्पिटल | लोअर सर्क्युलर रोड |

| | | |
|---|---|---|
| २० | मेडिकल कॉलेज हॉस्पिटल | ८८ कॉलेज स्क्वेअर |
| २१ | रामरिकदास हरलालका हॉस्पिटल | १०४ अशुतोष मुकर्जी रोड |
| २२ | विद्याशास्त्रपीठ हॉस्पिटल व कॉलेज | २९४।३।१ अपर सर्क्युलर रोड |
| २३ | विश्वनाथ आयुर्वेद कॉलेज व हॉस्पिटल | ९४ ग्रे स्ट्रीट |
| २४ | (श्री) विशुधानद सरस्वती मारवाडी हॉस्पिटल | ११८ ॲम्हर्स्ट स्ट्रीट |
| २५. | सागर दत्त हॉस्पिटल | कामरहट्टी (बराकपूर ट्रंक रोड). |
| २६ | सभुनाथ पंडित हॉस्पिटल | ११ एलजिन रोड |
| २७ | स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन | सेंट्रल ॲव्हेन्यू |

## कलकत्यातील सिनेमागृहें

| | नांव | पत्ता |
|---|---|---|
| १ | श्री | १३८ कॉर्नवॉलिस स्ट्रीट |
| २. | अलेया | २२० ए रासविहारी ॲव्हेन्यू |
| ३ | अलफरेड सिनेमा | ९१ हॅरिसन रोड |
| ४ | उत्तरा | १३८।१ कॉर्नवॉलिस स्ट्रीट |
| ५ | एलफिन्स्टन | चौरंगी प्लेस |
| ६ | ग्लोब | ७ लिंडसे स्ट्रीट |
| ७ | चित्रा | २८ कॉर्नवॉलिस स्ट्रीट |
| ८. | छबीघर | सिआलधा |
| ९ | छाया | १२२ अपर सर्क्युलर रोड |
| १० | टॉकी शो हाऊस | शामबझार. |
| ११ | न्यू सिनेमा | १७१ घरमताला स्ट्रीट |
| १२ | न्यू एम्पायर | १ हुमायून प्लेस |
| १३ | पूर्णा | २ रस्सारोड, भवानीपूर |
| १४ | प्लाझा | १९ चौरंगी रोड |
| १५ | प्रभात | १३६ सुरेंन्द्रनाथ बानर्जी स्ट्रीट |
| १६. | फर्स्ट एम्पायर | ४ चौरंगी प्लेस |
| १७ | बिजली | ६।१ रस्सारोड. |

| | | |
|---|---|---|
| १८. | भारत लक्ष्मी | २।२।१ चित्तरंजन अॅव्हेन्यू |
| १९ | मेट्रो सिनेमा | ५ चौरंगी रोड |
| २० | रिगल | ४ सुरेन्द्रनाथ बानर्जी स्ट्रीट. |
| २१ | रुबी | ३२ धरमताला स्ट्रीट |
| २२ | रुपाली | ४५ बी अशुतोष मुकर्जी रोड |
| २३ | रूपवानी | ७६।३ कॉर्नवॉलिस स्ट्रीट |
| २४ | सुचित्रा | डायमंड हार्बर रोड, बेहाला. |

## कलकत्त्यांतील नाटकगृहें

| | नाव | पत्ता |
|---|---|---|
| १ | मिनर्व्हा | ६ बिडन स्ट्रीट |
| २ | रंगमहाल | ७६।१ कॉर्नवॉलिस स्ट्रीट |
| ३ | स्टार | ७९।३।३ कॉर्नवॉलिस स्ट्रीट |

एल्फिन्स्टन व ग्लोब सिनेमा गृहात इंग्रजी नाटकें व नाच मधून मधून होतात

# प्रकरण दुसरें

# शहराचा इतिहास

इतर शहराप्रमाणे कलकत्त्याच्या स्थापनेविषयी बऱ्याच आख्यायिका आहेत.

## पौराणिक

दक्षयज्ञानतर शकराने सती (पार्वती) चें शव घेऊन ताडवनृत्यास सुरुवात केली सारें जग घाबरून गेलें तेव्हा श्रीविष्णूनें सुदर्शन चक्रानें सतीच्या शवाचे तुकडे केले हे भाग कायमचे ज्या ज्या ठिकाणी पडले त्या ठिकाणाना क्षेत्राचें माहात्म्य आलें सतीच्या उजव्या पायाचा आगठा ज्या ठिकाणी पडला त्याला कालीक्षेत्र असे नाव प्राप्त झालें काहीं कालानंतर त्याला कालीघाट असें म्हणू लागले व त्याचाच अपभ्रश कलकत्ता असावा असे वाटते

भाषाशास्त्रज्ञ श्री सुनीतिकुमार चतर्जी याचे मत असें आहे की, ("कली" म्हणजे शिपाचा चुना व "काट' म्हणजे ठेवण्याची जागा ) या ठिकाणी पूर्वी कळीच्या चुन्याच्या वखारी होत्या, म्हणून जवळपासचे लोक या जागेला कलीकाट असें म्हणत कलिकाटचा अपभ्रश कलकत्ता झाला

इ स १४९४ मध्ये विप्रदास याने आपल्या मानस मगल या ग्रथात कलिकाता असा उल्लेख केला आहे कलकत्ता नावाचा उल्लेख अबुल फजल-च्या ऐने-इ-अकबरी या ग्रथात आढळतो हा ग्रथ इ स १५९६ त लिहिला गेला सतगाव (सप्तग्राम) या परगण्यात (हल्लीचा हुगळी जिल्हा) कलकत्ता मोडत असून या गावाचा जमीनमहसूल सालिना २३,४०५ रुपये होता असे यात लिहिलें आहे

## ऐतिहासिक

कलकत्त्यास या ठिकाणी पोर्तुगीजांनी आपलें लहानसें व्यापारी ठाणें केलें होतें. परदेशचीं मोठाली जहाजें येथें येण्यास अडचण पडे म्हणून कांही

शेठानीं थोडी दक्षिणेस आपली वसाहत केली, व त्याला गोविंदपूर हें नाव दिलें हल्ली जेथें हेस्टिंग्ज स्ट्रीट आहे त्या ठिकाणी पूर्वी हें गांव होतें या गावाजवळ सुतानती म्हणजे सुताचा बाजार भरू लागला बगाल प्रात तलम कापडासाठी फार पूर्वीपासून प्रसिद्ध असल्यानें सुताच्या व्यापाराला त्या काळीं महत्त्व असावें हें ठीकच आहे कलकत्ता शहर सतराव्या शतकाच्या अखेरीस असलेलीं सुतानती, गोविंदपूर व कलिकाता ही तीन खेडीं मिळून झालें आहे

## सर्जन हॅमिल्टन

दिल्लीचा बादशहा फरुकसेर हा अत्यत आजारी होता हकीम व वैद्य लोकांनी त्याच्या जीविताची आशा सोडली त्या वेळी विल्यम हॅमिल्टन नावाचा एक डॉक्टर दिल्लीस राहात असे त्यानें बादशहाला औषधोपचार करण्याची परवानगी मागितली, व त्याच्या प्रयत्नाला यश येऊन बादशहा चागला बरा झाला तुझ्या कामगिरीबद्दल वाटेल ते बक्षीस माग असें बादशहानें हॅमिल्टनला सागितलें हॅमिल्टननें स्वत साठीं काही न मागता इग्रज लोकाना हिंदुस्थानात व्यापार करण्याची सनद मागून घेतली या देणगीमुळें पुढें हिंदुस्थानचे सर्व साम्राज्य इग्रजाच्या हाती जाणार आहे याची कल्पनाही बादशहाला त्या वेळी आली नसेल

## जॉब चारनॉक

कलकत्ता शहर वसविण्याचें श्रेय ईस्ट इडिया कपनीच्या जॉब चारनॉक या एका अधिकाऱ्याकडे जातें इ स १६९० च्या सुमारास हा गृहस्थ हिंदुस्थानात आला, व त्या वेळच्या नबाबानें त्याला हुगळी येथें राहण्याची परवानगी दिली परतु चारनॉकने अनेक कारणामुळें हुगळीस न राहतां सुतानतीस राहण्याचे पसत केले हें गांव हुगळीपेक्षां समुद्राला जवळ असल्याने गलबताच्या वाहतुकीला जास्त सोयीस्कर होतें, आणि नदीच्या पूर्वकिनाऱ्यावर असल्याने मोगल व मराठे याच्या स्वाऱ्यापासून सुरक्षित होते या कारणानीं येथें व्यापारी मडळी हळूहळू येऊन राहू लागली, व चारनॉकनें पण त्याना पुष्कळ सोयी करून दिल्या पोर्तुगीज, आर्मेनियन, वगैरे बाहेर

देशातील व्यापारी पण येथें येऊन राहू लागले आपण वसविलेल्या शहराची पूर्ण भरभराट पाहण्यापर्यंत चारनॉक राहिला नाही ता १० जानेवारी, १६७२ रोजी तो मेला त्याच्यामागून त्याचा जावई चार्लस् आयर हा सर्व कारभार पाहू लागला

## चार्ल्स् आयर

चार्लस् आयरचे कारकीर्दीत इग्रजाना फोर्ट विलियम हा किल्ला बाधण्याची सधि मिळाली इ स १६७३ च्या सुमारास मिदनापूर येथील शोभासिग नावाच्या सरदारानें बड उभारिलें मूर्शिदाबाद, हुगळी ही ठाणीं काबीज करून तो सुतानतीवर चाल करून आला या निमित्तानें इग्रजानी घाईघाईनें स्वत चा बचाव करण्यासाठी तट बाधण्याची परवानगी नबाबाकडून मिळविली, व लगेच तटाचें बाधकाम सुरू केलें हल्लीं जेथें स्ट्रँडरोड आहे तेथें पूर्वी नदी होती, व हल्लीं ज्या ठिकाणीं मुख्य पोस्ट ऑफिस व ईस्ट इडिया रेल्वेचें ऑफिस आहे तेथें इग्रजानी तट बाधला शोभासिगाचें बड मोडल्यानतरही १६९७ साली या तटावर दहा तोफा ठेवण्यात आल्या अशा रीतीने शोभासिगाच्या बडाचा किल्ला बाधण्याचे कामी इग्रजाना फायदा झाला शोभासिग नदीच्या अलीकडे न आल्याने सुतानती येथील वसाहत सुरक्षित राहिली व नदीच्या पलीकडचा मुलूख मात्र बचिराख झाला यामुळें इतर पुष्कळ व्यापारी मडळी सुतानतीस येऊन राहिली, व अशा रीतीने गावाची वाढ होऊ लागली १६९८ साली सुमारें १६,००० रुपये भरून वरील तीनही गावें इग्रजानी आपल्या सपूर्ण मालकीची करून घेतली मध्यतरीं चार्लस् आयर स्वदेशी गेला व १७०० साली नाइटची पदवी मिळवून परत आला त्यानें किल्ला बाधण्याचा हुकूम मिळविला, व कोणाच्याही डोळ्यांत न भरेल व दुरून साधारण मोठ्याशा वखारीसारखा दिसेल असा किल्ला बाधला इ स १७०२ पासून या गावी ईस्ट इडिया कपनीच्या वखारी व नोकराचे बगले, वगैरे इमारती बाधण्यात येऊ लागल्या

इ स १७०० पासून बगालमध्यें बऱ्याच महत्त्वाच्या राजकीय घडामोडी झाल्या विशेषत बगालच्या नबाबाची कलकत्यावरील स्वारी, ब्लकहोलचा अत्याचार, इंग्रज व फरेंच यांची लढाई, मीर जाफर व सिराज-

उद्दौला यांची चुरस, वगैरे गोष्टी इतिहासप्रसिद्ध आहेतच या सर्वांचें पर्यवसान इ स १७५७ सालीं झालेल्या प्लासीच्या लढाईंत होऊन क्लाइव्हला बंगाल प्रांताची दिवाणी मिळाली व त्यायोगें कलकत्त्याला महत्त्व आले. इ स १७५७ पासून इंग्रजाच्या हाती पूर्ण सत्ता आली व त्याचें लक्ष शहर-रचनेकडे लागले पहिला गव्हर्नर जनरल वॉरन् हेस्टिंग्स् यानेंही बऱ्याच सुधारणा केल्या याच्या कारकीर्दींत येथील एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल ही संशोधनसंस्था स्थापन झाली तसेंच शिवपूर येथील वनस्पतीची बागही अस्तित्वांत आली या दोन्ही संस्थांची माहिती पुस्तकात स्वतंत्र दिली आहे

## १८०३ नंतर

दिनाजपूर, मूर्शिदाबाद, बरद्वान, डाका व पाटणा येथील कर व जमीन-महसूल वगैरेची खाती बंद करून कलकत्ता येथें महसूल कमेटी स्थापन केली वॉरन हेस्टिंग्स्नंतर कॉर्नवॉलिस, वेलस्ली, वगैरे गव्हर्नर जनरलांनीं अनेक सुधारणा घडवून आणल्या हिंदुस्थानात व्यापार करण्याचे जे विशेष हक्क ईस्ट इंडिया कंपनीला देण्यात आले होते ते १८१३ साली काढून घेण्यात आले, व सर्वांनाच व्यापार करण्याची परवानगी मिळाली याचा कल-कत्त्यातील व्यापारावर अनुकूल परिणाम होऊन तो वाढू लागला परंतु १८४७ साली युनियन बँक बंद झाल्यामुळें बऱ्याच व्यापारी पेढ्यांची दिवाळी निघाली, व येथील व्यापारावर फार वाईट परिणाम होऊ लागला "कल-कत्त्यांत व्यापारी नीतिमत्तेचें दिवाळें निघालें" असें यूरोपमध्यें सर्व लोक म्हणू लागले असें एका इंग्रज लेखकाने लिहिलें आहे

## १८१३ नंतर

१८१३ सालीं कलकत्त्याचा टाऊन हॉल बांधण्यात आला १८४७ साली सेंट पॉल चर्च पूर्ण होऊन तेथे यथाविधी क्रूसाची स्थापना झाली १८३१ साली येथे टांकसाळ सुरू केली त्या वेळी प्रथम चांदीचीच नाणीं पाडीत असत. परंतु १८६५ सालापासून तांब्याची नाणी पाडण्यास सुरुवात झाली. कलकत्ता ट्रेड असोसिएशन ही अत्यंत जुनी व्यापारी संस्था याच सुमारास

अस्तित्वांत आली  गव्हर्मेंट हाऊसजवळ असलेला एडन बाग लॉर्ड ऑकलंड यांच्या बहिणींनी याच सुमारास तयार केला  १८७० सालीं बंदराच्या व्यवस्थेसाठी "पोर्ट कमिशनर्स" नेमण्यात आले  या कमिशनरांनी बंदरांत बऱ्याच सुधारणा केल्या. बोटींचे धक्के, घाट व बंदरावरील सर्व व्यवस्था यांचे ताब्यात आहे  व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीची आठवण हिंदुस्थानांत कायम राहावी म्हणून लॉर्ड कर्झन याने स्मारक बांधण्याचें ठरविलें हें स्मारक "व्हिक्टोरिया मेमोरियल" १९२१ साली तेव्हाचे प्रिन्स ऑफ वेल्स, नंतर आठवे एडवर्ड बादशहा व सध्याचे ड्यूक ऑफ वुइंडसर यांचे हस्तें उघडण्यात आलें  १९१२ साली इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट (शहरसुधारणा मंडळ) स्थापन झालें  या मंडळाने शहराच्या रचनेंत बरेच फेरफार केले  दाट वस्तीतून मोठाल्या सडका काढल्यानें मोकळी हवा व उजेड शहरांत जास्त खेळू लागला  जनतेला मोकळ्या हवेंतील व्यायाम घेण्यासाठी ठिकठिकाणी मैदाने व बागा करण्यात आल्या  शहरांत असलेल्या विहिरी व तळी बुजवून शहराचें आरोग्य वाढविण्यात आलें  नवीन नवीन उपनगरे वसवून  शहराच्या वाढत्या वस्तीची सोय करून दिली

त्या वेळीं या शहरीं सिनेमा, नाटकें, खेळांचे सामने, वगैरे आजच्या सारखी करमणुकीची साधने नव्हतीं  साधारण नाटकाची कल्पना असे पण ती आपल्या इकडच्या ललिताच्या स्वरूपाची असत  इ स १८७२ च्या सुमारास बंगालच्या नाटचभूमीवर  पाश्चात्य संस्करण घडून आल्यानें तींत बराच फेरफार झाला  जमीनदाराचे वाडे पाहण्यालायक असत, व हे बघण्यास पुष्कळ लोक जात  बहुतेक वाड्यातून मूर्तिकला व चित्रकला यांना सढळ आश्रय दिलेला पाहण्यात येई  परंतु या सर्व मूर्ती व चित्रें पाश्चात्य कारागिरांनी केलेली असल्यामुळें पैसा परदेशीच जाई  कलकत्त्यातील प्रेक्षणीय स्थळे या सदराखालीं मल्लिक पॅलेसचें वर्णन आहे त्यावरून वरील विधानाची सत्यता पटेल  बहुतेक जमीनदाराचे पदरी गवई, कवी, वगैरे गुणीजनांना आश्रय मिळे

दुर्गापूजेंत जमीनदाराचे वाडे बघावयास मोकळे असत  उत्सवाचे दाही दिवस नाच, गाणे, हरीकीर्तन, वगैरे कार्यक्रम होत व गरिबांना प्रत्येक वाड्यांत उदार आश्रय मिळे  श्री कालीचें मंदिर हें फारच पुरातन असून

त्या वेळपासून देवालयाला जे महत्त्व आलेलें आहे तें आजतागायत कायम आहे या देवालयाची माहिती दुसरीकडे स्वतंत्र दिली आहेच देवीच्या पूजेकरता किती अवाढव्य खर्च होई याची कल्पना पुढें दिलेल्या आकड्यावरून येईल · १६० शेर तांदूळ, १२ शेर साखर, २० शेर मिठाई, १० शेर दूध, १०० केळीं व सुमारें १० बोकड हा झाला रोजचा खर्च विशेष प्रसंगी वरील आकड्यांच्या दसपट खर्च होई श्रीमंत जमीनदार पूजेला आला की असाच सढळ हाताने खर्च करी राजा नवकिशन हा एकदां पूजेला आला असता त्यानें एक लाख रुपये निव्वळ पूजेप्रीत्यर्थ खर्च केला ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारीसुद्धां देवीची पूजा करवीत असत मग ते श्रद्धेमुळें किंवा तो एक राजकीय डाव होता हें सागणें कठिण आहे मात्र या त्यांच्या कृतीमुळें त्या वेळच्या हिंदु समाजाच्या मनावर बराच परिणाम झाला असला पाहिजे

## तत्कालीन इंग्रज समाज

कंपनीच्या काळात येथून इंग्लंडला जाण्यास जवळजवळ एक वर्ष लागत असे या कारणाने येथें आलेल्या युरोपियनाला एकलकोंडेपणाने राहण्याची वेळ येई इग्लंडमधून इकडे आलेल्यानीं कसें वागावें याचे नियम सरकार घालून देई तरीही एकंदर युरोपियनाची राहणी व वागणूक नीतिनियमाना सोडूनच होई व्यापार म्हणजे जुगार, श्रीमंत तो सर्वगुणी, उघडकीला आल्यासच पापाचा दोष, अशा तऱ्हेची रूढि त्या वेळी प्रचारांत होती मधूनमधून एतद्देशीय स्त्रियाशी विवाह केले जात. स्वत· जॉब चारनॉकनेंच एका हिंदु विधवेशी लग्न केलें होतें ती गोष्ट मोठी मजेदार आहे एके दिवशीं चारनॉक हुगळी नदीच्या कांठी हिंडत असता एका तरुण विधवेला सर्व शृंगार घालून तिच्या म्हाताऱ्या नवऱ्याच्या प्रेताबरोबर ' सती " देण्याकरता नेण्यात येत होतें तिच्या रूपानें चारनॉक मोहित झाला स्वत· ती स्त्री सती जाण्यास तयार नाही हे पाहून इतर मडळीच्या साहाय्यानें त्यानें तिला सोडवून आपल्या घरी नेलें व तिच्याशीं लग्न लावलें. या स्त्रीपासून त्याला बरीच मुलें झाली

त्या काळच्या परकीयाच्या करमणुकीच्या साधनात बिलियर्ड, बोटिंग

व बोट ट्रिप्स् याचा समावेश प्रामुख्यानें होता बिलियर्ड पैसे लावून जुगारी-प्रमाणें खेळत याची राहणी फार खर्चाची व ऐषआरामाची असे पुष्कळ नोकर ठेवणें हें एक ऐश्वर्याचें लक्षण समजले जाई चार माणसाच्या कुटुबा-करिता ११० नोकर असल्याचा उल्लेख फरान्सिसच्या सेक्रेटरीनें एका ठिकाणीं केला आहे जुगार फार मोठ्या प्रमाणात खेळत असून घोडचाच्या शर्यतीही चालत त्या सुमारास कलकत्त्यात घोडचाची शर्यत खेळण्याची दोन मैदानें होतीं तसेंच सोडतीचीही पद्धत बरीच चालू असे

## नवीन धार्मिक चळवळी

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारभापासून कलकत्ता येथें धार्मिक सुधा-रणेच्या चळवळींना सुरुवात झाली पहिला सुधारक राजा राममोहन रॉय हा इ स १८१४ ते १८३० पर्यंत येथें होता यानें सामाजिक सुधारणेची-ही चळवळ करून शिवाय इग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला सती व वर्ण-व्यवस्था हीं मोडून टाकण्याबाबत त्यानें बरीच खटपट केली तो पक्का वेदाती होता मूर्तिपूजा त्याला पसत नसल्याने सामुदायिक प्रार्थनेकरितां उपासना सभा ही संस्था त्यानें स्थापिली इ स १८३० सालीं हा थोर पुरुष यूरोपला गेला, व १८३३ मध्ये तिकडेच मरण पावला

धार्मिक सुधारणेची चळवळ त्याच्या मागून महर्षि देवेद्रनाथ टागोर यानी चालविली टागोर व त्यांचे सहकारी याना वेदाबद्दल फारसा आदर नव्हता पण उपनिषदांना ते प्रमाण मानीत म्हणून याच्या चळवळीला सनातनी लोकाचा फारसा विरोध नव्हता केशवचंद्र सेन याची मतें टागोरां-च्या मताशी पटत नसत सेन याचेवर बायबलाचा फार परिणाम झालेला होता इ स १८६६ चे सुमारास टागोर व सेन याचे बिनसले व सेनबाबूनी ब्रह्म समाज स्थापन केला इ स १८७८ साली ब्रह्म समाजातही फाटाफूट होऊन त्यातल्या कांही विद्वान् मंडळीनी साधारण ब्रह्म समाज ही सस्था स्थापन केली

वरील चळवळीचा व मिशनऱ्याच्या चळवळीचा हिंदुसमाजावर परि-णाम होऊ लागला तेव्हा हिंदुधर्माभिमान्यानीं विरुद्ध चळवळ सुरू केली राजा राधाकात देव व रामकमल सेन हे जमीनदार या चळवळींत असल्यानें

त्याचा परिणाम चागला होऊ लागला इ स १८३० साली हिंदुधर्माभिमान्यानी धर्मसभा नावाची संस्था स्थापन केली श्रीमत् भगवद्गीतेचा पुरस्कार करण्यात येऊ लागला, व विख्यात वंग कादबरीकार बंकिमचद्र चतर्जी यानी गीतेचे बंगालीत भाषातर केले हिंदुधर्माच्या पुरस्काराला श्रीरामकृष्ण परमहस याची बरीच मदत झाली पुढे त्याचे शिष्य स्वामी विवेकानद यानी तर हिंदुधर्माची महति सर्व जगालाच पटविली शिकॅगो येथील सर्वधर्मपरिपदेंत जमलेल्या सभासदाना हिंदुधर्मातील उच्च तत्त्वे पटवून खुद्द अमेरिकेंत बरेच अनुयायी मिळविले या सर्वांचा परिणाम बंगाली तरुणांवर होऊन त्यांना स्वधर्माबद्दल आसक्ति वाटू लागली शिकॅगोहून परत आल्यावर विवेकानदानी इ स १८९९ मध्यें रामकृष्ण मिशन ही संस्था स्थापन केली आज या सस्थेच्या जवळजवळ शंभर शाखा नुसत्या हिंदुस्थानांत असून सर्व जगभरही त्याच्या शाखा पसरलेल्या आहेत

## नव्या सामाजिक चळवळी

इ स १८४० चे सुमारास विधवाविवाहाची चळवळ सुरू झाली इ स १८४५ सालीं मोतीलाल शील यानीं स्वजातींतील विधवेशीं पुनर्विवाह करणाऱ्या तरुणाला दहा हजार रुपयाचें बक्षीस जाहीर केलें होतें पुढें ही चळवळ पडित ईश्वरचद्र विद्यासागर यानी हाती घेतली ईश्वरचंद्रानी याबाबत साधकबाधक प्रमाणे देऊन एक पुस्तक छापिलें इ स १८५६ च्या सुमारास बऱ्याच लोकाच्या सह्याचा एक अर्ज सरकारकडे पाठवून विधवा विवाहाचा कायदा पास करवून घेतला याच सुमारास पडितजींनीं बहुपत्नीकत्वाच्या चालीविरुद्ध चळवळ सुरू केली इ स १८५५ च्या सुमारास बऱ्याच प्रतिष्ठित लोकांच्या सह्याचा अर्ज कायदेमडळाकडे पाठवून या चालीलाही कायद्यानें बदी करण्याचा प्रयत्न केला पण त्यात फारसें यश आलें नाही

## राजकीय चळवळ

कपनी सरकारच्या राज्यात जीवित व वित्त सुरक्षित असून प्रजेला धार्मिक स्वातत्र्य असे व या कारणानें बंगालमध्यें अठराव्या शतकाच्या मध्या-

पासून सुरक्षितता व शातता नादत होती याचा परिणाम असा झाला की, ज्या वेळेस हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमान राज्यें आपआपसात भाडण्यात मग्न होती त्या वेळीं बगाल्यात शैक्षणिक, बौद्धिक व आर्थिक उन्नतीला सुरुवात झाली होती इंग्रजानीं नवीन नवीन मुलूख जिंकावा व जिंकलेल्या मुलखात सुव्यवस्थित राज्यपद्धति लावण्यासाठीं इग्रजी शिकलेल्या सुशिक्षित बंगाली लोकाची दुय्यम अधिकाराच्या जागेवर नेमणूक करावी अशी प्रथा असे इंग्रज व्यापाऱ्याची अडतेगिरी व नोकरी करून बगाली लोकानाही विपुल पैसा मिळे. अशा रीतीनें पैसा, सत्ता व मानमरातब मिळत असल्यानें जवळजवळ १८५७ पावेतों बंगाली लोकाना राजकीय चळवळीची जरूरी भासली नाही, व त्यामुळे राजा राममोहन रॉयसारख्या कर्तृत्ववान् पुरुषानें धार्मिक व सामाजिक चळवळीत पुढाकार घेतला इ स १८५१ साली बंगालमध्यें ब्रिटिश इडियन असोसिएशन स्थापन झाली व तिच्या द्वारा डॉ राजेंद्रलाल मित्र व रामगोपाळ घोप यानीं सार्वजनिक कामें केलीं स्वातत्र्य गमावलेल्या हिंदुस्थानातील राष्ट्रानी पुन्हा तें मिळविण्यासाठी इ स १८५७ साली शेवटचा सशस्त्र प्रयत्न केला, परतु त्याला यश आलें नाही या चळ-वळीत बंगालनें मुळीच भाग घेतला नाही या लढ्याचा (इग्रज इतिहासकार त्याला सत्तावन सालचें बड म्हणतात ) बींमोड केल्यानंतर बगालमध्यें विश्वविद्यालय व हायकोर्ट स्थापन करण्यात आलें १८६२ च्या सुमारास येथे कायदेमडळ स्थापन होऊन येथून नवीन युगाला सुरुवात झाली या सुमारास सार्वजनिक चळवळ विशेष सुसघटित नसली तरी वर्तमानपत्रद्वारा होणाऱ्या टीकेचा परिणाम सरकारी अधिकाऱ्यावर होत असे १८५३ सालीं आय सी एस ची परीक्षा इग्लडमध्यें सुरू केल्यानें सरकारी खात्यांत हिंदी लोकाना मोठ्या नोकऱ्या मिळणे कठिण झालें, व येथून बगालमध्ये राजकीय चळवळीला सुरुवात झाली असावी असे वाटते १८७२ साली सुरेंद्रनाथ बानर्जी व आनदमोहन घोष यानीं इंडियन असोसिएशन नावाची सस्था स्थापन करून तिच्या विद्यमानें देशभर दौरा काढून सरकारी राज-नीतीवर कडक टीका केली लॉर्ड सॅलिसबरीनें सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेस बसण्याची वयोमर्यादा १९ वर्षापर्यंत कमी केल्यानें या प्रतिगामी धोरणावर लोकमत जागृत करण्यासाठीं सुरेंद्रनाथ बानर्जी यानी मोठी चळवळ सुरू

केली व पार्लमेंटला अर्ज करण्याचेंही ठरलें १८८३ त सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी कलकत्त्यास अल्बर्ट हॉलमध्यें राजकीय परिषद भरविली लगेच दुसरे वर्षी येथें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन पण झालें या प्रदर्शनात नॅशनल कॉंग्रेसची मूळ स्फूर्ति आहे असें रे जॉन मरडॉक याचें म्हणणें आहे

देशात पडलेला दुष्काळ, रशियाच्या पद्धतीवर नोकरशाहीनें केलेले नवीन नवीन कायदे, अफगाण युद्धात झालेला अवाढव्य खर्च व १८७७ साली भरलेला उधळा दिल्लीदरबार, यांमुळें हिंदी जनता अगदीं त्रस्त होऊन गेली मुद्रणस्वातन्त्र्य, सभा भरविण्याचे हक्क व विश्वविद्यालयाचे स्वातंत्र्य काढून घेण्यांत आले यामुळें लॉर्ड लिटन याचे कारकीर्दींत अशांतता व बंड होण्यापर्यंत पाळी आली ही अशांततेची वाफ बाहेर सोडून देण्याकरिता मि ह्यूम यानी हिंदुस्थानांत एक राष्ट्रीय संमेलन भरविण्याचें ठरविलें, व ता १ मार्च १८८३ रोजीं कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीधराना एक अनावृत्त पत्र लिहिले " लोकसत्ताक राज्यपद्धति, वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपासून अलिप्त-पणा व तुम्हांपैकीं जो सर्वश्रेष्ठ त्यानें सर्वांचे सेवक व्हावें, हें ध्येय पुढें ठेवून देशाची सेवा करण्यास तुम्ही तयार व्हा, व आपण राष्ट्रीय संस्था स्थापन करू ' अशा अर्थाचा मजकूर त्या पत्रात होता मि ह्यूम यानी १८८५ सालीं सिमल्यास लॉर्ड डफरीन याची भेट घेऊन त्यांना राष्ट्रीय सभेची खरी कल्पना दिली इंडियन नॅशनल कॉंग्रेस ज्या धोरणानें स्थापन करण्यांत आली व ज्या धोरणानें तिचें काम आजपर्यंत चालू आहे त्याच्या मुळाशी खरोखर लॉर्ड डफरीन होते ही गोष्ट पुष्कळांना आश्चर्यकारक वाटेल राष्ट्रीय सभेची कल्पना आपण सुचविली ही गोष्ट हिंदुस्थानातील आपली कारकीर्द संपेपर्यंत गुप्त ठेवण्याचें वचन लॉर्ड डफरीन यांनीं मि ह्यूमजवळून घेतलें मि ह्यूम याचे खटपटीनें ता २८–१२–१८८५ रोजी मुंबई येथे गोकुळ-दास तेजपाळ संस्कृत कॉलेजच्या भव्य इमारतीत श्री बाबू उमेशचंद्र बानर्जी या बंगाली गृहस्थाच्या अध्यक्षतेखालीं इंडियन नॅशनल कॉंग्रेसचें पहिले अधि-वेशन झाले १८८६ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनास दादाभाई नौरोजी हे अध्यक्ष होते १८९६ साली रहिमतुल्ला सयानी याचे अध्यक्षतेखाली कलकत्त्यास पुन्हा कॉंग्रेस झाली अशा रीतीनें आधुनिक राष्ट्रीय चळवळीत बंगालनें बराच पुढाकार घेतला उमेशचंद्र

बानर्जी, सुरेंद्रनाथ बानर्जी, आनदमोहन घोष, मनमोहन घोष, लालमोहन घोष, कालिचरण बानर्जी, वगैरे मडळी राजकीय चळवळीचें खडतर कार्य मोठ्या उत्साहानें करीत होती

राज्यकारभाराला सोयीचे पडावे म्हणून पूर्व बगाल आसामला जोडण्याची योजना कर्झन साहेबाचे अमदानीत २० जुलै, १९०५ रोजी जाहीर झाली बगाल प्राताचे तुकडे करून बगाली राष्ट्राची मानखडना करण्याचा व त्याला दुर्बल करण्याचा हा प्रयत्न आहे अशी लोकाची भावना झाली व जनतेच्या मनोवृत्तीची चलबिचल सुरू झाली हिंदी जनतेला प्रतिकार करण्याची कल्पना प्रथम या चळवळीत सुचली म्हणून तिला विशेष मान् व महत्त्व आहे आतापर्यंत अर्ज, विनत्या, सभा, निषेध व ठराव यापलीकडे लोकाची मजल गेली नव्हती या चळवळीत ब्रिटिश मालावर बहिष्कार व स्वदेशीव्रत याचा प्रचार हिंदी जनतेंत करण्याचे ठरले या चळवळीला पदोपदी सरकारचा विरोध होत असल्याने, सरकारी नोकर जमीनदार, राजेमहाराजे, वगैरे मडळी या चळवळीतून हळूहळू अग काढू लागली विद्यार्थ्यांनी चळवळीत पडू नये अशी हुकुमवजा सर्क्युलरें निघालीं याच सुमारास बंकिम बाबूच्या आनदमठ कादबरीतील "वदेमातरम्" या पद्यानें गोंधळ माजविला वदेमातरम् म्हणजे बाघो मारो व सुरेंद्रनाथ म्हणजे "सरेंडर नॉट" (surrender not) असा राज्यकर्त्यांनी अर्थ काढला व त्यामुळें "वदेमातरम्' पद गाणे हा गुन्हा ठरला आनदमठातील ओसाड अरण्यातून हिंडणाऱ्या चोरट्याना गाण्याकरिता लिहिलेलें पद्य अखेर राष्ट्रगीत होऊन बसले याचे हें विलक्षण भाग्य पाहावयास बकिम बाबू जिवत राहिले नाहीत

बारीसाल येथील राजकीय परिषदेत 'वदेमातरम्' पद म्हणू नये असा सरकारी हुकूम निघाला लोकानी तो मोडण्याचें ठरविले व अध्यक्षाच्या मिरवणुकीत 'वदेमातरम्" पद गाण्यास सुरुवात केली पोलिसानीं लाठीमार करून मिरवणूक उधळून लाविली तीच स्थिति मिदनापूरच्या सभेची झाली गुरखे शिपायानी घरात शिरून मारहाण केली व स्त्रियाची अब्रू घेतली या सर्वांमुळे जनतेंत सरकारबद्दल अत्यत तिरस्कार उत्पन्न होऊन मानहानीच्या तीव्र वेदनेत क्रांतिकारक चळवळीचा जन्म झाला हें

हत्याकांड इ स १९३५ पावेतों सुरू होतें इ स १९०३ च्या शिवाजी उत्सवात मुसलमानांनीं भाग घेऊन जनतेमध्ये कै देऊसकराच्या " शिवाजीचा थोरपणा ' या लेखाच्या प्रती वाटल्या बारीसाल येथील परिषदेचे अध्यक्ष बॅरिस्टर रसूल व चळवळीचे पुढारी मौलाना लिकायत हुसेन हे दोघेही मुसलमानच होते यावरून हिंदु-मुसलमानांत हा वेळपावेतों ऐक्य नांदत होते पूर्वबंगालचे तत्कालीन ले गव्हर्नर सर बॅमफील्ड फुल्लर यांनी चळवळीचा बीमोड करण्यासाठी या दोन जातीत वैमनस्य लावण्याचे प्रयत्न केले हिंदु व मुसलमान जाती या दोन माझ्या राण्या असून पैकीं मुसलमान राणी माझी आवडती अशी उपमा देऊन आपलें पक्षपाती धोरण जाहीर केलें हें धोरण सरकारनें आजपावेतों सुरू ठेवलें आहे अँग्लो इंडियनांच्या चिथावणीला भुलून डाक्याच्या नवाबांनी १९०७ साली मुस्लीम लीग स्थापन केली सरकारी धोरणाचा फायदा घेऊन धर्मवेड्या मुसलमानांनीं हिंदूंना बाटविण्याचा सपाटा चालविला, व राष्ट्रीय भावनेनें गुंग झालेल्या हिंदू पुढाऱ्यांना स्वधर्मीयांना मदत करण्याची जरूरी भासली नाहीं बंगालमधील गत पुढाऱ्यांच्या अदूरदर्शीपणाची फळें हिंदू जनतेला आज भोगावी लागत आहेत बंगालमध्यें १९३५ च्या कायद्यानें मुसलमानी राजसत्ता निर्माण झाली असून ती लौकर जाईल असें वाटत नाही

इ स १९०६ सालीं पुन्हा कलकत्त्यास कॉंग्रेस झाली तिचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी होते स्वराज्याच्या ध्येयाचा जाहीर स्पष्टोच्चार करून राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशीव्रत व परकी मालावर बहिष्कार हे स्वावलंबनाचे मार्ग देशानें स्वीकारावेत असे त्यांनीं सांगितलें राष्ट्रीय सभेनें येवढी आघाडी मारणें नेमस्तांना योग्य न वाटल्यानें सुरतेची कॉंग्रेस मोडली व त्यांनी आपले कन्व्हेन्शन स्थापन केलें त्यानंतर दोन महिन्यांनी पबन्यास प्रांतिक परिषद भरली तेथें रवींद्रनाथ टागोर यांनी नव्याजुन्याचा मिलाफ करून दिला, व बंगालपुरतें तरी हें नवीन भांडण मिटले व १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या ठरावाप्रमाणें पुढे पाऊल टाकावयाचें ठरलें. इ स १९०७–८ मध्यें हिंदुस्थानला मोर्ले-मिंटो सुधारणा मिळाल्या, परंतु १९०८ सालीं लोकमान्य तुरुंगात गेल्यानें धडाडीच्या राजकारणाला मंदी आली १९११ सालीं राज्यारोहणाचे निमित्तानें बंगालची फाळणी रद्द करून राजधानी कल-

कत्याहून दिल्लीस गेली १९१४ साली लोकमान्य सुटून परत आले व १९१६ चे सुमारास त्यानी होमरूल लीगची मोठी चळवळ सुरू केली, आणि नेमस्तांशीं शक्य तितकी तडजोड करण्याचे प्रयत्न सुरु केले १९१७ साली बेझंट-बाईंच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्यास कॉंग्रेसचें अधिवेशन झालें त्या वेळीं राय वैकुंठनाथ सेन, अंबिकाचरण मुजुमदार, सुरेंद्रनाथ बानर्जी, भूपेंद्रनाथ बसू याचा "जुना नेमस्त" व नुकतेच राजकारणात पडू लागलेले सी आर दास, बी के लाहिरी, जितेंद्रलाल बानर्जी याचा "होमरूलर व नॅशनॅलिस्ट" असे दोन जबरदस्त पक्ष कलकत्त्यास होते १९१८ चे सुमारास मॉटग्यू-चेम्स्फर्ड सुधारणा मिळाल्या व त्याच वर्षी युद्ध पण थाबलें १९२० सालीं लोकमान्य दिवगत होऊन राष्ट्रीय सभेची सूत्रें गाधीच्या हातात गेलीं व त्यानतर बगालची अशी राजकीय चळवळ स्वतत्र न राहता हिंदुस्थानाच्या राजकीय चळवळींत ती मिसळली पुढें सबध चळवळीस काय धोरण लागलें वगैरे माहिती सर्वांना विदित असल्यानें त्याबाबत लिहिण्याचें कारण नाही

# प्रकरण तिसरें

# कलकत्ता कॉर्पोरेशन

## [नगरसभा]

कलकत्ता व मुंबई ही दोन्ही शहरें इंग्रजानीच वसविली व वाढविली. या दोन बंदरांतूनच मुख्यतः संबंध हिंदुस्थानचा परदेशाशी व्यापार चालतो. कलकत्त्याला तागाच्या गिरण्या आहेत तर मुंबईस कापसाच्या आहेत. बहुतेक सर्व दृष्टीनीं दोन्ही शहरें सारखी व सारख्याच योग्यतेचीं असूनही मुंबईहून हें शहर फार विस्तीर्ण आहे. येथील कॉर्पोरेशनला जितके अधिकार आहेत तितके या देशांतील इतर कोणत्याही नगरसभेला नाहींत. याचें श्रेय मुख्यतः सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांना दिलें पाहिजे. ते दिवाण असतांना त्यांनीं १९२३ चा कायदा पास करून घेतला. कलकत्ता शहराची स्थापना सुमारें १६९० मध्यें झाली. जशी शहराची वाढ होत गेली तसा त्याचा विस्तारही वाढला. आज म्युनिसिपल हद्दींत ३१॥ चौरस मैलांचा प्रदेश आहे. या वाढीबरोबरच त्याची स्वच्छता, आरोग्य, इत्यादि स्थानिक कारभाराची व्यवस्था करण्याची योजना करणें आवश्यक झालें. पहिल्यानें हा अधिकार कंपनीच्या एका सिव्हिल सर्व्हंटाकडे देण्यांत आला. त्या वेळीं यास जमीनदार अगर कलेक्टर असें म्हणत.

इ. स. १७२७ सालीं एका बादशाही सनदेनुसार शहरव्यवस्थेचा कारभार एक " मेयर " व नऊ " आल्डरमेन " यांच्याकडे सोपविण्यांत आला. शहराच्या व्यवस्थेखेरीज दिवाणी व फौजदारी किरकोळ खटल्याचा निकाल देणें व इंग्रज लोकांच्या धार्मिक बाबींवर नियंत्रण ठेवणें, वगैरे कामें या मेयर-च्या कोर्टाकडे असत. सन १७२९ मध्यें स्थानिक लोकांवर कर बसवून टाऊन हॉल किंवा कोर्टाची इमारत हल्लींच्या सेंट ॲन्ड्र्यूझचे चर्चचे जागीं बांधण्यांत आली. कॉर्पोरेशनला १७५३ सालीं नवी सनद देण्यांत आली. परंतु कॉर्पोरेशनच्या कारभारांत फारशी सुधारणा झाली नाहीं. मेयर व त्याच्या सहकाऱ्यांना शहराच्या साफसफाईसाठीं व सुधारणेसाठीं सुमारें तीन लाख रुपये घरपट्टीच्या रूपानें वसूल करण्याचा अधिकार देण्यांत आला.

त्याचप्रमाणें भुईभाडें, दस्तुरी व नाकेपट्टी यापासून होणाऱ्या उत्पन्नातून शहराच्या सरक्षणासाठी व रात्री गस्त घालण्यासाठी ठाणेदार आणि पहारेकरी नेमण्यात आले इतकेंही करून शहराची सुधारणा होईना व स्वच्छता तर मुळीच नव्हती सन १७९४ मध्ये त्या वेळच्या गव्हर्नर जनरलनें कलेक्टरकडील म्युनिसिपालिटीसबधींचा अधिकार काढून घेऊन ' जस्टिस ऑफ दि पीस ' याची या कामाकरिता नेमणूक केली व त्याना करवसुलीचे अधिकार देण्यांत आले या नवीन व्यवस्थेमुळें शहरात बऱ्याच सुधारणा घडून आल्या नवीन रस्ते तयार झाले व जुन्याची निगा राहू लागली याच सुमारास सर्क्युलर रोड खडीचा करण्यात आला

इ स १८०३ मध्ये लॉर्ड वेलस्ली यानें नगरव्यवस्थेंत सुधारणा करण्याचे ठरविले या सुधारणा पुढील ३० वर्षांत ' शहर सुधारणा कमिटी "नें व १८१७ मध्यें स्थापन झालेल्या सोडत कमिटीने अमलात आणिल्या सोडतीच्या उत्पन्नाचा विनियोग जुनी तळी बुजविणें व नवीं खणणें, नवे रस्ते व घाट बांधणें वगैरे कामाकडे होत असे रस्त्याची दुरुस्ती वगैरे कामें मात्र या पैशातून करिता येत नसत १८३३ पासून नगरसभेला थोडेफार लोकसत्ताक स्वरूप देण्याचा विचार होऊ लागला काही विशिष्ट कर देणाऱ्या लोकाना शहराच्या चार विभागांकरिता म्युनिसिपल कमिट्या निवडण्याचा अधिकार मिळाला या कमिट्याना फक्त सल्ला देण्याचा अधिकार असे १८३६ साली लॉर्ड ऑकलड यानें म्युनिसिपल सुधारणा कमेटी नेमिली या कमेटीनें एकदर परिस्थितीचा पूर्ण विचार करून इ स १८४७ मध्ये एक तपशीलवार अहवाल प्रसिद्ध केला या अहवालात इतर सूचनाबरोबर शहरसुधारणेविषयीं काही सूचनाही केल्या होत्या शहरांत मलेरियासारखे रोग अस्वच्छतेमुळें होतात याचा उल्लेख करून एका मोठ्या इस्पितळाची व शहरातील साडपाण्याचा निकाल करण्यासाठी गटाराची किती आवश्यकता आहे हें या अहवालात निदर्शनास आणिलें होतें इ स १८४० च्या कायद्यान्वयें शहरातील कोणत्याही विभागातील कर देणाऱ्या लोकांपैकी दोनतृतीयाश लोकांनी मागणी केल्यास त्या विभागात कर बसविणे, तो वसूल करणे, इत्यादि अधिकार त्या विभागाला देण्यात येत

इ स १८४७ साली नऊ सभासदाच्या एका बोर्डाकडे साफसफाई-

खातें देण्यांत आलें नवापैकी तीन सभासद सरकारनियुक्त व बाकीचे शहराच्या निरनिराळ्या भागातर्फे निवडून आलेले असत उत्तरोत्तर या बोर्डाला आणखी अधिकार मिळू लागले इ स १८६३ मध्यें कॉर्पोरेशनच्या खर्चावर सर्वसाधारण नियंत्रण ठेवण्याचा अधिकार लोकनियुक्त सभासदांना देऊन मंजूर झालेल्या ठरावाची अमलबजावणी करण्याचें काम मात्र एका पगारी अधिकाऱ्याकडे सोंपविण्यात आले या कायद्याप्रमाणे बंगाल, बिहार व ओरिसा प्रांतातील कलकत्त्यांत राहणारे सर्व जस्टिस ऑफ दि पीस, व शहरातील जस्टिस ऑफ दि पीस कॉर्पोरेशनचे सभासद झाले ही योजना एकंदरीत फारशी सोयीची ठरली नाही तेव्हां १८७६ मध्यें एक नवा कायदा करण्यात आला या कायद्यान्वयें म्युनिसिपालिटीतील ७२ सभासदांपैकी दोनतृतीयांश कर भरणाऱ्यांनी निवडावयाचे व बाकीचे सरकारनें नेमावयाचे अशी योजना होती अध्यक्ष व उपाध्यक्षाची नेमणूक, कमिट्यांची निवडणूक वगैरे १८६३ च्या कायद्याप्रमाणेंच होत असे येवढ्या मोठ्या सभेला सर्व बारीकसारीक कामावर देखरेख करतां येणे शक्य नसल्याचें आढळून आल्या-मुळें १८७७ साली एक टाऊन कौन्सिल नेमण्यात आलें या टाऊन कौन्सिल-मध्यें सर्व कमिट्यांचा अंतर्भाव करण्यात आला ही योजना यशस्वी ठरल्यानें तिला पुढें कायदेशीर स्वरूप देण्यात आलें

इ स १८८४ मध्यें सभासदांची संख्या ७५ करण्यांत आली यापैकी १५ सरकारनें नेमिलेले, ५० लोकांनीं निवडलेले, ४ बेंगॉल चेंबर ऑफ कॉम-र्सचे, ४ ट्रेड असोसिएशनचे व २ पोर्टकमिशनरचे प्रतिनिधी असत १८९९ च्या कायद्यान्वये सभासदांची एकंदर संख्या ७५ च्या ऐवजीं ५० करण्यात येऊन, लोकनियुक्त सभासदांची संख्या २५ केली लोकमत या कायद्याच्या विरुद्ध होतें या कायद्यान्वये कॉर्पोरेशन, जनरल कमिटी, व चेअरमन अशी अधिकारत्रयी नेमण्यांत आली. या कायद्याच्या अस्तित्वाच्या काळात शहरात पुष्कळ सुधारणा झाल्या हल्लींच्या नगरसभेची घटना १९२३ साली पास झालेल्या नव्या कायद्यानुसार आहे हा कायदा सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या श्रमाचें फळ आहे या कायद्याप्रमाणें माणिकताला, काशीपूर, चितपूर, गार्डनरिच, टॉलीगंज, बालीगंज हे सर्व भाग नगरसभेच्या कक्षेंत समाविष्ट करण्यात आले मतदानाच्या सोयीकरता शहराचे ३२ भाग पाडून

त्या सर्वांचे मिळून एकदर ६३ सभासद निवडले जातात त्यांपैकी १५ जागा मुसलमानासाठी राखीव आहेत त्याशिवाय बेंगॉल चेंबर ऑफ कॉमर्स, ट्रेड असोसिएशन, पोर्टकमिशन या संस्थाकडून एकदर १२ प्रतिनिधी निवडले जातात सरकार १० सभासद नेमतें आल्डरमेनांची निवडणूक लोकनियुक्त व सरकारने नेमिलेल्या सभासदाच्या सयुक्त सभेत सर्वसाधारण निवडणुकीनतर लगेच करण्यात येते या सर्वांच्या पहिल्या सभेत सभासदापैकी दोघाची मेयर व डेप्युटी मेयर म्हणून निवडणूक होते कॉर्पोरेशन आपले प्रमुख अधिकारी स्वतःच नेमतें चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर, चीफ इंजिनियर, चीफ अकौन्टट, हेल्थ ऑफिसर व सेक्रेटरी हे मुख्य अधिकारी होत यांपैकी चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर हा सर्वांत वरिष्ठ दर्जाचा पगारी अधिकारी असून इतर सर्व अधिकारी याचे हाताखाली काम करतात

जमिनीवरील कर, घरपट्टी, विशिष्ट धद्यावरील कर, वाहनें, कुत्रे, घोडे, वगैरेवरील कर या नगरसभेच्या उत्पन्नाच्या प्रमुख बाबी असून तिचें वार्षिक उत्पन्न जवळजवळ दोन कोटी सदतीस लक्ष आहे विशेष कामाकरिता गरज पडल्यास सरकारचे परवानगीने दोन तीन लाखापर्यंत कर्ज उभारण्याचाही अधिकार नगरसभेला आहे वरील कायद्यान्वयें नगरसभेचे हिशेब तपासणाऱ्या ऑडिटरना मोठे अधिकार मिळाले आहेत गैरकायदा केलेला कोणताही खर्च नामजूर करण्याचा अधिकार ऑडिटरला आहे

पाल्टा व ताला या दोन पंपिंग स्टेशनामधून सर्व शहरभर पिण्याकरिता गाळून स्वच्छ केलेले पाणी पुरवितात ताला पंपिंग स्टेशन डमडमजवळ असून येथे पाणी साठविण्याकरिता जमिनीपासून ११० फूट उंचीवर तलाववजा एक लोखडी टाकें बांधलें आहे हें १६ फूट खोल, ३२१ फूट रुद व ३२१ फूट लांब असे आहे सडासांतील टाक्याकरितां गगचें न गाळलेले पाणी पुरविलें जाते या पाण्याची पंपिंग स्टेशने हुगळी नदीवर मल्लिक घाट व वॉटगज येथें आहेत हें न गाळलेले पाणी स्वतत्र नळांनीं सर्व शहरभर खेळविलें आहे कलकत्ता शहरास दररोज जवळजवळ सहा कोटी गॅलन पिण्याचे पाणी लागते शिवाय आजूबाजूच्या काही म्युनिसिपालिट्याना पिण्याचें पाणी कलकत्ता म्युनिसिपाल्टिीकडून विकत घ्यावें लागतें

इ स १९२३ च्या कायद्यान्वयें नगरसभेनें मोफत शिक्षण देणाऱ्या

बऱ्याच प्राथमिक शाळा उघडल्या या शाळांची संख्या १९२३ साली १९ होती व आज ती संख्या २३० वर झाली असून यामध्ये ३३,००० मुले शिक्षण घेत आहेत भंगी, गाडीवाले व खालच्या वर्गाच्या नोकराकरिता काही रात्रीच्या शाळा चालविल्या जातात वरील शाळांना लागणारे शिक्षक तयार करण्याकरिता एक ट्रेनिंग स्कूलही नगरसभा चालवीत आहे शहरात प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था वरीलप्रमाणें केल्यावर तें सक्तीचें करण्याचा विचार नगरसभेत चालू आहे प्रयोगादाखल १९३४ मध्यें नवव्या वॉर्डातील ६ ते १० वर्षे वयाच्या मुलांना सक्तीचें शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे १९३६ च्या अखेरीस या वॉर्डातील ६ ते १० वर्षे वयाची ३,४०० मुलें शिक्षण घेत होती यावरून हा प्रयोग यशस्वी झाला असें म्हणण्यास हरकत नाही प्राथमिक शिक्षणाकरिता नगर सभा १६,४५,००० रुपये खर्च करीत आहे

जनतेला व्यापारी शिक्षण देण्याकरिता नगरसभेनें कॉलेज स्ट्रीटवर एक औद्योगिक पदार्थ संग्रहालय स्थापन केले आहे हिंदुस्थान, देशी संस्थाने ब्रह्मदेश व सिलोन या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या शेतकी व औद्योगिक मालाचे नमुने येथें आहेत कलकत्ता नगरसभेनें कलकत्ता म्युनिसिपल गॅझट हें मुखपत्र चालविले आहे जन्ममृत्यूच्या आंकड्यावरून कलकत्ता शहराच्या आरोग्याविषयीं अनुमान काढणें चुकीचें होईल कारण येथील लोकवस्ती-पैकी बरेच येथील कायमचे रहिवासी नसून कामानिमित्त बाहेरून आलेले असतात कलकत्यातील एकंदर मृत्यूपैकी सर्वांत जास्त मृत्यू ट्युबरक्यु-लॉसिस्, मलेरिया व पोटाच्या विकारांनीं घडून येतात फुप्फुसाच्या विकाराने बंगाल प्रांतापेक्षा तेरा पटींनी जास्त मृत्यू कलकत्यात होतात तापसराईचे मृत्यू मात्र बंगालप्रांताच्या मानानें एकपंचमांश ते एकषष्ठांश होतात कलकत्ता शहर बंगालसारख्या मलेरियानें पछाडलेल्या प्रांतांत असूनही येथील तापानें होणारे मृत्यू इतके कमी होतात यावरून कलकत्याचे आरोग्य चांगले आहे असे म्हणता येतें याचें बरेचसें श्रेय कलकत्याचें चांगले पाणी व सांडपाण्याच्या निकालाची व्यवस्था यांनाच दिलें पाहिजे

मलेरियाचा ताप बहुतकरून डासांपासून पसरतो तेव्हां डासांचा बंदोबस्त करण्याकरता नगरसभेने डास प्रतिबंधक खातें सुरू केलें आहे. या

खात्याचे अधिकारी मलेरियाचा प्रादुर्भाव झालेल्या भागात फिरून डास, त्यांची अंडी व आळ्या मारण्याचे सर्व उपाय अमलात आणतात

कलकत्ता शहर फार विस्तृत असल्यानें येथें जागेची कमतरता नाही, व म्हणून मुबईपेक्षा येथील लोकवस्ती विरळ आहे मुबई व कलकत्ता या दोन शहरामधील आणखी एक फरक असा की मुबईस फिरण्याकरिता पार्क्स (मैदानें) नाहीत कलकत्त्यात अशीं मैदानें पुष्कळ आहेत खुद्द भवानीपुरांतच चार पार्क्स असून सध्याकाळी तेथें बरेच लोक व मुलें फिरावयास व खेळण्यास येतात पोहण्याच्या सोयीकरतां शहरांत कृत्रिम तलाव बांधिले आहेत यातून पोहण्याची सोय केली असून लहान मुलें व शिकणारे यांचेकरिता चांगली व्यवस्था ठेवली आहे इ स १७१० साली कलकत्त्याची लोकसख्या अवघी बारा हजार होती वाढता वाढता १९३१ सालचे खानेसुमारीत ती बारा लक्षांवर येऊन पोंहोचली आहे

हिंदुस्थानातील मुख्य शहरांची लोकसख्या व जन्ममृत्यूचें आकडे

इ स १९३५.

| शहराचें नाव | लोकवस्ती | जन्म | मृत्यू |
|---|---|---|---|
| कलकत्ता | १,१९६,७३४ | २१ २ | २८ ५ |
| मुबई | १,१६१,३८३ | २९ ६ | २५ २ |
| मद्रास | ६४७,२३० | ४७ ९ | ३८ ६ |
| दिल्ली | ३४७,५३९ | ४८.६६ | ३२.८५ |

वरील आंकड्यावरून कलकत्त्यात जन्मसख्यपेक्षा मृत्युसख्या अधिक दिसते

# प्रकरण चौथें

# कलकत्ता युनिव्हर्सिटी व शिक्षणसंस्था

## शिक्षणाची सद्यःस्थिति

शिक्षणाची वाढ हळूहळू होत आहे, परंतु अजून शिक्षण सार्वत्रिक झालें नाही इ स १९३६ च्या आरंभीं शहरात एकदर ५१२ प्राथमिक शाळा होत्या त्यापैकीं २३० नगरसभेनें चालविलेल्या आहेत शहराच्या एक दोन भागांत मोफत प्राथमिक शिक्षण सक्तीचें केल्याचें नगरसभेच्या वृत्तान्तांत सांगितलेंच आहे शहरात दुय्यम शिक्षण देणाऱ्या एकंदर १२२ शाळा (हायस्कुलें) आहेत. त्यांपैकीं ६० युनिव्हर्सिटीनें कायमच्याच मान्य केलेल्या व ६२ थोड्या मुदतीपुरत्या मान्य केलेल्या आहेत काही शाळातून हल्ली हस्तव्यवसायाचें (manual training) शिक्षण दिलें जातें याशिवाय काहीं शाळातून लोहारी, सुतारी, कापड विणण्याचें व रगविण्याचें काम व शेतकी, वगैरे धंद्याचें शिक्षणही दिले जातें उच्च शिक्षणाचा प्रसार मुबईपेक्षां कलकत्त्यास जास्त आहे असें वाटतें कलकत्त्यात आर्टस् व सायन्स या दोन्ही शाखा असलेलीं लहान मोठीं १५ कॉलेजें असून या सर्वांमिळून जवळजवळ १,५०० विद्यार्थी व १,२०० विद्यार्थिनी उच्च शिक्षण घेत आहेत याशिवाय मेडिकल कॉलेज, इजिनियरिंग कॉलेज, व्हेटरनरी कॉलेज, लॉ कॉलेज, व्यापारी कॉलेज, वगैरे शिक्षणसस्थातून सरासरी तीन हजारावर विद्यार्थी शिकत आहेत

## कलकत्ता विश्वविद्यालय

### स्थापना

इ स १८५७ च्या कायद्यान्वयें कलकत्ता, मुबई व मद्रास हीं तीन विश्वविद्यालयें स्थापन झालीं विश्वविद्यालयाची घटना लडन येथील विश्वविद्यालयाप्रमाणे आहे प्रारभीं हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल हे कलकत्ता

विद्यापीठाचे चॅन्सेलर होते व्हाइस चान्सेलर व फेलो यांची नेमणूक तेच करीत व्हाइस चान्सेलर व आर्टस्, कायदा, वैद्यक आणि स्थापत्य अशा चार शाखांच्या दहा प्रतिनिधींच्या सिंडिकेटकडे युनिव्हर्सिटीचा सर्व कारभार सोंपविलेला असे प्रारंभीं ऑफिसचें सर्व काम करण्यासाठी रजिस्ट्रार हा एकच पगारी अधिकारी असे १८८५ सालापासून असिस्टंट रजिस्ट्रारची नेमणूक करण्यात आली

## पदव्या

प्रवेशपरीक्षा घेणें, तसेंच बी ए, बी एल्, एम् ए, एल् एम् एस्, एम् डी, व एम् सी ई या पदव्या परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना देण्याचा अधिकार विद्यापीठास होता

## विद्यापीठाच्या इमारती

इ स १८७३ सालीं हिंदुस्थान सरकारनें इमारत बांधण्यासाठी ४ लक्ष ३८ हजार रुपये विद्यापीठाला दिले या रकमेतून बांधलेल्या हल्लीच्या सेनेट हाऊसमध्यें बरीच वर्षे विद्यापीठाची कचेरी होती सभा व परीक्षांकरिता मुख्य दिवाणखान्याचा उपयोग होत असे आज दर्भंगा बिल्डिंग, लॉ कॉलेज, हार्डिंज होस्टेल, अशुतोष बिल्डिंग व दोन सायन्स कॉलेजें इतक्या इमारती विद्यापीठाच्या मालकीच्या आहेत दोन सायन्स कॉलेजांपैकीं बालीगंज सर्क्युलर रोडवरील कॉलेज सर तारकनाथ पालित यांच्या राहत्या घरांत आहे

## अधिकारक्षेत्र

प्रारंभीं कलकत्ता विद्यापीठाचा अधिकार पंजाब, संयुक्तप्रांत, बिहार, ओरिसा, मध्यप्रांत, आसाम व ब्रह्मदेश येवढ्या प्रदेशावर होता निरनिराळ्या प्रांतात स्वतंत्र विद्यापीठे स्थापण्यात आल्यामुळें या विद्यापीठाच्या अधिकाराची व्याप्ति कमी झाली हल्लीं डाक्याशिवाय सर्व बंगाल प्रांत व आसाम येवढाच प्रदेश तिच्या अधिकारात आहे. या प्रदेशात एकदर ६२ कॉलेजें व एक हजारपेक्षा जास्त हायस्कुलें आहेत वरील आकड्यावरून

विद्यापीठाचा विस्तार अजूनही केवढा मोठा आहे याची सहज कल्पना येते. इ स १८९० सालीं सर गुरुदास बॅानर्जी याची व्हाइस चॅन्सेलरचे जागी नेमणूक झाली याचेपूर्वी या जागीं हिंदी मनुष्य नेमीत नसत इ. स १९०६ पासून मात्र व्हाइस चॅन्सेलरची जागा बहुश हिंदी गृहस्थानाच मिळत आहे विद्यापीठाला सध्याची स्पृहणीय स्थिति प्राप्त व्हावयास सर अशुतोष मुकर्जी हेच कारणीभूत होत त्याना कलकत्ता विद्यापीठाचे जनक असे म्हणतात

## १९०४ चा कायदा

ब्रिटिश हिंदुस्थानातील विद्यापीठाच्या कार्यांची चौकशी करून, सुधारणा करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें इ स १९०२ मध्यें एक रॉयल कमिशन नेमलें या कमिशनच्या शिफारशींचेंच पुढें १९०४ च्या कायद्यात रूपातर झाले या कायद्यान्वयें विद्यापीठास प्रत्यक्ष शिकविण्याचें व सशोधनाचें कार्य करण्याचा व त्यासाठी आवश्यक अशीं पुस्तकालयें, सग्रहालये, प्रयोगशाळा, व कारखाने स्थापण्याचा व यासाठी जरूर तो पगारी अध्यापक वर्ग नेमण्याचा अधिकार प्राप्त झाला आता परीक्षा घेणें येवढीच कार्य-मर्यादा न राहता प्रत्यक्ष शिकविणें व सशोधनकार्य करणे हीं कामें पण विद्यापीठाकडे आलीं

## अभ्यासक्रमाची सुधारणा

अभ्यासक्रमात महत्त्वाचे फेरफार करून परीक्षाच्या नावात बराच बदल करण्यात आला हिंदी भाषाना जास्त महत्त्व देऊन प्रवेशपरीक्षेपासून पदवीच्या परीक्षेपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्यानें मातृभाषा शिकलीच पाहिजे असा नियम केला हिंदी भाषा हा विषय एम् ए च्या परीक्षेस ठेवण्यांत आला व मॅट्रिकच्या परीक्षेस उपयुक्त असे ऐच्छिक विषय ठेविले अशा प्रकारे इटरपरीक्षेत ही सुधारणा करण्यात आली प्रवेशपरीक्षेपर्यंतचे सर्व शिक्षण मातृभाषेंतून देण्याची व मातृभाषेंतच प्रश्नपत्रिकाची उत्तरे लिहिण्याची परवानगी नुकतीच देण्यांत आली आहे शिक्षक वर्गाकरिता एल् टी व बी टी या परीक्षा घेतल्या जातात वैद्यक शाखेंत एम् बी, एम् डी, एम् एस्, एम् ओ या पदव्या दिल्या जातात स्थापत्य शास्त्राच्या बी ई.,

एम् ई ह्या पदव्या आहेत एम् ए व एम् एस्सी या परीक्षांपैकी कांहीं भाग संशोधनात्मक निबंध लिहून पुरा करिता येण्याची सवड ठेविल्यानें विद्यार्थ्यांस संशोधनकार्याचें शिक्षण मिळण्याची सोय झाली आहे बी कॉम ही व्यापारी शिक्षणाची पदवी दिली जाते

## स्टुडंट्स् वेलफेअर व इन्फर्मेशन ब्यूरो

विद्यापीठाला जोडलेल्या कॉलेजातील विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी इ स १९२५ साली विद्यापीठानें "स्टूडंटस् वेलफेअर कमिटी" नेमली प्रत्येक शिक्षणसंस्थेंत निरनिराळ्या इंग्रजी व देशी खेळांची व्यवस्था करण्यात आली येथून शिक्षण घेऊन बाहेर निघालेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी विद्यापीठानें "स्टूडंटस् इन्फर्मेशन ब्यूरो" काढली आहे या संस्थेमार्फत परदेशात शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तेथील विद्यापीठाची व अभ्यासक्रमाची माहिती दिली जाते- यामुळें परदेशी जाण्यापूर्वी तेथील अभ्यासक्रमाची व खर्चाची कल्पना आल्यानें परदेशीं जाऊन फशी पडण्याचा प्रसंग विद्यार्थ्यांवर येत नाहीं

## सॅडलर कमिशन

हिंदी विद्यापीठाच्या, विशेषत' कलकत्ता विद्यापीठाच्या कारभाराचें पूर्ण निरीक्षण करून अवश्य त्या सुधारणा सुचविण्याकरिता हिंदुस्थान सरकारनें इ स १९१७ साली सर मायकेल सॅडलर याचे अध्यक्षतेखाली एक रॉयल कमिशन नेमले या कमिशननें केलेल्या सूचनांपैकी महत्त्वाच्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत —

(१) दुय्यम शिक्षणाची व्यवस्था पाहण्याकरिता प्रत्येक प्रांतात एक बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन नेमावें.

(२) विद्यापीठाचे घटनेंत निवडणुकीचें तत्त्व जास्त प्रमाणात अमलात आणावें

(३) विद्यार्थ्यांची राहण्याची व शिक्षणाची व्यवस्था विद्यापीठाचे प्रत्यक्ष नजरेखालीं व्हावी म्हणून स्थानिक विद्यापीठें देशात स्थापावी

या सूचनानुसार इ स १९२० नंतर अलिगड, डाका, दिल्ली, लखनौ व रगून ही विद्यापीठें स्थापन झाली मद्रास व अलाहाबाद विद्यापीठांची पुनर्घटनाही याच सूचनानुसार करण्यात आली

## सशोधनकार्याकरिता शिष्यवृत्त्या व बक्षिसें

इ स १८६६ सालीं मुबईचे श्री. प्रेमचद रायचद यानी विद्यापीठाला दोन लाख रुपयाची देणगी दिली. या रकमेच्या व्याजांतून विद्यार्थ्यांस सशोधनकार्य करण्याकरिता शिष्यवृत्त्या देण्यात येतात १९०८ सालीं विद्यापीठाची ज्युबिली झाली त्या वेळी गंगाजळीतील ३०,००० रुपये बाजूला काढून त्याच्या व्याजातून ज्युबिली सशोधन पारितोषिकाची योजना सुरू केली. परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेता यावें म्हणून बंगाल सरकारने वार्षिक ३०० पौडाच्या दोन शिष्यवृत्त्या ठेवल्या आहेत त्या हिंदु व मुसलमान विद्यार्थ्यांस पाळीनें देण्यात येतात याशिवाय श्री गुरुप्रसन्न घोष व श्री तारकनाथ पलित यानीं दिलेल्या देणग्याच्या व्याजातून हिंदू विद्यार्थ्यांस परदेशात जाऊन धंदेशिक्षण घेण्याकरितां शिष्यवृत्त्या दिल्या जातात परीक्षाच्या निकालावरून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्या, पदकें व बक्षिसें याकरिता विद्यापीठास बाहेरून एकदर लहानमोठ्या १५० देणग्या मिळाल्या आहेत

## विद्यापीठाचा छापखाना

दर्भंगा बिल्डिंग व सीनेट हॉल या इमारतीत पन्याच्या इमारती बाधल्या असून त्यात विद्यापीठाचा स्वत चा छापखाना आहे विद्यापीठाची सर्व क्रमिक पुस्तकें, निरनिराळ्या कमिट्याचे अहवाल, सशोधनकार्याचे वृत्तात व नियतकालिकें, तसेच कलकत्ता रीव्ह्यू, इडियन केमिकल सोसायटी, इडियन फिजिकल सोसायटी, इडियन सायकॉलॉजिकल असोसिएशन, इत्यादि सस्थाची नियतकालिके या छापखान्यांत छापतात सरासरीनें छापखान्यात दरसाल ५०,००० पृष्ठाची छपाई होते छापखान्याच्या वाढत्या व्यापास हल्लीची जागा अपुरी पडत असल्यानें बालीगजमध्यें हजरा रोडवर नवी इमारत बाधण्याचें काम सुरू आहे

## ग्रंथालय

युनिव्हर्सिटीच्या ग्रथालयाची सुरुवात उत्तरपारा येथील रहिवाशी बाबू जयकिशन मुकर्जी यानी इ. स १८७४ साली दिलेल्या पाच हजार रुपयाच्या देणगीनें झाली. इ स १९०८ सालीं दर्भंग्याचे महाराज सर रामेश्वरसिंग यानी ग्रंथालयाकरितां स्वतत्र इमारत बाधण्यासाठी अडीच लक्ष रुपये दिले या इमारतीत ग्रथालय इ स १९३५ पर्यंत होतें त्यानतर हें ग्रथालय व पोस्ट ग्रॅजुएट खात्याचा ग्रथसग्रह एक करून सयुक्त ग्रथालय अशुतोष बिल्डिगमध्यें नेण्यात आलें सयुक्त ग्रथालयात सर्व विषयावरील पुस्तकें आहेत याशिवाय शास्त्रीय विषयावरील सदर्भ ग्रथाचा सग्रह त्या त्या खात्यास जोडलेला आहे मुख्य ग्रंथालयाच्या दिवाणखान्यात तीनशें वाचकाना एकाच वेळी वाचावयास बसण्याची व्यवस्था केली आहे मुख्य ग्रथालय व शाखाग्रथसग्रह यावर सालिना सुमारें चाळीस हजार रुपये खर्च होतात

## ट्रेनिंग डिपार्टमेन्ट

नव्या नियमांप्रमाणें प्रवेशपरीक्षेस शास्त्रीय विषय आवश्यक ठेवले आहेत तसेच हे विषय मातृभाषेंतून शिकवावयाचे आहेत याकरितां पद्धतशीर अध्यापनविद्या शिकलेले शिक्षक तयार करण्याकरिता इ स १९३५ साली टीचर्स ट्रेनिंग डिपार्टमेन्ट काढण्यात आलें तीन महिन्याचा एक व दीड महिन्याचा एक असे दोन वर्ग ठेविले आहेत याचा फायदा प्रातातील शिक्षकवर्गास पुष्कळ होतो

## लॉ कॉलेज

कायद्याच्या शिक्षणाची व्यवस्था या प्रातात समाधानकारक नाही ही गोष्ट तत्कालीन कुलगुरु सर अशुतोष मुकर्जी यांच्या लक्षात आली, त्यानी या बाबतीत मन घालून लॉ कॉलेजची योजना सिंडिकेट व सरकार याजकडून मजूर करवून घेऊन १९०९ साली हें कॉलेज सुरू केलें येथें बी एल् च्या परीक्षेस बसता येतें कॉलेजला स्वतःचें वसतिगृह आहे

## मायनिंग स्कूल

राणीगजजवळ इखरा गावीं वासती विजय हायस्कूल नावाची शिक्षण सस्था होती या सस्थेचे चालक श्री प्राणकृष्ण चतर्जी यानी ही सस्था व त्याबरोबर एक लक्ष पचेचाळीस हजार रुपये किमतीची इस्टेट व चालू खर्चा-करिता १८०० रु व्याज येईल इतकी नगद रक्कम १९२१ साली विद्या-पीठास दिली व या देणगींतुन बगाली तरुणाना खाणीच्या धद्याचें शिक्षण द्यावें अशी इच्छा प्रदर्शित केली अशा रीतीनें १९२१ सालीं वासंती विजय माइनिग स्कल सुरू झालें

## विद्यापीठाचें कॉलेज ऑफ सायन्स आणि टेक्नॉलॉजी

इ स १९१२ साली सर तारकनाथ पलित यानीं शास्त्रीय व धदेशिक्षणाची वाढ होऊन आपल्या देशबांधवात त्याचा प्रसार व्हावा यासाठी विद्यापीठाला सुमारे पधरा लक्ष रुपयाची देणगी दिली या रकमेच्या व्याजातून रसायन व पदार्थविज्ञान या विषयाचे अध्यापक नेमण्यात आले इ स १९१३ साली सर राषबिहारी घोष यानी विद्यापीठाला दहा लक्ष रुपयाची देणगी दिली या देणगीच्या व्याजातून औद्योगिक, गणित (applied mathematics), पदार्थविज्ञान रसायन व वनस्पति शास्त्राच्या अध्यापकाच्या जागा निर्माण केल्या अध्यापकांच्या हाताखाली सशोधन करण्याकरिता प्रत्येकी दोन दरमहा ७५ रुपयाच्या शिष्यवृत्त्याही ठेविल्या उरलेल्या रकमेचा विनियोग अध्यापकाच्या संशोधनकार्याकडे होतो इ स १९१९ साली सर राषबिहारी घोप यानी आणखी दहा लक्ष रुपये देऊन त्याच्या व्याजातून औद्योगिक रसायन व औद्योगिक पदार्थविज्ञान शास्त्राच्या अध्यापकाच्या जागा निर्माण केल्या या अध्यापकाचे हाताखाली सशोधन करण्याकरिता शिष्यवृत्त्याही वरीलप्रमाणेच ठेवण्यात आल्या सर राषविहारी घोष यानी आणखी अडीच लक्ष रुपयाची देणगी देऊन त्या रकमेच्या व्याजातून परदेशी प्रवास करून तेथील शास्त्रीय प्रगतीचें व नव्या शोधांचें अवलोकन करण्याची सोय केली आहे दरसाल तीन प्रवासी शिष्य-वृत्त्या दिल्या जातात घोप अध्यापकही पलित अध्यापकाप्रमाणें जन्मत

शुद्ध हिंदी असले पाहिजेत असा नियम आहे डॉ गणेशप्रसाद, डॉ देवेंद्रमोहन बोस, डॉ प्रफुल्लचंद्र मित्र, डॉ श पु आघारकर, डॉ हेमेंद्रकुमार सेन व डॉ फणींद्रनाथ घोष हे पहिले घोष अध्यापक नेमले गेले अध्यापकाची निवड शुद्ध रक्ताच्या हिंदी शास्त्रज्ञामधूनच करावयाची अशी अट त्यांनी घातली याशिवाय अध्यापकाच्या हाताखाली संशोधनकार्य करण्याकरिता दरमहा ७५ रुपयाच्या चार शिष्यवृत्त्याही ठेवल्या आहेत हा खर्च होऊन उरलेली रक्कम अध्यापकाच्या संशोधनाच्या खर्चाकडे दिली जाते विद्या-पीठाने आपल्या पैशातून ९२ अपर सर्क्युलर रोडवर सायन्स कॉलेजची इमारत बांधावी व संशोधनास लागणारी उपकरणसामग्री आणावी अशी अट घातली असल्यानें विद्यापीठानें अडीच लक्ष रुपये खर्च करून सायन्स कॉलेजची इमारत बांधली

इ स १९१७ साली सर तारकनाथ वारल्यानंतर ३५ बालीगंज सर्क्युलर रोडवरील त्यांची राहतीं घरे व त्यांसभोंवतीं असलेली सुमारे तीस बिघे जागा विद्यापीठाच्या ताब्यात आली या घरात योग्य ते फेरफार करून वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्राच्या प्रयोगशाळा स्थापण्यात आल्या तसेंच त्या शास्त्राच्या अध्यापकास राहण्याच्या जागा व विद्यार्थ्यांचें वसतिगृहही स्थापण्यात आले सर तारकनाथ यांच्या देणगीची व्यवस्था एका ट्रस्टकडून होते विद्यापीठाचे व्हाइस चान्सेलर या ट्रस्टचे प्रमख आहेत याशिवाय परदेशी जाऊन उच्च शिक्षण घेण्याकरिता एक शिष्यवृत्तीही सर तारकनाथ यांच्या देणगींतून दिली जाते सर प्रफुल्लचंद्र रॉय व सर चंद्रशेखर रामन हे पहिले पलित अध्यापक होते इ स १९२० साली कुमार गुरुप्रसाद सिंहा यांनी विद्यापीठाला साडेपाच लक्षाची देणगी दिली या देणगीच्या व्याजातून पदार्थविज्ञान, रसायन, शेतकी, कालवा, तौलनिक भाषाशास्त्र यांच्या अध्यापकांच्या जागा निर्माण करण्यांत आल्या याची सर्वसाधारण व्यवस्था पलित व घोष फंडाप्रमाणेंच आहे सर प्रफुल्ल-चंद्र रॉय यांनी १९२२ ते ३७ पर्यंत विनावेतन काम केलें, व या काळातील आपला पगार अनामत ठेवून त्याच्या व्याजातून रसायनशास्त्राच्या अभ्यासा-करितां दरमहा २०० रुपयाच्या दोन फेलोशिप्स् चालू केल्या कलकत्ता विद्यापीठाचा जो सर्व हिंदुस्थानात शास्त्रीय संशोधनाबद्दल लौकिक झाला आहे

त्याचें बीज या वरील योजनात आहे विद्यापीठाच्या सायन्स कॉलेजातील प्रयोग-शाळा नुकत्याच स्थापन झाल्या असल्या तरी एकदरींत त्या सर्व साधनानी युक्त अशा आहेत सशोधनास अवश्य असा ग्रथसग्रहही असल्यामुळे व केवळ पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थीच सायन्स कॉलेजात घेत असल्यानें शिक्षणाचा दर्जा उच्च प्रकारचा आहे शुद्ध व मिश्र गणित, पदार्थविज्ञान, औद्योगिक पदार्थ-विज्ञान, रसायन, औद्योगिक रसायन, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, भूशास्त्र, इद्रियविज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र, वगैरे विषयाची सोय येथील सायन्स कॉलेजांत आहे ज्याप्रमाणें शास्त्रीय सशोधनाची सोय आहे त्याचप्रमाणें अर्वाचीन व प्राचीन इतिहास, पुराणवस्तु सशोधन, भाषा-शास्त्र इग्रजी व बगाली, काहीं हिंदी भाषा व कला या सर्वांच्या उच्च शिक्षणाची व सशोधनाची सोय विद्यापीठात आहे सशोधन कार्यास येथील विद्यापीठात जितकें उत्तेजन मिळतें तितकें थोड्याच विद्यापीठातून मिळतें.

## कलकत्त्यांतील प्रमुख कॉलेजें

### प्रेसिडेन्सी कॉलेज, ८६–१ कॉलेज स्ट्रीट

इ स १८१७ सालीं राजा राममोहन रॉय व डेव्हिड हेअर याच्या हिंदु कॉलेजची स्थापना झाली इ स १८५५ साली सरकारनें हें कॉलेज हातांत घेऊन पूर्वीचें नाव बदलून प्रेसिडेन्सी कॉलेज असे नवीन नांव ठेवलें इ स १९१३ साली सरकारनें एक स्वतत्र व्यवस्थापक मडळ स्थापून त्याच्या-कडे याची व्यवस्था दिली इ स १९३५–३६ साली येथें ९७९ विद्यार्थी शिकत होते कॉलेजच्या पुस्तकालयात ४९,००० पुस्तकें आहेत

### सेन्ट झेवियर कॉलेज, ३० पार्क स्ट्रीट

इ स १८६० सालीं सोसायटी ऑफ जीजस या सस्थेनें या कॉलेजची स्थापना केली येथें बी ए व बी एस्‌सी पर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था आहे. जवळजवळ १००० विद्यार्थी या संस्थेंत शिकत आहेत

### स्कॉटिश चर्च कॉलेज, ४ कॉर्नवॉलिस स्क्वेअर

इ स १८३० साली रेव्हरंड डफ यानी ही संस्था स्थापन केली शहरा-

तील उत्तम कॉलेजांत याची गणना होते याच्या वसतिगृहाची व्यवस्था उत्तम असून विद्यार्थ्यांच्या शरीरप्रकृतीकडे विशेष लक्ष दिलें जातें येथें सहशिक्षण दिलें जात असून १,५०० विद्यार्थी व १५० विद्यार्थिनी आहेत

## विद्यासागर कॉलेज, ३९ शंकर घोष लेन

इ स १८५९ साली कलकत्ता ट्रेनिंग स्कूल नावाची संस्था अस्तित्वात आली इ स १८६४ साली पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचेकडे या संस्थेची सर्व व्यवस्था देण्यात आली त्यांनी या संस्थेंत बऱ्याच सुधारणा करून हिंदु विद्यार्थ्यांना थोड्या खर्चांत उच्च शिक्षण देण्याची सोय केली इ स १९१७ सालीं संस्थेच्या ट्रस्टींनी त्याचे नाव विद्यासागर कॉलेज असे ठेविले विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचेसाठी कॉलेजचे दोन वेगळे विभाग असल्याने दुसऱ्या कॉलेजाप्रमाणे सहशिक्षणाचा किंवा सकाळी येण्याचा त्रास विद्यार्थिनींना पडत नाहीं येथे बी ए, बी एस्सी व बी कॉम पर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे इ स १९३५–३६ साली ३,२६९ विद्यार्थी व २०७ विद्यार्थिनी शिकत होत्या बंगालमध्यें हें कॉलेज सर्वांत मोठें आहे

## बेथून कॉलेज

अयोध्या प्रांतांतील तालुकदार दर्शनारंजन मुकर्जी यांच्या वाड्यात १८४९ साली ड्रिंक वॉटर बेथून यांनी मुलींच्या शिक्षणासाठीं एक इंग्रजी शाळा काढली सर अलफ्रेड क्रॉफ्ट यांनीं ही शाळा व वंग महिला विद्यालय एक करून स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी बेथून कॉलेज ही संस्था सुरू केली इंटर आर्टस् व इंटर सायन्स व बी ए, बी एस्सी पर्यंत येथे शिक्षण दिलें जातें १९३६ साली कॉलेजमध्यें ३०३ विद्यार्थिनी होत्या

याशिवाय पुढें दिलेली कॉलेजें कलकत्त्यात आहेत (पान ४० पहा)

| अनुक्रम नंबर | कॉलेजचें नाव | पत्ता | स्थापन झाल्याचें वर्ष | कितीपावेतों शिक्षण देण्यांत येतें | विद्यार्थ्यांची सख्या सन १९३५–३६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिटी कॉलेज | .... | १८७९ | बी ए व बी एससी | १००३ |
| २ | रिपन कॉलेज | २४ हॅरिसन रोड | १८८० | बी ए, बी एस ज़ी, बी एल. | २३५० |
| ३ | वंगवासी कॉलेज | २५/१ स्कॉटलेन | १८८५ | बी ए बी एससी | २००० |
| ४ | सेन्ट पॉल कॅथीड्रल मिशन कॉलेज | ३३ ॲम्हर्स्ट स्ट्रीट | १८६५ | बी. ए. | ३५० |
| ५ | लॉरेटो हाऊस | ७ मिडलटन स्ट्रीट | . | बी. ए, एल. टी | ९८ |
| ६ | ला मारटिनीअर | . | १८३६ | इंटर आर्ट व सायन्स | ८ |
| ७ | इस्लामिया कॉलेज | ८ बीलवली स्ट्रीट | १९२६ | बी ए, इंटर सायन्स | १०८ |
| ८ | सेन्ट जोसेफ कॉलेज | ६९ बहूबझार | १८७१ | इंटर आर्टस व सायन्स | ५५ |
| ९ | व्हिक्टोरिया इन्स्टिटयूट (स्त्रियाकरिता) | ७८ अपर सर्क्युलर रोड | १८७१ | बी ए | २५० मुलींची सोय आहे. |
| १० | डेव्हिड हेअर ट्रेनिंग कॉलेज | २५/३ बालीगंज सर्क्युलर रोड | १९०८ | बी. टी | ७८ विद्यार्थ्यांची सोय आहे |
| ११ | संस्कृत कॉलेज | १ कॉलेज स्क्वेअर | १८२४ | बी. ए, व बंगाल संस्कृत असोसिएशनच्या पदव्या | १३५ |

# प्रकरण पांचवें

# वैद्यकीय शिक्षणसंस्था

## मेडिकल कॉलेज ऑफ बेंगॉल, ८८ कॉलेज स्ट्रीट

पाश्चात्य वैद्यकीय पद्धति हिंदुस्थानात प्रचलित होण्यापूर्वी येथे आयुर्वेदिक व युनानी वैद्यकाचा प्रसार होता रे. जे लॉंग यानी मिळविलेल्या माहितीवरून असे समजतें की, इ. स १८०७ च्या आधीपासून पाश्चात्य वैद्यकीय शिक्षण मिळविण्याकरिता मिशनरी इस्पितळांमध्यें हिंदी लोक येत असत इ स १८२४ साली सरकारनें वैद्यकीय शाळा स्थापन करून, तीन वर्षांचा शिक्षणक्रम ठेवला संस्कृत व उर्दूमध्यें शिक्षण देता यावे म्हणून या दोन भाषात इग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें केलीं वैद्यकीय शिक्षणाचे बाबतीत सरकारचें धोरण निश्चित करण्याकरिता इ स १८३३ मध्यें लॉर्ड विलियम बेन्टिक यानी एक कमिटी नेमली देशी भाषातून वैद्यकीय शिक्षण देण्याचा प्रघात बंद करून इग्रजीतून शिक्षण देणारें एक वैद्यकीय कॉलेज काढावें असा कमेटीनें सल्ला दिला या सल्ल्यानुसार इ स १८३५ सालीं मेडिकल कॉलेजची स्थापना झाली हिंदुस्थानातील हिंदी विद्यार्थ्यांनीं जुने विचार सोडून ता १० जानेवारी, १८३६ रोजी प्रथम स्वहस्ताने मृतदेहाची चिरफाड केली तो दिवस येथील वैद्यकीय शिक्षणाचे इतिहासात चिरस्मरणीय समजला पाहिजे विद्यार्थ्यांना अनुभविक ज्ञान मिळण्याकरिता कॉलेजला जोडलेल्या रुग्णालयाची जरूरी असते ही अडचण दूर करण्याकरितां इ स १८४८ सालीं एक रुग्णालय बांधिले हें येथील सर्वांत जुने रुग्णालय आहे त्यानतर कॉलेजच्या आवारात बऱ्याच नवीन रुग्णालयांची भर पडली खडोपाडी नवीन वैद्यकीय ज्ञानाचा प्रसार व्हावा व त्याचा फायदा गरीबगुरिबांना मिळावा म्हणून डॉक्टरीचें शिक्षण बंगाली भाषेंत देण्याची योजना अमलात आली तदनुसार इ स १८५२ मध्यें सब असिस्टट सर्जनचा नवा वर्ग स्थापन केला व दरमहा प्रत्येकी ५ रु शिष्यवृत्ति देऊन १०० विद्यार्थी

त्या वर्गांत घेतले यातून पास झालेल्या विद्यार्थ्यांना बंगाल प्रांतांत सरकारी डॉक्टर म्हणून नेमण्यात आले

वरील कॉलेजात लष्करात लागणारे डॉक्टर तयार करण्याचा व युनिव्हर्सिटीच्या एम् बी पदवीकरिता विद्यार्थी तयार करण्याचा असे दोन शिक्षणक्रम आहेत लष्करी डॉक्टर तयार करण्याचे वर्गांत गोरे व निमगोरेच विद्यार्थी घेतात, व त्यांची निवडणूक डायरेक्टर जनरल ऑफ इंडियन मेडिकल सर्व्हिस हे करतात रसायनशास्त्र, गणित व पदार्थविज्ञान हे ऐच्छिक विषय घेऊन पहिल्या वर्गांत इंटरमीजिएट परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना एम्.बी चे वर्गांत प्रवेश मिळतो कॉलेजमध्ये प्रत्येक वर्षी १०५ नवीन विद्यार्थी घेतले जातात व त्यांपैकीं फक्त ५ जागाच विद्यार्थिनींसाठी असतात

## कार मायकेल मेडिकल कॉलेज, १ बेलगाछिया रोड

सरकारी मेडिकल कॉलेजात विद्यार्थ्यांना जागा मिळणे कठिण व विद्यार्थी वर्गाची तर या धंद्याकडे जाण्याची अति उत्सुकता हें पाहून येथील कांहीं डॉक्टरांनी इ स १८८६ सालीं कलकत्ता स्कूल ऑफ मेडिसिन ही संस्था स्थापन केली येथील शिक्षणक्रम सरकारी मेडिकल स्कूलसारखा ठेवून अनुभविक रुग्णालयीन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मेयो हॉस्पिटलमध्ये धाडण्याची व्यवस्था केली इ स १९०९ मध्ये चाळीस रोग्याकरिता संस्थेनें स्वत चे रुग्णालय बांधिले याचे पूर्वीच वैद्यकीय शिक्षण देण्याकरिता कॉलेज ऑफ दि फिजिशियन्स अँड सर्जन्स या नांवाची एक खाजगी संस्था स्थापन झाली होती इ स १९०४ साली ही संस्था व कलकत्ता मेडिकल स्कूल एक करण्यात आले स्कूलचा चार वर्षांचा व कॉलेजचा पाच वर्षांचा असे दोन शिक्षणक्रम ठेवले इ स १९१५ साली सरकारनें इमारतीसाठी पाच लाख रुपये व सालिना खर्चाकरिता पन्नास हजार रुपयांची मदत देण्याचे कबूल केले इ स १९१६ मध्यें संस्थेस त्या वेळचे बंगालचे गव्हर्नर लॉर्ड कार मायकेल यांचे नाव देण्यात आलें विद्यापीठाने आता या कॉलेजला मान्यता दिली असून येथें एम् बी चे परीक्षेकरिता विद्यार्थी तयार केले जातात हल्ली कॉलेजात ७५५ विद्यार्थी आहेत.

## स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन, सेंट्रल अॅव्हेन्यू

इ. स. १९१० साली सर लिओनार्ड रॉजर्स यानी उष्ण प्रदेशातील विशिष्ट रोगाचा अभ्यास करून त्यावर योग्य औषधें शोधून काढण्यासाठी बादशहा सातवे एडवर्ड यांचें स्मारक म्हणून एक संस्था काढण्याचें ठरविले. पहिली स्मारकाची कल्पना लहान होती. परंतु स्मारकफंडाला अपेक्षेहून जास्त देणग्या मिळाल्याने मोठी योजना करून इ. स. १९२० साली तिला स्टेट सेक्रेटरीची परवानगी मिळविली. स्मारकफंडानें तीन लक्ष चौऱ्याशी हजार रुपये जमा केले, व हिंदुस्थान सरकारनें पाच लक्ष, बंगाल सरकारनें चार लक्ष ब्यांयशी हजार व इंडियन टीसर्च असोसिएशन फंडाने दोन लक्ष रुपये देणगी म्हणून दिले. बंगाल सरकार, इंडियन टीसर्च फंड असोसिएशन, चहाचे मळेवाले, ज्यूटच्या गिरण्याचे मालक, तसेंच खाणीच्या मालकाचे संघाकडून देणगी मिळते. इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च याचेकडूनही अलीकडे देणगी मिळाली आहे. वैद्यकीय शिक्षण पुरें केलेल्या विद्यार्थ्यांना उष्ण कटिबंधांतील रोगाची व त्यावरील उपचाराची सविस्तर माहिती देण्याचे वर्ग या ठिकाणी चालू असून वैद्यकशास्त्रात संशोधनकार्य करण्याचीही उत्तम व्यवस्था आहे. "डिप्लोमा इन ट्रॉपिकल मेडिसिन"चे शिक्षणक्रमाला सहा महिने लागतात, व "डिप्लोमा इन् पब्लिक हेल्थ"चा शिक्षणक्रम एक वर्षांत पुरा होतो. सब असिस्टंट सर्जनपासून आय. एम. एस. च्या लोकांपर्यंत सर्व दर्जाचे डॉक्टर तसेंच सिलोन, ब्रह्मदेश, चीन, सयाम, ऑस्ट्रेलिया, ईजिप्त व केनिया या देशातील विद्यार्थी उष्ण कटिबंधातील विशिष्ट रोगाच्या अभ्यासाकरिता येथे येतात.

या संस्थेंत झालेले "काला आजारा" संबंधींचें संशोधन फार उच्च दर्जाचे आहे. प्लेबोटोमस व अर्जेंटिपस् जातीच्या माशीपासून या रोगाचा प्रसार होतो हा शोध येथेच लागला. या रोगाचें निदान करण्याच्या पद्धतीत सुधारणा करून पूर्वींची त्रासदायक व अनिश्चित औषधयोजना बदलण्यात आली, व त्याचे जागी अँटिमनी धातूच्या विशिष्ट क्षाराची इंजेक्शने सुरू झाली. रोज एक अशीं आठ इंजेक्शनें घेऊन शेकडा ९८ रोगी आज बरे होत आहेत. आसामातील चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या मजुरामध्ये रक्त-

क्षयाचा (पांडुरोग) विकार फार होतो. या बाबतीत संशोधन करून या रोगावर लोहाशिवाय दुसरा चांगला उपचार नाहीं असें डॉ नेपियर यांनी सिद्ध करून दाखविले आहे पटकीच्या आजारावरचे प्रयोग डॉ पश्रीचा हे करीत असून त्याचे आशाजनक परिणाम दिसून येत आहेत कर्नल चोपरा यांनी आमाशाच्या विकारांवर पद्धतशीर अभ्यास करून त्यांनी आता या विकारावर बरीच चांगली औषधयोजना सुचविली आहे संग्रहणीच्या विकारावरही येथे संशोधन सुरू आहे

हत्तीपाय व वृषणवृद्धि यासारखे विकार ज्या जंतूपासून होतात त्यांना इंग्रजीत फायलेरिया असे म्हणतात या जंतूचा अभ्यास करून कर्नल अक्टन व डॉ सुंदरराव ह्यांनीं याविषयींच्या ज्ञानात मोठीच क्रांति घडवून आणली आहे एकाच जंतूपासून हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतातील रहिवाश्याच्या शरीरांत निरनिराळे विकार बहुधा हवामानाचे फरकामुळें कसे उद्‌भवतात हें या संशोधनाने सिद्ध झालें आहे

डॉ लो याचे विभागात महारोगावर औषधोपचार शोधून काढण्याचे प्रयोग सुरू आहेत या रोगाबद्दल मिळालेली माहिती व त्यावर निघणाऱ्या नवीन नवीन औषधयोजना याचा देशभर फैलाव व्हावा म्हणून या विभागातर्फे एक त्रैमासिकही प्रसिद्ध होतें हिंदुस्थानातील वनस्पतींच्या गुणधर्मांचा अभ्यास करून त्याचा उपयोग रोगनिवारणार्थ कसा करतां येईल याचे प्रयोग कर्नल चोपरा हे इ स १९२४ पासून करीत आहेत त्यांनीं जवळ-जवळ १५०० वनस्पतींचे नमुने गोळा केले आहेत अफू, गांजा, भांग, इत्यादि सेवनाचें व्यसन लागलेल्याच्या सवयीची पूर्ण माहिती मिळवून या वस्तूच्या सेवनाची सवय औषधोपचारानें मोडण्याविषयी बरेच प्रयोग येथें करण्यात आले त्यांतील अनुभव बराच आशाजनक आहे कार मायकेल हॉस्पिटल-मध्ये असलेल्या अशा व्यसनाधीन लोकांपैकीं शेंकडा ९० औषधोपचाराने व्यसनापासून मुक्त झाले आहेत

हल्ली परदेशातून येणाऱ्या औषधात फार भेसळ आढळते व म्हणून रोगांवर ती परिणामकारक होत नाहींत याविषयीं सरकारला सल्ला देण्याकरितां कर्नल चोपरा याचे अध्यक्षतेखाली एक कमेटी नेमली गेली औषधाच्या कारखान्यावर, व औषधांच्या व्यापारावर सरकारचे नियंत्रण

असावें व औषधें तपासण्यासाठी एक प्रयोगशाळा स्थापावी असें कमेटीनें सुचविलें या शिफारशी सरकारनें अद्यापि अमलात आणिल्या नाहींत परतु कर्नल चोपरा याच्या देखरेखीखाली एक प्रयोगशाळा नुकतीच या कार्या-करिता स्थापन केली आहे डॉ मेपल्स्टन व त्याचे सहकारी यानी हिंदु-स्थानातील सर्व त्वग्रोगाची माहिती गोळा करून, त्याचें वर्गीकरण करून त्यावर औषधयोजना करण्याचें कार्य सुरू केलें आहे

## पाश्चर इन्स्टिटयूट ऑफ बेंगॉल

पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषावर टोंचण्यात येणारी लस येथील पाश्चर इन्स्टिटयूटमध्यें तयार करतात व योग्य ते इतर औषधोपचार या संस्थेंत केले जातात इ स १९२४ साली स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिनच्या इमारतींत ही सस्था स्थापन करण्यात आली या सस्थेंत इ स १९३३ सालीं जवळजवळ १०,००० रोग्यांना औषधोपचार करण्यात आला पुढें जागेच्या अभावीं बालीगजमध्ये नवीन इमारत बांधून तेथे ही सस्था नेण्यात आली इ स १९२४ पासून १९३३ पर्यंत स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिननें जें कार्य केलें त्याची माहिती पुस्तकरूपाने (Essay Reviews) इ स १९३४ साली प्रसिद्ध झाली असून जिज्ञासूनी वरील पुस्तक अवश्य वाचावें

## ऑल इडिया इन्स्टिटयूट ऑफ हायजीन, ॲण्ड पब्लिक हेल्थ, सेन्ट्रल ॲव्हेन्यू

इ स १९२० सालापूर्वीं वैद्यकीय पदवीधराना उष्ण कटिबधातील रोगाचा व सार्वजनिक आरोग्याचा अभ्यास करण्यासाठीं विलायतेस जावें लागत असे त्या साली सरकारनें हें शिक्षण हिंदुस्थानात घेण्याची व्यवस्था करण्याचें ठरवून त्याप्रमाणें स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन ही सस्था कल-कत्त्यास स्थापण्यांत आली सार्वजनिक आरोग्यशास्त्राचा अभ्यास व सशोधन करण्यासाठी इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक हेल्थ ॲंड हायजीन ही सस्था मुबईस स्थापावी असा प्रथम विचार होता, परतु पुढें ती कल्पना मागे पडली व स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिनमध्येच आरोग्यशास्त्र शिकविण्याची व्यवस्था करण्यांत आली.

रॉकफेलर फंडाचे एक डायरेक्टर डॉ कार्टर हे पूर्वेकडील देशात फिरतीवर असताना कलकत्त्यास आले जनरल मेगॉ व जनरल ग्रॅहाम यानी त्याची भेट घेऊन सार्वजनिक आरोग्याचा अभ्यास व संशोधन करण्याची सोय हिंदुस्थानात नाही हे त्याचे नजरेस आणून दिलें ही सोय येथें करण्याची कल्पना कार्टरसाहेबाना पटून त्यानी रॉकफेलर फंडातर्फे एक पत्र हिंदुस्थान सरकारला लिहिलें व इन्स्टिटच्यूट ऑफ हायजीन या संस्थेचा नित्याचा चालू खर्च जर सरकार करण्यास तयार असेल तर जमीन, इमारत व संस्थेस लागणारीं सर्व यत्रें व उपकरणीं याचा खर्च फंडातून देण्याचें कबूल केलें सरकारनें ही शर्त मान्य केली व लगेच इ स १९३० सालीं स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिनच्या शेजारी जागा घेऊन नवीन इमारत बांधली या इन्स्टिटच्यूटचे एकदर सहा विभाग आहेत ते असे.——

(१) सार्वजनिक आरोग्यखात्याचा कारभार.
(२) आरोग्य स्थापत्य (Sanitary Engineering)
(३) मलेरिया व खेड्यातील आरोग्य
(४) जीवनरसायन व पोषण
(५) सूतिकाशास्त्र, मुलाचें व शाळेंतील आरोग्य
(६) सार्वजनिक आरोग्य व साथीचे रोग यासंबधी आकडेवार माहिती

प्रत्येक विभागावर एक मुख्य अध्यापक, एक दुय्यम अध्यापक व त्याचे मदतनीस आहेत एक दोन विषयाशिवाय डी पी एच चें बाकीचें सर्व शिक्षण इन्स्टिटच्यूटमध्येच होतें नुकतीच विद्यापीठानें डी पी एच एस ही सार्वजनिक आरोग्याची पदवी सुरु केली आहे

## स्टेट मेडिकल फॅकल्टी

बगाल प्रातात एकंदर नऊ वैद्यकीय शाळा असून त्यातील सहा सरकारी आहेत बेंगॉल कौन्सिल ऑफ मेडिकल रजिस्ट्रेशननें मान्यता दिलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्याना लायसेनशिएटचा डिप्लोमा देणें हें काम स्टेट मेडिकल फॅकल्टी करते फॅकल्टीचा एल् एम् एफ् हा डिप्लोमा मुबईच्या एल् सी पी एस् व नागपूरच्या एल् एम् पी बरोबरचा आहे कॅंबेल मेडिकल स्कूल, नॅशनल मेडिकल इन्स्टिटच्यूट व कलकत्ता मेडिकल

इन्स्टिटयूट अशी तीन मेडिकल स्कूल्स् कलकत्त्यात आहेत इ स १९३५–३६ साली प्रांतातील सर्व मेडिकल शाळांमिळून २,९५४ विद्यार्थी होते

## अष्टाग आयुर्वेदिक कॉलेज, १०७ राजा दिनेंद्र स्ट्रीट

पाश्चात्य वैद्यकीय ज्ञानाचा पुरस्कार इग्रजी राज्यात बराच झाल्याने पूर्वीची आयुर्वेदिक पद्धति जवळजवळ नाहीशी होत चालली पाश्चात्य वैद्यकीय ज्ञानाचा शक्य तितका फायदा घेऊन आधुनिक पद्धतीवर या शास्त्राचा अभ्यास करण्याची सोय झाल्यास बरेच विद्यार्थी आयुर्वेदाचा अभ्यास करण्यास तयार होतील असें येथील नामाकित कविराजाना (वैद्याना) वाटू लागलें व इ स १९१६ साली या विचाराचें आचारात रूपांतर होऊन यामिनीभूषण अष्टाग आयुर्वेदिक कॉलेजची स्थापना झाली येथें वैद्यशास्त्राच्या आठही विभागाचें शिक्षण देण्यात येत असून शिवाय इद्रियविज्ञान (Physiology), वनस्पतिशास्त्र (Botany), रसायनशास्त्र (Chemistry), औषधिविज्ञान (Pharmacology), व औषधोपचार (Therapeutics), वगैरे शिकविण्याचीही सोय आहे सस्थेंत एक चार वर्षांचा व एक पाच वर्षांचा असे दोन शिक्षणक्रम आहेत

कॉलेजचें स्वत चें रुग्णालय असून तेथें १२५ रोग्याची राहण्याची सोय आहे जुन्या पद्धतीप्रमाणें या रुग्णालयात चिरफाड पण केली जाते व त्यामुळे विद्यार्थ्यांना जें ज्ञान वैद्याकडे राहून व उमेदवारी करून मिळत नाही तें येथें मिळते रोज ३०० वर रोगी कॉलेजच्या दवाखान्यात औषधोपचारासाठी येतात आयुर्वेदिक पद्धतीनें औषधें व रसायनें करण्याचा कॉलेजचा स्वत चा कारखाना आहे त्यामुळें विद्यार्थ्यांना औषधें तयार करण्याच्या रीतीचेंही शिक्षण मिळते क्रमिक पुस्तकें सस्कृत व बगाली भाषेत आहेत तथापि हॅलिबर्टनचें इद्रियविज्ञान व ग्रेचें शारीर ही इग्रजी पुस्तकें क्रमिक म्हणून शिकविली जातात

याशिवाय खालील सस्थांतूनही वैद्यशास्त्राच्या शिक्षणाची सोय आहे

(१) वैद्यशास्त्र विद्यापीठ (२९४ अपर सर्क्युलर रोड),

(२) विश्वनाथ आयुर्वेद कॉलेज व हॉस्पिटल (९४ ग्रे स्ट्रीट)

## कलकत्ता डेंटल कॉलेज व हॉस्पिटल, ११४ लोअर सर्क्युलर रोड

डॉ. अहमद हे येथील एक प्रख्यात दतवैद्य असून आपल्या ज्ञानाचा रोग्याना जसा फायदा मिळतो तसा या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना पण मिळावा या हेतूनें त्यानीं आपल्या हाताखालीं काहीं विद्यार्थी घेण्यास सुरुवात केली दतविद्येचें विशिष्ट शिक्षण देणारी सस्था हिदुस्थानात नसल्यानें डॉ अहमद याचेकडे उमेदवारांचे पुष्कळ अर्ज येऊ लागले डॉक्टर साहेबानीं आपल्या विद्यार्थ्यांकरिता अमेरिका व यूरोपमधील दतवैद्यकाच्या शाळेंतील चालू अभ्यासक्रमाला धरून आपला अभ्यासक्रम ठेवला अशा रीतीनें इ स १९१६ साली कलकत्ता डेंटल कॉलेज व हॉस्पिटलची स्थापना झाली

## बेंगॉल ॲलन होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, १६९ बहुबझार स्ट्रीट

होमिओपॅथीचे कलकत्यातील सुप्रसिद्ध डॉ एन् एम् चौधरी यानी चोवीस वर्षांपूर्वी आपले शिकॅगो येथील गुरु डॉ ॲलन याचे नावें वरील सस्था स्थापन केली या कॉलेजच्या व सरकारी मेडिकल स्कूलच्या शिक्षणक्रमात फरक येवढाच की औषधयोजनेचे ज्ञान ॲलोपॅथिक पद्धतीने न देता होमिओपॅथीनें दिले जातें यापेक्षा बाकी शिक्षणात फारसा फरक नाही शारीर (Anatomy), इद्रियविज्ञान (Physiology) विकृतशारीर (Pathology), सूतिकाशास्त्र (Midwifery), शस्त्रवैद्यक (Surgery) वगैरे विषयाचें योग्य ज्ञान येथें दिले जातें चागल्या प्रशस्त आवारात या कॉलेजची इमारत बाधलेली आहे प्रयोगशाळा, पुस्तकालय, रुग्णालय, वस्तुसग्रहालय, वगैरे सर्व विभाग या कॉलेजलाच जोडलेले असल्याने येथून पास झालेले विद्यार्थी वैद्यकीय ज्ञानाचे बाबतीत कोणत्याही रीतीने कमी दर्जाचे ठरत नाहीत कॉलेजच्या रुग्णालयात व दवाखान्यात औषधोपचारासाठी पैसे घेत नाहीत नेत्रविद्येचा अभ्यास करण्यासाठी लागणारी सर्व यत्रें व उपकरणी नुकतीच आणविली असून 'क्ष' किरणाची व अल्ट्रा-व्हॉयोलेट किरणाची यंत्रेंही कॉलेजनें विकत घेतली आहेत

येथें प्रवेश मिळण्यासाठी विद्यार्थ्याचें शिक्षण कमीत कमी मॅट्रिकपावेतों झाले पाहिजे वैद्यकीय पदवीधराना एकदम तिसऱ्या वर्षाच्या वर्गांत घेण्यांत

येतें एल् एच् एम् एस् (लायसेनशिएट इन् होमिओपॅथिक मेडिसिन), हा शिक्षणक्रम तीन वर्षांचा असून एम् एच् एम् एस् (मास्टर इन् होमिओ-पॅथिक मेडिसिन) याला चार वर्षे लागतात वरील पदव्याना सरकार-मान्यता नाही डॉ चौधरी हे स्वत सरकारमान्य वैद्यकीय कॉलेजचे एम् डी असून या कॉलेजचे प्रिन्सिपॉल आहेत त्याचप्रमाणें कॉलेजमध्यें शिकविणारा सर्व शिक्षकवर्ग सरकारमान्य वैद्यकीय पदवीधर आहे. इ स १९३७–३८ मध्यें या संस्थेतून एल् एच् एम् एस् चे परीक्षेत २८, बी एच् एम् एस् चे परीक्षेत २४ व एम् एच् एम् एस् चे परीक्षेत २४ असे विद्यार्थी पास झाले

# प्रकरण सहावें

# धंदेशिक्षणाच्या संस्था

## बेंगॉल इंजिनियरिंग कॉलेज, [ शिवपूर ]

वरील कॉलेज कलकत्यांत नसून हुगळी नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर बोटॅनिकल गार्डन्स्‌जवळील शिवपूर खेड्याच्या हद्दीत आहे म्हणून पुष्कळदा याला शिवपूर इंजिनियरिंग कॉलेज असेही म्हणतात कॉलेजची इमारत अगदी नदी किनाऱ्यावर फार रमणीय जागी आहे सरकारनें इ स १८८० साली इंजिनियरिंगचें उच्च शिक्षण देण्यासाठी या कॉलेजची स्थापना केली येथें विद्यापीठाच्या बी ई परीक्षेपर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे शिवाय कॉलेजचे डिप्लोमाचेही वर्ग आहेत प्रत्येक वर्षी ७० नवीन विद्यार्थी घेतात त्यापैकी ४० सिव्हिल इंजिनियरिंगसाठी, व ३० मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगसाठीं घेण्यात येतात गेल्या दोन तीन वर्षांतील येथील विद्यार्थ्यांची संख्या सुमारें २८० होती बी ई च्या परीक्षेकरिता कलकत्ता विद्यापीठास जोडलेली अशी ही एकच संस्था आहे

गणित हा ऐच्छिक विषय घेऊन इंटर सायन्स पास झालेल्या विद्यार्थ्यांसच बी ई चे वर्गांत प्रवेश मिळू शकतो याशिवाय कॉलेजच्या प्रवेश परीक्षेंतही पास व्हावें लागतें बी एस्‌सी पास झालेल्या विद्यार्थ्यास एकदम दुसऱ्या वर्षांत घेतात बी ई चा शिक्षणक्रम एकंदर चार वर्षांचा असून पहिल्या दोन वर्षांनतर इंटर इंजिनियरिंगची परीक्षा होते ही पास झाल्यावर दोन वर्षांनी विद्यार्थ्यांना बी ई चे परीक्षेस बसता येते इंटर इंजिनियरिंग पावेतों वर्षास १६० रुपये व बी ई चे वर्गास वार्षिक २०० रुपये फी असते बी ई ची परीक्षा पास झाल्यावर वर्कशॉप किंवा विजेच्या कारखान्यात प्रात्यक्षिक शिक्षण (practical training) घेतल्याशिवाय पदवी मिळत नाही कोणत्याही परिस्थितीत २१ वर्षांचे वरील विद्यार्थी कॉलेजात घेत नाहीत

मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग या विषयातील डिप्लोमा व

असोशिएटशिप असे दोन शिक्षणक्रम आहेत या वर्गांत बोर्ड ऑफ अप्रेंटिस ट्रेनिंगची किंवा विद्यापीठाची इंटर सायन्स्ची परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांस त्याचें वय वीसपेक्षा जास्त नसेल तर प्रवेश मिळतो कॉलेजांतील शिक्षण तीन वर्षें व कारखान्यांत काम तीन वर्षें अशी एकदर सहा वर्षें या शिक्षणाला लागतात असोशिएटचा शिक्षणक्रमही सहा वर्षांचा आहे त्यापैकी चार वर्षें कॉलेजचें शिक्षण व दोन वर्षें कारखान्यातील शिक्षण असे त्याचे भाग आहेत.

## बेंगॉल टेक्निकल इन्स्टिटयूट

बेंगॉल टेक्निकल इन्स्टिटयूट ही संस्था इ स १९०६ साली सर तारकनाथ पलित याचे मदतीनें स्थापन झाली इ स १९१० साली ही इन्स्टिटयूट नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन या संस्थेकडे देण्यात आली व ती अद्यापि त्याचेकडूनच चालविली जाते सर राशबिहारी घोष हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष होते व त्यानीच आपल्या मृत्युपत्रानें आपली शिल्लकी मालमत्ता या संस्थेस दिली ही देणगी सुमारें वीस लक्ष रुपयाची होती श्री ब्रिजेंद्र किशोर रॉय चौधरी यानीही या संस्थेस मोठी देणगी दिली आहे सिआलदा स्टेशनच्या दक्षिणेस पाच मैलावर जाधवपूर स्टेशनच्या जवळ असलेली स्वतःच्या मालकीची शभर बिघे जमीन कलकत्ता नगरसभेने १९२२ साली इन्स्टिटयूटला देणगी म्हणून दिली या जागेवर मध्यभागीं कॉलेजची भव्य इमारत बांधली असून त्याचे बाजूस मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व केमिकल इंजिनियरिंगच्या प्रयोगशाळा, वर्कशॉप, वीज तयार करण्याचे विद्युत्गृह, वगैरे इमारती आहेत इमारतींचा एकदर खर्च सात लक्ष रुपये आणि यत्र-सामग्री व उपकरणी याकरिता सुमारें दोन लक्ष असे नऊ लक्ष रुपये या कामी खर्च झाले आहेत विद्यार्थी वसतिगृह व क्रीडांगण ही याच आवारात आहेत ई बी रेल्वेचें जाधवपूर स्टेशन इन्स्टिटयूटला लागूनच असल्यानें कलकत्त्यास राहून येथे शिकावयास येणारे बरेच विद्यार्थी आहेत

या संस्थेंत मुख्यतः पुढीलप्रमाणें शिक्षण दिलें जातें.—

(१) मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व केमिकल इंजिनियरिंग या विषयाचा चार वर्षांचा शिक्षणक्रम,

(२) मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगचा तीन वर्षांचा जोड

अभ्यासक्रम यात प्रात्यक्षिकावर जास्त भर देण्यात येत असल्यानें विद्यार्थ्यांचा बराचसा वेळ वर्कशॉपमध्यें किंवा विद्युत्गृहात काम करण्यात जातो,

(३) जमिनीची मोजणी (सर्व्हे) व यंत्राचे वगैरे नकाशे काढणें (ड्राफ्टस्मन) याचे शिक्षणाचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा आहे,

(४) कलकत्ता नगरसभेच्या वर्कशॉपमध्यें काम करणाऱ्या उमेदवारांना यान्त्रिक विषयाचें मोपपत्तिक ज्ञान देण्यासाठी इन्स्टिटच्यूटनें एक वर्ग उघडला आहे

या संस्थेतील शिक्षकवर्गापैकी बरेच अमेरिका, जर्मनी व इंग्लडमधील पदवीधर आहेत विद्यापीठाची मान्यता व सरकारी मदत नसतांही येथून पास झालेल्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकऱ्या मिळतात यावरून संस्थेचे शिक्षण किती उच्च दर्जाचें आहे हें दिसून येईल

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ दक्षिणेकडे जाणाऱ्या बालीगजच्या ट्रामने बालीगज स्टेशनवर जावें, व तेथून लोकलने जाधवपूरला जावें जाधवपूर स्टेशनजवळच इन्स्टिटच्यूटच्या भव्य इमारती दिसतात स्टेशनपासून इन्स्टिटच्यूटला जाण्यास चार मिनिटे लागतात

## बालीगज इंजिनियरिंग कॉलेज

ही संस्था नुकतीच अस्तित्वात आली असून येथें मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व मोटार इंजिनियरिंगचें शिक्षण बंगाली भाषेंतून दिलें जाते यान्त्रिक विषयाचें शिक्षण मातृभाषेंतून देण्याचा हा प्रयत्न स्तुत्य आहे

## बेंगॉल व्हेटरनरी कॉलेज, बेलगाछिया

जनावराच्या रोगाचे व त्यावरील उपचाराचें वैद्यकीय शिक्षण देण्यासाठी या प्रांतांत कांही व्यवस्था झाली पाहिजे असे सरकारला वाटूं लागल्यामुळे इ स १८८३ साली या विषयाचा विचार करण्यासाठी एक कमेटी नेमली या कमेटीनें सर्व बाजूंनी विचार करून कलकत्त्याचे जवळपास एक पशुवैद्यकाचें कॉलेज व रुग्णालय काढणें जरूर आहे असा अभिप्राय दिला.

इ. स १८८५ सालीं बड्या बझारातील मारवाडी व्यापाऱ्यानी कलकत्त्या-जवळ सोधपूर येथें एक पाजरपोळ काढून त्यात १,३०० गुराच्या औषध-पाण्याची व्यवस्था केली याच सुमारास पशुवैद्यकाची योजना सरकारपुढें होती पांजरपोळाच्या जवळ कॉलेज काढल्यास त्याचा उपयोग होईल म्हणून त्या सस्थेला सहकार्य करण्याबद्दल सरकारने विनंति केली सस्थेनें सरकारच्या विनतीस मान्यता देऊन शक्य ती मदत देण्याचे कबूल केलें व ३०,००० रुपये इमारत बाधण्यासाठी दिले. मुबईचे पारशी व्यापारी सर दिनशा माणेकजी पेटिट यानी पशुरुग्णालय बाधण्यासाठी सरकारला २५,००० रुपये देणगी दिली राजा शिवबक्ष बागला यानीं बेलगाछिया येथें असलेला आपला विस्तीर्ण बगिचा या कामासाठीं दिला अशा रीतीने इ स १८९२ सालीं इमारत पूर्ण होऊन बंगालचे तत्कालीन ले गव्हर्नर सर चार्लस् इलियट याचे हस्तें १८९४ साली व्हेटरनरी कॉलेजची स्थापना झाली राजा शिवबक्ष यानीं आणखी ३०,००० रुपये देणगी दिली इ स १९३४ सालीं कॉलेजात एकंदर १८४ विद्यार्थी होते या कॉलेजात बरेच महाराष्ट्रीय विद्यार्थी शिकून गेले आहेत दिवसेंदिवस परप्रातीयाना प्रवेश मिळणे कठिण होत आहे

## गव्हर्मेंट स्कूल ऑफ आर्ट, २८ चौरगी रोड

७३ वर्षापूर्वी बगालमध्ये चित्रकलेला विशेष मान्यता नव्हती लोकाचे व सरकारचें तिच्याकडे लक्ष नसल्यानें कलेची अवनति होत चालली ही स्थिति जर अशीच राहिली असती तर या देशातून चित्रकलेचें उच्चाटनच झालें असतें इ स १८५४ सालीं या कलेच्या काहीं श्रीमत नागरिकांनीं चित्रकला शिकविण्याकरिता एक शाळा स्थापन केली या सस्थेची विशेषशी भरभराट सरकारच्या हातांत ती सस्था येईपर्यंत झाली नाहीं. लॉर्ड नॉर्थब्रुक याच्या कारकीर्दींत चित्रकलेच्या शिक्षणासाठीं सरकारने प्रयत्न केला पाहिजे असें ठरले या धोरणानुसार ही सस्था तिच्या चालकाकडून स्वत कडे घेऊन तीत सरकारनें बऱ्याच सुधारणा केल्या या शाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरिता जुनी तैलचित्रें, दगडी व धातूचे जुने पुतळे निरनिराळ्या देशातून गोळा केले बहूबझारमधील शाळेची जागा सोयीची नसल्यानें चौरंगी रस्त्यावर इंडियन म्यूझिअमशेजारी या सस्थेला जागा देण्यात आली.

इ. स १९३७ साली शाळेंत एकदर २८५ विद्यार्थी निरनिराळ्या विभागातून शिक्षण घेत होते इ स १९११ साली म्यूझिअममधील चित्रकलाविभाग व शाळेचा चित्रसग्रह एक करून त्याची व्यवस्था स्कूल ऑफ आर्टकडे देण्यांत आली शाळेंत पाश्चात्य व हिंदी चित्रकला, व्यापारोपयोगी चित्रकला, शिळाछापाचें काम, नकाशे काढणें, ब्लॉकमेकिंग, वगैरे विषयाचे शिक्षण दिलें जातें प्रत्येक शाखेचा शिक्षणक्रम पूर्ण करण्यास पांच वर्षे लागतात पूर्ण शिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांस शिक्षकाच्या परीक्षेला बसता येते या परीक्षेकरिता आणखी तीन वर्षे शिक्षण घ्यावें लागतें

## मुके व बहिरे याच्या शिक्षणाची शाळा

इ स १८९३ सालीं श्री नाथ सिंह, श्री यामिनीनाथ बानर्जी, व श्री मोहिनीमोहन मुझुमदार या गृहस्थानीं सिटी कॉलेजच्या एका खोलींत बहिरे व मुके याना लिहिणें, वाचणे व बोलणें शिकविण्यासाठी एक शाळा काढली इ स १८९६ साली श्री बानर्जी हे या विषयाचे आधुनिक शिक्षण घेण्याकरिता अमेरिकेस गेले व तेथून परत आल्यापासून इ स १९२१ पावेतों ते या सस्थेचे प्रिन्सिपॉल होते मालद्याचे जमीनदार राजा शरच्चद्र रॉय चौधरी यांनी या सस्थेस दोन लक्ष वीस हजाराची देणगी दिल्यानें सस्थेस एक प्रकारचें स्थायिकत्व आले व इ स १९०३ साली अपर सर्क्युलर रोडवर सस्थेने स्वत ची इमारत बाधली श्री बोल्टन नबीनचद्र बोरल, उमेशचद्र दत्त, व प्रेसिडन्सी कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल मि एफ् जे रो याची सस्थेला फारच मदत झाली बगाल सरकार व कलकत्ता नगरसभा यांनीं सस्थेला अनुक्रमे बारा हजार व दहा हजार अशा देणग्या दिल्या येथून शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांनीं डाका, राजशाही, चित्तॅगॉग, बहेरामपूर, अलाहाबाद, बडोदा वगैरे ठिकाणी मुके व बहिरे याच्याकरितां शाळा काढल्या आहेत

ओठाच्या हालचालींचे अवलोकन करून समोरचा इसम काय बोलतो हें समजणे व त्याप्रमाणे बोलणे या गोष्टी येथें मुक्या बहिऱ्याना शिकविण्यांत येतात बोटें किंवा हात याचा उपयोग करण्याची जरूरी नसते खरे म्हटलें तर येवढे शिक्षण दिले की शाळेचें काम सपले परतु तसें न करतां विद्यार्थ्यांना

निरनिराळ्या धंद्याचें शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभें राहण्यास शाळा त्यांना मदत करते. मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र विभाग असून येथें स्त्री शिक्षक ठेवले आहेत. मुलांचे व मुलींचे अशी दोन वसतिगृहें शाळेच्या जवळ असून विद्यार्थ्यांना अभ्यासांत मदत करण्यासाठी शिक्षक वसतिगृहांत राहतात. चित्रकला, मूर्तिकाम, लोखंडाचें ओतकाम, छपाई, शिवणकाम, लोहारकाम, सुतारकाम, पुस्तकें बांधणें, भरतकाम, चित्रें छापणें, स्वयंपाक करणें, वगैरे विषयांचें शिक्षण येथें दिलें जातें.

## अंधविद्यालय

इ. स. १८९७ सालीं या संस्थेची स्थापना झाली. सर्व जातींच्या व धर्मांच्या निराश्रित व निराधार अशा अंध स्त्री पुरुषांना राहण्याची व साहित्य-विषयक, औद्योगिक, शास्त्रीय व व्यवहारोपयोगी शिक्षणाची सोय वरील संस्थेत आहे. अंध विद्यार्थ्यांस स्वतःचे पायावर उभें राहून सचोटीनें चरितार्थ चालविता येण्याजोगें शिक्षण देणें हें या शाळेचें मुख्य ध्येय आहे. शारीरिक शिक्षण, सामान्य शिक्षण, गायनाचें ज्ञान, औद्योगिक शिक्षण व अध्ययन असे शाळेचे पांच विभाग आहेत. हस्तशिक्षण व स्पर्शज्ञान या दोन गुणांची वाढ करण्याकडे विशेष लक्ष देतात. कारण या दोहोंशिवाय अंधांना शिक्षण देणें कठिण आहे. लोकवस्तीच्या पेठा व निरनिराळे रस्ते यांचें ज्ञानही विद्यार्थ्यांना देतात. दैनिकांतील व मासिकांतील लेख विद्यार्थ्यांना वाचून दाखवितात. त्याचप्रमाणे जगांतील घडामोडींचें व प्रचलित विषयांचें ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावें म्हणून आठवड्यांत अभ्यासगट भरवितात. कल-कत्याच्या दक्षिणेस सहा मैलांवर डायमंड हार्बर रोड, बेहला, येथें मोकळ्या जागेंत शाळा बांधली आहे. तेथें प्रशस्त वसतिगृहें व शाळेच्या इमारती असून खेळण्यासाठी मोठें क्रीडांगणपण आहे. मुलगे व मुली या दोन्ही विभागांतील शिक्षक तेथेंच राहात असल्यानें मुलांवर त्यांचे सतत लक्ष राहतें. प्रिन्सिपॉल व सुपरिंटेंडेंट यांचे बंगलेही त्याच आवारांत आहेत.

## कलकत्ता येथील गायनशाळा

बंगाल्यांत गायन, वादन व नृत्य या कलांना बरेंच महत्त्व आहे. इ. स. १९३२ सालीं सर्व प्रांतांत सात गायन शाळा होत्या, व त्यांतून ३२८ विद्यार्थी

तयार झाले पाश्चात्य व पौर्वात्य गायनाचे शिक्षण देणाऱ्या चार संस्था कलकत्यात आहेत

## कलकत्ता स्कूल ऑफ म्युझिक, ८४२ पार्क मॅन्शन, पार्क स्ट्रीट

इ स १९१५ साली वरील संस्था स्थापन झाली गायन व पियानो, व्हायोलिन, व्हायोला, व्हायोलिन सेलो, पेटी आरगन वगैरे वाद्यें वाजविण्याचें सशास्त्र शिक्षण येथे देण्यात येतें त्याचप्रमाणें गायनकलेची तत्त्वें व त्यातील सुसंबद्धता वगैरे विषय येथे शिकवितात

## संगीत संमीलनी, ७४ धरमतल्ला स्ट्रीट

हिंदी गायनकलेची वाढ व तिचा प्रसार करण्याकरिता ही संस्था इ स १९०८ साली स्थापन झाली सुशिक्षित बंगाली लोकात गायन व वादन याची आवड उत्पन्न करणें, या कार्याकरिता मुलामुलींसाठी शहराच्या निरनिराळ्या भागात संमीलनीच्या शाखा चालविणें, वेळोवेळी गायनाचे कार्यक्रम करविणें, वगैरे कार्य ही संस्था करीत आहे

## संगीत संघ

सर अशुतोष व लेडी प्रतिभा चौधरी यानी इ स १९०१ सालीं आनंदसभा नावाची संस्था स्थापन केली दहा वर्षांनी ही संस्था सार्वजनिक करून तिचे "संगीत सभा" असें नाव ठेविले हिंदी गायनकलेला उत्तेजन देऊन ती लोकप्रिय करणे, गायनशास्त्राचे संशोधन करणें, या विषयावरील हस्तलिखित व छापील पुस्तकाचा व चित्राचा संग्रह करणें व योग्य पुस्तकाचे प्रकाशन करणें, विद्वानाची या विषयावर व्याख्याने करविणें, शहरात ठिक-ठिकाणी गायनशाळा काढणे, गायनाचे कार्यक्रम करणें, वगैरे कार्य ही संस्था करीत आहे

## बासंती विद्यापीठी, ८७ कॉर्नवॉलिस स्ट्रीट

कलकत्याचे उत्तरभागात केवळ स्त्रियाकरिता ही संस्था स्थापन केली आहे सुरुवातीस येथें फक्त सहाच मुली होत्या दिनेंद्रनाथ टागोर, वीणा सेन, कमला टागोर, अशा सन्मान्य व्यक्तींच्या देखरेखीखालीं ही संस्था

चाललेली असून येथे गायन, वादन, नृत्य, गृहव्यवस्था, आरोग्य, वगैरे विषय शिकवितात तसेंच नवीं व जुनी बंगाली गाणी त्यांच्या नोटेशनसहित शिकविली जातात

## गव्हर्नमेंट वीव्हिंग इन्स्टिटयूट, श्रीरामपूर

१९०१ साली सिमला येथे भरलेल्या विद्याधिकाऱ्यांच्या सभेंत बंगाल प्रांतात धंदेशिक्षणाची वाढ करण्याकरिता एक विणकामाची शाळा काढावी असें ठरलें होतें परंतु सरकारचें या विषयाकडे लक्ष इ स १९०५ च्या स्वदेशी चळवळीनंतरच गेलें या साली श्रीरामपूर येथील जमीनदार राजा किशोरीलाल गोस्वामी यांनी आपला श्रीरामपूर येथील वाडा या शाळेच्या कामासाठी सरकारला दिला व अशा रीतीनें ही विणकामाची शाळा सुरू झाली हा प्रयोग फारच यशस्वी झाला लोकांच्या गरजेनुरूप शिक्षणक्रम असल्याने प्रारंभापासून येथे विद्यार्थ्यांची गर्दी झाली येथें दोन प्रकारचें शिक्षण देण्याची सोय आहे

(१) वरच्या वर्गांत साधारण सुशिक्षित तरुणांना या विषयाचे शिक्षक किंवा कारखान्याचे चालक होण्याची पात्रता यावी म्हणून धंद्याचें सोपपत्तिक शिक्षण देण्यात येते

(२) खालच्या वर्गांत कोष्टी लोकांना नवीन हातमागावर काम करण्यास शिकवितात इन्स्टिटयूटची इमारत चांगली प्रशस्त असून गंगेच्या काठीं असल्याने फार शोभिवंत दिसते या संस्थेंत हल्लीं १५० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय आहे

## जाण्याचा मार्ग

श्रीरामपूर हे गंगेच्या पश्चिम किनाऱ्यावर हावरा स्टेशनपासून चौदा मैलावर ई आय रेल्वेच्या मुख्य लाइनवर आहे स्टेशनवर भाड्याच्या घोडागाड्या व मोटारी मिळतात स्टेशनपासून इन्स्टिटयूटला जाण्यास घोड्याच्या गाडीला आठ आणे भाडें पडते दुसरा मार्ग बसचा. हावरा स्टेशनपासून बालीखालच्या बसेस सुटतात त्यातून उतरून बाली ब्रिजजवळचा छोटा पूल ओलांडावा म्हणजे पलीकडे श्रीरामपूरच्या बसेस असतात

त्या थेट श्रीरामपूर स्टेशनवर जातात स्टेशनवरून सोयीस्कर वाहन घेऊन इन्स्टिटयूटला जातां येतें

## सरोज नलिनी दत्त इंडस्ट्रियल स्कूल

स्त्रियाना स्वतःच्या पायावर उभें राहून चरितार्थ चालविता यावा म्हणून त्याना उपयुक्त अशा धद्याचें शिक्षण देण्यासाठी इ स १९२५ सालीं सरोज नलिनी दत्त इंडस्ट्रियल स्कूलची स्थापना करण्यात आली गायन, वादन, भरतकाम, चित्रकला, वगैरे विषयाच्या शिक्षणाचे वर्ग येथें आहेत. शाळा सुरू झाल्यापासून एकदर १,४०० हून जास्त स्त्रियानी येथें शिक्षण घेतलें हल्लीं येथें २०० प्रौढ स्त्रिया शिक्षण घेत आहेत

# प्रकरण सातवें

# प्रेक्षणीय स्थळें

## एस्प्लनेडचें मैदान

शहराच्या मोठेपणाला व वैभवाला साजेशी अनेक स्थळें कलकत्त्यात आहेत तीं सर्व सावकाशपणे पाहावयाची असल्यास बराच मुक्काम करावा लागेल ज्याला सवड असेल त्याने हिवाळ्यात येथे येऊन पधरावीस दिवस राहावे ईस्ट इडिया कपनीचा अमल सुरू झाल्यापासून इ स १९११ पर्यंत कलकत्ता हें ब्रिटिश हिंदुस्थानच्या राजधानीचें शहर होतें या कारणानें येथे पुष्कळ प्रेक्षणीय स्थळे व उद्याने आहेत मनुष्याच्या शरीरांत फुप्फुसें व रक्तवाहिन्या याना जें महत्त्व आहे तेंच मोठ्या शहरातील मोकळीं मैदाने व प्रशस्त रस्ते यांना आहे या दोन बाबीत कलकत्त्याची बरोबरी करणारे दुसरें शहर हिंदुस्थानात नाही

कलकत्त्यातील प्रेक्षणीय स्थळामध्ये अग्रपूजेचा मान वरील मैदानाला दिला पाहिजे हें फार विस्तृत, लाब, रुद, पुतळ्यानीं विभूषित, वृक्षराजीनी सुशोभित, हिरव्यागार दूर्वांकुरांनी मडित असे असून शहराच्या अगदी जवळ आहे पूर्वेस कलकत्त्यातील अत्यत महत्त्वाचा व प्रेक्षणीय चौरगी रस्ता, उत्तरेस कर्झन पार्क, पश्चिमेस हुगळी नदी व तिच्या काठावरील इतिहास-प्रसिद्ध फोर्ट विलियम आणि दक्षिणेस व्हिक्टोरिया राणीच्या येथील कार-कीर्दीचे सगमरवरी स्मारक (व्हिक्टोरिया मेमोरियल) अशी या मैदानाची चतुःसीमा आहे त्याची लाबी सुमारें दोन मैल व रुदी एक मैल आहे किल्ल्या-जवळील लष्करी हालचाली शहरातील लोकाच्या दृष्टीस पडू नयेत, व किल्ल्याजवळ शत्रूला येता येऊं नये म्हणून शहराची पूर्वसीमा व किल्ला यामध्यें ही जागा मुद्दाम राखून ठेविली असावी असे वाटतें कारण याला एस्प्लनेडचे मैदान असें म्हणतात कोणतेही कारण असो, येवढी गोष्ट खरी कीं, त्याचा उपयोग हल्ली कलकत्त्यातील जनतेला सकाळीं व सध्याकाळी मोकळ्या

हवेंतील व्यायाम घेण्यास होतो मैदानाच्या एका भागांत शहरातील निरनिराळ्या क्लब्जची क्रीडांगणे आहेत लंडन येथील हाईड पार्क व पॅरीसचें ब्वा-द-बोलोन्य (Bois-De-Boulogne) याच्याशी तुलनेंत हें मैदान कोणत्याही रीतीनें कमी दर्जाचें नाही

## व्हिक्टोरिया मेमोरियल [राणी व्हिक्टोरियाचें स्मारक]

ताजमहालला प्रतिस्पर्धी म्हणून लॉर्ड कर्झननें आपल्या कारकीर्दीत व्हिक्टोरिया मेमोरियल बांधण्याची सुरुवात केली असें म्हणतात भोंवतालची सुंदर व विस्तृत उद्यानें, जलसमूह व मध्यवर्ती असलेली संगमरवरी इमारत एवढ्याधुरतें दोहोंत साम्य आहे पण सौंदर्य व सूक्ष्म शिल्पकला या दृष्टीनें हें स्मारक ताजमहालची बरोबरी करूं शकत नाहीं दोन्ही स्मारकें बांधणाराच्या हेतूमध्येंदेखील साम्य नाहीं एक स्वर्गीय प्रेमाची खूण म्हणून बांधलेलें, तर दुसरें बादशाही दर्पामुळें व ऐतिहासिक स्पर्धेमुळें अस्तित्वात आलेलें तथापि हें स्थान पाहण्यासारखें आहे यात शंका नाही व्हिक्टोरिया राणीच्या हिंदुस्थानातील कारकीर्दीची स्मृति ह्या देशात चिरकाल राहावी याकरिता कर्झन साहेबानीं हें स्मारक बांधण्याचें ठरविलें माजी बादशहा पांचवे जॉर्ज हे युवराज असताना त्यांचे हस्तें त्या इमारतीच्या कोनशिलेचा समारंभ झाला व इ स १९२१ साली तेव्हाचे युवराज, नंतरचे अष्टम एडवर्ड व सध्याचे ड्यूक ऑफ वुइंडसर यांच्या हस्तें ही इमारत उघडण्यात आली एकंदर सर्व इमारतीस ७६ लक्ष रुपये खर्च झाला ही रक्कम सर्वसाधारण जनता व मोठमोठे राजेमहाराजे यांच्याकडून वर्गणी गोळा करून जमा केली होती याची लांबी ३३९ फूट असून रुंदी २२८ फूट आहे

उत्तरेकडील दरवाज्यानें आंत शिरल्यावर हॉलमध्यें आलें की, उजवीकडे रॉयल गॅलरी लागते व्हिक्टोरिया राणीच्या आयुष्यातील निरनिराळ्या प्रसंगाचीं चित्रे येथें असून राणीचा पिआनो व लिहिण्याचें टेबल या दालनाच्या मध्यभागीं ठेवलें आहे मध्यघुमटाच्या खाली असलेल्या अष्टकोनी विस्तृत जागेला राणीचा हॉल असें म्हणतात येथे मध्यभागीं राणीचा तरुणपणीचा संगमरवरी सुंदर पुतळा आहे दिवाणखान्याच्या प्रत्येक भिंतीवर निरनिराळ्या भाषांतून राणीचा जाहीरनामा कोरलेला दिसतो

मध्यभागी उभे राहून वर पाहिलें म्हणजे वरील गॅलरीतील भितीवर व्हिक्टो-रिया राणीच्या आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसगाची चित्रें काढलेली दिसतात

राणीच्या दिवाणखान्यातून तसेंच पुढें गेलें म्हणजे आपण राजपुत्राच्या दिवाणखान्यांत येतों येथे क्लाइव्हचा भव्य पुतळा व प्लासीच्या युद्धात जिंकलेल्या दोन फ्रेंच तोफा प्रामुख्याने दिसतात या ठिकाणी पुष्कळ ऐति-हासिक चित्रें व कागदपत्र आहेत ऐतिहासिक कागदात नंदकुमारावर बनावट सही केल्याचा आरोप ठेवून त्याला फाशीची शिक्षा फर्माविलेलें आरोपपत्र जसेंच्या तसेंच माडून ठेवलेलें आहे वर गेले म्हणजे जुन्या बाद-शाही सनदा, पेशव्याशी केलेले मोडींत लिहिलेले तहनामे, जुनी नाणी, ब्रह्म-देशच्या थिबा राजाची बसण्याची चादीची चटई, जुनीं शस्त्रास्त्रे वगैरे दिसतात आर्ट ग्यालरी म्हणून एक भाग आहे त्यांत पुष्कळ चित्रांचा सग्रह आहे येथें श्री शिवाजी महाराजांचें दाभणकाठी मिशा असलेलें, दाढीविरहित असें एक चित्र आहे मेमोरियलचे माजी क्यूरेटर कै रावबहादुर भाईसाहेब गुप्ते यानी आपल्या एका लेखांत "हें चित्र तंजावरच्या राजघराण्यातील चित्रसंग्रहांतून आणलेलें असून जास्त विश्वसनीय आहे" असें आपले मत प्रतिपादिले होते मेमोरियलच्या इमारतीचा लहान लाकडी नमुना व प्लासीच्या लढाईचा नकाशा आणि विलायतेची सफर करणारें तत्कालीन एक जहाज याचेही नमुने आहेत हल्लीचा फोर्ट विल्यिम दूरवर दिसत आहे अशा तऱ्हेचें हुगळी नदीचें चित्र पाहिल्याशिवाय राहू नये ज्या ठिकाणी राणीची भितीवरील चित्रे आहेत त्या ग्यालरीत जाण्याकरिता मेमोरियलच्या सुपरिंटेंडेंटची परवानगी घ्यावी लागते इमारतीत शिरल्याबरोबर त्याची कचेरी आहे तेथें अर्ज केला की ही परवानगी मिळते

मेमोरियलच्या आवारातील बगिच्यात नाना कारागिरानी तयार केलेले राजघराण्यातील लोकाचे पुतळे आहेत सोमवारखेरीज इतर सर्व वारी सकाळीं १० ते सध्याकाळी ५ वाजेपर्यंत (हिंवाळ्यात १० ते ४) मेमो-रियल पाहावयास उघडें असते आत जाण्याकरिता फी नाहीं परतु एका भागातील चित्रें पाहण्याकरितां माणशी चार आणे द्यावे लागतात शुक्रवारी आंत जाण्यास आठ आणे फी पडते परतु मग चित्राच्या विशिष्ट भागाला असलेली चार आणे फी निराळी द्यावी लागत नाही

अशा रीतीने हिंदुस्थानावर इंग्लिश लोकानी मिळविलेल्या जयाची व वैभवाची साक्ष देण्यास, कर्झन आणि इतर इंग्रजानी, हिंदी जनतेचा पैसा घेऊन हे स्मारक बांधलें मोगल बादशहानी हिंदी जनतेच्या पैशानें मुसलमानी वैभवाची साक्ष म्हणून ताजमहाल बांधला परंतु आमच्या मराठी राज्याचा अटकेपर्यंत व बंगालपर्यंत जो विस्तार झाला व जें वैभव प्राप्त झाले त्याची साक्ष कोठें आहे ? इत्यादि विचारानीं मन गोंधळून गेल्याशिवाय राहात नाही

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपासून उत्तरेकडे जाणारी कोणतीही बस किंवा ट्राम घ्यावी थिएटर रोडवर उतरलें म्हणजे डाव्या हातास स्मारकाची भव्य इमारत दिसतेच त्या दिशेनें चालत गेलें म्हणजे दहा मिनिटांचे आत आपण आवारात शिरतों

## जादुघर [ इंडियन म्यूझिअम ]

इ स १८१४ साली शिवपूरच्या वनस्पतींच्या राजबागेचे व्यवस्थापक डॉ नाथानिअल वॅलिच हे डॅनिश गृहस्थ होते. यानी येथील एशिॲटिक सोसायटीपुढें एक निबंध वाचून हिंदी पदार्थ संग्रहालय स्थापन करण्याची आवश्यकता प्रतिपादिली

सोसायटीच्या सभासदाना ही गोष्ट पटून त्यानीं पुराणेतिहासविषयक, भूशास्त्रविषयक, प्राणिशास्त्रविषयक, व कलाकौशल्यनिदर्शक अशा वस्तूंचा संग्रह करण्यास सुरवात केली इ स १८५८ मध्यें सोसायटीचा हा वस्तुसंग्रह ठेवण्याकरिता "इंपीरियल म्यूझिअम" नावाची एक इमारत बांधण्याची हिंदुस्थान सरकारास सोसायटीच्या सभासदानी विनंति केली बऱ्याच पत्रव्यवहारानंतर इ स १८६६ साली म्यूझिअम ॲक्ट हा कायदा पास झाला, व तदन्वयें सोसायटींतील सर्व वस्तुसंग्रह म्यूझिअमच्या नव्या इमारतींत नेण्यांत आला यातील पुराणवस्तुशाखा, भूशाखा, कलाविभाग, उद्यमविभाग व प्राणिविभाग हे महत्त्वाचे व विस्तृत आहेत

## पुराणवस्तुसंग्रह

पुराणेतिहासाच्या वस्तूंचा येथील संग्रह पूर्वेकडील देशांत असलेल्या कोणत्याही संग्रहापेक्षा फार मोठा आहे न्यू हॉलमध्ये असलेल्या इतिहास-पूर्वकालीन वस्तूमध्ये सिंधमधील मोहेंजदारो येथे सापडलेल्या प्राचीन वस्तू पाहण्यालायक आहेत या वस्तू ५००० वर्षांपूर्वीच्या आहेत असें म्हणतात त्याचप्रमाणें पियरवा स्तुपातील अवशेष असलेली पेटी, अशोकाच्या अखंड दगडी कीर्तिस्तंभाची शीर्षकें, भारहुत स्तूपाचे नक्षीकाम केलेले कठडे व इतर भारतीय कौशल्याच्या वस्तू पाहण्यालायक असून हे नमुने इसवी सनाच्या पूर्वी तीन शतकाच्या कालातील होत नाण्याचा संग्रहही फार चांगला आहे इ स १७३९ त नादिरशहानें हिंदुस्थानावर स्वारी केली या लढाईंत महमदशहाचे सैन्याचा पराजय करून जी लूट नेली त्यातील दोन ऐतिहासिक रत्नें या ठिकाणी पाहावयास मिळतात

## भूशाखा

भूशाखेचे शिलारूप जीवशेष, खनिज व उल्का असे तीन उपविभाग आहेत जीवावशेष भागात या देशातील व परदेशातील शिलारूप प्राणी व वनस्पतींचे नमुने ठेवले आहेत असनसोलजवळील एका कोळशाच्या खाणीतून दोन शिलाद्रुम सांपडलेले येथें ठेविले आहेत याची लांबी ६० फुटापेक्षा जास्त आहे खोडाची रचना आज जिवंत असलेल्या झाडाच्या खोडासारखीच दिसते हे २०० लक्ष वर्षांपूर्वीचे असावेत असा तर्क आहे उल्का विभागात हिंदुस्थान व परदेश यातील उल्कांचा संग्रह आहे शिवालिक दालनात शिवालिक पहाडांत प्राचीन काळीं राहात असलेल्या प्राण्यांचे शिलारूप अवयव व डोकीं पाहिलीं म्हणजे हिंदुस्थानातील पूर्वीचे हत्ती केवढे मोठे होते याची कल्पना होऊन मन गुंग होते त्याचप्रमाणें मनुष्य व वानर याना जोडणाऱ्या दुव्याचाही एक अवशेष येथें सापडतो

## कलाविभाग

कलाविभाग पौर्वात्य कलेच्या नमुन्यानी भरलेला आहे ब्रह्मदेशा-तील व तिबेटी निशाणें, सुंदर जरीचें काम केलेली पांढरी मलमल, भावनगर

हाऊस, ब्रह्मी राजा थिबा याचे सिंहासन, तिबेटांतील लामा वापरीत असलेली मनुष्याच्या माडीच्या हाडाची केलेली माळ या वस्तू विशेष चमत्कृतिजनक आहेत हिंदी चित्रकारांची उत्तमोत्तम चित्रेंही ठेवलेलीं दिसतात

## उद्यमविभाग

हिंदुस्थानातील वनस्पतिजन्य कच्च्या व पक्क्या मालानें उद्यमविभाग भरलेला आहे सिकोना झाडाच्या सालीपासून क्विनाइन कसें काढतात व खसखसीच्या झाडापासून अफू कशी काढतात या दोन गोष्टी अवश्य पाहाव्या सर्व तऱ्हेच्या ततु असलेल्या वनस्पतींचे व त्यापासून काढिलेल्या ततूचे नमुने येथें ठेविले आहेत चहाची लागवड, पाने खुडणें, गोळा करणें, मुरविणें व वाळविणें आणि डबे भरणे, इत्यादि सर्व क्रिया दाखविणारी एक स्वतत्र खोलीच आहे

## प्राणिविभाग

नाना तऱ्हेचे किडे, पृष्ठवशविरहित प्राणी, नाना तऱ्हेचे पक्षी व पशु याचा बराच मोठा सग्रह या ठिकाणी दृष्टीस पडतो या सग्रहातील बहुतेक प्राणी हिंदुस्थानातीलच असून क्वचित् परदेशातील प्राणीही आहेत इडियन म्यूझिअम हें हिंदुस्थानातील एक उत्कृष्ट सग्रहालय आहे येथील संग्रह फार मोठा असून प्राण्याच्या नैसर्गिक परिस्थित्यनुरूप माडणी मात्र मुबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझिअममध्ये जास्त चागली आहे

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपाशी उत्तरेकडे जाणारी कोणतीही ट्राम अगर बस घ्यावी इडियन म्यूझिअमजवळच या वाहनांची थांबण्याची जागा आहे तेथें उतरले की समोरच म्यूझिअमची भव्य इमारत व प्रेक्षकाची चाललेली जा ये दृष्टीस पडते

## मल्लिक पॅलेस

कलकत्त्याच्या उत्तर भागात बगालमधील घरदाज श्रीमत जमीनदाराचे मोठमोठाले वाडे आहेत त्यापैकीच मल्लिक पॅलेस हा एका जमीन-

दाराचा भव्य प्रासाद असून तो मुक्ताराम बाबू स्ट्रीटवर आहे हल्लींचे जमीनदार कुमार ब्रिजेन्द्र मल्लिक यांनीं लोकाना बघण्यासाठी म्हणून हा वाडा सकाळीं १० ते संध्याकाळी ५ पर्यंत उघडा ठेवण्याची परवानगी दिली आहे पश्चिम दरवाज्यानें आत शिरल्यावर एक संगमरवरी फरसबंदी असलेला मोठा दिवाणखाना लागतो यांत नाना तऱ्हेचे पुतळे असून व्हिक्टोरिया राणीचा राज्याभिषेकाचा पोषाख असलेला एक भव्य पुतळा आहे बाजूच्या दिवाणखान्यातून पौर्वात्य व पाश्चिमात्य चित्रकारानी काढलेली तैलचित्रे पाहण्यालायक आहेत

नाना प्रकारची दुर्मिळ तैलचित्रे व पुतळे यानीं हा वाडा भरून गेला आहे त्या सर्वांचे व्यवस्थेशीर वर्णन केल्यास तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल राजवाड्याच्या बागेची रचना मोठ्या चातुर्यानें केलेली आहे विविध रंगाचा पिसारा असलेले मोर, मलाया बेटातील बर्ड्स् ऑफ पेरेडाईझ, नाना तऱ्हेचे पोपट, काकाकुवे, मैना, इत्यादि पुष्कळ तऱ्हेचे पक्षी येथें असून त्याच्याकरिता तारेच्या जाळ्यानी आच्छादित अशी योग्य घरेंही बांधलेलीं आहेत एका बाजूला एका लहानशा गुंफेत प्रार्थनेत गढून गेलेल्या सन्याशाचा पुतळा ठेवला आहे उत्तरेस देवघर बांधलें असून आत मल्लिक घराण्याची देवता दिसते. या कुटुंबाच्या औदार्यानुरूप देवालयाजवळ शेंकडो भिकाऱ्यांना रोज अन्नदान मिळतें तात्पर्य, वेळ असल्यास हा राजवाडा बघण्यासारखा आहे

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ उत्तरेकडे जाणारी नंबर ४ किंवा ४ ए ही बस घ्यावी ही बस चौरंगी, एस्प्लनेड, बेंटिंक स्ट्रीट, लोअर चितपूर, अपर चितपूर रोडवरून थेट बाग बझारला जाते बसने हॅरिसन रोडचें नाकें सोडलें म्हणजे कंडक्टरला ' मल्लिक कोठी जायगा '' असें सांगितलें म्हणजे तो योग्य ठिकाणी उतरवतो तेंथून थोडेंसे चालावे लागते ट्रामनें पण जाता येते भवानीपूरच्या पोलिस स्टेशनजवळ डलहौसीची ट्राम घ्यावी व थेट बागबझारचें तिकिट काढावे एस्प्लनेडच्या ट्राम जंक्शनवर उतरून तेथून बाग बझारच्या ट्राममध्यें बसावे ट्राम कंडक्टरला सांगितलें म्हणजे तो योग्य ठिकाणी उतरण्यास सांगतो

## बेलूर मठ

इ स १८९९ त अमेरिकेंतील शिकॅगो शहरी सर्वधर्मपरिषद भरली होती त्या वेळी तेथें स्वामी विवेकानद हे हिंदुधर्माचे प्रतिनिधि म्हणून गेले होते त्या परिषदेत यश सपादून परत आल्यानतर लगेच त्यांनी बेलूर मठाची स्थापना त्याच वर्षी केली हा मठ गगेच्या उजव्या किनाऱ्यावर असून मठाची जागा स्वामीजींना त्याच्या एका अमेरिकन शिष्यिणीने विकत घेऊन दिली त्या जागीं ओम "ॐ" अक्षराच्या आकाराचें श्री रामकृष्णाचें एक भव्य मदिर बांधण्याचा स्वामीजींचा मानस होता परतु अनेक अड-चणीमुळे ही गोष्ट त्यांचे हयातीत शक्य झाली नाही इ स १९३६ साली श्रीरामकृष्णाचा शतसांवत्सरिक उत्सव कलकत्त्यात फार मोठ्या प्रमाणांत साजरा करण्यात आला त्याच वर्षी किंवा त्याचे अगोदर एकाद वर्ष स्वामी-जींच्या इच्छित मदिराच्या बांधकामाला सुरुवात झाली सुरुवातीला त्याच्या एका अमेरिकन शिष्यानें दीड लाख रुपये दिले ॐ आकाराचें मदिर बांधणे अशक्य आहे असा मोठमोठ्या शिल्पकारांचा सल्ला पडल्यानें मदिर ओमसारखे झालें नाहीं बांधकाम जवळजवळ पूर्ण झाले असून श्री रामकृष्णाच्या मूर्तीची स्थापना मदिरांत झाली आहे

बेलूर येथें विवेकानदाची राहण्याची, बसण्याची, निजण्याची, वगैरे सर्व खोल्या जशाच्या तशाच शृंगारलेल्या ठेवल्या आहेत रोज त्या ठिकाण-चा केरकचरा वगैरे काढून त्या स्वच्छ करून ठेवतात कलकत्त्यांत ही चाल फार आहे रामकृष्ण मिशनची मुख्य कचेरी बेलूरलाच आहे मिशनचें काम फारच व्यवस्थित पद्धतीवर चाललें असून त्याच्या जवळजवळ शंभरा-पेक्षा जास्त शाखा यूरोप, अमेरिका, आफ्रिका, ब्रह्मदेश, वगैरे जगाच्या सर्व भागांत पसरल्या आहेत हिंदुस्थानात तर बहुतेक मोठ्या शहरी मिशनची शाखा आहेच सर्व शाखातून धर्मार्थ दवाखाने चालविणें, धर्म-शिक्षण देणें, वगैरे लोकोपयोगी कामे केली जातात मिशनचे बहुतेक स्वामी इंग्लड, अमेरिका येथें जाऊन आलेले असून त्यातील बरेच जण पदवीधर व सपन्न कुटुबातील आहेत इतके श्रीमत व शिकलेले लोक सर्वसगपरित्याग करून या मिशनचे सेवक बनले ही एकच गोष्ट मिशनची लोकप्रियता दर्शविते

बेलूरला एक धर्मार्थ दवाखाना, एक औद्योगिक शाळा व पाश्चात्य पद्धतीचें एक गेस्ट हाऊस ही आहेत अमेरिकेतील शिकॅगो शहरी असतांना विवेकानंद ज्या झाडाखाली उभे राहून हिंदुधर्माची प्रवचने करीत असत त्या झाडाचें टेबल करून हिंदुस्थानांत आणून त्याचेभोंवती सर्व धर्मांच्या लोकानी बसून धर्माबद्दल चर्चा करावी अशी स्वामीची असलेली इच्छा त्याच्या एका अमेरिकन शिष्याने नुकतीच पूर्ण केली त्या झाडाची एक फळी कापून ती हिंदुस्थानात आणून बेलूर मठात टेबलासारखी ठेवलेली आहे हें टेबल पाहिल्यानंतर स्वामीजीबद्दल पाहणाराचे मनात अत्यंत आदर अभिमान वाटल्यावांचून राहात नाही स्वामीजीचे जन्मोत्सवाचे वेळी दर वर्षी येथें सर्वांना जेवण देण्यात येतें त्या वेळी हजारो लोक प्रसादाकरिता जमतात या समुदायात गरीब, श्रीमंत, स्त्री-पुरुष, मुलेंबाळे, वगैरे सर्व मंडळी असतात इतक्या लोकाना पुरेसें अन्न ठेवण्याएवढी मोठी भाडीं असणें शक्य नसल्याने भात, भाजी, आमटी, वगैरे ठेवण्याकरता मोठमोठाले चुनेगच्ची हौद बांधलेले आहेत प्रत्येक पदार्थ लहान भाड्यात शिजवून मग या हौदात आणून साठवतात एकदरींत हें ठिकाण अत्यंत प्रेक्षणीय आहे

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ उत्तरेकडे जाणाऱ्या नंबर ५ च्या बसमध्यें बसून हावरा स्टेशनवर जावें हावरा स्टेशनाच्या दक्षिणेस १६ नंबरच्या बालीखालकडे जाणाऱ्या बसेस असतात त्यात बसल्यावर बेलूर मठाजवळ उतरविण्यास कंडक्टरला सांगावे तो सांगेल त्या ठिकाणीं उतरून थोडेसें उत्तरेकडे चालत गेल्यास To Belur Math अशी पाटी समोर दिसते त्या पाटीच्या दिशेने नीट गेल्यास १० मिनिटांत आपण मठात पोचतों हुगळी नदीतून स्टीमरनेही बेलूरला जातां येते परंतु बसचाच मार्ग जास्त सोयीस्कर असल्याने बहुतेक मंडळी बसनेंच जातात

## दक्षिणेश्वर

दक्षिणेश्वरचें कालीचें देवालय गंगेच्या डाव्या किनाऱ्यावर असून तें राणी रासमणी नावाच्या बाईचे मालकीचें आहे या देवालयात श्रीरामकृष्ण

परमहस हे देवीचे पुजारी म्हणून होते लहानपणापासून त्याचें मन पर-मार्थाकडे असे, व त्या वृत्तीला पोषक असे कामपण त्याना मिळालें देवीची पूजा करताना ते अगदीं तल्लीन होऊन जात अशा वेळी त्याना स्वत ला काही शुद्ध राहात नसे पुढें देवळांत बसून ध्यान करणें जुळेना म्हणून देवळाच्या बागेच्या कोपऱ्यात असलेल्या एका झाडाखाली बसून ते देवीची प्रार्थना करीत बरेच दिवसानतर याच ठिकाणी त्याना साक्षात्कार होऊन सिद्धि मिळाली या ठिकाणीं हल्ली एक लहानशी झोपडी बाधलेली असून ऐांत एक त्रिशूळ ठेवलेला आहे हे ठिकाण पाहण्यासारखे आहे कालीचें देऊळ गगेकडे तोंड करून बाधलेलें असून त्याचे दोन्ही बाजूना सहा सहा शकरार्ची देवळें आहेत येथें गगेला घाट बाधलेला असून यात्रेकरू मडळी या ठिकाणी स्नान करतात कलकत्त्याच्या कालीघाट येथील कालीचे देवालयापेक्षा येथे जास्त पावित्र्य दिसतें कारण या ठिकाणी बलिदान करावयास बदी आहे

पुजारी असताना व साक्षात्कार झाल्यावर रामकृष्ण ज्या जागी राहात असत तेथें त्याची व त्याच्या पत्नी मा शारदादेवी यांची, अशा दोन तसबिरी आहेत त्याचप्रमाणें त्या दोघाच्या निजण्या-बसण्याच्या वगैरे जागा त्याचे भक्तमडळीनी जशाच्या तशाच राखून ठेवल्या आहेत रामकृष्णाची भक्त-मडळी पुष्कळ होती परंतु स्वामी विवेकानद हा एकच त्याचा पट्टशिष्य होता हा शिष्य आपल्या धर्माची वाढ करून तो सर्व जगभर पसरवील अशी त्याना खात्री होती, आणि म्हणूनच विवेकानदाच्या (स्वामी होण्यापूर्वी) लग्नाची तयारी चालली आहे हें समजताच एक योग्य मनुष्य ससारांत पडून वाया जाणार म्हणून रामकृष्णाना फार वाईट वाटलें काय योगायोग पहा-इकडे विवेकानदानी पण लग्नाचे नाकारून धर्मकार्याचे पवित्र कार्यांत उडी घेतली, व जगभर रामकृष्णाचे व त्याचेबरोबर हिंदु धर्माचें नाव फडकविलें. व धर्मप्रसारार्थ बेलूर येथें रामकृष्ण मिशन ही सस्था स्थापली याबाबतची माहिती स्वतत्र दिलेली आहे रामकृष्ण विवेकानद साहित्य म्हणून (१) "उद्बोधन' हें बगाली, (२) "समानवे" हें हिंदी, (३) व "प्रभुद्ध भारत" हें इंग्रजी अशी तीन मासिकें कलकत्त्यात निघतात

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपाशीं उत्तरेकडे जाणाऱ्या न २ किंवा २ ए या बसमध्ये बसावें ही बस थेट शामबझारला जाऊन थांबते. तेथून दक्षिणेश्वरला जाणारी बस निघते तीत बसावे ही बस थेट दक्षिणेश्वरच्या आवारात येते बेलूरप्रमाणे फेरी स्टीमरनेपण दक्षिणेश्वरला जाता येतें. पण बसचा मार्ग जास्त सोयीस्कर पडतो. किंवा बेलूरला गेलें असताना बालीब्रिजवरून दक्षिणेश्वरला यावें हेंपण सोयीचें पडतें

# कालीचें देवालय

काली देवीचें मंदिर आदिगंगा नावाच्या हुगळी नदीच्या एका फाट्यावर बांधलेलें आहे दक्षयज्ञांत सतीचा मृत्यु झाल्यावर तिचें शव खांद्यावर घेऊन श्री शंकराने तांडवनृत्य सुरू केलें तें इतकें भयंकर होतें की सर्व प्राणिमात्र घाबरले शेवटी श्री विष्णूनें आपल्या सुदर्शन चक्राने त्या शवाचे तुकडे केले त्या शवाचा आंगठा ज्या ठिकाणीं पडला त्या ठिकाणीं हल्लीचें कालीचे मंदिर आहे सती ही शंकराची पत्नी असल्यानें तिच्या शवाचे तुकडे आर्यावर्तांत ज्या ज्या ठिकाणी पडले ती सर्व स्थानें क्षेत्रें झालीं तदनुरूप कालीचें देवालय हीदेखील क्षेत्राची जागा असून हजारों यात्रेकरू येथें येतात दूरदूरच्या देशातून पायी प्रवास करून आलेल्या अनेक यात्रेकरूनीं व पुजाऱ्यानीं देवालयाचें आवार भरलेले असतें देवालयाचे आवाराचे बाहेर नाना प्रकारच्या घाणेरड्या रोगानी ग्रस्त अशा भिकाऱ्यांची गर्दी असते एखाद्या भिकाऱ्याला धर्म म्हणून पैसा दिला कीं लागलीच सर्व भिकारी अंगाशीं झोंबल्यासारखे करू लागतात त्यांचीं तीं रोगग्रस्त शरीरें पाहून नवीन जाणाराचे मनात किळस उत्पन्न होते या त्रासांतून बचाव करावयाचा असेल तर धर्म म्हणून कोणाला काहीही देऊ नये देवालयाचे आत जाण्याकरता माणशी दोन पैसे देवालयाचा कर म्हणून द्यावा लागतो यापेक्षा जास्त काहीं देण्याची जरूरी नाही

देवालयाची इमारत करड्या रंगाची असून चौकोनी आहे त्याचा घुमट चमत्कारिक आकाराचा असून त्यावरील हिरव्या, पिवळ्या व निळ्या

रंगानीं तो डौलदार दिसतो देवीची मूर्ति एका अरुंद गाभाऱ्यात आहे, व तिच्या पायाला हात लावण्याकरिता पायऱ्यांवर भक्त लोकात रेटारेटी चाललेली दिसते पायाला हात लावण्यास आणखी चार पैसे पडतात देवालयाच्या एका कोपऱ्यात एक चाफ्याचे झाड असून त्याच्या फाद्याना रंगीबेरंगी दोऱ्यानी लहानलहान दगड बांधिलेले आहेत हे दगड पुत्रप्राप्तीची इच्छा असलेल्या स्त्रियानी नवसाचे बांधलेले आहेत असें म्हणतात देवालयाच्या दक्षिणेकडील आवाराच्या कोपऱ्यांत एक भीषण दृश्य दिसतें वेश्याचशा स्त्रिया लाकडाच्या ठोकळ्यावर मोठमोठ्या सुऱ्याना धार देत असतात देवीपुढे बळी देण्याकरतां शृंगारून आणलेला बकरा व क्वचित् प्रसंगी रेडा मारण्याकरता या सुऱ्याचा उपयोग करतात बळी मारणारा मनुष्य जातीने लोहार असतो त्याच्या श्रमाबद्दल त्याला बळी दिलेल्या प्राण्याचें मुंडके मिळतें दुर्गापूजेच्या दिवसांत जवळजवळ १,००० बकरी व ५० रेडे या ठिकाणीं बळी देतात या जागेजवळ नौबतखाना असून बलिदानाचे वेळी देवालयाची वाद्यें सदैव वाजत असतात आपल्या इकडील मंदिरात असणारें पावित्र्य येथें मुळीच नाही, इतकेच नव्हे तर देवालयातून जाऊन आले की मन उद्विग्नच होते बलिदानाचा बीभत्स देखावा न दिसावा असें वाटत असेल तर मंगळवार व शनिवार सोडून कोणत्याही वारी संध्याकाळीं ७ ते १० वाजेपर्यंत केव्हाही दर्शनास जावें

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपाशीं दक्षिणेकडे जाणारी कोणतीही बस किंवा ट्राम घ्यावी कालीवाडीला जावयाचें असे सांगितले म्हणजे कंडक्टर योग्य ठिकाणी उतरवितो उतरल्यानंतर थोडें पश्चिमेकडे चालत गेलें कीं आपण देवालयाचे आवारात येऊन पोंचतो

## जैनमंदिर

गौतम बुद्धाचे काळी महावीर नावाचा एक सत्पुरुष होऊन गेला बुद्धाप्रमाणेच संसाराचा त्याग करून अरण्यात दीर्घकाल तपश्चर्या केल्यावर त्याला साक्षात्कार झाला नंतर त्याने ठिकठिकाणी हिंडून आपल्या नवीन

धर्ममताचा प्रचार केला महावीराला "जिन" (इंद्रिय दमन करणारा) असें नाव प्राप्त झालें जैन लोक चोवीस जिन अथवा तीर्थंकर मानितात व त्याच्याच मूर्ती देवळात ठेवून त्याची पूजा करतात याचे श्वेतांबर व दिगंबर असे दोन मुख्य पंथ आहेत जैन धर्मांत अहिंसेच्या तत्त्वाला विशेष महत्त्व आहे तें इतकें की आजचे जैन लोकसुद्धा ढेकूण, विंचू, सर्प अशा उपद्रवी प्राण्यानाही मारीत नाहीत कलकत्त्याचें जैनमंदिर इ स १८०७ साली बांधलें हिंदी शिल्पकलेचा तो एक उत्कृष्ट नमुना असल्यानें बाहेरून कलकत्त्यात येणाऱ्या मंडळींनी तें अवश्य पाहावे देवालयाच्या आसपास जरी कंगाल वस्ती असली तरी एकदां देवालयांत प्रवेश केला की, देवालयाचें तें सुंदर नक्षीकाम बघून मन प्रसन्न होतें लहान लहान दगड व काचाचे तुकडे याची व्यवस्थेशीर जुळवणी करून नाना प्रकारची नक्षी काढणाराच्या दीर्घोद्योगाची व कौशल्याची धन्यता वाटते देवालय रोज सकाळी ६ ते ११ व संध्याकाळी ४ ते ८ खुलें असतें परंतु सकाळचे वेळीच देवालय बघावयास जावें नाना रंगाच्या कांचांवर पडलेल्या सकाळच्या सूर्यकिरणाचें परावर्तन होऊन जो नयनमनोहर देखावा दिसतो त्याची आठवण कधीही विसरली जाणार नाही

चौथऱ्याचे एका बाजूवर एक इमारत आहे तिच्यावरील शिल्पकला मुख्य देवालयाच्या शिल्पकलेशी जुळणारी आहे या इमारतीत आलेल्या लोकाचें स्वागत करण्याकरिता एक मोठा दिवाणखाना आहे त्याच्या खिडक्याची तावदानें रंगीबेरंगी असल्यानें मोठी शोभिवंत दिसतात दरवाज्याच्या लाकडी तावदानावर नामांकित बंगाली चित्रकाराचीं सुंदर तैलचित्रें काढलेलीं असून छताला मोठमोठी कांचेचीं झुंबरें लावलेलीं आहेत देवालयाचे बगिच्यातील कोपऱ्यात एक स्तंभ दिसतो ज्या उदार व्यक्तीनें हे देवालय बांधलें त्याचें दहन झालेल्या जागेवर हा स्तंभ आहे याच ठिकाणीं पित्याच्या स्मरणार्थ एक मोठें भव्य स्मारक बांधण्याचा सध्याच्या देवालयाच्या मालकाचा विचार आहे देवाची पूजा करण्याकरिता येणाऱ्या जैन भक्तासाठी स्नानाची फार छान व्यवस्था केली आहे वर्षांतून एका ठराविक वेळीं जैनांचा कांहीं उत्सव असतो या उत्सवात भजन, कीर्तन, नृत्य, वगैरे कार्यक्रमाकरतां दिवाणखान्याचे मागील बाजूस दूर्वांकुरानीं आच्छादित

असें एक मोठें मैदान आहे त्या वेळीं विजेच्या रोषणाईने देवाल्याला फारच शोभा आणतात

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ उत्तरेकडे जाणाऱ्या नं ३ च्या बसमध्यें बसावें सिआलधा स्टेशनच्या पुढें गेल्यावर कंडक्टरला जैनमंदिराला जावयाचें असें सांगितले की तो योग्य ठिकाणीं उतरवतो तेथें उतरल्यानंतर मंदिराचा सोनेरी कळस उजव्या हातास दिसतो त्या दिशेनें थोडेंसें पुढें चालत गेल्यास दोन मोठे स्तंभ दिसतात त्यांतून आत शिरलें की आपण देवालयाचे आवारात पोंचतों

# मराठा डिच

इ स १७४२, १७४३ व १७४४ या साली बंगाल प्रांतावर मराठ्याच्या तीन स्वाऱ्या झाल्या त्या वेळेस बंगालचा नवाब अलीवर्दीखान होता मराठ्याच्या स्वाऱ्या झाल्या त्या नबाबाच्या मुलखावरती परंतु कलकत्त्या-वरही मराठे कदाचित् स्वारी करतील या भीतीनें इंग्रजानीं कलकत्ता शहरा-भोंवती संरक्षणासाठीं एक मोठा खंदक खणण्याचे ठरविलें हुगळी नदीला एक बाजूला घेऊन, उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत अर्धचंद्राकृती खंदक खणण्याला सुरुवात केली सहा महिन्यात त्यापैकी तीन मैल खंदक तयार झाला नंतर मराठ्याच्या स्वाऱ्या बंद झाल्यानें खंदकाचा विचारपण तसाच राहिला कलकत्त्यातील लोअर व अपर सर्क्युलर रोड ही खंदकाची रेषा होय मरा-ठ्याच्या स्वाऱ्याची दहशत बंगालमध्ये इतकी बसली होती कीं, लहान मुलांना निजवितांना म्हणण्याच्या गीतात मराठ्याचा असा उल्लेख आहे —

"खोका घुमालो पाडा जुडालो बोर्गी एलो देशे।
बुलबुलीते धान खेएछे खाजना दिबो किशे॥"

"बाळा नीज मोहल्ला गोळा झाला आहे कारण बुर्गी मुलुखात चालून आला आहे" अशा प्रकारचा या गीतातील पहिल्या चरणाचा अर्थ आहे बुर्गी (बारगीरचा बंगाली अपभ्रंश) म्हणजे मराठा घोडेस्वार होय

## न्यू मार्केट

या मार्केटला सर स्टुअर्ट हॉग याचे नाव दिलें आहे इ स १८७४ साली हें बाधले असून याचा घड्याळाचा मोठा मनोरा लिन्डसे स्ट्रीटवर आहे बाधल्या वेळेपेक्षा याचा सध्याचा विस्तार बराच मोठा वाढला यांत जवळजवळ ५,००० सुव्यवस्थित व सुसज्ज अशी दुकानें असून ससाराला लागणाऱ्या सर्व वस्तू येथें मिळतात मार्केटातील सर्व माल बहुतेक परदेशी असून दुकानदाराशी फार घासाघीस करावी लागते नवखे तर तेव्हाच फसतात कलकत्त्यांत राहणाऱ्यांपैकी कोणाला बरोबर घेऊन मार्केटांत गेलें म्हणजे नवीन येणाराला फसण्याची फारशी भीति नाहीं रात्रीं दिव्यानी मार्केट विशेष शोभायमान दिसतें

### जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपाशी उत्तरेकडे जाणारी कोणतीही ट्राम किंवा बस घ्यावी लिन्डसे स्ट्रीटवर कंडक्टरला उतरविण्यास सागावें तेथें उतरून एक फर्लांगभर चाललें कीं मार्केटचे घड्याळाचा मनोरा दिसतोच

## ऑक्टलॉनी मॉन्युमेंट

सुमारें शभर वर्षांपूर्वी नेपाळच्या विरुद्ध झालेल्या युद्धात सर डेव्हिड ऑक्टर्लोनी हा फार शौर्याने लढला त्याचे स्मारक म्हणून हा स्तभ उभारला आहे याची उची एकशेंपासष्ठ फूट असून आतील वाटोळ्या जिन्यानें मनुष्यास स्तभाच्या वरपर्यंत जातां येते वर जाण्याकरिता पोलिस कमिशनरकडे अर्ज करून परवानगी मिळवावी लागते

### जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपाशीं उत्तरेकडे जाणारी कोणतीही बस किंवा ट्राम घ्यावी एस्प्लनेडच्या मैदानातच हा स्तभ आहे तेथें उतरावें

## हावऱ्याचा पूल

इ स १८७४ साली सर ब्रॅडफोर्ड लेस्ली यानी बावीस लक्ष रुपये खर्च

करून हुगळी नदीवर हा पूल बांधला पूल बांधतेवेळीं त्यावर आजच्यासारखी अखंड रहदारी चालेल ही कल्पनाही नव्हती हावरा व कलकत्ता याच्यात जाण्यायेण्याकरितां एक तात्पुरता मार्ग म्हणूनच याची बांधणी झाली पण हावरा व कलकत्ता यातील दळणवळणास ही एकच जवळची वाट असल्याने मोटारगाड्या, बसेस, खटारे, पायी चालणारे, याची अखंड रहदारी या पुलावरून असते हा पूल होड्यावर बांधलेला असून दररोज एकदा भरतीचे वेळी याचा मधला भाग दूर करून ठेवतात, म्हणजे मोठमोठी व्यापारी गलबतें व आगबोटी उत्तरेकडे जाऊ शकतात अशा वेळीं हावरा व कलकत्ता यामधील दळणवळण चालू राहण्यासाठी पोर्ट कमिशनरनी आगबोटींची सोय केली आहे रोजच्या वर्तमानपत्रांत पूल काढण्याच्या वेळा दिलेल्या असतात हा पूल आता फार जुना झाल्यामुळें वाढलेल्या रहदारीस व ट्रामचा रस्ता करण्यास योग्य असा बिनकमानीचा पूल बांधण्याचे काम हल्ली सुरू झालें आहे

## फोर्ट विलियम

इ स १६९६ चे सुमारास शोभासिंगचें बंड झाले हुगळी व मूर्शिदाबाद ही गावे काबीज करून तो सुतानतीवर चाल करून येण्याची तयारी करू लागला ही संधि साधून आयरनें स्वसंरक्षणार्थं हुगळीच्या पूर्वकिनाऱ्यावर किल्ला बांधण्याची परवानगी बंगालच्या नबाबाजवळून मिळविली दुरून मोठीशी वखार दिसेल अशा तऱ्हेचा किल्ला बांधला व मद्रासहून त्यावर १० तोफा ठेवण्याची परवानगी आली अशा रीतीनें बांधलेल्या वखारीचे आजच्या किल्ल्यात रूपांतर झालें याच्या चौफेर खंदक असून गोऱ्या शिपायाच्या राहण्याच्या बराकी, शस्त्रागार, दारूखाना, कवाइतीचे मैदान, बिनतारी तारायंत्र, वगैरे सर्व सामग्री आंतच आहे हा किल्ला आतून बघावयास मिळत नाही असे म्हणतात.

## झूऑलॉजिकल गार्डन [ चिडिया बाग ]

कलकत्त्याचा चिडिया बाग अलीपूर येथें असून आतील प्राणिसंग्रह फारच मोठा आहे एकेका प्रकारचे प्राणी व पक्षी बरेच दिसतात व त्याना

ठेवण्याची व्यवस्था इतर चिडिया बागापेक्षा उत्तम आहे बागेत पाण्याचा एक कृत्रिम प्रवाह तयार केलेला असून ठिकठिकाणीं छोटे छोटे जलसचय आहेत पाण्याच्या विपुलतेमुळे सर्व बागभर सुदर वनश्री दिसते जलाशयाचे आसपास बदकें, राजहस, शहामृग, वगैरे नाना तऱ्हेचे पक्षी स्वैरपणें विहार करताना पाहावयास सापडनात त्याचप्रमाणें इतर पक्ष्याकरिता पुष्कळ पाखरखाने असून आत नाना तऱ्हेचे पोपट, मैना, मोर, काकाकुवे, शाळुका, चिमण्या, वगैरे नाना प्रकारचीं पाखरें आहेत पाखरखान्यात झाडावर निरनिराळ्या ठिकाणी पाखराची छोटी छोटी घरटी, व त्याना झोंके घेण्याकरतां दाड्याचे झोपाळे असल्यानें पाखराना आत मोकळेपणा वाटतो येथे कागारूच्या बऱ्याच जोड्या दिसतात तसेंच हरणें, सावरे, हिमालयातील गायी हे प्राणी येथे आहेत वाघ, सिंह, हत्ती, उंट, चित्ते, वगैरे प्राणी असून उत्तरेच्या देशातील पाढरी अस्वलें, टापीर नावाचा प्राणि, गेंडे, पाणहत्ती, जिराफ, तपकिरी रगाची अस्वले, माजरासारखेंच पण सर्व अगभर काटे असलेलें शाळू नावाचें जनावर, नाना प्रकारचीं रानमाजरें, वगैरे वरेच दुसरीकडे न दिसणारे प्राणी या ठिकाणी आहेत माकडें व वानरें याच्या तर येथे पुष्कळच जाती दिसतात पण त्यापैकी चिपँझी व ओरँग-ओटँग या दोन आफ्रिकेंतील जाती विशेष उल्लेखनीय होत सर्पगृहात गवतात व झाडावर राहणारे हिरवेगार साप, दहाचा आकडा असलेले नाग, मातीत राहणारे साप वगैरे नाना प्रकारच्या सर्पाच्या जाती आहेत येथे मोठाले अजगरपण दृष्टीस पडतात एका ठिकाणी समुद्राच्या तळाशी वाढणाऱ्या वनस्पती ठेवल्या असून त्यात बावरणारे छोटे छोटे मासे व समुद्रात राहणारे प्राणी दिसतात एका छोट्याशा जलाशयात सील मासे असून येथेंच दोन सुसरीपण ठेवलेल्या आहेत एकदरीत या बागेंतील प्राणिसंग्रह प्रेक्षणीय आहे ही गोष्ट खरी रविवारी दुपारी चार वाजता येथे बँड असतो त्या वेळी बागेत जाण्यास माणशी एक रुपया तिकिट पडतें इतर वारी दर माणशी एक आणा द्यावा लागतो

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपाशी दक्षिणेकडे जाणारी नबर ३ ची बस

घ्यावी ही बस अलीपूर जेल, विजयमंझील (बरद्वानचे महाराजाचा राजवाडा), वगैरे ठिकाणे सोडून जाता जाता कुचविहारचा राजवाडा लागतो तेथें उतरावें हा राजवाडा व मिलिटरी हॉस्पिटल यामधून जो रस्ता जातो तो थेट चिडिया बागेत पोंचतो साधारण चार पाच मंडळींना जावयाचें असेल तर बसपेक्षा टॅक्सीच बरी कारण बसने सहा सात आणे खर्च होतातच व भवानीपूर पोलिस स्टेशनपासून टॅक्सी आठदहा आण्यात मिळते

## वनस्पतींची सरकारी राजबाग, शिवपूर
### [ रॉयल बोटॅनिकल गार्डन ]

ही राजबाग हुगळी नदीच्या किनाऱ्यावर किंग जॉर्ज गोदीच्या समोर आहे याचा विस्तार सुमारें २७० एकर आहे इ स १७८६ साली कर्नल रॉबर्ट कीड यांनी याची सुरुवात केली या बागेच्या सुपरिंटेंडेंटच्या जागी रॉक्सबरो, हॅमिल्टन ग्रिफिथ थॉमसन्, अँडरसन, क्लार्क, किंग व प्रेन यासारख्या जगविख्यात वनस्पतिशास्त्रज्ञांनी कामे केलीं आहेत

भूपृष्ठावरील निरनिराळ्या देशात होणाऱ्या महत्त्वाच्या वनस्पतींची लागवड येथें केलेली आहे बागेच्या आवारात लहान मोठीं अशीं २६ तळी असून त्यापैकीं काही इतकी मोठीं आहेत की त्यात लहान लहान बेटेंही आहेत बागेतील रस्त्यावर दुतर्फा निरनिराळे वृक्ष लाविलेले असून त्यांपैकी ओरिओडोक्सा (बाटलीच्या आकाराचा ताड) ॲव्हेन्यू, ताल ॲव्हेन्यू, हूकर ॲव्हेन्यू हे प्रेक्षणीय आहेत केवड्याचीं बेटें व ताडाचीं वनें, कृत्रिम खडक व त्यावर लाविलेल्या विशिष्ट वनस्पति ही बागेंतील प्रेक्षणीय स्थळें होत ऑरकिडस् (बांडगुळें) व इतर गारव्यात वाढणाऱ्या वनस्पतींच्या जातीकरता केलेलीं लताच्छादित घरें फार मौल्यवान् आहेत परंतु सर्वांत प्रेक्षणीय व प्रसिद्ध असें येथील वडाचें झाड होय हें १५८ वर्षांचे असून त्याला ६०१ पारंब्या आहेत याचे मूळ खोड कुजल्यानें काढून टाकले असून त्याजागी नवीं वडाची कलमे लावलेलीं आहेत हीं कलमें जगून मोठी झाली म्हणजे त्यांचा मूळच्या झाडाशीं सांधा जोडावयाचा असून अशा रीतीने झाडाचें पुनरुज्जीवन व्हावयाचें आहे कलकत्त्याहून नदीचे मार्गानें आल्यास बोटीच्या धक्क्यावर उतरून थोडें वर यावें लागते वर आल्यानंतर आपण जर उत्तरे-

कडे जाऊं लागलों तर दुतर्फी कण्हेर, रासतुरा, कोरांटीच्या निरनिराळ्या जाती, वगैरे फुलझाडांचे ताटवे लागतात. धक्क्याकडून येताना लागणाऱ्या बागेच्या फाटकावर बुगान व्हिलियाच्या "स्कार्लेट क्वीन' च्या जातीचा वेल असून त्याच्या किरमिजी फुलांचे गुच्छ हवेंत हलताना फारच मनोहर दिसतात "ओरिओडोक्सा" च्या ताडांनी आच्छादिलेल्या सडकेच्या सुरुवातीलाच हिमालयांत होणारे दोन अहिवट आहेत याच वाटेवर महॉगनीचे वृक्ष पाहावयास सापडतात वाटेच्या दोन्ही टोंकास दोन लहान कृत्रिम खडकाळ जागा केलेल्या असून येथें किरमिजी फडे निवडुंग कोरफड, व अमेरिकेतील पानाच्या कॅक्टसच्या जाती लाविलेल्या आहेत उत्तरेकडील टोंकास कर्नल कीडचें आरसपानी स्मारक दिसतें त्याच्या चोहों बाजूंना रस्ते गेलेले असून ईशान्येस ऑरकिड हाऊस आहे मार्च महिन्यात जेव्हां या ऑरकिडना फुलें येतात तेव्हांचें दृश्य मनोहर असतें ऑरकिड हाऊसचे पूर्वेस व अँडरसन रस्त्याच्या बाजूला ब्राउनियाच्या मिश्र जाती, डालबेगरिया (शिसवी वर्गातील जाती), नानाविध पानाचा वड, वगैरे वृक्ष आहेत या रस्त्यानें पुढें उत्तरेस गेल्यास, निकोबार, अंदमान व मॉरिशस बेटांतील झाडें पाहावयास मिळतात प्रेक्षकांना विश्रांति घेण्यासाठी बांधलेल्या छत्रीजवळ कलकत्त्याच्या सर्द हवेंतील वृक्षसमूह आहे पुढें फुलांचे वार्षिक प्रदर्शन भरण्याची जागा आहे याच्या पश्चिमेस लताकुंज असून त्याचे दक्षिण दरवाज्यानें बाहेर पडल्यास ग्रिफिथचें स्मारक लागतें मादागास्कर बेटांतील अल्बिझिया रिचर्डीयाना या सुंदर वृक्षाची छाया या स्मारकावर पडते क्लार्क अॅव्हेन्यूनें हूकर अॅव्हेन्यूवर गेलें म्हणजे आपण वनस्पतिसंग्रहा (हर्बेरियम) चे इमारतीजवळ पोहोंचतों येथें हिंदी साम्राज्य, एशिया, यूरोप व ऑस्ट्रेलिया या खंडांतील शुष्क वनस्पतींचा संग्रह ठेवला आहे या वनस्पतींचा उपयोग मुख्यत: वनस्पती तुलनेनें ओळखण्याकरिता होतो. यांतील कित्येक वनस्पतींच्या वर्णनास आधारभूत असे नमुने येथें आहेत वनस्पतिसंग्रहाचें महत्त्व तेथें असलेल्या आधारवनस्पतींच्या संख्येवर अवलंबून असतें या दृष्टीनें येथील वनस्पतिसंग्रह आशिया खंडात पहिल्या प्रतीचा आहे याच इमारतींत वनस्पतिशास्त्राचें ग्रंथालय आहे हें आज १५० वर्षें अस्तित्वात असल्याने त्यात पुष्कळ दुर्मिळ ग्रंथ आहेत

## प्रकरण आठवें

# कारखाने

### ब्रिटानिया बिस्किट कंपनी, १० बिरपारा लेन, डमडम

हल्ली जेथें फॅक्टरी आहे त्या जागेवर लहान झोंपडे बांधून १८९७ साली दोन बंगाली गृहस्थांनी बिस्किटें तयार करण्याची लहान भट्टी सुरू केली यंत्रसामग्री व त्या धंद्यात लागणाऱ्या ज्ञानाच्या अभावीं तयार झालेला माल फार ओबडधोबड निघे व बाजारात त्याला विशेष मागणी नसे १९१४ साली महायुद्ध सुरू झाले तेव्हा लष्कराला लागणाऱ्या बिस्किटाचा पुरवठा करण्याचा मक्ता त्या कंपनीला मिळाला ह्या मक्त्याप्रमाणें कंपनीचा सर्व माल सरकार विकत घेई लष्करी खात्यासारखें सढळ हाताने किंमत देणारें गिऱ्हाईक मिळाल्यानें कंपनीची सांपत्तिक स्थिति चांगली सुधारली नवीन यंत्रसामग्री आल्याने युद्धानंतर विदेशी बिस्किटांशीं बाजारात टक्कर देण्याइतकी शक्ति कारखान्याच्या अंगात आली १९२४ मध्यें भांडवलाची जरूरी फार भासल्यानें कंपनी लिमिटेड करण्यात आली व वीस लाख रुपये भांडवल उभारलें कंपनीनें ह्याच वर्षी मुंबईस दुसरा कारखाना उघडला आज कंपनीचा कारभार १९२४ पेक्षा चार पटींनीं वाढला आहे हटले पामरच्या तोडीचा माल आज कंपनीच्या कारखान्यातून निघतो ह्या कंपनीयेवढी मोठीं बिस्किटे करणारी कंपनी सबंध आशिया खंडात नाहीं असे म्हणतात कंपनीचें भांडवल व कामकरी वर्ग हिंदी आहे

#### जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ उत्तरेकडे जाणारी नं २ किंवा २ ए ही बस घ्यावी ही बस थेट शामबझारला जाऊन थांबते शामबझार बस स्टँडवर डमडम एअरोड्रोमकडे जाणाऱ्या बसमध्यें बसावें व बिरपारा लेन-जवळ उतरवून देण्यास बसच्या कंडक्टरला सांगावे

## बेंगॉल इम्युनिटी कंपनी, बरानगर

महायुद्धापूर्वी औषधें व रोगप्रतिबंधक लसी मुख्यत जर्मनींतून येत परंतु युद्ध सुरू झाल्यानतर हा माल त्या देशातून येईनासा झाला अमेरिका व इग्लंडमधून हा माल येई, पण त्याचा पुरवठा अनियमित व अपुरा असून विश्वसनीय नसे किमतीही भरमसाट वाढल्या होत्या यामुळें हिंदुस्थानातील डॉक्टराची बरीच कुचबणा होऊ लागली व त्यातून मार्ग काढण्यासाठी कलकत्त्यातील काही डॉक्टर मडळींनी १९१९ साली बगाल इम्युनिटी ही कपनी स्थापन केली. रोगप्रतिबधक लसी तयार करण्याचा हा येथील पहिलाच कारखाना आहे उष्ण हवेमध्ये माल बिघडणार नाही व त्याची रोगप्रतिबधक शक्ति कमी होणार नाही ह्याबद्दल विशेष काळजी घेऊन माल तयार करीत असल्यानें कपनीच्या मालाबद्दल फार थोड्या अवधीत डॉक्टरवर्गाचा अनुकूल ग्रह झाला, व सरकारी दवाखान्यातून सुद्धा कपनीचा माल वापरण्यांत येऊ लागला कपनीचीं औषधे व रोगप्रतिबधक लसी मलाया, बर्मा, मेसोपोटेमिया व आफ्रिकेंत पण जातात भिन्न देशातील लोकाच्या शरीरप्रकृतीत व स्वभावरचनेंत जसा फरक असतो, त्याप्रमाणेंच दोन निराळ्या देशात उत्पन्न होणाऱ्या एकाच रोगाच्या जतूच्या गुणधर्मांत फरक असतो त्यामुळें ह्या देशातील रोगजंतूपासून तयार केलेल्या रोगप्रतिबंधक लसी येथील रोगावर बाहेरून येणाऱ्या लसीपेक्षां जास्त गुणकारी असतात ह्या कारणांमुळें कपनीचा माल येथील रोगाच्या प्रतिबधासाठी जास्त फायदेशीर होतो कंपनीच्या प्रयोगशाळेंत नवीन औषधें व लसी शोधून काढण्याचे प्रयोग सतत चाललेले असतात कपनीची प्रयोगशाळा, कारखाना व जनावराचा तबेला बरानगरला बाधला आहे

### जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपासून उत्तरेकडे जाणारी न २ किंवा २ ए ची बस घ्यावी व शामबझारला जावे तेथून नंबर ३२ च्या दक्षिणेश्वरला जाणाऱ्या बसमध्ये बसावें ही बस बरानगरवरून दक्षिणेश्वरला जाते कंडक्टरला सांगितल्यास तो योग्य ठिकाणी उतरवून देतो

## बेंगॉल केमिकल अँड फारमास्युटिकल वर्क्स

देशात मिळणाऱ्या वस्तूपासून रासायनिक द्रव्ये व औषधें तयार करण्याचा कारखाना सर प्रफुल्लचद्र रॉय, डॉ ए सी बोस व श्री एस् सी सिंहा यानीं १८९२ साली काढला रायबाबूंनी औषधें व रसायनें तयार करण्याच्या नवीन नवीन पद्धती शोधून काढण्याचें काम घेतले कारखान्यांत तयार झालेल्या औषधांचे गुणधर्म रोग्यावर प्रयोग करून पाहण्याची डॉक्टरी बाजू डॉ बोस यानी आपलेकडे घेतली व श्री सिंहाची व्यवस्थापक म्हणून नेमणूक झाली देशी औषध पद्धतीत काष्ठौषधींचे काढे रोग्याना स्वत तयार करून घ्यावे लागतात, हें खटाटोपीचे असल्याने पाश्चात्य औषधां-प्रमाणे देशी औषधे घेण्यास सोयीची नसतात दुसरे प्रत्येक ऋतूत व प्रत्येक ठिकाणी काष्ठौषधि हव्या तशा चांगल्या मिळतीलच असें निश्चित नाही व म्हणून काष्ठौषधि गुणकारी असूनहि रोगी घेण्यास कटाळतात ही अडचण रायबाबू व त्याचे सहकारी मित्र याचे लक्षात आली देशी औषधींचे आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें कषाय व काढे तयार करून विकण्यास सुरुवात केली परतु नामाकित विदेशी कपन्याचा त्यावर शिक्का नसल्याने डॉक्टर मडळी हीं औषधे वापरून पाहण्यास तयार नसत व आयुर्वेदांत दिलेल्या रीतीप्रमाणे हीं औषधें तयार केलेली नसल्यानें वैद्य मडळींना ती त्याज्य वाटत अशा परिस्थितीत कारखान्याच्या मालाला मागणी नसे दीर्घोद्योग व मतपरिवर्तनाचे शक्य ते प्रयत्न करून चालकानी हळूहळू लोकाची सहानुभूति आपल्याकडे वळविली. १९०१ साली ह्या प्रयत्नाचे रूपातर ५०,००० रुपयाचे भाडवलाच्या लिमिटेड कपनीत झालें कामाचा व्याप वाढत चालल्यामुळे १९२८ साली कपनीचे भाडवल ३० लाख झाले व हल्ली ते ६० लाखावर आहे

माणिकताला येथील कारखान्याची जागा ४० बिघे असूनही ती अपुरी पडू लागली म्हणून १९२१ सालीं पनिहाटी गावाजवळ बराकपूर ट्रकरोडवर १३५ बिघे जमीन विकत घेतली सलफ्युरिक ॲसिड (गधकाचा तेजाब) तयार करण्याचे विभाग माणिकतालाहून पानिहाटीला आणिले दगडी कोळशाचें व डामराचें ऊर्ध्वपातन करून क्रिओसोट, कारबॉलिक ॲसिड,

नाफ्थालिन, आन्थ्रासिन, पीच वगैरे रासायनिक द्रव्यें तयार करण्याचा नवीन विभाग येथें सुरु केला आहे

रासायनिक द्रव्यें, औषधें, रोगप्रतिबंधक व रोगनाशक लसी, शस्त्रक्रियेस लागणारी हत्यारे व शास्त्रीय प्रयोगाची उपकरणी कंपनीच्या कारखान्यात तयार होतात कारखान्यातून बाहेर पडणारा माल प्रमाणानुसार आहे किंवा नाही ह्याची परीक्षा करण्यासाठी एक स्वतंत्र प्रयोगशाळा आहे रासायनिक द्रव्ये करण्याच्या चालू पद्धतीत सुधारणा करणे व नवीन पद्धति शोधून काढणें ही कामेंपण येथे केली जातात कारखान्यात १,५०० वर लोक काम करीत आहेत वरिष्ठ नोकर वर्गाला राहण्यासाठी कारखान्यांचे आवारात घरें बांधण्यात आलीं असून कारखान्यातील सर्व लोकासाठी मोफत रुग्णालय, दवाखाना व पुस्तकालय हीं कंपनीने स्वतःच्या खर्चानें चालविली आहेत १५ रुपयाहून अधिक मासिक वेतन मिळणाऱ्या कंपनीच्या सर्व नोकरांना कंपनीच्या प्रॉव्हिडंट फंड योजनेचा फायदा मिळतो

## जुन्या कारखान्यास जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ उत्तरेकडे जाणारी नंबर ३ ची बस घ्यावी चौरंगी, धरमताला व सिआलधा स्टेशन सोडून बस पुढें गेली म्हणजे माणिकताला रोड लागतो येथें बस बदलावी व पूर्वेकडे जाणारी दुसरी बस घ्यावी ही बस थेट कंपनीच्या कारखान्यासमोर जाऊन उभी राहते

## नव्या कारखान्यास जाण्याचा मार्ग

नंबर २ किंवा २ ए ची उत्तरेकडे जाणारी बस घ्यावी ही बस थेट शामबझारला जाते तेथून नंबर ३२ ची दक्षिणेश्वरला जाणारी बस घ्यावी व बरानगरचें तिकिट काढावे बरानगर बस स्टँडवरून बराकपूरची बस निघते त्यांत बसावे व कंडक्टरला दवाई कारखाने मे जाना है असें सांगितले म्हणजे तो योग्य स्थळी आपणास उतरवून देतो बराकपूरकडे जाताना हा कारखाना डाव्या हाताकडे लागतो

## बंगलोर व्हाइट लेड सिंडिकेट, कोननगर, कलकत्ता

गेल्या महायुद्धानंतर हिंदुस्थान सरकारने एक औद्योगिक कमिशन

नेमलें या कमिशनपुढें ज्या गोष्टी आल्या त्यात एक महत्त्वाची माहिती होती ती अशी की, "युद्धाचे कालात परदेशाहून येणारे तेलाचे रग बद झाल्यामुळें देशात असलेला माल अवाचे सवा भावानें विकला गेला व पुष्कळाना तर रगाचे अभावी वेलतेलावरच काम भागवावें लागलें" तेलाच्या रगापैकीं बऱ्याच रगात व्हाइट लेड हा मुख्य घटक असतो हा पदार्थ जर या देशात तयार करता आला तर तेलाचे रग करण्याच्या धद्याला बरीच मदत होईल अशी कल्पना सर अल्फ्रेड चाटरटन याना कमिशनपुढें आलेल्या माहितीवरून सुचली त्यानी आपले विचार सर राजेद्रप्रसाद मुकर्जीना सांगितले या धद्यातील तज्ज्ञ वाहेरून आणून मोठ्या प्रमाणात कारखाना काढण्याची कल्पना दोघानाही पसत नसल्यानें, बगलोर येथील इडियन इन्स्टिटच्यूट ऑफ सायन्समध्यें या धंद्याचे प्राथमिक प्रयोग करण्याचें ठरले त्याप्रमाणें इ स १९१९ सालीं श्री स के दातार (कारखान्याचे हल्लींचे मॅनेजर) याना शिष्यवृत्ति देऊन, इन्स्टिटच्यूटचे रसायन शास्त्राचे तत्कालीन प्रोफेसर डॉ सडबरो याच्या देखरेखीखाली व्हाइट लेड करण्याचे प्राथमिक प्रयोग सुरू झाले पुढें सर राजेंद्रनाथ मुकर्जी, सर ए चाटरटन, डॉ सडबरो, डॉ वॅटसन, व श्री रगास्वामी अय्यंगार (म्हैसूर संस्थानच्या औद्योगिक खात्याचे सेवानिवृत्त डायरेक्टर) या पाच गृहस्थानीं बगलोर व्हाइट लेड सिडिकेट या नावाची लिमिटेड कपनी काढली इन्स्टिटच्यूटमधील प्रयोग यशस्वी झाल्यानतर इ स १९२२ मध्ये हा कारखाना बगलोरासच काढला श्री रगास्वामी वारल्यानतर सर राजेंद्र मुकर्जी यानी आपले शेअर्स मद्रासच्या इडियन ॲल्युमिनम कपनीस विकले देशात व्हाइट लेड करण्याचा हा एकच कारखाना असल्यामुळें त्याला चागलाच फायदा होऊ लागला व पुढें भाडवल वाढविण्याची आवश्यकता वाटली इग्लडमधील रगाचे मोठे कारखानदार गुड लॉसबॉल आणि कंपनीने बरेच भाडवल दिलें कारखान्याची मॅनेजिंग एजन्सी, इडियन अल्युमिनम कपनीकडून कलकत्त्याच्या डी वाल्डी आणि कपनीकडे आली व्यापारी दृष्टीनें बंगलोर सोयीस्कर नसल्याने १९३६ सालीं हा कारखाना कलकत्त्यास आणला हिदुस्थानची व्हाइट लेडची गरज निम्याहून जास्त हा एकच कारखाना पुरवू शकेल, इतका मोठा हा कारखाना बाधला आहे काचेच्या भांड्यातील प्राथमिक प्रयोगापासून तों आजच्या

विशाल रूपापर्यंतची कारखान्याची सर्व वाढ श्री दातार याच्या देखरेखी-खाली झाली आहे योग्य संधि मिळाल्यास महाराष्ट्रीयही युरोपियनां-प्रमाणेच जबाबदारीची कामे यशस्वी रीतीनें करूं शकतात ही गोष्ट रा दातार याच्या उदाहरणावरून सिद्ध होते

### जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ उत्तरेकडे जाणारी नबर ५ ची बस घ्यावी, व हावरा स्टेशनवर जावे तेथील बसच्या अड्डयावरून बालीखालला जाणारी बस घ्यावी ही विलिंग्डन पुलाच्या पायथ्याशी उभी राहते तेथें उतरून बालीखाल कालव्यावरील पूल ओलाडून पलीकडे गेले म्हणजे श्रीराम-पुरास जाणाऱ्या बस मिळतात श्रीरामपूरच्या बसमध्यें बसल्यावर डी वाल्डी आणि कपनीच्या कारखान्याजवळ (कोननगरला) उतरावे तेथें जवळच हा कारखाना आहे कडक्टरला सागितल्यास तो योग्य ठिकाणी उतरवतो.

## टिटाघर येथील कागदाचा कारखाना

इ स १८८२ त या कारखान्याची स्थापना झाली येथें कागदाचा लगदा व कागद हीं दोन्ही तयार करतात कागद मुख्यत· "सवाई"च्या गवताचा करतात बांबूपासून कागद तयार करण्याचे प्रयोग सिद्ध झाले असून यापुढें कागद तयार करण्यासाठीं बाबूचाच उपयोग केला जाईल टिटाघर व ककीनारा या दोन ठिकाणीं कपनीचे कारखाने असून दोन्ही कारखाने मिळून वर्षास १८,००० ते २०,००० टन कागद तयार होतो पाढरे व रगीत सर्व प्रकारचे लिहावयाचे कागद, बदामी आणि पाढरे पुठ्ठ्याचे कागद, टीप कागद, त्याचप्रमाणे अँटिक वोव्ह, इत्यादि प्रकारचे कागद या कारखान्यात तयार होतात

### जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ उत्तरेकडे जाणारी न २ किंवा २ ए च्या बसमध्ये बसून शामबझारला उतरावे तेथून दक्षिणेश्वरच्या बसमध्यें बसून

बरानगरला उतरावें या ठिकाणाहून बराकपूरच्या बसमध्ये बसून टिटाघर पेपर मिल्सजवळ उतरविण्यास सांगितले की कंडक्टर योग्य ठिकाणीं उतरवितो

## टांकसाळ

स्ट्रँड रोडवर ही टांकसाळ असून गरज पडेल तर २०,०००,००० रुपये दररोज पाडता येतील इतकी यंत्रसामग्री येथे आहे ही एक व मुंबईस एक अशा दोनच टांकसाळी हिंदुस्थानांत आहेत टांकसाळ बघावयास तेथील वरिष्ठ अधिकाऱ्याची परवानगी लागते

### जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपासून उत्तरेकडे जाणारी ट्राम घेऊन निमताल्याचें टिकिट घ्यावें एस्प्लनेडजवळ निमताल्याच्या ट्राममध्ये बसावें हॅरिसन रोड सोडून ट्राम पुढें जाऊं लागली म्हणजे उजवे बाजूस टांकसाळीची भव्य इमारत दिसते

## कलकत्ता फास्ट कलर डाय वर्क्स

### [ २४ तातीपारा लेन, सालकिया, हावरा ]

कै केवलचंद नंदराम चव्हाण हे जरी जातीने मारवाडी होते तरी त्यांचा जन्म व शिक्षण महाराष्ट्रात झाल्यामुळे ते स्वत ला महाराष्ट्रीय समजत असत व महाराष्ट्राबद्दल त्यांना विलक्षण अभिमान असे बरेच दिवस कलकत्त्यास ते हुवेरो कंपनीच्या रंगाचा धंदा करीत याच सुमारास श्री अच्युत अनंत पै हे हुवेरो कंपनीच्या कॅनव्हासरचें काम करीत होते १९३० साली या दोघांनी हावरा येथें कलकत्ता फास्ट डाय वर्क्स नावाचा सूत रंगविण्याचा एक कारखाना काढला श्री पै यांचें रंगाचे ज्ञान व श्री केवलचंद यांची व्यापारी बुद्धि अशी जोड जमल्याने फार थोड्या अवधीत कारखाना चांगला भरभराटीस आला १९३१ सालीं कंपनीनें कटक येथें एक पेढी काढून श्री बी ग भट यांची तेथें नेमणूक केली कुष्टिया येथील मोहिनी मिल्सला लागणारे रंगीत सूत पुरविण्याचा मक्ता घेतला, व कुष्टीयास

दुसरा एक सूत रंगविण्याचा कारखाना काढला १९३६ साली एका महाराष्ट्रीय गृहस्थाच्या देखरेखीखाली मिदनापूर येथें सूत विकण्याचें दुकान सुरू केलें

हल्ली काम नसल्यानें बंगालमध्ये कोष्टी वर्गाची फार हलाखीची स्थिति आहे गरिबाना काम मिळेल व आपणालाही फायदा होईल असा विचार करून १९३६ सालीं श्री केवलचंद यानी कॉटेज इंडस्ट्रीजच्या धर्तीवर कुष्टियास रंगीत चादरी विणवून घेण्याची सुरुवात केली विणकर वर्गाला रंगीत व साधें सूत पुरवावयाचें व त्याच्याकडून ठराविक दरानें जाड चादरी विणवून घ्यावयाच्या असा उपक्रम आहे विणकराना भरपूर काम देऊनही या चादरी इतक्या स्वस्त पडतात की त्या आज मुंबईच्या कापडपेठेंत मिल्सच्या चादरींपेक्षा कमी दरानें विकणें कंपनीला परवडतें कंपनीचें एक दुकान मुंबईसपण आहे वर्षाच्या कांठीं ५।६ लक्षाचा व्यापार कंपनी करते सिंगापूर, ब्रह्मदेश, आफ्रिका, वगैरे परदेशात कंपनीचीं दुकानें काढून व्यापार वाढविण्याची कंपनीच्या मालकाची इच्छा होती व त्यासाठीं किदरपूरच्या बाजूला एक मोठें डाय हाऊस बांधण्याचा विचार सुरू होता परंतु दुर्दैवानें १९३८ च्या ऑगस्ट महिन्यात श्री केवलचंद एकाएकी वारले त्याच्या निधनानें कंपनीला बराच धक्का बसला परंतु श्री पै याच्या नेतृत्वाखालीं कारखान्याचें काम व्यवस्थित चाललें आहे कै केवलचंद यांच्या अकालीं निधनानें येथील महाराष्ट्र समाजाचें अत्यंत नुकसान झालें आहे

## भारत ग्लास वर्क्स

उद्योगधंदा व व्यापार यात महाराष्ट्रीयाना अजून पुष्कळ शिकावयाचें आहे महाराष्ट्रीयानी उद्योगधंदे यशस्वी रीतीनें चालविण्याची उदाहरणें अगदीं हातावोटावर मोजण्यासारखीं आहेत व्यापार व धंदा यात लागणारी चिकाटी, व्यापारी धोरण व गिऱ्हाइकाला आकर्षून घेण्याची कला आम्हा महाराष्ट्रीयांमध्यें विशेष नाहीं अशा परिस्थितीत भारत ग्लास वर्क्सचे मालक श्री भाऊसाहेब सावंत यानीं बडोद्याहून कलकत्त्यासारख्या दूर शहरीं येऊन स्वतःचा कांचेचा कारखाना काढला व तो आज दहाबारा वर्षें यशस्वी रीतीनें चालविला यातच त्यांच्या कर्तृत्वशक्तीची खरी कल्पना येते श्री.

भाऊसाहेबाचें उदाहरण प्रत्येक महाराष्ट्रीय तरुणानें आपल्यासमोर ठेवण्यासारखे आहे

प्रारंभी निरनिराळ्या काच कारखान्यात जर्मन व जपानी लोकाच्या हाताखाली अगदीं साध्या मजुराप्रमाणें भाऊसाहेब काम करीत असत ते प्रथम "बेंगॉल ग्लास वर्क्स" डमडम, येथें नोकरीकरिता आले कारखान्यात कांहीं दिवस काम केल्यावर अधिकाऱ्याशीं त्यांचे मतभेद होऊं लागले म्हणून स्वत जवळ जें काय थोडें भाडवल होतें तें जमा करून इ स १९२८ सालीं कलकत्त्यापासून उत्तरेकडे दोन तीन मैलांवर डमडम गावीं भाड्याची जागा घेऊन त्यानीं स्वत चा काच कारखाना सुरू केला

प्रारभी कांच वितळविण्याच्या पाच मुशी असलेली एक भट्टी त्यानी बांधली या भट्टीतून एका वेळेस १२०० ते १५०० पौंड काच तयार होई पाढरी स्वच्छ काच तयार करणें कठिण असल्याने प्रथम या कारखान्यात नुसत्या बाटल्याच तयार करीत असत पुढें शास्त्रीय प्रयोगानें काचेच्या मिश्रणात सुधारणा करवून कंदिलाच्या चिमण्या तयार करण्यात येऊ लागल्या. अशा रीतीनें कारखान्याचा व्याप वाढू लागून भाड्याची जागा अपुरी पडू लागली म्हणून ई बी रेल्वेच्या बेलघुरिया स्टेशनपासून दोन मैलांवर वीस बिघे जागा घेऊन तेथे मोठ्या प्रमाणात कारखाना बाधला, व इ स १९३६ साली नव्या इमारतीत कामाला सुरुवात झाली

हल्लीं कांचेच्या तीन भट्ट्या असून रोज साडेआठ टन काचेचा माल तयार होतो त्यांत बरण्या, बाटल्या, कंदिलाच्या चिमण्या, पाणी पिण्याचे ग्लास, विजेच्या दिव्याचे शेडस्, कांचेच्या पोकळ व भरीव नळ्या, वगैरे प्रकार असतात वर्षास ऐंशी हजाराचा कच्चा माल लागतो व त्यापासून एकदर अडीच लक्ष रुपयाचा माल येथें तयार होतो यावरून कारखान्याचा व्याप सहज लक्षात येईल कारखान्यात तीनशें कामगार असून त्याना राहण्यासाठीं मालकानी चाळी व घरे बाधलीं असून त्यांच्या शरीरस्वास्थ्याकडेही मालकाचें लक्ष आहे कारखान्यातील लोकाकरितां स्वतत्र डॉक्टर व फुकट औषधयोजनेची व्यवस्था आहे

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ नंबर २ किंवा २ ए ची बस घेऊन थेट शाम बझारला जावें शाम बझारला दक्षिणेश्वरच्या बसमध्यें बसून बरा-नगरला उतरावे तेथून बराकपूरला जाणारी बस निघते आगगाडीचा रस्ता पुलावरून जातो त्या पुलापासून एक फर्लांगावर उतरावें तेथें भारत ग्लास वर्क्सची पाटी आहे, व उजव्या बाजूला कारखान्याचीं दोन धुराडी दिसतात

## प्रकरण नववें

# संशोधनसंस्था

## दि रॉयल एशिआटिक सोसायटी ऑफ बेंगॉल

## [ १ पार्क स्ट्रीट ]

Bataviaasch Genootschap Van Kunsten en Wetenchappen (बटेव्हियाची कला आणि शास्त्र यांची सभा) या संस्थेखेरीज पूर्वेकडील सर्व साहित्य व शास्त्रीय संस्थामध्यें एशिआटिक सोसायटी ऑफ बेंगॉल ही अत्यंत जुनी आहे सर विलियम जोन्स याची १७८३ सालीं वरिष्ठ कोर्टाचे प्युनिजज्ज म्हणून कलकत्त्यास नेमणूक झाली जोन्स साहेबाना अनेक पौर्वात्य भाषांचें चागलें ज्ञान होतें व या बाबतीत नवीन शोध व्हावे असे त्याना वाटे कलकत्त्यास आल्यानतर येथील प्रमुख नागरिकाची सभा भरवून ता १४ जानेवारी, १७८४ रोजी जोन्स साहेबानी एशिआटिक सोसायटीची स्थापना केली तत्कालीन गव्हर्नर जनरल वॉरन् हेस्टिग्ज हे संस्थेचे आश्रयदाते व सर विलियम जोन्स हे तिचे पहिले अध्यक्ष निवडले गेले जोन्स यांनी अध्यक्षपदावरून केलेल्या आपल्या पहिल्या भाषणात सोसायटीच्या कार्याची रूपरेषा पुढे दिल्याप्रमाणे ठरविली आहे सर्व आशिया खड हें आमचे कार्यक्षेत्र होय या खडांतील सर्व नैसर्गिक व मनुष्यनिर्मित गोष्टीचा चोकसपणे अभ्यास करून त्यासबधी विश्वसनीय माहिती जमविणें हें सोसायटीचें ध्येय आहे

प्रारभीं काही वर्षे सोसायटीच्या सभा वरिष्ठ कोर्टाच्या ज्यूरीरूममध्यें भरत असत सोसायटीची इमारत हल्ली जेथें आहे ती जागा सरकारने सोसायटीला १८०५ सालीं मोफत दिली व १८०८ साली त्यावर इमारत बाधण्यात आली या इमारतीत पुष्कळ फेरबदल व वाढ झाली तथापि इमारतीचा मुख्य भाग १८०८त जसा बाधला तसाच अजून कायम आहे सोसायटीनें आपलें पहिलें कार्य म्हणून " एशिआटिक रीसर्चीझ " नांवाचें नियतकालिक

सुरू केलें या नियतकालिकाचे १७८८ पासून १८३६ पावेतों एकंदर २० खंड निघाले व पुढे सापत्तिक परिस्थितीमुळें हें बंद पडले या ग्रंथाच्या कित्येक अनधिकृत आवृत्ति छापण्यात आल्या ही गोष्ट त्याच्या लोकप्रियतेची साक्ष देते "ग्लीनिंग्ज इन सायन्स या मासिकात सोसायटीच्या बैठकींची साद्यंत माहिती येऊ लागली व १८३२ साली या मासिकाच्या संपादकानें सोसायटीच्या परवानगीनें मासिकास सोसायटीचे नाव दिलें, परंतु पुढें १८४३ सालीं हें मासिक सोसायटीने सर्वस्वी आपल्या हाती घेतलें संस्थेची ' जर्नल " आणि "प्रोसिडिंग्ज ' अशीं दोन नियतकालिकें होती तीं १९०५ साली एक करून त्याला " जर्नल ॲंड प्रोसिडिंग्ज ऑफ दि एशिआटिक सोसायटी ऑफ बेंगॉल" असें नांव देण्यात आलें फार विस्तृत व महत्त्वाचे लेख या नियतकालिकात न छापता मेम्वार्स या रूपानें छापण्यात येतात सोसायटीच्या प्रकाशनातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे बिब्लिओथेका इंडिका ( Bibliotheca Indica ) ही ग्रंथमाला होय या मालेमध्ये संस्कृत, फारशी, अरबी, वगैरे इतर पौर्वात्य भाषातील निरनिराळ्या विषयावरील ग्रंथ प्रसिद्ध केले गेले आहेत अकबरनामा, ऐनें-इ-अकबरी, साहित्यदर्पण यांसारख्या महत्त्वाच्या ग्रंथाचीं भाषांतरें विद्वान् लेखकाकडून करवून घेऊन सोसायटीनें फार महत्त्वाचें काम केलें आहे

संस्थेचा हस्तलिखित ग्रंथाचा संग्रह फार मोठा समजला जातो १६,००० संस्कृत व ५०० वर फारशी, अरबी व तुर्की भाषेंतील ग्रंथ या संग्रहात आहेत ब्रह्मी भाषेंतील जुने हस्तलिखित ग्रंथ येथें आहेत दहाव्या शतकात लिहिलेल्या " अष्टसाहस्रिक प्रज्ञपरमित " या ग्रंथात जुन्या काळची फार सुंदर चित्रें पाहावयास मिळतात हस्तलिखित ग्रंथसमूहाची सविस्तर अनुक्रमवार यादी तयार करण्याचे काम हल्ली सुरू आहे सोसायटीचा छापील ग्रंथसंग्रहही फार मोठा असून त्यात शास्त्रीय विषयांवरील पुष्कळ ग्रंथ आहेत येथील इंडियन म्यूझिअमची स्थापना सोसायटीतर्फेच झाली होती परंतु वस्तुसंग्रहालयासारख्या लोकशिक्षणाच्या संस्था आपल्या हातीच ठेवणें हें सरकारचें कर्तव्य आहे असे ठरल्यामुळे संस्थेला दीड लक्ष रुपये देऊन सरकारनें म्यूझिअम आपले ताब्यात घेतला

ज्यानी सोसायटीच्या कार्यकारी मंडळात काम करून संस्था नावा-

रूपास आणिली अशा काही प्रमुख व्यक्तींची तैलचित्रें व अर्धपुतळे सोसायटीच्या इमारतींत आपणास पाहावयास सापडतात अशोक राजाची दगडावर कोरलेली काहीं आज्ञापत्रें (इ स च्या पूर्वी २५० वर्षें) सोसायटीनें जपून ठेविली आहेत पाली भाषेंत लिहिलेल्या शिलालेखांचा अर्थ जेम्स प्रिन्सेस यानीं प्रथम लावला हे सस्कृत भाषेचे चागले पंडित होते व त्यानी केलेल्या सेवेची आठवण म्हणून हुगळी नदीवरच्या एका घाटाला त्याचे नाव देण्यांत आलें आहे सोसायटीच्या सस्थापकांची इच्छा या सस्थेनें वैद्यकशास्त्रामध्येही सशोधन करावे अशी होती परतु ती पूर्ण झाली नाही १९०६ साली सोसायटीनें वैद्यकीय विभाग सुरू केला व त्यानतर त्याच्या सभाही काहीं दिवस भरल्या परतु त्यानतर " स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन " ही सस्था स्थापन झाल्यामुळे, वैद्यकीय विषयावरील आपला ग्रथसग्रह या संस्थेला देऊन टाकला इडियन सायन्स कॉंग्रेसच्या स्थापनेत या सोसायटीनें पुष्कळ मदत केली आहे पहिली सायन्स कॉंग्रेसची बैठक १९१४ साली आपल्या इमारतीत भरविली- या सस्थेची कायमची कचेरी सोसायटीच्या इमारतींत आहे १९३६ साली सोसायटीला राजेसाहेबाकडून सनद मिळाल्यामुळें तिचें नांव " रॉयल एशिआटिक सोसायटी ऑफ बेंगॉल " असें ठेवण्यांत आले

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपासून उत्तरेकडे जाणारी कोणतीही बस किंवा ट्राम घ्यावी व्हिक्टोरिया मेमोरिअलच्या पुढें गेलें म्हणजे पार्कस्ट्रीट लागतो तेथें उतरावें पार्कस्ट्रीट व चौरगी रस्त्याच्या कोपऱ्यावर सोसायटीची इमारत आहे

## अलीपूर येथील हवाखात्याची वेधशाळा

ब्रिटिश राजसत्तेच्या आधी हवामानाची नोंद ठेवण्याची व्यवस्था हिंदुस्थानांत कोठेंही नव्हती इग्रजी मुलुखातील कांहीं अधिकाऱ्यानी १८५२ सालपर्यंत व्यक्तिश काही टिपणें ठेविली होतीं परतु तीं कोणत्याही एका पद्धत्यनुसार केलेलीं नसल्यामुळे परस्पराशी इतकी विसगत होती की त्याचा पुढें कांही उपयोग होऊ शकला नाही १८५३ साली बगाल सरकारच्या

मोजणीखात्याच्या कचेरीत हवामानाची नोंद ठेवण्याची पद्धत सुरू झाली गोदींत असलेल्या जहाजांना येथून रोज खरी वेळ (सूर्याच्या स्थानावरून ठरविलेली) दिली जात असे १८६४ साली ऑक्टोबर महिन्यात कलकत्त्यास फार मोठें वादळ झालें व हुगळी नदीचें पाणी समुद्रातील प्रचंड लाटांनी इतकें वाढलें कीं त्यामुळें जवळजवळ ८०,००० लोक प्राणास मुकले नदीतील बरीचशी जहाजेंही फुटली या प्राणहानी- व वित्तहानीमुळे सरकारचे डोळे उघडले व पुन्हा असला ईश्वरी कोप झालाच तर त्याची आगाऊ सूचना मिळावी म्हणून हवेंतील परिस्थितीचें व त्यातील फेरफाराचें निरीक्षण करण्या-साठीं हिंदुस्थान सरकारनें १८६५ साली हवाखातें सुरू केलें. बंगाल प्रांतासाठीं ठरविलेली योजना १८६७ मध्यें सुरू झाली व प्रेसिडेन्सी कॉलेजातील पदार्थ-विज्ञानशास्त्राचे प्रोफेसर मि एच एच ब्लँडफोर्ड यांना येथील हवाखात्याचे पहिले रिपोर्टर नेमण्यात आलें

१८७४ साली इंग्लंडमधील मिटिऑरॉलॉजिकल कौन्सिलच्या शिफा-रशीवरून हवाखात्याची पुनर्घटना करण्याचे सरकारनें ठरविले व मि ब्लँड-फोर्ड यांना इंपीरिअल रिपोर्टरच्या जागेवर नेमून हें काम करण्यास सांगितलें त्याच्या योजनेप्रमाणें अलीपूरच्या वेधशाळेची स्थापना इ स १८७५ मध्यें झाली ह्या वेधशाळेचें मुख्य काम हवेंतील फेरफारांची नोंद ठेवणें, स्व-चलित यंत्रांची निगा राखणें, दुसऱ्या वेधशाळेतील नादुरुस्त यंत्रांची दुरुस्ती करणें व नवीन नोकरांना कामाचें शिक्षण देणें हे होतें पुढें कांहीं दिवसांनीं हवाशास्त्रामध्ये नवीन शोध लावण्याचें कामही अलीपूर वेधशाळेकडे देण्यात आलें सूर्य मध्यान्हीला आल्याची बरोबर वेळ दाखविणारें यंत्र सेंट फोर्ट विलियममध्यें होतें त्याची सर्व व्यवस्था पाहण्याचें काम मोजणीखात्याकडून काढून वेधशाळेकडे देण्यात आलें देशातील हवामानाची नोंद रोज माहिती-पत्रकाच्या रूपानें प्रसिद्ध करणे ही ब्लँडफोर्ड साहेबाची शिफारस अमलात आली व हे काम मुख्य कचेरीकडे १८७८ सालीं दिलें १८७६ व १८७७ सालीं देशात ओला व सुका दुष्काळ लागोपाठ पडल्यानें हवामानाची माहिती देशामध्ये शक्य तितक्या लौकर प्रसिद्ध होणें अवश्य असें सरकारने ठरविल्या-मुळें ही माहिती तारेने गोळा करण्याचें ठरलें मुख्य संस्थेच्या शिवाय पांच प्रांतिक संस्थाही सुरू करण्यात आल्या बंगाल्यातील संस्थकडे प्रांताच्या

हवामानाची नोंद व धोक्याची सूचना देण्याचें काम दिलें गेलें हवाशास्त्रामध्यें जसजसे नवीन शोध लागू लागले तसतशी अलीपूरच्या वेधशाळेची उपयुक्तताही वाढू लागली बिनतारी संदेश व्यवहारात आल्यानंतर बंगालच्या उपसागरात वावरणाऱ्या जहाजांना वेळीच धोक्याचे बिनतारी संदेश देण्याचें अत्यंत जबाबदारीचें काम या वेधशाळेकडे आलें १८८९ साली ब्लॅंडफोर्ड साहेबाच्या जागी सर जॉन इलियट याची नेमणूक झाली त्यांनी ब्लॅंडफोर्ड योजनेंतील अपूर्ण राहिलेले काम हातीं घेतले कामाच्या सोयीसाठीं देशातील सर्व वेधशाळा एका खात्याच्या हातीं असाव्या असें ठरलें व त्याप्रमाणें मध्यवर्ती सरकारने या वेधशाळा आपल्या हाताखालीं असलेल्या हवाखात्यास जोडल्या व कलकत्त्यास या खात्याची मुख्य कचेरी ठेवली पूर्वी अलीपुर वेधशाळेचे मुख्य अधिकारी व हवामानाची नोंद ठेवण्यासाठी बंगाल सरकारचे अधिकारी असे दोन स्वतंत्र अधिकारी कलकत्त्यास असत १९०४ सालीं इलियट साहेबाच्या जागेवर सर गिल्बर्ट वॉकर हे जेव्हा डायरेक्टर झाले तेव्हा त्यांनी वर लिहिलेल्या दोन अधिकाऱ्याच्या जागा एक केल्या व हवाखात्याची मुख्य कचेरी कलकत्त्याहून सिमल्यास नेली नवीन जागेचा हुद्दा मिटिऑरॉलॉजिस्ट असा केला व त्या जागेवर प्रेसिडेन्सी कॉलेजांतील पदार्थविज्ञानाचे अध्यापक यांची अंशतः (पार्ट टाईम) नेमणूक केली प्रोफेसर पीक दोन्ही कामें करीत असत पुढे प्रेसिडेन्सी कॉलेजातील विज्ञानशास्त्राचे मुख्य अध्यापक हे अधिकारपरत्वेंच अलीपूरच्या वेधशाळेचे मुख्य अधिकारी होत असत ही पद्धत १९२६ पर्यंत चालली पण एकाच अधिकाऱ्याला दोन निराळ्या खात्यांचें काम जबाबदारीनें करणें कठिण होऊ लागलें तेव्हां मिटिऑरॉलॉजिस्टच्या जागेवर स्वतंत्र अधिकारी नेमण्याचें ठरले या जागेवर पहिली नेमणूक श्री वि वि सोहनी यांची झाली

या वेधशाळेत होणाऱ्या कामाची माहिती खालीं दिल्याप्रमाणें आहे —

(१) हवेचा दाब, उष्णतामान, गति, दिशा व आर्द्रता याची नोंद ठेवणें,

(२) सिसमोग्राफ (कंपलेखक) वरून भूकंपांचीं नोंद ठेवणें,

(३) समुद्रावरील हवामानाचा अभ्यास करण्याकरिता कलकत्त्याकडे येणाऱ्या जहाजाच्या हालचालीची माहिती जमविणें,

(४) पूर्वहिंदुस्थानातील हवामानाची माहिती रोज पत्रकारूपाने प्रसिद्ध करणे,

(५) येथील बंदराला रोज बरोबर वेळ कळविणे, व आंतरराष्ट्रीय पद्धत्यनुसार दिवसांतून दोन वेळा बरोबर वेळा संदेश (टाईम सिग्नल्स्) बिनतारी यंत्रानें पाठविणे,

(६) बंगालच्या उपसागरावरील बंदरांना व गलबतांना हवेमध्ये होणाऱ्या वादळाची पूर्वसूचना देणें,

(७) पोलिस, रेल्वे व सार्वजनिक कामाच्या (पब्लिक वर्क्स) खात्यांना अतिवृष्टीची पूर्वसूचना देणें,

(८) देशातील इतर वेधशाळांतून असलेल्या उपकरणांची व यंत्रांची दुरुस्ती करणे, वगैरे

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपासून दक्षिणेकडे जाणारी नंबर ३ ची बस घ्यावी ही बस हजरारोडच्या कोपऱ्यावर पश्चिमेकडे वळते या मार्गाने जात असतांना अलीपूर जेल, सरकारी टेस्ट हाऊस, हेस्टिंग्स् पार्क, बरद्वानचा राजवाडा, कुचबिहारचा राजवाडा, वगैरे महत्त्वाची स्थळें लागतात कुचबिहारच्या राजवाड्यानंतर गव्हर्नरच्या बॉडीगार्डस्च्या बराकी आहेत. या बराकीच्या परसांतून वेधशाळेकडे जाण्याचा मार्ग आहे येथून वेधशाळा पांच मिनिटाच्या रस्त्यावर आहे

## बोस इन्स्टिटयूट, ९३।१ अपर सर्क्युलर रोड

सर जगदीशचंद्र बोस यांनी प्रेसिडेन्सी कॉलेजातील विज्ञानशास्त्राच्या अध्यापकाचे जागेवरून सेवानिवृत्त झाल्यावर स्वतःच्या संशोधनकार्याकरिता ही संस्था इ स १९१७ सालीं स्थापन केली तेव्हांपासून आजपावेतों येथें संशोधनाचें काम सतत चालू आहे येथें प्रारंभींचें शिक्षण देण्याची सोय नाही फक्त पदवीनंतरच्या संशोधनाची येथें व्यवस्था करण्यात आलेली आहे धन किंवा कीर्ति संपादनाची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यापेक्षा केवळ ज्ञानासाठींच ज्ञान संपादन करून सत्याचा शोध लावणें हेंच ज्यांनी आपले

ध्येय ठरवून सर्व आयुष्य त्यात ालविण्याचा निश्चय केला असेल अशानींच येथें यावें, असें कै डॉ बोस याचे म्हणणें असे

वनस्पति व प्राणि या दोहोंच्या जीवनामध्यें एक प्रकारचे साम्य आहे ही गोष्ट या प्रयोगशाळेत जास्त स्पष्ट करून दाखविण्यात आली वनस्पतीची इद्रियरचना साधी तर प्राण्याची इद्रियरचना त्या मानानें गुतागुतीची असते वनस्पतीच्या व प्राण्याच्या शरीरांतील सवेदक ततूवर उष्णता व उत्तेजक व समोहक पदार्थांचा इष्टानिष्ट परिणाम सारखाच होतो अशा रीतीनें वनस्पती यत्रांसारख्या निर्जीव नसून प्राण्यासारख्या सजीव आहेत असें येथील प्रयोगानी विशद करून दाखविले आहे सजीव प्राण्यांच्या मज्जाततूना मेंदूकडून प्रेरणा मिळते व त्या प्रेरणेप्रमाणे अवयव आपली कामें करितात परतु ही स्थिति वनस्पतीमध्यें आढळून येत नाही ज्ञानवाहक व गतिवाहक असे दोन्ही प्रकारचे मज्जातत् आपआपली कामें स्वतत्रपणें करितात त्याना प्रेरणा देण्याचे मेंदूसारखें एक केंद्र वनस्पतींत नाहीं जिवंत प्राण्याचें रक्ताभिसरण हृदयाच्या क्रियेवर अवलंबून असतें, परतु वनस्पतीमध्यें पोषक रस सर्व भागातून पोहोचविण्याचें काम सजीव पेशीच्या आकुचन व प्रसरणानें घडून येते वनस्पतीच्या इद्रियव्यापाराविषयी सशोधन करण्यास अवश्य अशी सर्व यत्रें व उपकरणे येथेंच तयार करण्यात आली आहेत (Resonant Recorder) रेझोनट रेकॉर्डर या यत्रानें सेकदाच्या एकहजाराश इतकी सूक्ष्म वेळ मोजता येतें व त्यामुळेंच वनस्पतीना मिळणाऱ्या संवेदनांची गति निश्चित करता येते अतिसूक्ष्म दर्शकामध्येंही दिसणार नाही अशी वनस्पतीच्या रसपेशीची अतिसूक्ष्म वाढ (Magnetic Crescograph) मॅग्नेटिक क्रेस्कोग्राफ या यत्रानें उत्तम तऱ्हेनें दाखविता येते

डॉ बोस याच्या या शोधामुळें सशोधनकार्याला एक नवीन दिशा लागली आहे वनस्पतीच्या गुणधर्मांचा अभ्यास व माहिती जसजशी वाढत जाईल तसतशी वैद्यकशास्त्रामध्यें क्राति होऊन मनुष्याचें जीवन जास्त सुखमय होईल असें वाटते

प्रयोगशाळेची इमारत हिदु पद्धतीची आहे व्याख्यानांसाठी १५०० लोकाना स्पष्टपणे ऐकू येईल असा एक मोठा दिवाणखाना आहे मुख्य इमारतीच्या मागें लहानसा सुदर बगिचा आहे व त्यासभोंवती प्रयोगशाळा

व वनस्पतिगृहें आहेत इन्स्टिटयूटला हिंदुस्थान सरकारकडून सालिना ५०,००० रुपयाची मदत मिळते

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपासून उत्तरेकडे जाणारी नंबर ३ ची बस घ्यावी सिआलधा स्टेशन सोडून बस पुढे गेली म्हणजे ५–६ मिनिटांनी सायन्स कॉलेज, डॉ बोस यांचा बंगला व बोस इन्स्टिटयूट अशा इमारती एकापुढें एक डाव्या बाजूस लागतात कंडक्टरला सांगितलें म्हणजे तो योग्य ठिकाणीं उतरवून देतो

## गव्हर्मेंट टेस्ट हाऊस, १२ जज्जकोर्ट रोड, अलीपूर

हिंदुस्थान सरकार जो माल इंग्लंडमध्यें विकत घेतें तो करार केलेल्या नमुन्याबरहुकुम असल्याची परीक्षा इंडिया ऑफिसच्या तज्ज्ञ अधिकाऱ्याकडून माल तयार होत असताना वारंवार केली जाते, व त्यासाठी एक स्वतंत्र प्रयोग-शाळा तेथें आहे सरकारी रेल्वेंना लागणारा माल हिंदी कारखान्यांकडून घेऊन देशातील उद्योगधंदे वाढवावयाचे असतील तर येथे तयार होणाऱ्या मालाची परीक्षा करण्यासाठीं इंग्लंडप्रमाणें येथेंही एक प्रयोगशाळा असली पाहिजे, असें आपलें मत तत्कालीन रेल्वेबोर्डाचे अध्यक्ष सर टी विन्न यांनी १९०९ साली सरकारला कळविलें ही सूचना हिंदुस्थान सरकारला पटल्या-मुळे १९१० साली कलकत्त्यातील कारखान्यात सरकारसाठी तयार होणाऱ्या मालाची परीक्षा करण्याकरिता "इन्स्पेक्टर ऑफ लोकल मॅन्युफॅक्चरर्स" या नांवाच्या एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक झाली, व रेल्वेच्या निर-निराळ्या बांधकामात लागणाऱ्या लोखंडी मालाची परीक्षा करण्यास लागणारीं यंत्रें व उपकरणी या अधिकाऱ्याचे कचेरींत ठेवण्यात आली हीच हल्लींच्या टेस्ट हाऊसची सुरुवात होय यानंतर "पोर्टलंड सीमेंट" व रंगणाच्या तेलाची परीक्षा करण्याची सोय येथें झाली सरकारच्या या धोरणामुळें वनस्पतिजन्य तेलें, साबू, तेलाचे रंग वगैरे येथें होणारा माल रेल्वे घेऊ लागली या मालाच्या पृथक्करणासाठीं टेस्ट हाऊसमध्यें रसायन विभाग सुरू केला दगडी कोळशाची परीक्षा करण्यासाठीं रेल्वेबोर्डाची एक प्रयोगशाळा होती,

ती बंद करून तें काम स्टेट हाऊसला देण्यात आलें १९१३ साली इन्स्पेक्टरचा हुद्दा "सुपरिंटेंडंट" करण्यात येऊन त्याच्या हाताखाली रसायन विभागासाठी एक व इंजिनियरिंग विभागासाठी एक असे दोन अधिकारी नेमण्यात आले याच वर्षीं टेस्ट हाऊससाठीं इमारत बांधण्यात आली

या प्रयोगशाळेचा फायदा रेल्वेव्यतिरिक्त इतर सरकारी खात्यांना व खाजगी व्यक्तींना देण्याचें ठरून निरनिराळ्या कामाकरिता फी ठरविण्यात आली यामुळें हिंदी कारखानदारांना आपला माल ठराविक नमुन्याचा होत आहे किंवा नाही याची खात्री करून घेण्याची विशेष सोय झाली सरकारी खात्यांना व खाजगी व्यक्तींनाही माल घेण्याचे आधी पारखून घेतल्याने वाईट माल मिळण्याची भीति उरली नाही येथें होणाऱ्या व परदेशांतून येणाऱ्या मालाची उपयुक्ततेच्या दृष्टीनें परीक्षा व पृथक्करण करून अवश्य गुणांचे वर्णन (स्पेसिफिकेशन्स्) तयार करण्याचें बरेचसे काम टेस्ट हाऊसनें केले १९१४ साली महायुद्ध सुरू झालें व दारूगोळा व लष्कराला लागणारा निरनिराळा माल तपासण्याचे काम टेस्ट हाऊसकडे आले त्यामुळें ही प्रयोगशाळा रेल्वेखात्याकडून काढून 'म्युनिशन्स बोर्ड' कडे देण्यात आली युद्ध संपल्यानंतर इंडियन स्टोअर्स डिपार्टमेंटची स्थापना झाली व त्यानंतर या खात्याकडे टेस्ट हाऊसची व्यवस्था सोपविण्यात आली कामाचा व्याप बराच वाढल्याने १९२२ साली टेस्ट हाऊस इमारत बरीच वाढविण्यात आली

सर्व प्रकारचा लोखंडी माल, रेल्वेचे बफर्स, डबे जोडण्याच्या सांखळ्या, व्हॅक्यूम ब्रेक्सचे सामान रुळाखाली टाकण्याची खडी, सीमेंट, गरम व सुती कापड, विजेचे पंखे, दिवे, वंगणाची व साधीं तेलें, तेलाचे रंग, पेट्रोल, केरोसीन, रस्त्यावर लागणारे डामर व ॲसफॉल्ट, निरनिराळ्या धातू, खनिज पदार्थ, दगडी कोळसा, वगैरे अनेक व्यवहारोपयोगी वस्तूंची परीक्षा व पृथक्करणें येथें करतात ही कामें करण्यासाठी निरनिराळ्या विषयांची तज्ज्ञ मंडळी येथें नेमिली आहेत हिंदुस्थानची नॅशनल फिझिकल लॅबोरेटरी अशी संज्ञा टेस्ट हाऊसला दिल्यास अयोग्य होणार नाही या येवढ्या मोठ्या सरकारी प्रयोगशाळेचे हल्लीचे मुख्य अधिकारी हे एक हिंदी गृहस्थ आहेत हें विशेष होय

हिंदी कारखानदाराचा माल प्रमाणबद्धतेबद्दल तपासून देणे येवढेंच

केल्यानें कारखानदाराचें भागत नाही माल तयार करतांना पुष्कळ शास्त्रीय अडचणी येतात व ज्यामुळें त्याचा माल व्हावा तितका उत्तम होत नाही त्या अडचणी दूर करण्याचा मार्ग दाखविणें व अशा रीतीनें हिंदी कारखानदारांना सरकारनें मदत करणे जरूर आहे असें ठरल्यावर, १९३४ सालीं " इंडस्ट्रियल रीसर्च ब्यूरो ' स्थापन करण्यात आला याच्यातर्फे टेस्ट हाऊसमध्यें संशोधन विभाग सुरू करण्यांत आला आहे कोणत्याही कारखानदारास स्वतःचे धंद्यात कांहीं संशोधनाची जरूरी वाटत असल्यास त्यानें आपल्या प्रांताच्या " डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज " मार्फत रीसर्च ब्यूरोला लिहावें म्हणजे त्याचें काम टेस्ट हाऊसमध्ये करून देण्यात येतें महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं या सरकारी मदतीचा जरूर फायदा घ्यावा

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनपाशीं दक्षिणेकडे जाणारी नंबर ३ ची बस घ्यावी अलीपूर जेलचें आवार संपल्यावर लगेच टेस्ट हाऊसचे आवार लागतें

## इंडियन असोसिएशन फॉर दि कल्टिव्हेशन ऑफ सायन्स
## [ २१० बाऊबझार स्ट्रीट ]

हिंदी लोकांमध्यें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी देशी लोकांनींच चालविलेली अशी एखादी संस्था असणें जरूर आहे, ही कल्पना डॉ महेंद्रलाल सरकार यांनीं कलकत्ता मेडिकल जर्नलमध्यें प्रसिद्ध केली डॉ सरकार यांच्या चिकाटीमुळे १८७६ सालीं " इंडियन असोसिएशन फॉर दि कल्टिव्हेशन ऑफ सायन्स " ही संस्था स्थापन झाली थोड्याच दिवसात संस्थेला अपेक्षे-बाहेर देणग्या मिळाल्यामुळें १८७६ साली ३०,००० रुपयास हल्लींची जागा विकत घेऊन त्यावर इमारत बांधण्यांत आली लंडन येथील रॉयल इन्स्टि-ट्यूटच्या पद्धतीवर या संस्थेचा कार्यक्रम आखला कॉलेजमध्ये शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांकरिता विज्ञानशास्त्र (फिजिक्स्), रसायनशास्त्र केमिस्ट्री, जीवनशास्त्र (बायॉलॉजी), व ज्योतिष या विषयावर संशोधनात्मक व्याख्यानें देण्याची सोय येथें केली आहे याशिवाय ज्यांना दिवसां कॉलेजात जाणें शक्य नव्हतें अशाकरितां रात्रीच्या वर्गांची सोय येथें केली होती हे

रात्रीचे वर्ग विद्यापीठानें इंटरमीजिएट परीक्षेकरितां मान्य केले होते अशा रीतीनें १९१० पावेतों संस्थेचें कार्य चाललें यानंतर विद्यार्थ्यांना कॉलेजांतील परीक्षांचें शिक्षण देणें हें ध्येय हळूहळू बदलून शास्त्रीय संशोधनावर विशेष भर देण्यात आला कलकत्ता विद्यापीठातील विज्ञानशास्त्राचे पहिले "तारकनाथ पलित" अध्यापक सर चंद्रशेखर रामन हे या संस्थेचे चिटणीस झाल्यापासून संस्थेचें कार्य निव्वळ संशोधनाचें झालें आहे त्यांनीं आपलें महत्त्वाचें संशोधनकार्य (रामन इफेक्ट) असोसिएशनच्या प्रयोगशाळेंतच केलें

हिंदुस्थानातील सर्व प्रांताच्या विद्यार्थ्यांना संशोधन करण्यास असोसिएशननें शक्य त्या सवलती दिल्या पाहिजेत या अटीवर संस्थेला सालिना २०,००० रुपयाची मदत हिंदुस्थान सरकार देत आहे हल्ली येथें कोचीन, पंजाब, मद्रास, मुंबई, मध्यप्रांत, आसाम, वगैरे प्रांतातील विद्यार्थी संशोधनकार्य करीत आहेत असोसिएशनचें पुस्तकालय फार मोठें असून येथें जगातील विज्ञानशास्त्रावरील जवळजवळ सर्व नियतकालिकें येतात असोसिएशनच्या प्रयोगशाळेत पदार्थविज्ञान या विषयावर संशोधन करण्यास लागणारीं सर्व तऱ्हेची यंत्रें व उपकरणीं आहेत

## जाण्याचा मार्ग

भवानीपूर पोलिस स्टेशनजवळ उत्तरेकडे जाणाऱ्या ट्रॅममध्यें बसावें व डलहौसी स्क्वेअरला उतरावें तेथून बाऊबझार रस्त्यानें सिआलधा स्टेशनकडे जाणाऱ्या ट्रॅममध्यें बसावें ट्रॅमनें चित्तरंजन ॲव्हेन्यू सोडला कीं थोड्याच वेळात असोसिएशनची इमारत लागते

## प्रकरण दहावें

# इतर संस्था, क्रीडामंडळें, क्लब, पुस्तकालयें, वर्तमानपत्रें, नियतकालिकें, इ.

### रॉयल ॲग्रिहॉर्टिकलचरल सोसायटी, १ अलीपूर रोड

इ स १८२० सालीं रे केरो नांवाच्या गृहस्थानें ही संस्था स्थापन केली देशातील शेती व उद्यानाची सुधारणा करून तीं वाढविणें हा या संस्थेचा मुख्य हेतु होता हल्ली संस्थेनें आपल्या ध्येयातील शेती सुधारणा हा भाग सोडून दिला असून फक्त उद्यानापुरतेंच आपलें कार्यक्षेत्र मर्यादित केलें आहे इ स १८२६ मध्यें संस्थेनें निरनिराळ्या देशातून भाजीपाल्याचीं बियाणी आणवून कलकत्ता व पाटणा येथील मळेवाल्याना मोफत दिलीं, आणि फळें व भाजीपाला याचीं प्रदर्शनें भरविण्यास सुरुवात केली इ स. १८३८ साली दक्षिण अमेरिका, आफ्रिका, ईजिप्त या देशातून कापसाचे उत्तम बीं आणून हिंदुस्थानातील जमिनींत लागवड करण्याचे प्रयोग सुरू केले. संस्थेनें शिवपूर येथील सरकारी बागेजवळ तीन बिघे जमीन घेऊन उसाच्या लागवडीचे प्रयोग सुरू केले ही जागा सरकारी बागेला हवी असल्यानें अलीपूर येथे चौसष्ठ बिघे जमीन घेऊन बागायतीच्या प्रयोगाना त्या ठिकाणीं सुरुवात केली

प्रारभीं ही सस्था निमसरकारी होती म्हणून शेतकी खात्याचे सर्व प्रयोगांचेही काम ती करीत असे पण इ स १९०० साली हे काम सरकारनें काढून घेतल्यानें फळेंफुले व भाजीपाला यांची लागवड व त्या बाबतींतील प्रयोग यासाठीं संस्थेला सधि मिळाली परदेशातील निरनिराळ्या झाडा-झुडपाची जी लागवड आज या प्रातांत दिसत आहे त्याचें पुष्कळसे श्रेय या सस्थेच्या प्रयत्नासच आहे अलीपूर रोडवर सोसायटीचा बगिचा असून सृष्टिसौंदर्याचे दृष्टीने तो फारच सुदर आहे त्यातल्या त्यात ज्याना उद्यानाची आवड आहे त्याना तर येथे पुष्कळच नवीन गोष्टी पाहावयास सापडतात

## कलकत्ता मॅथमॅटिकल सोसायटी

इ स १८०८ साली या संस्थेची स्थापना झाली कै सर अशुतोष मुकर्जी हे तिचे पहिले अध्यक्ष होते त्यांचे मृत्यूनंतर कलकत्ता विद्यापीठाचे गणितशास्त्राचे मुख्याध्यापक कै डॉ गणेशप्रसाद याना हा मान मिळाला इ स १९३५ साली हे दिवगत झाल्यावर प्रोफेसर शामदास मुकर्जी हे अध्यक्ष झाले हल्लीं प्रॅसिडेन्सी कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री बी एन् सेन हे या पदावर आहेत सोसायटीचा पुस्तकसंग्रह जवळजवळ तीन हजार असून तो सायन्स कॉलेजमध्ये आहे आजपावेतों गणित विषयावर या सस्थेकडून बरेच प्रकाशन झाले

हिंदुस्थानांत गणित विषयाचें अध्ययन करण्याची लोकांना आवड उत्पन्न करणें, या विषयांतील विद्यार्थी व शिक्षक यांत सशोधनवृत्ति जागृत करणें, गणितशास्त्राच्या प्रगतिविषयीं चर्चा व विचारविनिमय करण्याकरिता सभा भरविणे, या सभात वाचलेले निबध व त्यावरील चर्चा नियतकालिका-तून प्रसिद्ध करणें, वगैरे सोसायटीचे मुख्य हेतू आहेत

## मायनिंग ॲण्ड जिऑलॉजिकल इन्स्टिटयूट ऑफ इंडिया

जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया या खात्याचे माजी डायरेक्टर सर टी एच हॉलंड यांचे अध्यक्षतेखाली या संस्थेची स्थापना इ स १९०६ साली झाली भूशास्त्र व तदनुषगिक खनिशास्त्र, खनिजशास्त्र, इत्यादि विषयाची चर्चा सस्थेच्या सभेंत होतात तसेंच एतद्विषयक प्रसिद्ध स्थळें पाहण्यासही सस्थेचे सभासद मधून मधून जातात जानेवारी महिन्यात सस्थेचें वार्षिक संमेलन भरतें मुख्य कचेरी कलकत्यात जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या इमारतीत असून धनबाद व जमशेदपूर येथे तिच्या शाखा आहेत भूशास्त्र, धातुशास्त्र, खनिशास्त्र याची जनतेंत आवड उत्पन्न करणे, सशोधन करणें, वगैरे या सस्थेचे मुख्य हेतू होत

## अन्थ्रापॉलॉजिकल सोसायटी

इ स १९२० साली सर अशुतोष मुकर्जी यांच्या आश्रयाखाली अन्-थ्रापॉलॉजिकल क्लब या नांवाची एक संस्था स्थापन झाली मानवांच्या

देहाची रचना, त्याची परपरा, त्याचे गुणधर्म, त्यानी उत्पन्न केलेल्या निरनिराळ्या कला, त्याचे स्वभावधर्म, पराक्रम, वगैरे विषयावर क्लबतर्फे चर्चा व निबधवाचन मधून मधून होतें या संस्थेची सापत्तिक स्थिति चागली नसल्यानें मानुषशास्त्रातील प्रकाशनाचें काम अजून तिने आपल्याकडे घेतलें नाही संस्थेच्या सभा बालीगज सर्क्युलर रोडवरील सायन्स कॉलेजमध्यें भरतात इ स १९३४ साली अन्थ्रापॉलॉजिकल क्लबचें नांव बदलून अन्थ्रापॉलॉजिकल सोसायटी असें ठेवण्यात आलें

४८२

## इंडियन केमिकल सोसायटी

हिंदी शास्त्र परिषदेत (इंडियन सायन्स कॉंग्रेस) सर्व प्रकारच्या शास्त्रीय विषयाचा समावेश होतो व वार्षिक अधिवेशनाचे कामाच्या सोयीसाठी निरनिराळे विभाग करण्यात येतात शास्त्र परिषदेचा मुख्य हेतु त्या त्या विषयाचा खोल अभ्यास हें नसून निरनिराळ्या विषयातील संशोधन एकत्र आणून, त्यांना परस्परांचे काम समजून घेण्याची सधि आणून देणें हा असल्यानें, रसायनशास्त्रज्ञांना आपल्या विषयाचा खोल विचार करून, त्याच्या वाढीचे प्रयत्न स्वतन्त्रपणें करतां यावे म्हणून इ स १९२४ साली सर पी सी रॉय, डॉ धार, डॉ ई आर वॉटसन, डॉ भटनागर, वगैरे विद्वान मंडळींनीं इंडियन केमिकल सोसायटीची स्थापना केली सोसायटीची वार्षिक बैठक सायन्स कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे वेळीच होते संस्थेचें स्वतःचे नियतकालिक असून त्यात रसायनशास्त्रावरील चर्चा, निबध व नवीन शोधाची माहिती दिलेली असते लाहोर, मद्रास व मुंबई येथें सोसायटीच्या शाखा आहेत

## इन्स्टिटयूशन ऑफ केमिस्ट्स्

कलकत्त्यातील निरनिराळ्या धंद्याच्या प्रयोगशाळांतून किती तरी रसायनी (केमिस्ट) कामे करीत आहेत ही सर्व मंडळी एकत्र जमली तर बऱ्याच उपयुक्त गोष्टी करिता येतील अशी कल्पना दहा वर्षांपूर्वी काहीं रसायन्याना आली या वेळीं इंडियन केमिकल सोसायटी अस्तित्वात होतीच परतु उद्योगधद्यात पडलेल्या रसायन्याना सोसायटीच्या कार्यांत विशेष गोडी

वाटली नाही उद्योगधद्यात रसायनशास्त्राचा कसा उपयोग होऊ शकेल येवढ्या आकुचित दृष्टीनें त्या विषयाकडे पाहिलें पाहिजे व चर्चा केली पाहिजे असें या लोकाचें मत पडल्यानें इ स १९२७ साली इन्स्टिटयूट ऑफ केमिस्टस् ही सस्था स्थापन करण्यात आली लौकरच सस्थेचें कार्यक्षेत्र वाढलें दूर-दूरच्या शहरातील रसायनी सस्थेला येऊन मिळाले व दोन वर्षांत दोनशें सभासद झाले

देशाच्या औद्योगिक उन्नतीच्या दृष्टीने रसायनशास्त्राचे विवेचन करणें, निरनिराळ्या उद्योगधद्यासबधीं निबध वाचणे, व त्यावर चर्चा करणे, सशोधनकार्य हाती घेणें, स्वत चें एक नियतकालिक चालविणे, सरकारला व खाजगी व्यक्तींना रसायनशास्त्राच्या बाबतीत सल्ला देणें, वगैरे या सस्थेचे मुख्य हेतू आहेत मधून मधून निरनिराळे कारखाने पाहावयास जाण्याचा उपक्रम बहुतेक सभासदाना पसत पडल्यामुळे सस्थेच्या कार्यांत एक प्रकारचा जोम आलेला आहे बेकार रसायन्याची एक जत्री ठेवून जमेल तसतसे या मडळींना उद्योगाला लावून देणें हा एक स्तुत्य उपक्रम सस्थेने नुकताच सुरू केला आहे इ स १९३७ साली सस्थेची एक शाखा बिहार-मध्यें गया येथे स्थापन करण्यात आली

## रामकृष्ण मेडिकल एज्युकेशन सोसायटी फॉर वुइमेन

येथील रामकृष्ण मिशनच्या ' शिशु मगल प्रतिष्ठान ' नांवाच्या सूतिकागृहाच्या चालक सिस्टर सरस्वती यानी ही सस्था १९३५ साली स्थापन केली सस्थेच्या कार्यकारी मडळाच्या अध्यक्ष सतोषच्या महाराणी-साहेब असून सिस्टर सरस्वती या चिटणीस आहेत स्त्रियामध्यें वैद्यकीय शिक्षणाची आवड उत्पन्न करून त्याचा प्रसार करणें, सूतिकाशास्त्र, औषधि मिश्रणें तयार करणें वगैरे शिक्षण देणें, स्त्रियाचे समाज, मुलींच्या शिक्षण सस्थामध्यें आरोग्यशास्त्रावर व्याख्याने देणे वगैरे संस्थेचे मुख्य उद्देश आहेत संस्थेला मोतीसील ट्रस्ट, रघुमल ट्रस्ट, इडियन फूटबॉल असोसिएशन व नगरसभा यांकडून आर्थिक मदत मिळते सस्थेची कचेरी व स्त्रियाचें इस्पितळ १२८ लॅन्सडाऊन रोड येथे आहे

याशिवाय कलकत्ता जिऑग्रफिकल सोसायटी, इडियन स्टॅटिस्टिकल

सोसायटी, फिजिकल सोसायटी, बायोकेमिकल सोसायटी, फिजिऑलॉजिकल सोसायटी, इंडियन मेडिकल सोसायटी, वगैरे शास्त्रीय संस्था कलकत्त्यात असून प्रत्येक संस्था स्वतःच्या शक्तीप्रमाणें आपआपल्या विषयाची लोकांमध्यें गोडी उत्पन्न करण्याचे प्रयत्न करीत आहे.

## क्रीडामंडळें [ Sports Clubs ]

मैदानातील सामुदायिक खेळामध्यें कलकत्ता शहराचा नंबर फारच वर लागतो. शहरातील सर्व जातीच्या लोकांत असले खेळ पाहण्याची आवड आहे. फूटबॉल, हॉकी, टेनिस, क्रिकेट, बॅडमिंटन, वगैरे खेळाचे सामने सुरू झाले की क्रीडांगणे प्रेक्षकांनी फुलून जातात व पुष्कळांना जागेच्या अभावी परत जावे लागतें. त्याचप्रमाणे पोहणें व होडचा वल्हवणें याचे पण सामनें होतात. व त्या वेळी सुद्धा प्रेक्षकांची गर्दी होतेच. युरोपियन लोकांत पोलो व गोल्फ या खेळाची विशेष आवड आहे. फूटबॉलच्या महत्त्वाच्या सामन्याचे वेळीं कधी कधीं प्रेक्षक वर्गाचा उत्साह इतका वाढतो की, दोन्ही संघाचे अभिमानी मारामारीपर्यंत मजल आणतात. कुमार टोळी इन्स्टिटयूट इ. स. १८८४ सालीं व मोहन बागन स्पोर्टिंग यूनियन १८९६ साली स्थापन झालें. आर्यन क्लब, मह्मेडन स्पोर्टिंग, ईस्ट बेंगॉल स्पोर्टिंग, वगैरे हिंदी लोकांचे खेळण्याचे क्लब आहेत. याशिवाय शैक्षणिक संस्था, कॉलेजें, मोठालीं सरकारी व खाजगी ऑफिसें यानीं आपआपले क्लब स्थापन केलेले आहेत. युरोपियन क्लबमध्ये टॉलीगंज क्लब, जोधपूर क्लब, व रॉयल टर्फ क्लब या संस्था मोठ्या आहेत.

### फूटबॉल

या खेळाची लोकामध्यें आवड उत्पन्न करण्यासाठी खेळात शिस्त, सुसंघटितपणा व नियमबद्धता आणण्यासाठी, त्याचप्रमाणें प्रतिपक्षाबद्दल सहिष्णुता व खेळाडू वृत्तीची वाढ करण्यासाठी इंडियन फूटबॉल असोसिएशन ही संस्था अस्तित्वात आली. या संस्थेतर्फे कलकत्त्यातील प्रमुख संघांचे सामने होतात. चांगल्या सामन्याचे वेळी प्रेक्षकांची संख्या ३५,००० पर्यंत जाते. हे सामने पाहण्यासाठी तिकिटें लावून जो पैसा उत्पन्न होईल त्यापैकी

बराचसा भाग शहरांतील संस्थाना धर्मादाय म्हणून दिला जातो असो-सिएशनचा हा हेतु खरोखरच स्तुत्य आहे

## क्रिकेट

मुंबई प्रांताप्रमाणें बंगालमध्यें क्रिकेटच्या खेळाची विशेष आवड नाही लोक क्रिकेट खेळतात, त्याचे सामने द्यावयास जातात, पण फूटबॉलपेक्षा कमी आर्यन व मोहन बागन या क्लबाच्या क्रिकेट टीम्सही आहेत ईडन बागेंतील कलकत्ता क्रिकेट क्लबचें क्रीडांगण फारच सुंदर आहे याच क्रीडा-गणावर ऑस्ट्रेलियन टीम व एम् सी सी टीम याचे बरोबर हिंदी टीमचे सामने झाले होते. हॉकीच्या खेळाची आवडपण क्रिकेटपेक्षा जास्त आहे

## टेनिस

हा खेळ खर्चाचा असल्यानें सर्वसाधारण जनतेला त्यात भाग घेता येत नाहीं तरीपण या खेळाची आवड असलेली मंडळी येथें पुष्कळ आहेत. प्रत्येक मोठ्या स्क्वेअरमध्यें एकदोन टेनिसचीं क्रीडांगणें असतातच येथे गवताच्या कोर्टवर खेळण्याचा फार प्रघात आहे माती, सीमेन्ट किंवा डाब-राची कोर्टस् फ़ार नाहीत कलकत्ता क्रिकेट क्लब, साऊथ क्लब, नॉर्थ क्लब, वगैरे ठिकाणीं डिसेंबर, जानेवारी महिन्यात टेनिसचे सामने होतात व त्यात हिंदुस्थानातील उत्तमोत्तम खेळाडू भाग घेतात येथील टेनिसच्या सामन्याच्या इतिहासात डीन ब्रदर्स, शिमिड्झ्, किशन प्रसाद, ओकामोटो यांचीं नावे आलेली आहेत

## पोहणें व वल्हवणें यांचे सामने

बंगाली लोकांना पोहण्याचा फार नाद आहे प्रत्येक मोठाल्या तलावांत एक दोन पोहण्याचे क्लब आहेत सर्वसाधारणपणें स्त्रियांसही पोहावयास येते किंबहुना वधुपसंतीच्या गुणांत केसांची लांबी व पोहता येणे याचा अंतर्भाव होतो, इतके त्याचे महत्त्व आहे या प्रांतातील पाण्याची विपुलता व पुष्कळ भागांत केवळ जलमार्गानेच प्रवास करण्याची जरूरी यामळे हे साहजिकच आहे पोहण्याचे सामने कोठे ना कोठें नेहमी

चालू असतातच प्रतिवर्षी गगेंतून ४० मैल पोहण्याची शर्यत होत असते. व त्यात कित्येकदा मुलीही भाग घेतात ढाकुरया येथे इंप्रूव्हमेन्ट ट्रस्टने एक मैल लाब व एक फर्लांग रुद असा कृत्रिम तलाव खणला आहे या तलावांत होड्याच्या शर्यती होतात यात कलकत्ता बोट क्लब, मारवाडी बोट क्लब, इडियन बोट क्लब, युनिव्हर्सिटी बोट क्लब भाग घेतात

## घोडदौडी

रॉयल टर्फ क्लबतर्फे येथें घोडदौडीच्या शर्यती होतात घोडदौडीची एकदर तीन मैदानें असून त्यापैकीं महत्वाचें मैदान व्हिक्टोरिया मेमोरियल-जवळ आहे येथें डिसेबरमध्ये किंग एम्परर कप, व्हाइसरॉय कप, अशा दोन मोठ्या दौडी होतात त्या वेळीं लक्षावधि रुपयाचा चुराडा होतो नुकतीच कुत्र्याच्या दौडीना (ग्रे हाऊड रेसिस) पण सुरुवात झाली आहे या दौडीचें मैदान शहरच्या दक्षिणेस बेहाला गावाजवळ आहे दौडीच्या उत्पन्नातून फार मोठी रक्कम येथील क्षयरोग्याच्या रुग्णालयास मिळते

## कलकत्ता युनिव्हर्सिटी इन्स्टिटयूट

ब्रह्म समाजाचे एक प्रमुख पुढारी श्री प्रतापचद्र मुझुमदार याचे खट-पटीमुळें इ स १८९१ मध्यें सोसायटी फॉर हायर ट्रेनिंग ऑफ स्टूडटस् ही सस्था स्थापन झाली विद्यार्थ्यांची शारीरिक, मानसिक, बौद्धिक व नैतिक उन्नति करून त्याना देशाचे आदर्श घटक बनवावयाचे हा सस्थेचा मूळ उद्देश होता श्री मुझुमदार यांचे चिकाटीमुळे तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड लॅन्स-डाऊन याची सहानुभूति सस्थेला मिळाली तदनतर सर गुरुदास बानर्जी, रे कालीचरण बानर्जी, महाराजा जतींद्र मोहन टागोर, वगैरेसारख्या थोर व्यक्तींनी या सस्थेंत आपलें मन घातलें सोसायटीला बगाल सरकार-कडून मासिक देणगी व हिंदु स्कूलच्या इमारतीतील काही भाग वापरण्यास मिळाला इ स १८९३ साली महाराज कुमार विनय कृष्ण याच्या देणगीनें संस्थेची सापत्तिक स्थिति सुधारली इ स १८९६ मध्यें सोसायटीचें नाव युनिव्हर्सिटी इन्स्टिटयूट असें ठेवलें पुढें इ स १९१५ साली लॉर्ड कार मायकेल याचे हस्तें सध्यांच्या टोलेजग इमारतीचा उद्घाटन समारभ झाला.

पुस्तकालय विवेचन मडळ, बैठे खेळ, गायनवादन, तालीमखाना, समाजसेवा, अम्ब्युलन्स, वगैरे सस्थेचे विभाग असून प्रत्येक विभागाचा एक अध्यक्ष आहे कवितागायन, व्याख्यानें, बैठे व मर्दानी खेळ, याचे आतर-कॉलेजीय सामने दरवर्षी या सस्थेतर्फे होतात या सस्थेनें गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी इ स १९०८ साली विद्यार्थी फड स्थापन केला बगालचे माजी ले गव्हर्नर सर एडवर्ड बेकर, हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिज व त्याच्या पत्नी, सर देवप्रसाद सर्वाधिकारी, यांसारख्या थोर व्यक्तीनीं फडाला चागलेंच आर्थिक साहाय्य केलें या फडांतून पुष्कळ गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत मिळते बाहेरगांवचे विद्यार्थी संस्थेचे सभासद झाले म्हणजे शहरांतील विद्यार्थ्यांबरोबर त्याचें दळणवळण वाढून एकमेकाबद्दलचे कोते विचार कमी होतात व सहानुभूति वाढते थोर व्यक्तींच्या सान्निध्यात येण्याची सधि येथील विद्यार्थ्यांना मिळत असल्यानें त्याच्या उच्च विचाराचा लाभ विद्यार्थ्यांना सहज मिळतो, व त्याचा फायदा विद्यार्थी दशेनंतरच्या आयुष्यात मिळतो या सस्थेत जुने (सीनिअर) व नवे (ज्यूनिअर) असे दोन प्रकारचे सभासद असतात जुन्या सभासदाला वार्षिक वर्गणी सहा रुपये व नव्या सभासदास दोन रुपये द्यावी लागते

## पुस्तकालयें व नियतकालिकें

विद्यार्थ्यांच्या व शिक्षकाच्या उपयोगासाठी प्रत्येक शिक्षण सस्थेंत लहानमोठी पुस्तकालये आहेत याशिवाय विद्यापीठ, भूशास्त्र, प्राणिशास्त्र, व वनस्पतिशास्त्र याचे सशोधन करणारी सरकारी खाती, बोस इन्स्टिटयूट, इडियन असोसिएशन फॉर दि कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, एशिआटिक सोसायटी, बगीय साहित्य परिषद, केमिकल सोसायटी, सस्कृत साहित्य परिषद, वगैरे-सारख्या मोठमोठ्या सशोधनकार्य करणाऱ्या संस्थाची स्वतत्र पुस्तकालयें आहेत या पुस्तकालयाची माहिती त्या त्या सस्थेच्या वर्णनांत थोडीफार लिहिलेली आहेच सरकारी नोकरासाठी बगाल सरकारच्या मुख्य कचेरींत एक मोठें पुस्तकालय आहे हिंदुस्थान सरकारच्या व्यापार व उद्योगधद्याची माहिती गोळा करणाऱ्या खात्याचे एक व्यापारी पुस्तकालय असून, त्यात व्यापार व उद्योगधद्याला लागणारी माहिती पुरविणाऱ्या ग्रथाचा मोठा

संग्रह आहे जगातील उद्योगधंद्याचीं व व्यापाराचीं सर्व नियतकालिके येथें येतात कोणालाही या पुस्तकालयाचा उपयोग करतां येतो त्यासाठी परवानगीची जरूरी नाही पुस्तकाची किंमत अनामत ठेविली तर पुस्तकें घरींही आणतां येतात त्याचप्रमाणें शहरांत अनेक खाजगी लहान मोठी पुस्तकालयें आहेन यापैकीं पुष्कळाना नगरसभेकडून मदत मिळते खाजगी पुस्तकालयापैकी चैतन्य लायब्ररी, सर गुरुदास इन्स्टिटयूट, कालीघाट इन्स्टिटयूट या अत्यंत जुन्या संस्था होत

## इंपीरिअल लायब्ररी

हें कलकत्त्यातील फार मोठें पुस्तकालय आहे इ स १८९१ साली सरकारच्या निरनिराळ्या खात्यातील पुस्तकालयें एकत्र करून इंपीरिअल लायब्ररी ही संस्था स्थापन करण्यात आली इ स १९०२ साली कलकत्ता पब्लिक लायब्ररी ही संस्था इंपीरिअल लायब्ररीला जोडून त्यात बऱ्याच सुधारणा करण्याचे श्रेय लॉर्ड कर्झन याजकडे आहे इ स १९०२ पासून इ स १९२३ पर्यंत हा ग्रंथसंग्रह मेटकाफ हॉलमध्ये होता परंतु ही जागा पुरेशी न झाल्यामुळे हे पुस्तकालय इ स १९२३ सालीं हल्लींच्या जागी (६ एस्प्लनेड रोड) आणलें त्याची व्यवस्था एका कमेटीकडे सोपविली असून, या कमेटीचे अध्यक्ष हिंदुस्थान सरकारचे एज्युकेशनल कमिशनर आहेत बंगाल सरकारचे व कलकत्ता विद्यापीठाचे प्रतिनिधी, आणि काही सरकार-नियुक्त सभासद या कमेटींत आहेत पुस्तकालयाचे मुख्य अधिकारी या कमेटीच्या चिटणिसाचे काम पाहतात

हिंदुस्थानसंबंधी बहुतेक जुनी नवी इंग्रजी पुस्तकें येथें पाहावयास मिळतात एकंदर ग्रंथसंग्रह ३४०,००० वर असून हिंदुस्थानांतील सर्व महत्त्वाची वर्तमानपत्रें व नियतकालिकें वाचनालयांत येतात येथें याकरिता वेगळी व्यवस्था केलेली आहे पुस्तकाची किंमत अनामत ठेवून पुस्तकें कलकत्त्याच्या बाहेरही मिळू शकतात यामुळें पुष्कळ लहान पुस्तकालयांना थोड्या खर्चांत आपल्या वाचकाना बहुमोल ग्रंथ देतां येतात हस्तलिखित व दुर्मिळ असे ग्रंथ पुस्तकालयातून कोणत्याही अटीवर बाहेर जाऊं देत नाहीत पुस्तकालयात जाऊन वाचण्याची सर्वांना मुभा आहे फारशी व अरबी

भाषेंत छापलेल्या हस्तलिखित ग्रंथाचा बराच मोठा संग्रह पुस्तकालयाला भेट म्हणून मिळाला आहे या विभागाला बुहर लायब्ररी म्हणतात

## वर्तमानपत्रें व नियतकालिकें

इ स १७८० सालीं कलकत्यास बेंगॉल गॅझेट नावाचें पहिले इंग्रजी छापील वर्तमानपत्र निघालें याचें धोरण कडक असल्यानें त्याच्यावर अधिकाऱ्याची अवकृपा होऊन तें लौकरच बंद पडलें कलकत्ता गॅझेट, बंगाल हुरकारा, सरकारी गॅझेट, कलकत्ता जर्नल, जॉन बुल, एशिआटिक जर्नल वगैरे इंग्रजी नियतकालिकें पुढें निघालीं श्रीरामपूरच्या मिशनरी लोकानीं फ्रेन्ड ऑफ इंडिया नावाचें वर्तमानपत्र इ स १८१८ सालीं सुरू केलें इंग्रजी वर्तमानपत्रें, त्यातील माहिती व निरनिराळ्या विषयावरील चर्चा वाचून, बंगाली भाषेंतही एक वर्तमानपत्र काढावे अशी कल्पना बंगाली लोकांच्या मनात आली व त्याप्रमाणें बेंगॉल गॅझेट नावाचें पहिलें नियतकालिक श्री गंगाकिशोर भट्टाचार्य यांचे संपादकत्वाखालीं सुरु झाले श्रीरामपूरच्या मिशनरी लोकांनीही लौकरच "दिग्दर्शन' नांवाचें बंगाली मासिक सुरु केलें या मासिकाची लोकप्रियता बरीच वाढल्यानें चालक मंडळीना बराच उत्साह आला व त्यानी इ स १९१८ च्या मे महिन्यांत "समाचारदर्पण' नावाचे साप्ताहिक सुरू केलें याचे संपादक मि मार्शमन हे मिशनरी गृहस्थ होते राजा राममोहन रॉय याच्या नेतृत्वाखाली इ स १८२१ साली "संवादकौमुदी' नावाचें साप्ताहिक सुरू झाले

कोणत्याही विषयावरील स्वतःचें मत बनविताना आपल्या विचारशक्तीचा उपयोग करावा हें डेरोझिओचें मत त्या वेळच्या बंगाली लोकाना पटले, व आपले मत वर्तमानपत्राचे द्वारां लोकांपुढे मांडण्याविषयीचा उत्साह देशात बराच वाढला यामुळें पुष्कळ नियतकालिकें सुरू झाली पण उत्साह ओसरल्यावर ती आपोआप बंद पडली इ स १८५२ पावेतों समाचारदर्पण मात्र चालू होतें इ स १८५१ साली राजेंद्रलाल मित्र यानी विविधार्थसंग्रह नांवाचे नियतकालिक सुरू केलें इ स १८७३ साली श्री बंकिमचंद्र चतर्जी यानी बंगदर्शन नांवाचे नियतकालिक सुरू केले या दोन्ही पत्रानी बंगाली वाङ्मयाची बरीच सेवा केली जुनी पिढी व पाश्चात्य शिक्षण

घेतलेली तरुण पिढी, यांच्या विचारसरणीत त्या वेळी जमीनअस्मानाचा फरक होता आपल्या पत्रातून नानाविध लेख व गोष्टी लिहून तो काढून टाकण्याचा प्रयत्न बंकिमबाबूंनी केला यानतर निघालेल्या मासिकानी "वंगदर्शना"ला आपलें आदर्श मानलें पंचवीस वर्षांपूर्वी डी एल् मित्र यांनी "भारतवर्ष" हें मासिक सुरू केलें

हल्ली निघणाऱ्या बगाली मासिकात "प्रवासी" हें फार जुनें व लोकप्रिय आहे याशिवाय "वसुमती", "विचित्रा", "वगश्री", "परिचय", वगैरे महत्त्वाचीं मासिकें आहेत हिंदी संपादकानीं चालविलेल्या इग्रजी मासिकांमध्यें "मॉडर्न रीव्ह्यू" व "कलकत्ता रीव्ह्यू" यांचा नंबर बराच वर लागतो त्याचप्रमाणें दैनिकात अमृतबझारपत्रिका हें वर्तमानपत्र फार जुनें असून फार लोकप्रिय आहे

# प्रकरण अकरावें

# कलकत्त्यांतील महाराष्ट्रीय संस्था

## १८९९ पासून १९२९ पर्यंतचा कलकत्त्याच्या " महाराष्ट्र समाज "चा इतिहास

[ श्री जनार्दन गोविंद रायकर याचे लेखावरून ]

१८९९ सनात कलकत्ता पाहून गेलेल्या मनुष्याला त्या शहरात पडलेलें जमीनअस्मानाचे अतर दिसून येईल त्याचप्रमाणें त्या वेळचा व आजचा महाराष्ट्रीय समाज यातही विलक्षण फरक पडलेला पाहून त्याला अचबा वाटेल दीर्घ कालनिद्रेंतून जागा झाल्यावर 'रिप व्हॅन विंकल' प्रमाणें त्याची स्थिति झाल्यास नवल नाही

सन १८९७–९८ चे सुमारास प्रथम मिलिटरी अकाऊटस् खात्यात थोडी मडळी पुण्याहून बदलून येथें आली प्रथमत ते भवानीपुरात व मागाहून " बहु " बाजारात राहात होते दूरदेशीं आल्यामुळें सर्व जण परस्परांच्या आश्रयाने एकाच घरात अखेरपर्यंत होते रामकृष्णपुर (हावडा) येथेंही ह्याच कचेरीत काम करणारे महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचे श्री शंकरराव पाटकर सहकुटुब राहात होते याचे वडीलही येथें पेन्शनर होते पुढें श्री शकररावांनी पेन्शन घेतल्यावर पितापुत्र जेव्हा समागमे पेन्शन घ्यावयास जात तेव्हा पुष्कळ लोकाना सकौतुक आश्चर्य वाटे हा क्रम काही वर्षेंपर्यंत चालला होता श्री पाटकराशिवाय पुण्याच्या काही लोकाना आठवतील असे त्या वेळचे सद्गुहस्थ म्हटले म्हणजे श्री रामचद्र दाजी ऊर्फ भाऊसाहेब मोघे, श्री रामभाऊ नेने, श्री दत्तोपत गाडगीळ वगैरे होत

याच सुमारास मुबईहून श्री आनदराव दीनानाथ माडगावकर येथें आले तेव्हापासून आतापर्यंत ते कापडाचा व्यापार करीत असून सांप्रतच्या महाराष्ट्रीय समाजात एक कर्ते पुरुष म्हणून गणले जात आहेत व्यापारांत दक्षिणी लोक अद्यापही मागेंच आहेत तीस वर्षांची गोष्ट तर बोलावयासच

नको अशा काळात व्यापारात पडण्याची त्यांची बुद्धि व कलकत्त्यासारख्या अगदी नवख्या ठिकाणीं तो सुरू करण्यातलें त्यांचें धाडस ही वाखाणण्यासारखीं आणि अनुकरणीय आहेत

रा ब बाळकृष्ण आत्माराम ऊर्फ भाईसाहेब गुप्ते हेही ह्या वेळीं येथील म्युझिअममध्यें क्यूरेटर होते पुढें ते अलीपूर येथें व्हिक्टोरिया मेमोरियलकरिता जो वस्तुसंग्रह तयार होता, त्यावर मुख्याधिकारी म्हणून "बेलव्हेडिअर"मध्यें राहात होते

१८९९ ह्या वर्षाच्या ऑक्टोबरात बंगाल-नागपूर रेल्वेची मुख्य कचेरी नागपुराहून निघून कलकत्त्यास आली त्या समयीं सुमारें २०० मराठी मंडळी येथें आली ज्यांनी पूर्वी व्यवस्था करून समागमें स्वयंपाकी ब्राह्मण, मोलकरीण वगैरे आणिली होती म्हणून एकत्र राहू शकले त्यांना कोणत्याही प्रकारें अडचण भासली नाही त्यांचा काल मोठ्या आनंदांत गेला इतरांचे अत्यंत हाल झाले वास्तविक आलेल्या मंडळीपेक्षा कितीतरी पटीनें अधिक यावयाची कारण आजवर नागपुरास कचेरी असल्याकारणानें मुख्य भरणा आपल्याच लोकांचा होता, पण आम्हांमध्यें स्वदेश सोडून जाण्यासंबंधीं जो स्वभावतः कंटाळा त्यामुळे कित्येकांनीं नोकऱ्या सोडल्या, पण कलकत्त्याला जाण्याला कबूल झाले नाहीत यात वैयक्तिक नुकसान तर झालेच पण समाजाच्या दृष्टीनेही अधिक नुकसान झाले कारण त्या मानानें दक्षिणी समाजाचे बळ मर्यादित झाले नोकरीला सोयीचे म्हणून ही मंडळी किदरपूर आणि गार्डनरिच या भागात राहू लागली

खरें पाहिलें तर कलकत्त्यात दक्षिणी मंडळी आम्ही येण्याच्या पूर्वी बऱ्याच वर्षांपासून राहात होती ही मंडळी प्राय काशी, बिहारकडून आली असल्यामुळे त्यांचा महाराष्ट्राशी संबंध तुटलेला तेव्हा मायदेशाकडे संकोशवृत्तीने बघणारे आणि महाराष्ट्राला तर त्यांच्या अस्तित्वाची जाणीवही नाही त्यामुळे आपलेकडील चळवळीशी ही मंडळी तटस्थच राहिली. त्यांच्यापैकी प्रस्तुत लेखकाच्या साक्षात् परिचयाचे असे कै वैद्यराज गंगाधरशास्त्री कर्वे व कै वेदमूर्ति विश्वनाथभट्ट पोहरे हे होत इतर मंडळी भिक्षुकवृत्तीची, जुन्या परंपरेंत वाढलेली, त्यामुळे नवीन आलेल्या व थोड्याफार सुधारलेल्या चालीरीतीनें वागणाऱ्या महाराष्ट्रीय समाजापासून ते जरा

दूरच राहात असत व अजूनही राहतात त्याच्यापैकीं काहीं मडळी साप्रत बगाल व बिहारमध्यें स्थायिक झाली असून पाठक व भट्ट हीं दोन घराणी तर मोठे जमीनदार म्हणून प्रसिद्ध आहेत मराठी भाषा सर्वांना वाचता येते बायकाच्यामुळे मोडकीतोडकी भाषा व कांहीं चालीरीती जीव धरून आहेत मुलाना मराठी भाषा शिकवावी लागते, पण त्याच्यातही आता भाषेविषयी तरी प्रेम वाटू लागलें आहे पुष्कळांकडे आपल्याकडची प्रमुख पत्रे, मासिकें नियमितपणें येतात असो

मात्र पुणें नागपूरकडून जी मडळी येथें आली ती आपल्याबरोबर महाराष्ट्रातल्या नव्या नव्या चळवळी व कल्पना घेऊन आली, इतकेंच नव्हे तर पुणेरी नागपुरी इत्यादि प्रातीय भेदभाव व भांडणेंही घेऊन आली असें म्हटल्यास अन्यथा होणार नाही

सन १९०० सालापासून कलकत्त्याला श्रीगजाननोत्सव होऊ लागला तो आतापर्यंत अखड चालू आहे पुष्कळ वर्षे एकच उत्सव होई परिस्थितीच्या मानानें आजला कलकत्त्यात चार उत्सव होऊं लागले आहेत दक्षिणी लोकाची वस्ती व कलकत्त्याची मांडणी लक्षांत घेतां हें ठीकच आहे, असें म्हटलें पाहिजे सुरुवातीची काही वर्षे कोणतीही अशी सस्था नव्हती दहा पाच मडळी खेळण्याच्या व शिळोप्याच्या गप्पा मारण्यासाठीं जमत त्यालाच पुढें "मराठा मडळ" असें नामाभिधान प्राप्त झाले घटनेचा पत्ता नव्हता तरी पण याच सस्थेचे रूपातर कांहीं कालानें "मराठा को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स" या नावाच्या सहकारी दुकानात झालें तें काही वर्षे चालून बंद पडलें

१९०५–६ साली वगभगानिमित्त स्वदेशी चळवळीची लाट सर्व देशभर उसळली त्या वेळी येथें "नॅशनल् मेडिकल कॉलेज" निघाले त्यात नागपूर-पुण्याकडून बरेच विद्यार्थी शिक्षणासाठीं आले त्यांनी शहरांत बहु बाजारात "मराठा लॉज" स्थापन केला तोच आतां "महाराष्ट्र लॉज" ह्या नांवानें श्री त्र्यंबक विठ्ठल जयवत ऊर्फ काका जयवत ह्यांच्या नेतृत्वाखाली नादत आहे हे आमचे कलकत्त्यातील "सार्वजनिक काका"च होत "महाराष्ट्र लॉजमध्ये' मुबईचे विद्यमान डॉ सावरकर, यवतमाळचे डॉ काणे, पुण्याचे डॉ पळसुले, नागपूरचे डॉ. हेडगेवार, इत्यादि मडळी होती.

ह्याच वेळीं वऱ्हाडमधील विद्यार्थ्यांनी "शांतिनिकेतन" व कर्नाटकातून आलेल्या विद्यार्थ्यांनी "कर्नाटक क्लब" हे स्थापन केले होते.

हा वेळपावेतों येथल्या मंडळींचा खास महाराष्ट्राशी फारसा संबंध येत नसे. पण स्वदेशी चळवळ व राष्ट्रीय सभा या निमित्तानी तिकडून लोक येऊ जाऊ लागले. तसेच वरिष्ठ कायदे-कौन्सिलमुळें नामदार गोखल्याच्या खेपा वरचेवर होऊ लागल्या. खुद्द कलकत्त्यात श्री. सखाराम गणेश देऊसकर म्हणून एक गृहस्थ असत. ते "हितवादी" ह्या बंगाली पत्राचे संपादक होते. त्या वेळी कै. सुरेंद्रनाथ बानर्जी ह्यांचा "बंगाली" इंग्रजीतून आणि देऊसकराचा "हितवादी" बंगाली भाषेतून जागृति उत्पन्न करीत होतां. महाराष्ट्रीयांना अभिमानाची व बंगाली लोकाना कौतुकाची गोष्ट ही कीं, श्री. देऊसकराचे लेख बंगाली मातृभाषा असलेल्या लेखकांप्रमाणें सरस वठत. सखाराम बाबूनी "देशेरकथा" ह्या नावाचें बंगालीत लिहिलेलें पुस्तक पुष्कळांना ठाऊक असेल. बंगाली लोकाना आपल्या प्राचीन वैभवाचें स्मरण एका मराठ्यानें करून द्यावें ही घटना अघटितच म्हणावयाची व तिचें महत्त्व पुस्तकाला जोडलेल्या प्रस्तावनेंत लोकमान्य टिळकांचे जीवश्चकंठश्च स्नेही "अमृतबझारपत्रिके"चे भूतपूर्व संपादक बाबू मोतीलाल घोष ह्यानी मान्य केलें आहे. हें पुस्तक व त्याचे "देश की बात" ह्या नावाने हिंदीत झालेलें भाषांतर अशीं दोन्ही पुस्तके लौकरच सरकारजमा झाली! सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर जे मतभेद उत्पन्न झाले त्यामुळें देऊसकराचा वर्तमानपत्राशी संबंध राहणें शक्य नव्हतें, म्हणून त्यांनी संपादकत्व सोडलें. त्यानंतर ते कलकत्त्यास राहिले, पण पुढें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांनी जो कलकत्त्याला एकदा रामराम ठोकला त्यानंतर त्यानी पुनरागमन केलें नाहीं. दुर्दैवाने काहीं दिवसानंतर त्यांचे अत्यंत कष्टमय स्थितीत देहावसान झालें! अशा थोर आणि विद्वान् सरस्वतिभक्ताचा एकाद्या अप्रसिद्ध अशा खेडेगांवी अंत व्हावा हा निर्घृण काळाचा पक्षपात नव्हे काय? "सखाराम बाबूनी आम्हाला फसविलें!" असे म्हणून सर्व बंगाली बंधुवर्ग त्या वेळीं हळहळला! ईश्वरेच्छा बलीयसी!

ह्यानंतर देऊसकराचे एक आप्त श्री. बाबूराव पराडकर आणि जावई श्री. लक्ष्मण नारायण गर्दे हेही प्रसिद्ध हिंदी साहित्यसेवक व प्रतिभा-

सपन्न लेखक म्हणून नादत होते साप्रत हे काशी येथें आज आणि " श्रीकृष्णसंदेश " या वृत्तपत्राचे संपादक आहेत

सरासरी १९१६ सालापर्यंत येथला महाराष्ट्रीय समाज थोडा सघटित, बराचसा विस्कळित व काही अशी निद्रित अवस्थेतच होता एवढ्या अवधीत किदरपुरास आणखी एकदोन सस्था निघाल्या प्रथम Love-tie Society (प्रेमबधन सस्था) ही परस्पर साहाय्याच्या तत्त्वावर काम करणारी सस्था निघाली हिचे सभासद फक्त दहा सस्थापक हेच असून त्यानी मासिक वर्गणी-च्या रूपाने काही भाडवल जमवून काही वर्षे कार्य केलें ह्या सस्थेचे मुख्य आधारस्तभ श्री व्यकटराव आठवले हे होते तदनतर ह्याच सस्थेला मर्यादित भाडवलाच्या ( Limited ) कंपनीचें स्वरूप देण्यात येऊन दुकान, पतपेढी वगैरे व्यवहार 'युनायटेड बँकिग आणि ट्रेडिंग सोसायटी, लिमिटेड' या नांवाने होऊ लागले हिचा व्यवहार सुरळीतपणे काही वर्षे चालून महाराष्ट्रातील अशा तऱ्हेच्या व्यापारी समाईक मडळचा ज्या कारणानी बुडतात त्याच कारणानीं हीही नामशेष झाली मध्यतरी म्हणजे १९१६ साली लखनौ येथें जहाल-मवाळ पक्षाची राष्ट्रीय सभा भरण्यापूर्वी श्री तात्यासाहेब केळकर हे हिंदुस्थानात लोकमत अजमावून पाहण्यासाठी फिरत असता त्याच्या प्रोत्साहनाने किदरपूर येथे " महाराष्ट्र क्लब " स्थापन झाला त्यानतर पाच सहा वर्षेपर्यंत ही सस्था चागलें काम करीत होती १९१७ साली राष्ट्रीय सभेच्या वेळीं व १९२० साली त्या सभेचे जें विशेष अधिवेशन झालें तेव्हा " महाराष्ट्र क्लबा "नें महाराष्ट्रीय प्रतिनिधींची जी यथाशक्ति सेवा केली ती अद्यापि पुष्कळाच्या स्मरणात असेल लोकमान्य टिळक, महात्मा गाधी, श्रीमत दादासाहेब खापर्डे, डॉ मुजे, न्यायमूर्ति सर नारायणराव चदावरकर याच्यासारखी देशातील सर्व पक्षाची मडळी ह्या सस्थेस वेळोवेळी भेट देऊन गेली आहेत नामदार गोखलेही एका विशेष प्रसगी किदरपुरास आले होते

ज्या सुमारास कालक्रमानें किदरपूरच्या मराठी माणसाची सख्या घटत होती, त्याच सुमारास भवानीपुरास नवी नवी मडळी भरू लागली. यात दिवाण व्ही पी माधवराव ह्याचे पुतणे रावबहादूर विनायकराव पाटणकर, पोस्टखात्यातले रावसाहेब लक्ष्मण पाडुरग कुलकर्णी, शिल्पकार करमरकर बंधु, कलकत्ता विश्वविद्यालयातले प्राचीन हिंदुस्थानच्या

इतिहासाचे अध्यापक डॉक्टर देवदत्तपंत भांडारकर, वनस्पतिशास्त्राचे अध्यापक डॉक्टर शंकरराव आघारकर, पूर्वबंगाल रेल्वेंतील एक अधिकारी श्री वामनराव भांडारकर, प्रसिद्ध चित्रकार परब, कोळशाचे व्यापारी श्री फणसळकर, पुराणवस्तुसंशोधन खात्यांतले श्री काशीनाथ नारायण दीक्षित, गव्हर्मेंट टॅनिंग इन्स्टिटयूटमधील रसायनशास्त्रातील संशोधक श्री भास्कर बळवंत ऊर्फ नानासाहेब ढवळे, श्री र रा देव ही मंडळी प्रमुख होत जाता जाता बॅरिस्टर एरुळकर ह्यांच्या नावाचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही बॅरिस्टरसाहेब जरी इस्रायल होते तरी ते व भवानीपुरातील महाराष्ट्रीय मंडळी इतकी एकरूप झाली होती की, त्यांना आपण कोण आहोंत ह्याचीही प्रसंगविशेषी स्मृति राहात नसे सध्या हे उद्योगानिमित्त विलायतेस गेलेले आहेत ह्याखेरीज आणखीही अगदी नवीन मंडळी भवानीपुरांत आली आहेत विस्तारभयास्तव नामनिर्देश करीत नाही, तरी त्यांनी क्षमा करावी

वर लिहिलेल्या संस्थांशिवाय 'आगाशे यांची सर्कस हीं खुद्द बंगालमध्ये नांदत होती बंगालच्या बाहेर किंबहुना चोवीस परगणा जिल्ह्याच्या बाहेर ती केव्हाही गेलेली नसल्यामुळें महाराष्ट्राला ह्या सर्कशीची माहिती नाही श्री आगाशे ह्यांनी इकडे चांगला नावलौकिक मिळविला होता बरीच वर्षे सर्कस सभाळल्यावर त्यांचा किदरपूर येथे प्रस्तुत लेखकाच्या बिऱ्हाडी अंत झाला त्याच्या पश्चात् पुढे लौकरच सर्कशीनेही राम म्हटलें

१९२१–२२ या सालापासून किदरपुरातील "महाराष्ट्र क्लब"त काही गैरसमज व मतभेद सुरू झाल्याने एकाच्या ऐवजी दोन गणपतिउत्सव होऊं लागले व पुढे क्लबापेक्षा जास्त कार्यक्षम आणि लोकमतानुवर्ति संस्था असावी ह्या हेतूनें आणि भवानीपूरच्या बाजूला मंडळी दिवसेंदिवस वाढू लागल्यामुळें "महाराष्ट्र मंडळ" निघाले याचे अगोदर वर्ष-दोन वर्षें याच नांवाची एक संस्था होती पण ती अल्पजीवि ठरली १९२४ साली जें मंडळ सुरू झालें तें मात्र सर्वांच्या सहानुभूतीने आजवर चांगल्या तऱ्हेने कार्य करीत आहे

त्या वेळच्या किदरपूरच्या समाजामध्यें श्री सोन्याबापु नगरकर, कॅशिअर हे एक थोर गृहस्थ होते याच्याकडे सबंध बंगाल-नागपूर रेल्वेच्या खजिन्याची ने-आण, हिशेब ठेवणें, पगार वाटणें, वगैरे कामें होतीं ह्यांच्या

आश्रयानें बरीच दक्षिणी मडळी कचेरींत होती पुढें ह्याच्या बधूकडे (श्री एकनाथपत) हें काम गेलें तें त्यानी आपल्या ह्यातीपर्यंत चालविलें हे कपनीचे ठेकेदार ( contractor ) म्हणून काम करीत होते त्याच्या मरणोत्तर ही सर्व व्यवस्था कपनीनें आपल्या ताब्यात घेतली आहे

किर्लोस्कर सगीत नाटक मडळीनेही कलकत्त्याला दोनदा भेट दिली होती बगालवर बुर्गी लोकाची ही एक निराळ्याच प्रकारची स्वारी म्हणावयाची ! पहिल्या खेपेच्या वेळी कपनीची चागली तयारी व सच असल्याकारणानें तिचे " कांटों मे फुल " वगैरे हिंदी खेळ लोकास फारच पसत पडले विशेषत मराठी सगीतानें व अभिनयाने प्रक्षक तल्लान होत आडबार। खेळ लागूनही मडळीला चागलेंच नाव व पैसे मिळाले स्थानिक कपन्यांना ह्यांच्यामुळें आंच लागू लागल्याकारणानें पुढे किर्लोस्कर कपनीला नाटकगृह मिळेना तेव्हा निरुपायानें कपनी नागपुरास परत गेली जाण्याच्या पूर्वी कपनीनें येथील दक्षिणी लोकासाठीं मानापमान नाटकाचा प्रयोग करून दाखविला बगालमध्यें मराठी नाटक व मराठी प्रेक्षक हा योग अपूर्व कोण म्हणणार नाहीं ? अगदी कपिलाषष्ठीचा योग ! नाटक करणार महाराष्ट्रातील अग्रणी किर्लोस्कर मडळी, नाटक नाटकाचार्य खाडिलकराचें लोकप्रिय मानापमान आणि प्रेक्षक मराठी नाटकासाठी हपापलेले कलकत्त्याचे महाराष्ट्रीय ! लोक अगदी झाडून बायकामुलासह उपस्थित, मग नाटकाला विलक्षण रग चढला असल्यास आश्चर्य कसलें ? श्री शंकरराव मुजुमदाराची धडाडी फारच थोड्या नाटक कंपन्याच्या चालकात दिसून येते मराठी नाटक कंपन्या आपल्या गायनपटुत्वानें आणि अभिनयकौशल्यानें येथल्या शौकिन लोकाना सहज तल्लीन करून सोडतील अशी खात्री वाटते महाराष्ट्र क्लबाने नाटक मडळीला येथें येण्यापूर्वी व आल्यावर आपलेपणाच्या नात्यानें यथाशक्ति साहाय्य केलें आणि त्याबद्दल श्री मुजुमदार यानी महाराष्ट्र क्लबाला उत्तेजनपूर्वक योग्य देणगी दिली

रेल्वेंतली मडळी हळूहळू घटत चालल्याचें वर सांगितलेंच आहे येथें बरींच वर्षे मोठी अधिकाराची जागा सभाळून परत गेलेल्या गृहस्थांपैकी पुण्यास अद्याप रावसाहेब केशवराव सोहोनी व रावसाहेब महिपतराव पदे हे ह्यात आहेत कै नारायणराव गाडगीळ म्हणून एक उत्साही गृहस्थ रेल्वेत

होते. ते येथें असेतोंपर्यंत मजुराच्या चळवळींत भाग घेत व बंगाल-नागपूर रेल्वेच्या लोकाचा जो ( Death Benefit Fund ) "मरणोत्तर साहाय्यक निधि" आहे त्याचे एक संस्थापक होते आजला ही संस्था चांगली नावारूपास आली असून तिचे हजारावर सभासद आहेत

भवानीपूर व खास शहर यात यानतर पुष्कळच मंडळी येऊ लागली व हा प्रवाह चालूच आहे दादाजी धाकजी आणि कपनी रगाचा व्यापार करीत असून तींत जाऊन येऊन दक्षिणी माणसें असतात मायर्स पपवाले श्री लिमये यानी गेली चार पांच वर्षे येथें कारभार करून चागला जम बसविला आहे कापडाचे व्यापारी श्री माडगावकर गेली पचवीस वर्षे यशस्वी धदा करीत असून सुशिक्षित व अशिक्षित व्यापारी यामधील अतर दाखवीत आहेत इलेक्ट्रिकल इंजिनियर, तागाच्या व कापडाच्या गिरण्यातून निरनिराळ्या कामावर अधिकारी म्हणून, रगाच्या कपन्यातून, कॅनव्हासर म्हणून, सेल्समन-विक्रयकार म्हणून, स्वतत्र धद्यासाठी, कॉलेजात व शाळात विद्यार्थी म्हणून कलकत्त्यास महाराष्ट्रीयांची सख्या वाढत आहे ही आनदाची गोष्ट आहे तीस वर्षांपूर्वी कलकत्त्यास जावयास नको म्हणून नोकरी सोडणारे लोक प्रस्तुत लेखकानें पाहिले आहेत आणि वाटेल त्या अडचणींना बाजूस सारून शिकण्यासाठी किंवा पोट भरण्यासाठीं येथें अनेक तरुण येतानाही तो आज पाहात आहे

ह्या तीस वर्षांच्या वृत्तान्तावरून दिसून येईल कीं, कलकत्त्यात महाराष्ट्रीयाच्या काहीं नाहीं तरी पांच सहा सस्था निघाल्या, पण त्यांतली एकही कार्यक्षम ठरून दुर्दैवानें दीर्घजीवि झाली नाही याला कारण आमच्या स्वभावांतील दोष असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें सस्था निघाली कीं तिला स्थापन करणारे लोक आपली मत्ता समजू लागतात हा आमचा फारच मोठा दोष होय सार्वजनिक सस्थेंत चार प्रकारचे लोक जमावयाचेच एकमेकांचें दोषाविष्करण करीत बसून दुसऱ्याच्या प्रत्येक कृत्याच्या मुळाशीं काही तरी स्वार्थी हेतु गृहीत धरणें ही घातुक चूक आम्ही वारवार करीत असतों मतभेद हा कोठे नसतो ? एकमेकाचें कोठें बिनसतें हें पाहण्यापेक्षां तें कोठे पटतें हें पाहण्याची सवय झाली तर आपल्यातील शेंकडा नव्याण्णव तटे नाहीसे होतील आणि समाजाची प्रगति जोरानें होईल मी शहाणा,

मी म्हणेन तेंच खरे, असा दुराग्रह सार्वजनिक सस्थांतून कसा चालेल ? वैयक्तिक मनातले कोनेकोपरे, काटेकुटे तडजोडीच्या धारेनें घासून-छाटून टाकल्यावर सर्वमान्य असा मार्ग सहज निघू शकतो, हें सार्वजनिक सस्था चालविणारानी सतत ध्यानी धरलें पाहिजे एकट्या व्यक्तीच्या लहरीवर चालणारी सस्था अल्पावकाशात कोसळून पडली तर नवल कसलें ? सार्व-जनिक सस्थांचा पाया जितका अधिक व्यापक तितकें त्याना चिरस्थायित्व अधिक लाभणार हें उघड आहे

शेवटी महाराष्ट्रीयाच्या स्वभावातला आणखी एक दोष सागून वाच-कांचा निरोप घेतों कारण त्याच्यावर समाजाची प्रगति पुष्कळशी अवलबून आहे असें वाटते रेल्वेखात्यांत जेथें तीस वर्षांपूर्वी दोनशें माणसें होतीं तेथें आज आमच्यातील पचवीस तीस माणसेंही असू नयेत ? त्या वेळच्या मंडळीत काहीं वजनदार महाराष्ट्रीय अधिकारी होते पण कोणीही आपापली माणसे आणून नवीन विशेष म्हणण्यासारखी भरती केली नाहीं मिलिटरी अकाऊंटस् खात्यात हीच कथा आज तर त्या खात्यात एकही मराठी मनुष्य नाही-पुण्याला मात्र कित्येक बगाली व मद्रासी आढळतील

मनुष्यस्वभावाप्रमाणें देशातील आणि प्रातातील माणसांत कमी अधिक मानाने ही स्वकीयाची सोय करण्याची प्रवृत्ति दिसून येते मद्रासी लोकाचा हा स्वभाव तर ठिकठिकाणच्या लोकांना जाणवू लागला आहे पण आम्ही मराठी माणसें भलतीच भिडस्त स्वभावाची व निस्पृही या स्वभावा-च्या अगाचें खरें दिग्दर्शन तुसडेपणा या शब्दानेंच होईल अन्यप्रातीयांमध्यें स्वजातीय माणूस आपलेकडे खेचून घेण्याची प्रवृत्ति तर दक्षिणी माणसात आपला माणूस दूर लोटण्याकडे कल याचा परिणाम आपण पाहात आहोतच दरएक खात्यात व [illegible] महाराष्ट्रीय मागे मागें पडत आहेत

पण निराश होण्याचें कारण नाहीं काळ बदलत चालला आहे आमचे दोष आम्हाला पटले असून ते दूर करण्याचे प्रयत्नही दिवसेंदिवस वाढत आहेत महाराष्ट्रांत व बाहेर अनेक सस्था निघत आहेत व त्यातून नवजीवन सपादलेले दिसत आहे अपयशातूनच यश निघतें पुष्कळ सस्था कलकत्यास निघून नामशेष झाल्या, पण त्याच्या मागून निघालेलें " महा-राष्ट्र मंडळ " अल्प कालांतच केवढी कामगिरी बजावीत आहे ! चार पाच

वर्षांच्या काळांतच बाळसेदार होऊन स्वतःची इमारत बांधण्यापर्यंत मजल गाठणें ही काय लहान कामगिरी झाली ? परमेश्वर करो आणि ही संस्था चिरायु होवो बृहन्महाराष्ट्रानेंही या संस्थेकडे कूर्मदृष्टीनें न्याहाळून पाहावें अशी लेखकाची सविनय प्रार्थना आहे इत्यलम्

## महाराष्ट्र मंडळ, ८५।१।१ बेलताला रोड

बेंगॉल नागपूर रेल्वेची कचेरी कलकत्ता येथे सुमारें १९०० सालीं आली यापूर्वी महाराष्ट्रीय लोक कलकत्त्याच्या बाजूस क्वचितच येत असत रेल्वेची कचेरी येथें आली त्या वेळीं पुष्कळ महाराष्ट्रीय कुटुंबें येथें आलीं व त्यातली काही अद्यापि येथें नांदत आहेत गेल्या वीस वर्षांत सरकारी अगर खाजगी नोकरी किंवा स्वतंत्र धंद्याच्या निमित्तानें बरेच महाराष्ट्रीय येथें आले आहेत बायका मुलें धरून सुमारें सहाशें महाराष्ट्रीय कलकत्त्यांत आहेत असा अंदाज आहे

महाराष्ट्र मंडळ या नावाची एक संस्था १९२० च्या सुमारास निघाली होती. पण ती अल्पजीवि ठरली मंडळ मोडलें तरी श्रीगणेशोत्सव होतच असे १९२४ च्या उत्सवांत विचारविनिमय होऊन एकादी मध्यवर्ती संस्था असल्याशिवाय परस्पर दळणवळण, नवीन ओळखी, व आल्यागेल्याची सोय होणें शक्य नाही असें ठरलें व मंडळी अशी संस्था काढण्याच्या उद्योगाला लागली सध्याच्या महाराष्ट्र मंडळाची स्थापना शके १८४६ च्या (सन १९२४) दिवाळीत पाडव्याच्या सुमुहूर्तावर झाली पहिल्या वर्षाचे अध्यक्ष या सालचे बृहन्महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष दिवाणबहादूर लक्ष्मणराव कुलकर्णीच होते हा एक सुयोग आहे मंडळ स्थापन झालें त्या वेळी पटावर ४५ सभासद होते व वार्षिक वर्गणीचे उत्पन्न रु १७८० झालें आज पटावर सुमारें १४० सभासद व वार्षिक उत्पन्न रु १८०० आहे

मंडळ स्थापन झाल्यानंतर एक वर्षाच्या आंतच काहीं उत्साही सभासदांनी स्वतःची पुस्तकें देऊन मंडळाचें पुस्तकालय सुरू केलें. पहिल्या वर्षी पुस्तकांची संख्या ४४० होती हल्लीं वाचनालयात दोन हजारांवर पुस्तकें आहेत पूर्वी महाराष्ट्र मंडळ व महाराष्ट्र भगिनी समाज यांची वेगवेगळीं वाचनालयें व ग्रंथालयें होती यामुळें बऱ्याच पुस्तकाच्या दोन दोन प्रती

मी म्हणेन तेच खरे, असा दुराग्रह सार्वजनिक संस्थातून कसा चालेल ? वैयक्तिक मनातले कोनेकोपरे, काटेकुटे तडजोडीच्या धारेनें घासून-छाटून टाकल्यावर सर्वमान्य असा मार्ग सहज निघू शकतो, हें सार्वजनिक संस्था चालविणारानीं सतत ध्यानी धरलें पाहिजे एकट्या व्यक्तीच्या लहरीवर चालणारी संस्था अल्पावकाशात कोसळून पडली तर नवल कसलें ? सार्वजनिक संस्थाचा पाया जितका अधिक व्यापक तितकें त्याना चिरस्थायित्व अधिक लाभणार हे उघड आहे

शेवटी महाराष्ट्रीयाच्या स्वभावांतला आणखी एक दोष सागून वाचकाचा निरोप घेतों कारण त्याच्यावर समाजाची प्रगति पुष्कळशी अवलबून आहे असें वाटतें रेल्वेखात्यांत जेथें तीस वर्षांपूर्वी दोनशें माणसें होतीं तेथें आज आमच्यातील पचवीस तीस माणसेंही असू नयेत ? त्या वेळच्या मडळींत काहीं वजनदार महाराष्ट्रीय अधिकारी होते पण कोणींही आपापली माणसे आणून नवीन विशेष म्हणण्यासारखी भरती केली नाही मिलिटरी अकाऊंटस् खात्यात हीच कथा आज तर त्या खात्यात एकही मराठी मनुष्य नाहीं. पुण्याला मात्र कित्येक बगाली व मद्रासी आढळतील

मनुष्यस्वभावाप्रमाणें देशातील आणि प्रातातील माणसात कमी अधिक मानाने ही स्वकीयांची सोय करण्याची प्रवृत्ति दिसून येते मद्रासी लोकाचा हा स्वभाव तर ठिकठिकाणच्या लोकाना जाणवू लागला आहे पण आम्ही मराठी माणसें भलतींच भिडस्त स्वभावाचीं व निस्पृही या स्वभावाच्या अगाचें खरें दिग्दर्शन तुसडेपणा या शब्दानेंच होईल अन्यप्रातीयांमध्यें स्वजातीय माणूस आपलेकडे खेंचून घेण्याची प्रवृत्ति तर दक्षिणी माणसात आपला माणूस दूर लोटण्यांकडे कल याचा परिणाम आपण पाहात आहोंतच. दरएक खात्यात व दरएक ठिकाणी महाराष्ट्रीय मागें मागें पडत आहेत

पण निराश होण्याचें कारण नाहीं काळ बदलत चालला आहे आमचे दोष आम्हाला पटले असून ते दूर करण्याचे प्रयत्नही दिवसेंदिवस वाढत आहेत महाराष्ट्रात व बाहेर अनेक संस्था निघत आहेत व त्यातून नवजीवन संपादलेलें दिसत आहे अपयशांतूनच यश निघतें पुष्कळ संस्था कलकत्त्यास निघून नामशेष झाल्या, पण त्याच्या मागून निघालेले "महाराष्ट्र मंडळ" अल्प कालातच केवढी कामगिरी बजावीत आहे ! चार पाच

वर्षांच्या काळातच बाळसेदार होऊन स्वत:ची इमारत बांधण्यापर्यंत मजल गाठणें ही काय लहान कामगिरी झाली? परमेश्वर करो आणि ही संस्था चिरायु होवो. बृहन्महाराष्ट्रानेंही या संस्थेकडे कूर्मदृष्टीनें न्याहाळून पाहावें अशी लेखकाची सविनय प्रार्थना आहे. इत्यलम्.

## महाराष्ट्र मंडळ, ८५।१।१ बेलताला रोड

बेंगॉल नागपूर रेल्वेची कचेरी कलकत्ता येथें सुमारे १९०० सालीं आली. यापूर्वी महाराष्ट्रीय लोक कलकत्त्याच्या बाजूस क्वचितच येत असत. रेल्वेची कचेरी येथें आली त्या वेळी पुष्कळ महाराष्ट्रीय कुटुंबें येथें आली व त्यातलीं कांही अद्यापि येथें नांदत आहेत. गेल्या वीस वर्षांत सरकारी अगर खाजगी नोकरी किंवा स्वतंत्र धंद्याच्या निमित्तानें बरेच महाराष्ट्रीय येथें आले आहेत. बायका मुलें धरून सुमारें सहाशें महाराष्ट्रीय कलकत्त्यांत आहेत असा अंदाज आहे.

महाराष्ट्र मंडळ या नांवाची एक संस्था १९२० च्या सुमारास निघाली होती. पण ती अल्पजीवि ठरली. मंडळ मोडलें तरी श्रीगणेशोत्सव होतच असे. १९२४ च्या उत्सवांत विचारविनिमय होऊन एकादी मध्यवर्ती संस्था असल्याशिवाय परस्पर दळणवळण, नवीन ओळखी, व आल्यागेल्याची सोय होणें शक्य नाहीं असें ठरलें व मंडळी अशी संस्था काढण्याच्या उद्योगाला लागली. सध्याच्या महाराष्ट्र मंडळाची स्थापना शके १८४६ च्या (सन १९२४) दिवाळींत पाडव्याच्या सुमुहूर्तावर झाली. पहिल्या वर्षाचे अध्यक्ष या सालचे बृहन्महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष दिवाणबहादूर लक्ष्मणराव कुलकर्णीच होते हा एक सुयोग आहे. मंडळ स्थापन झालें त्या वेळी पटावर ४५ सभासद होते व वार्षिक वर्गणीचें उत्पन्न रु. १७८० झालें. आज पटावर सुमारें १८० सभासद व वार्षिक उत्पन्न रु. १८०० आहे.

मंडळ स्थापन झाल्यानंतर एक वर्षाच्या आंतच कांहीं उत्साही सभासदांनी स्वत:ची पुस्तकें देऊन मंडळाचें पुस्तकालय सुरू केलें. पहिल्या वर्षी पुस्तकांची संख्या ४४० होती. हल्लीं वाचनालयांत दोन हजारांवर पुस्तकें आहेत. पूर्वी महाराष्ट्र मंडळ व महाराष्ट्र भगिनी समाज यांची वेगवेगळीं वाचनालयें व ग्रंथालयें होतीं. यामुळें बऱ्याच पुस्तकांच्या दोन दोन प्रती

घ्याव्या लागून व्यर्थ खर्च होत असे तो वाचवून ग्रंथालय व वाचनालय जास्त चांगलें व उपयुक्त करण्यासाठी दोन्ही संस्थाचीं ग्रंथालयें एकत्र केलीं आहेत त्याची व्यवस्था महाराष्ट्र मंडळ, महाराष्ट्र भगिनी समाज व महाराष्ट्र निवास यांच्या प्रतिनिधींमार्फत होत असते आता पूर्वीपेक्षा जास्त पुस्तकें व नियतकालिके आणतां येऊन सर्वांस त्याचा फार उपयोग होऊं लागला आहे ग्रंथालयाचा खर्च या तीनही संस्थाकडून मिळणाऱ्या वर्गणीतून होतो

मंडळाचे सभासद सत्तर ऐशींच व खर्चाचे मानाने उत्पन्न बेताचेंच तरी मंडळ स्थापन करणाऱ्या सभासदाचा उत्साह व काम करण्याची चिकाटी असामान्य होती भाड्यानें घेतलेली जागा गैरसोयीची व भाडें फार अशा परिस्थितींत महाराष्ट्रीयांची स्वतःची इमारत असल्याशिवाय मंडळाचे सर्व उद्देश साधणे शक्य नाही, तरी महाराष्ट्रीयांची स्वतःची इमारत बांधावयाची असा संकल्प पहिल्याच वर्षी झाला दोन तीन वर्षांत सभासदांनी दहा हजार रुपयाचे आकडे जमविले सन १९२९ साली जागा घेतली व सन १९३१ साली महाराष्ट्र निवास निधि मंडळाने बांधलेली महाराष्ट्र निवास ही इमारत पुरी झाली या इमारतीत मंडळ तारीख १ मार्च, १९३१ पासून आलें महाराष्ट्र मंडळ व महाराष्ट्र निवास या संस्था अगदी भिन्न असल्या तरी निवास बांधण्याची कल्पना मंडळाची व मंडळानें निवास बांधण्याचे काम स्वतःचा प्रयत्न व लोकाश्रय याच्या जोरावर पार पाडलें

महाराष्ट्र मंडळाचे उद्देश स्थानिक महाराष्ट्रीयाचें दळणवळण व संघटन वाढविणे, महाराष्ट्र संस्कृति व परंपरा याचा प्रचार करणें, व इकडे येणाऱ्या जाणाऱ्या महाराष्ट्रीयाचा परामर्श घेणें हे आहेत पहिल्या दोन उद्देशास अनुसरून महाराष्ट्रात पाळले जाणारे सण व उत्सव साजरे केले जातात श्रीगणेशोत्सव तर मोठ्या थाटानें दहा दिवस साजरा केला जातो ऐतिहासिक विभूतींच्या पुण्यतिथी पाळल्या जातात व मधून मधून गाणें, कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, व भोजन वगैरे कार्यक्रम केले जातात कलकत्यास येणाऱ्या प्रमुख व्यक्तींचा सत्कार मंडळ करतें पाहुण्याची जेवणाखाण्याची व राहण्याची सोय करण्याचे काम आतां निवासाने अंगावर घेतलें आहे

महाराष्ट्रीयाच्या सोयीकरिता तीन वर्षांपूर्वी मंडळाच्या विद्यमाने सहकारी तत्त्वावर एक दुकान (स्टोअर्स) काढण्यात आलें या दुकानाचें

सर्व भाडवल सभासदाचें आहे दुकानात महाराष्ट्रीयाना लागणारा पण कलकत्त्यांत सहज न मिळणारा माल पुरविण्याची व्यवस्था केली आहे दुकानाची आर्थिक स्थिति चागली आहे सालिना सोळा सतरा हजाराचा व्यवहार दुकानात होतो

१९३७ च्या फेब्रुवारी महिन्यात एक प्राथमिक शाळा सुरू करण्यात आली गेल्या वर्षी या शाळेस कै आनदराव माडगावकर याचें नाव दिलें आहे शाळेची व्यवस्था एका कमिटीकडे आहे

सभासदाच्या करमणुकीकरिता पत्ते, पिंगपाँग व बॅडमिटन खेळण्याची सोय आहे या सोयीचा फायदा घेण्याकरितां स्त्रिया, पुरुष व मुलें मिळून तीस चाळीस माणसें साधारणत- रोज मडळाच्या जागेंत जमतात

मडळाची सांपत्तिक स्थिति समाधानकारक आहे मडळाची गगाजळी दोन हजारावर आहे ऐपतीप्रमाणें मंडळ निरनिराळ्या लोकोपयोगी सस्थाना वेळोवेळी मदत करते

## महाराष्ट्र भगिनी समाज, ८५।१।१ बेलताला रोड

इ स १९२५ साली काही भगिनींच्या सूचनेवरून महाराष्ट्र स्त्रीसमाज काढण्याची कल्पना कै आनदराव माडगांवकर, रा वैद्य व रा कोतवाल यांनी महाराष्ट्र मडळाचे तत्कालीन अध्यक्ष रावसाहेब ल पां कुलकर्णी याचेपुढें माडली व ती त्याना पसत पडली पुढें ता १८ जून, १९२५ रोजीं देशबधु चित्तरजन दास याची स्मशानयात्रा पाहण्यासाठी बऱ्याच स्त्रिया महाराष्ट्र मडळात जमल्या होत्या या प्रसंगी स्त्रीसमाज काढण्याचे बाबतीत बरीच चर्चा झाली व सौ इदिराबाई कोतवाल आणि सौ पार्वतीबाई आघारकर याच्या सहचानीं सर्व स्त्रियास ता १२ जुलै रोजी सौ पार्वतीबाई आघारकर यांचे घरी येण्यास आमत्रण देण्यात आलें याप्रमाणें महाराष्ट्र भगिनी समाजाची सुरुवात १२ जुलै, १९२५ रोजीं झाली सौ. आघारकर यांचे घर एका बाजूस असल्यानें किदरपूर येथे राहणाऱ्या महाराष्ट्र भगिनींना तेथें येणें गैरसोयीचें पडू लागलें. म्हणून रा ढवळे याचे घरीं दर रविवारीं दुपारीं ४ ते ६ जमण्याचें निश्चित झालें याप्रमाणें काही आठवडे चाललें, परतु बऱ्याच भगिनींना रविवारचा दिवस सुटीचा असल्यानें समाजात येण्यास

जमेना म्हणून दिवस व ठिकाण बदलण्याचें ठरलें ता २१ ऑगस्ट, १९२५ रोजीं (शुक्रवारी) रा माडगावकर यांचे घरीं स्त्रिया जमल्या सर्वांना हें ठिकाण आवडलें व दर शुक्रवारी महाराष्ट्र भगिनींनीं येथें जमावें असें ठरलें. याच दिवशी सौ सरलाबाई वैद्य यांचे सूचनेवरून या समाजाला "महाराष्ट्र भगिनी समाज" असें नाव देण्यात आलें, व वर्गणीचे दर १ रुपया, ८ आणे व ४ आणे निश्चित केले

समाजाच्या सुरुवातीस फक्त २४ सभासद होते पुढें १९२९ सालीं ही संख्या ५१ झाली कै रा माडगावकर याच्या घराभोवती चागले प्रशस्त आवार असल्याने बॅडमिंटनसारखे व्यायामाचे खेळ भगिनीना खेळण्यास मिळत असत माडगावकर मंडळी बाहेरगावी गेल्यानें काही महिने समाजाच्या बैठकी रा का ना दीक्षित याचे घरी भरू लागल्या परतु ही मडळी परत आल्यावर समाज पुन्हा त्याचेकडे आणिला समाजाच्या बाल्यावस्थेंत त्याच्या उन्नतीसाठी श्री सीताबाई माडगावकर व सौ पार्वतीबाई आधारकर यानी फार झीज सोसली १९३० साली महाराष्ट्र निवासाची इमारत बाधल्यानतर समाज निवासांत नेण्यात आला

बऱ्याच भगिनींनी आपलीं पुस्तकें दिल्यानें समाजाचे एक लहानसे पुस्तकालय सुरू झाले १९२९ सालीं या पुस्तकालयांत २०० पुस्तकें होतीं पुढें १९३३ साली महाराष्ट्र मडळ, महाराष्ट्र भगिनी समाज व महाराष्ट्र निवास याचे साहाय्याने एका स्वतत्र पुस्तकालयाची व वाचनालयाची नवीन व्यवस्था करण्यात आली या व्यवस्थेप्रमाणें भगिनी समाजाने आपली पुस्तकें नवीन पुस्तकालयाला देऊन टाकली महाराष्ट्र सस्कृति कायम राहावी म्हणून स्त्रियाचे महत्त्वाचे सण साजरे करण्यात येतात त्याचप्रमाणे महाराष्ट्रांतील लोकोत्तर व्यक्तींच्या पुण्यतिथी पण समाजांत पाळतात आसाम व पूर्वबंगालमध्यें अतिवृष्टीमुळे जो दुष्काळ पडला त्या वेळी व बिहारच्या धरणीकपाच्या बिकट प्रसंगीं भगिनी समाजानें जुने कपडे गोळा करून व नवे शिवून पाठवून निराश्रिताना फारच मदत केली हल्ली समाजाचे सभासद जवळजवळ १०० असून वार्षिक उत्पन्न ५०० रुपये आहे बॅडमिंटनचे खेळात बऱ्याच भगिनी उत्साहाने भाग घेतात गेल्या तीन वर्षांपासून वसंतगौरीचे वेळी

समाजात स्त्रियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन भरतें समाजाच्या गंगाजळींत जवळजवळ ८०० रुपये आहेत

## माडगांवकर मराठी शाळा, ८५।१।१ वेलताला रोड

कलकत्ता येथें मराठी प्राथमिक शाळा असावी असें मधून मधून पुष्कळांस वाटे परंतु येथील महाराष्ट्रीय समाज लहान व शाळेंत येणारीं मुलें देखील थोडीं असल्यानें शाळा स्थापन केली तरी कायम टिकेल की काय, तसेंच शाळा चालविण्यासाठी लागणारा खर्च आपणास झेपेल किंवा नाहीं, इत्यादि गोष्टींचा विचार करून पद्धतशीर प्रयत्न १९३६ सालापर्यंत झालेच नव्हते या साली रा दामोदरपंत शेजवलकर यानी कलकत्ता येथील मुलाच्या पालकांना भेटून त्याची संमति घेऊन महाराष्ट्र मंडळ, भगिनी समाज व महाराष्ट्र निवास या तिन्ही संस्थाच्या साहाय्यानें शाळा चालवावी असा प्रयत्न केला व तो यशस्वी होऊन ता १ जानेवारी,१९३७ पासून शाळा सुरू करावी असा विचार होता मध्यंतरी २६ डिसेंबर, १९३६ रोजी झालेल्या कै आनंदराव माडगांवकर याच्या अकाली निधनानें शाळेचा विचार थोडा मागें पडला त्यानंतर ता १ मार्च, १९३७ पासून येथील भगिनी समाजानें आपल्या स्वत च्या जबाबदारीवर शाळा दोन महिने सुरळितपणे चालविली पुढें शाळा मेमध्यें उन्हाळ्याच्या सुटीनिमित्त बंद झाली या वेळेस असें ठरलें कीं सुटीनंतर तिन्ही संस्थाच्या प्रातिनिधिक कमेटीनें शाळा चालवावी याप्रमाणें जून, १९३७ पासून शाळा कमिटीच्या विद्यमानें चालत आहे शाळा मराठी इन्फंट वर्गापासून चौथीपर्यंत असावयाची आहे परंतु हल्ली इन्फंट ते सहावी पावेतोचे वर्ग शिकविले जातात शिक्षण मुंबईच्या अभ्यासक्रमाप्रमाणे सुरू आहे शिवाय डायरेक्ट पद्धतीनें थोडेंसे इंग्रजी व हिंदी मुलांना शिकविलें जातें व्यायाम म्हणून कवायतीचें शिक्षण, गायन, शिवणकाम, वगैरे शिकविण्यात येतें. सुरुवातीला एकूण आठ मुलें शाळेंत आली नोव्हेंबर, १९३७ मध्यें मुलाची संख्या वीसपर्यंत वाढली आजतागायत मुलाची संख्या चौतीस आहे त्यापैकी मुलींची संख्या जास्त आहे

शाळेची वेळ सकाळीं ११ ते दुपारीं ४ असून शनिवारी व रविवारी सुटी दिली जाते इतर सणांच्या सुट्या दिल्या जातात उन्हाळ्याची सुटी

एक महिना दिली जाते मार्च व एप्रिल, १९३७ मध्यें ही शाळा भगिनी समाजातील काही सभासदांनीं विनावेतन चालविली पुढें शाळा कमेटीकडे गेल्यानतर जून, १९३७ पासून दरमहा रु ३० पगारावर एका मुख्य अध्यापिकेची नेमणूक करण्यात आली

त्याशिवाय दोन भगिनी विनावेतन शिक्षकिणीचें काम करीत आहेत मुलांची सख्या दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें आणखी निदान एक किंवा दोन शिक्षकिणी लौकरच नेमाव्या लागतील महाराष्ट्र मंडळ व महाराष्ट्र निवास या दोन्ही सस्थांकडून मिळणारी देणगी, फीचें उत्पन्न व इतर देणग्या यातून शाळेचा खर्च भागविण्यात येतो शाळेचा खर्च सालिना सुमारे हजार रुपयांपर्यंत आहे शाळेचे वर्ग सध्यां महाराष्ट्र मडळाच्या दिवाणखान्यांत भरविले जातात

ता २६ फेब्रुवारी, १९३८ रोजी कै आनदराव माडगावकर याचे स्मरणार्थ शाळेचें नाव "माडगांवकर मराठी शाळा" असें ठेवण्यात आलें शाळा कमिटीची घटना खालीलप्रमाणें आहे महाराष्ट्र मडळ व भगिनी समाज याचे अध्यक्ष (अधिकारपरत्वें), महाराष्ट्र मडळ, भगिनी समाज व महाराष्ट्र निवास यानी नेमून दिलेला प्रत्येकी एक सभासद व या कमेटीनें नेमून घेतलेले दोन सभासद अशा एकदर सात सभासदाची ही कमिटी आहे कमिटीनें आपणामधून अध्यक्ष, खजिनदार व चिटणीस नेमावयाचे आहेत कमिटीची सभा दर महिन्यास होत असते

## महाराष्ट्र इडस्ट्रियल असोसिएशन, १२ बी।६ इंद्रॉय रोड

बगलोरास असताना श्री दातार व त्याचे काहीं मित्र यानीं थोडा द्रव्यनिधि जमवून "म्हैसूर सायटिफिक इडस्ट्रियल इन्स्ट्रुमेंट सिंडिकेट" स्थापन केलें व व्हॉर्निश करण्याचे प्राथमिक प्रयोग करून तयार झालेला माल बाजारात पाठविण्यास सुरुवात केली आज ती सस्था उत्तम चालली आहे अशा प्रकारची एकादी संस्था आपण सुरू करावी अशी कल्पना श्री दातार यानी आपल्या मित्रमडळीपुढें मांडली या कल्पनेची चर्चा करण्याकरिता श्री साने याचे घरीं ता ३० मे, १९३७ रोजीं सायकाळी पहिली बैठक झाली पुढे दोन तीन बैठकीत कार्याची रूपरेषा आंखून "महाराष्ट्र इडस्ट्रियल असोसिएशन" ही

एक महिना दिली जाते मार्च व एप्रिल, १९३७ मध्ये ही शाळा भगिनी समाजातील कांही सभासदानीं विनावेतन चालविली पुढें शाळा कमेटीकडे गेल्यानतर जून, १९३७ पासून दरमहा रु ३० पगारावर एका मुख्य अध्यापिकेची नेमणूक करण्यात आली

त्याशिवाय दोन भगिनी विनावेतन शिक्षकिणीचें काम करीत आहेत मुलाची सख्या दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें आणखी निदान एक किंवा दोन शिक्षकिणी लौकरच नेमाव्या लागतील महाराष्ट्र मडळ व महाराष्ट्र निवास या दोन्ही सस्थाकडून मिळणारी देणगी, फीचें उत्पन्न वे इतर देणग्या यातून शाळेचा खर्च भागविण्यात येतो शाळेचा खर्च सालिना सुमारें हजार रुपयापर्यंत आहे शाळेचे वर्ग सध्या महाराष्ट्र मडळाच्या दिवाणखान्यात भरविले जातात

ता २६ फेब्रुवारी, १९३८ रोजीं कै आनदराव माडगांवकर याचे स्मरणार्थ शाळेचे नाव "माडगावकर मराठी शाळा" असे ठेवण्यात आले. शाळा कमिटीची घटना खालीलप्रमाणें आहे महाराष्ट्र मडळ व भगिनी समाज याचे अध्यक्ष (अधिकारपरत्वें), महाराष्ट्र मडळ, भगिनी समाज व महाराष्ट्र निवास यानी नेमून दिलेला प्रत्येकी एक सभासद व या कमेटीनें नेमून घेतलेले दोन सभासद अशा एकदर सात सभासदाची ही कमिटी आहे कमिटीनें आपणामधून अध्यक्ष, खजिनदार व चिटणीस नेमावयाचे आहेत कमिटीची सभा दर महिन्यास होत असते

## महाराष्ट्र इडस्ट्रियल असोसिएशन, १२ बी।६ इंद्ररॉय रोड

बगलोरास असताना श्री दातार व त्याचे काही मित्र यानीं थोडा द्रव्यनिधि जमवून "म्हैसूर सायटिफिक इडस्ट्रियल इन्स्ट्रुमेंट सिंडिकेट" स्थापन केलें व व्हॉनिश करण्याचे प्राथमिक प्रयोग करून तयार झालेला माल बाजारात पाठविण्यास सुरवात केली आज ती सस्था उत्तम चालली आहे अशा प्रकारची एकादी सस्था आपण सुरु करावी अशी कल्पना श्री दातार यानी आपल्या मित्रमडळीपुढें माडली या कल्पनेची चर्चा करण्याकरिता श्री साने याचे घरी ता ३० मे, १९३७ रोजीं सायकाळी पहिली बैठक झाली पुढे दोन तीन बैठकीत कार्याची रूपरेषा आखून "महाराष्ट्र इंडस्ट्रियल असोसिएशन" ही

सभासद

(५) श्री प्रभाकर बाळकृष्ण सोनक, मिलिटरी इंजिनियरिंग सर्व्हिस, काशीपूर, कलकत्ता

(६) श्री लक्ष्मण नारायण साने, ब्रँच सेक्रेटरी, कॉमनवेल्थ इन्शुअरन्स कंपनी, मद्रास

(७) श्री विनायक जनार्दन भट, सुताचे व्यापारी, कटक

(८) श्री एकनाथ रघुनाथ मराठे, कार्डिंग मास्तर, बंगलक्ष्मी कॉटन मिल्स्, श्रीरामपूर, कलकत्ता

(९) कै केवलचंद नंदराम चव्हाण, मालक, कलकत्ता फास्ट डाय वर्क्स (इ स १९३८ साली वारले)

(१०) श्री वसंत बापूराव चितळे, असिस्टंट जी मॅकेंझी कंपनी, कलकत्ता

(११) श्री द्वारकानाथ विष्णु गोगटे, केमिकल असिस्टंट, गव्हर्मेंट टेस्ट हाऊस अलीपूर, कलकत्ता

## महाराष्ट्र निवास

मनुष्यप्राणी जात्या प्रगमनशील नसल्यानें आपल्यापाशी असेल तें राखण्याकरितां गट करण्याच्या खटपटींत असतो, व परिस्थितीनें त्याला एका गटातून दुसऱ्या गटात टाकलें तरी तेथे आपलेपणा कसा राहील याचा विचार तो करतो या आपलेपणात विशेषेकरून त्याचे आचारविचार व त्याचेकडे आलेले पूर्वापार संस्कार याचा समावेश होतो रोजच्या चरितार्थाकरिता करावें लागणारें काम करून फावल्या वेळात या द्वयींची जोपासना करणें आपलें कर्तव्य समजून त्याकरितां जरूर असणारी साधनें मिळविण्याच्या खटपटीस तो लागतो पहिले साधन म्हणजे आपलीच परंपरा व संस्कृति असणाऱ्या स्थानिक लोकामध्यें दळणवळण उत्पन्न करून त्याचें संघटन करणें, व दुसरें म्हणजे आपल्याहून भिन्न परंपरा व संस्कृति असणाऱ्या आपल्या सभोंवतालच्या लोकाना आपली परंपरा व संस्कृति यांची

माहिती करून देऊन त्याच्यांत त्याबद्दल सहानुभूति उत्पन्न करणें या दोन कारणांकरिताच परदेशांत स्थापन केल्या जाणाऱ्या समाजांपैकींच सध्याचा कलकत्त्याचा "महाराष्ट्र मंडळ" हा समाज होय.

हें "महाराष्ट्र मंडळ" १९२४ सालीं विजयादशमीच्या सुमुहूर्तावर स्थापन होऊन असल्या सार्वजनिक संस्थाचे जे दोन हेतु---(१) स्थानिक महाराष्ट्रीयांमध्यें दळणवळण व संघटन व (२) महाराष्ट्रीय संस्कृति व परंपरा यांचा प्रसार—ते साधण्यावरच न थांबता विशिष्ट परिस्थितीत उद्‌भवलेल्या आणखी एका उद्देशाकडे वळले. बंगाल प्रांत हा प्राधान्येंकरून मत्स्याहारी असल्याने हिंदुस्थानांतील बाकीच्या भागांत महाराष्ट्रीयांच्या सुखसोयींची विशेषतः जेवणाखाण्याची अडचण जी विशेष भासत नाहीं ती येथें तीव्र स्वरूपांत भासते. याची जाणीव धरून या मंडळाने कलकत्त्यात येणाऱ्या महाराष्ट्रीय पाहुण्यांची जेवणाखाण्याची व राहण्याची सोय करावयाचें ठरविले, हा तो तिसरा उद्देश होय. व या उद्देशानेच मंडळाला महाराष्ट्रीयांच्या मालकीच्या इमारतीची आवश्यकता भासवून दिली. सुदैवाने परिस्थिति अतिशय अनुकूल झाल्यानें मंडळाची व पाहुण्यांची सोय या दोन्हींकरिता मिळून एकच इमारत बांधावयाचें मंडळानें निश्चित करून त्याकरिता इ. स. १९२६ च्या वार्षिक सभेंत—म्हणजे आपल्या दोनच वर्षांच्या अस्तित्वात—आपल्या सात सभासदांची एक स्वतंत्र पोट कमिटीही नेमिली. या कमिटीला (१) इमारत बांधण्याबद्दल सविस्तर योजना करणे, (२) त्यास लागणारा निधि जमविणें, (३) केलेली योजना स्वतंत्रपणें अमलांत आणणें, (४) आपणांतील सभासदांत जरूर पडेल त्याप्रमाणें फेरफार करणें, यासंबंधी पूर्ण अधिकार देण्यांत आले. या पहिल्या कमिटीचे सभासद खालीलप्रमाणें होते :—

श्री. आनंद दिनानाथ मांडगावकर, अध्यक्ष
श्री. डेव्हिड सालोमन एरुळकर, खजिनदार
श्री. भास्कर बळवंत ढवळे, चिटणीस
श्री. जनार्दन गोविंद रायकर } सामान्य
श्री. दामोदर दिनकर भावे } सभासद

| | | |
|---|---|---|
| श्री शंकर पुरुषोत्तम आघारकर | } | सामान्य |
| श्री लक्ष्मण पांडुरंग कुलकर्णी | } | सभासद |

यात वेळोवेळी बदल झाले

इमारतीची कल्पना पहिल्या योजनेप्रमाणें जवळजवळ निश्चित झाली होती ती अशी कीं, महाराष्ट्र मंडळाच्या पहिल्या दोन उद्देशांसाठी, सर्व तळमजला महाराष्ट्र मंडळाकडे द्यावयाचा व तिसऱ्या उद्देशासाठीं वरील मजला किंवा मजले पाहुण्याच्या राहण्याच्या सोयीला येतील, अशा बेताने त्यांत राहावयाच्या खोल्या, स्वयपाकगृह, भोजनगृह, दिवाणखाना, इत्यादि बांधून घ्यावयाचे कमिटीपुढें पहिला प्रश्न आला तो असा कीं, इमारतीस लागणारी रक्कम कशी मिळवावयाची ? त्यावर बराच विचारविनिमय होऊन कलकत्तावासीयानी शेंकडा ४० टक्के रक्कम आपसांत देणगीच्या रूपानें गोळा करावी व बाकीची रक्कम हिंदुस्थानातील सर्व ठिकाणच्या महाराष्ट्रीयाकडून मिळवावी असें ठरून, देणग्या मिळण्यास सुलभ झालें म्हणून, "One who pays the piper calls the tune" या इंग्रजी म्हणीप्रमाणें, रकमेचा उपयोग इमारत बांधण्याकडे व्हावयाचा, पण त्या इमारतीची मालकी, वहिवाट, व कायमची व्यवस्था, सर्व देणगी देणाऱ्यांच्याच मताप्रमाणें ठरविली जाईल, असें आश्वासन विनतिपत्रकातच जाहीर करण्यांत आलें व त्याचा इष्ट तो परिणाम होऊन बाहेरून वर्गण्या भराभर येऊं लागल्या श्रीमत् छत्रपति राजाराम महाराज सरकार करवीर यानी एक हजार रुपयाची देणगी देऊन इमारत फंडास सुरुवात केली चार वर्षांच्या अवधीत वीस हजार रुपयाच्या वर देणग्या आल्याने इमारतीकरिता जागा विकत घेतली गेली. व इमारतीचा पायाही तारीख ९ मे १९३० रोजीं रा ब विनायकराव पाटणकर याच्या हस्तें घालण्यात येऊन, ता १ मार्च १९३१ रोजी इमारतीची वास्तुशांत करण्यात आली त्याच वेळी इमारतीचे नाव "महाराष्ट्र निवास" ठेवून योजलेल्या कार्याकरितां तिचा उपयोगही करण्यास सुरुवात झाली विनतिपत्रकांत आश्वासन दिल्याप्रमाणे "महाराष्ट्र निवास' च्या मालकी, वहिवाट व कायमच्या व्यवस्थेबद्दल देणगी देणाऱ्याचे पोस्टानें मत (Ballot) घेण्यात आलें, व त्यांत

(१) महाराष्ट्र निवास Public trust म्हणून रजिस्टर करण्यात यावा

(२) महाराष्ट्र निवासाची सर्व व्यवस्था पाच ट्रस्टींकडे द्यावी, व त्यात तीन स्थानिक व दोन बाहेरचे असावे

(३) हे ट्रस्टी तहाहयात असून त्यांतील कोणीही एक अगर अनेक मृत्यु, राजीनामा अगर अन्य कारणानें नाहींसे झाल्यास ट्रस्टींनीं त्यांच्या जागा भराव्या

(४) सर्व तळमजला महाराष्ट्र मडळाला आपल्या बाकी सर्व कार्य-क्षेत्राकरिता नाममात्र ( nominal rent ) भाड्यानें द्यावा असें ठरलें

नतर दुसऱ्या बॅलेटने पहिले पाच ट्रस्टीही निवडण्यात आले ते असे —

श्री आ दि माडगावकर
श्री श पु. आघारकर } स्थानिक
श्री भा ब ढवळे

श्री न चिं ऊर्फ तात्यासाहेब केळकर } बाहेरचे
श्री गो कृ देवधर

या ठरावान्वयें ता ३ फेब्रुवारी रोजी निवास रजिस्टर करण्यांत येऊन ट्रस्टींचे स्वाधीन केला

महाराष्ट्र निवासाची जागा एकंदर जवळजवळ ७५०० चौ फूट असून इमारत फक्त पूर्वपश्चिम ६०' व दक्षिणोत्तर ४५' मिळून २७०० चौरस फुटावर बाधली आहे निवास तीन मजली असून तळमजला व दुसरा मजला यावर २५'×४०' चा दिवाणखाना आहे पहिल्या मजल्या-वर २५'×४०'=१००० चौरस फूट जागेत २५'×१६' चें भोजनगृह काढून २५'×२४' चा दिवाणखाना ठेवला आहे पाहुण्यांच्या सोयीकरता ९ खोल्या बाधल्या असून प्रत्येक खोलीत विजेचा पखा व दिवाबत्ती आणि जरूर तें फर्निचरही आहे १० हजाराची जागा व ३८।३९ हजारांची इमारत मिळून एकदर खर्च ४८–४९ हजार रुपये झाला पैकी ३ हजार रुपये दरसाल दरशेकडा ६ व्याजाची कायम ठेव, २९–३० हजार देणगी-रूपानें मिळविलेले व १६–१७ हजाराचें कर्ज आहे या रकमेवर शेंकडा ६ रु प्रमाणें व्याज असून मुद्दल दहा हप्त्यात परत करावयाचें आहे आज-पर्यंत $\frac{१}{१०}$ रक्कम व बाकी रकमेचें व्याज परत दिलें गेलें

निवासात फक्त शाकाहारीच जेवण असून तें दक्षिणी पद्धतीनें करतात

व वाढताल निवासात राहावयास येणाऱ्याना एक दिवसाचा दर माणशी २॥ रुपये असून महिन्याचा आकार दर माणशी रु ५० असा आहे त्यात दोन वेळ जेवण, दोन वेळ चहा, खोलीत निजावयास जागा व धोतर, टॉवेल धुणावळ यांचा समावेश आहे. पाहुण्याच्या परिस्थितीप्रमाणें आकार कमी करण्याचा अधिकार ट्रस्टींना आहे, व त्याचा उपयोग सढळपणें केला जातो

पहिल्या ट्रस्टींपैकीं श्री. आ दि माडगावकर व गो कृ देवधर हे निवर्तल्यानें व श्री न चिं केळकर यांनी प्रकृतिस्वास्थ्याकरिता राजीनामा दिल्यानें त्या जागा भरल्या जाऊन सध्यां खालीलप्रमाणें ट्रस्टी आहेत —

श्री शं पु. आघारकर<br>
श्री भा ब ढवळे } स्थानिक<br>
श्री र रा देव

श्री मा श्री ऊर्फ बापूजी अणे } बाहेरील<br>
दि ब ल. पा कुलकर्णी

आज सात वर्षे वर लिहिलेल्या धर्तीवर निवास चालवून या संस्थेनें महाराष्ट्रीय पाहुण्यांची सेवा केली आहे, व ट्रस्टींना अशी आशा आहे की, दिवसेंदिवस निवास पाहुण्यांच्या उदार आश्रयास पात्र राहील

## प्रकरण बारावें

# बंगाली भाषा

[सरकारी टेस्ट हाऊसचे केमिकल ॲसिस्टट श्री जतींद्रनाथ मुकर्जी यानीं या पुस्तकासाठीं लिहिलेल्या इग्रजी लेखावरून]

### बंगाली लिपीचा उगम

बगाली भाषा व तिच्या इतिहासाबद्दल लिहिण्याचे अगोदर बंगाली लिपीचा उगम कसा झाला याची माहिती देणें जरूरीचें आहे बगाली भाषेची लिपि देवनागरीपासून निघालेली असावी अशी एक सर्वसाधारण समजूत आहे परतु ती चुकीची आहे. प्राचीन काळीं सस्कृत भाषेची स्वतःची अशी लिपि नव्हती निरनिराळ्या प्रातांतून रूढ असलेल्या सर्व लिपीतूनच त्या वेळीं सस्कृत लिहिली जात असे देवनागरींतून सस्कृत लिहिण्याची पद्धति फारशी प्राचीन नाहीं. हल्लीं हिंदुस्थानांत रूढ असलेल्या सर्व लिप्याचा उगम फार प्राचीन अशा ब्राह्मी लिपीपासून झाला असून अशोक राजाचे सर्व शिलालेख याच लिपींत लिहिलेले आहेत त्यावरून या लिपीत मात्रा नसाव्यात असें दिसतें कालमानाप्रमाणें सर्व प्राचीन परिस्थितीत फरक पडत चालला त्याबरोबर लिपींतही फरक झाला कुशन् व गुप्त वशाच्या राजवटीत लिहिलेल्या शिलालेखामध्यें हा फरक स्पष्ट दिसतो पुढे सातव्या शतकात म्हणजे हर्षवर्धनाचे कारकीर्दीत ब्राह्मी लिपीपासून १ शारदा, २ नागरी व ३ कुटिल या तीन लिपी निर्माण झाल्या यापैकी कुटिल लिपीपासून बगाली, उरिआ व आसामी या लिप्याचा उगम झाला आहे.

### बंगाली भाषा

मगध देशातील मागधी भाषेपासून बंगालीचा उगम झालेला असल्यानें मागधीपासून निघालेल्या उरिआ व आसामी भाषाशीं बगालीचें बरेंच साम्य

आहे मैथिली भाषेचें बंगालीशीं साम्य असल्यानें ही देखील मागधीपासून निघाली असावी असें वाटतें पूर्वी मैथिलीची स्वतःची लिपि होती. परंतु हल्ली ही लिपि नष्ट होऊन मैथिली देवनागरीतून लिहिली जाते. कालमानाप्रमाणें बंगाली भाषेचे तीन भाग पडतात —

(१) पहिला भाग इ स ९५०–१२०० पर्यंत हिंदू राजवटीचा,

(२) मध्यभाग इ स १२००–१८०० पर्यंत मुसलमानी राजवटीचा,

(३) एकोणिसाव्या शतकापासून पुढें इंग्रजी राजवटीचा

राजसत्तेप्रमाणेंच निरनिराळ्या धर्मांच्या प्रसाराचाही तिच्या सद्य-स्वरूपावर परिणाम झाला आहे बौद्ध, इस्लामी, वैष्णव व ख्रिस्ती धर्म या सर्वांचा परिणाम होऊन आजची बंगाली भाषा तयार झाली आहे

## बंगाली या नांवाची उत्पत्ति

या भाषेला प्रथम गौड भाषा असें म्हणत व आधुनिक वाङमयांत हे नांव अजूनही वापरतात राजा राममोहन राय यानीं लिहिलेल्या बंगाली व्याकरणाला "गौरिया व्याकरण" हें नाव दिलें असून कवि मायकेल मधुसूदन दत्त यानी या प्रांतांतील लोकाना "गौरजन" असें संबोधिले आहे पश्चिम बंगाल (राढी) व उत्तर बंगाल (वरेंद्र) मिळून पूर्वींचा गौर देश होत असे व सध्याचे बंगाली भाषेचा प्रारंभ गौर संस्कृतीपासून झाला आहे असें भाषाशास्त्र्याचें मत आहे पूर्व बंगाल हा पूर्वींचा वंग देश होय गौर, वंग, बाग्री (बोगडा जिल्हा), चटल (चितगांव) या सर्व भागाला मुसलमानी राजवटींत राज्यकारभाराच्या सोयीसाठी "बंगाल" असें नांव दिलें गेलें गौर, वंग वगैरे भाषांतील सूक्ष्म भेद राज्यकर्त्यांना समजत नसल्यानें या प्रांतात बोलत असलेल्या भाषेला त्यानी "बंगला" असें नाव दिलें "बंगला" भाषेंतील शब्दाची आकडेवारी खालीलप्रमाणें आहे.

| | |
|---|---|
| संस्कृत शब्द | ४४ टक्के |
| अपभ्रष्ट संस्कृत व प्राकृत शब्द | ५१.५ ,, |
| परभाषेंतील शब्द | ४.५ ,, |

व्यापार व राज्यकारभाराच्या निमित्तानें बंगाली लोकांशीं पारशी,

आरबी, पोर्तुगीज, फ्रेंच, डच व इग्रज लोकांचा संबंध आल्यानें त्याच्या भाषांतील बरेच शब्द बंगालींत रूढ झाले आहेत

## बंगाली वाङ्मय

प्राचीन, मध्यकालीन व आधुनिक असे बंगाली वाङमयाचे तीन विभाग पाडता येतात.

**प्राचीन बंगाली**:—गौड देशाजवळ बुद्ध गयेला बौद्ध धर्माची स्थापना झाल्याने त्या धर्माची व तत्कालीन वाङमयाची छाप गौड भाषेवर पडणें साहजिकच होतें पुढें बौद्ध धर्म मागें पडून ब्राह्मण धर्माची सरशी झाली व त्या कालात गौड व बग देशावर सस्कृत भाषेचें वर्चस्व बरेंचसे स्थापित झालें त्यानतर बगाली भाषेला एक प्रकारची स्थिरता येऊन वाङमयाची वाढ होऊं लागली याच सुमारास बगाली शब्दरचनेंत जोडाक्षरे रूढ झालीं असावी. कारण गौड लिपि ज्या ब्राम्ही लिपीपासून निघाली तिच्यात मात्रा व जोडाक्षरें नव्हतीं

**मध्यकालीन बंगाली**:—बाराव्या शतकाच्या सुमारास "नीतिका", "बेहुला ओ लखीदर रे कहानी", "फुल्लरा ओ काल केतूर कहानी", "मगल काव्य" यासारखे ग्रथ लिहिले गेले हे जुने असले तरी आजही वाचकाच्या मनाला तल्लीन करितात सदैव ईश्वरभजनात व चिंतनात काळ घालवावा, ऐहिक सुखोपभोग मिथ्या असून ते मिळण्यासाठीं धडपडू नये ही वैष्णव पथाची विचारसरणी वरील ग्रथातून आढळत नाहीं. उलट स्वोन्नतीकरतां मनुष्यानें सारखी धडपड करावी असे विचार यात आहेत सोळाव्या शतकात श्री चैतन्य व श्री गौरागदेव यानीं वैष्णव पथाचा प्रचार बगाल्यात केला विद्यापति, गोविंददास वगैरे कवींनी आपल्या प्रतिभाशाली वाणीने बंगाल्यांत वैष्णव पंथाचीं तत्त्वें आबालवृद्धापुढे मांडली श्रीकृष्णाचे गुणानुवाद व मथुरावृदावनांतील त्याच्या बाललीला याचीं भक्तिरसपूर्ण काव्यें हें वैष्णव पंथाचें मुख्य वाङमय होय हें वाङमय सस्कृत व मैथिली भाषेतून निघालेल्या वृजभाषेंत लिहिलें असल्याने जसजसा वैष्णव पथाचा प्रचार होऊं लागला, तसतशी बंगाली वाङमयावर वृजबोलीची छाप पडू लागली तत्कालीन बगाली वैष्णव कवींनी आपल्या

काव्यांत वृजबोलीचे बरेच शब्द व वाक्यरचना वापरल्या आहेत कवि-सम्राट रवींद्रनाथ ठाकूर, यांनीं आपल्या तरुणपणीं भानुसिंग या टोपण नावानें वृजबोलींत भक्तिरसानें ओथबलेलीं सुदर काव्यें लिहिली आहेत "मरण रे तुहु मम शाम समान" ही कविता बगाली लोक मोठ्या भक्तिभावानें गातात वृजधाम किंवा वृंदावन येथे चालू असलेली वृजभाषा व वृजबोली या एक नाहीत हें मात्र नमूद केलें पाहिजे

चडीदास याचें श्रीकृष्णकीर्तन व पद्मावली, किर्तीबास याचें रामायण, केशिरामदास याचें महाभारत, मुकुंद चक्रवर्तीचें "चडी मगल" व कृष्णदास कविराज याचें चैतन्य चरित्रामृत हे ग्रंथ बंगाली वाङमयाच्या मध्यकालात लिहिले गेले या ग्रथातून तुमी (तूं), आमी (मी) हीं सर्वनामें "तुम्ही" व "आम्ही" अशी, तसेंच करेन (करणें) बोलेन (बोलणें) ही क्रियापदं "करेन्त" व "बोलेन्त" अशी वापरलेलीं आढळतात

**आधुनिक काल**:—आधुनिक कालातील म्हणजे अठराव्या शतकानतरच्या वाङमयाचे साधारणपणें दोन भाग पडतात. रामप्रसाद व भरतचद्र यांचे काळांत पुष्कळसें वाङमय पद्यरूपात व विशेषत ईश्वरभक्तिपरायण असे या काळांतील महत्त्वाचे ग्रथ रामप्रसादाच्या आदिरसात्मक कविता, भरतचंद्राचें "विद्यासुदर व अन्नदा मगल" हीं काव्यें होत या ग्रथांत भाषालकाराचा उपयोग फार दिसून येतो यानतर जे ग्रथ निर्माण झाले त्यात निव्वळ भगवद्भक्ति हा एकच लेखनाचा विषय नसून काव्यरूपात वर्णनें लिहिण्याची नवीन कल्पना सुरू झाली निधुबाबूची "टप्पा", अँटनी (ख्रिश्चन) व भोलामायरा याचें "कविगुण", देशू रॉय याची "पांचाळी" व गोपाळ उारया याचा "जत्रा" हे या काळांतील पद्य ग्रंथ वाङमयात झालेल्या सुधारणेची साक्ष पटवून देतात यानंतर मात्र बगाली वाङमयांत एकदम बराच फरक पडू लागला पद्यलेखनाबरोबर गद्यलेखनाचीही सुरुवात झाली वाङमयातील या नवीन काळाची सुरुवात करण्याचें पुष्कळसें श्रेय ख्रिश्चन मिशनरी लोकानाच दिलें पाहिजे पोर्तुगीज मिशनरींनीं लिसबन येथे बंगाली भाषेचें पहिलें व्याकरण रोमन लिपींत अठराव्या शतकांत छापलें पुढे काहीं मिशनरींनी बगाली भाषेंत हुगळी येथें अठराव्या शतकाचे अखेर पहिलें बगाली व्याकरण लिहिलें बंगाली लेखकानें बंगाली

भाषेचें बंगालीत लिहिलेले पहिलें व्याकरण म्हणजे राजा राममोहन राय यांचें "गौडीय व्याकरण" हे होय. ख्रिश्चन मिशनरींनी केलेले हे प्रयत्न लोकाना बाटवून ख्रिश्चन करण्याच्या हेतूनेंच केले होते यात शका नाहीं तथापि त्याच्या या प्रयत्नामुळेंच बंगाली वाङ्मयांत गद्यलेखनाचा नवीन काळ निर्माण झाला हें नाकबूल करता येणार नाहीं. मिशनऱ्याची ही वाङ्मयसेवा बगाली वाङ्मयसेवकानीं विसरणे शक्य नाही

इग्लडहून येणाऱ्या कपनीच्या गोऱ्या नोकरांना बगाली भाषेचें शिक्षण देण्यासाठीं कंपनी सरकारनें इ स १८०० त फोर्ट विलियम येथे एक शाळा स्थापन केली या शिक्षणासाठी रे. विलियम केरी यानी बरींच क्रमिक पुस्तकें लिहिली. त्याचप्रमाणें बगाली भाषेचें व्याकरण व शब्दकोषही त्यानीं प्रसिद्ध केला. हीं क्रमिक पुस्तकें पाहिलीं असता असें दिसून येते की त्यात वापरलेली बगाली भाषा संस्कृत शब्दानी ओत-प्रोत भरलेली असून त्या वेळी बोलत असलेल्या बगालीशीं तिचें मुळीच साम्य नसे सस्कृत शब्दांचा उपयोग केल्याने त्या भाषेला एक प्रकारचा बोजडपणा आला होता तो पुढें ईश्वरचद्र विद्यासागर, अक्षयकुमार दत्त यांच्या लेखनानें कमी झाला बकिम बाबूच्या प्रभावशाली व उत्कृष्ट लेखनपद्धतीने तर बगाली वाङ्मयात क्रातीच घडवून आणिली यापुढें एकापेक्षा एक असे सरस वाङ्मयसेवक निर्माण होऊ लागले मायकेल मधुसूदन दत्त, हेमेंद्रचद्र बानर्जी, रगलाल बानर्जी, नवीनचंद्र सेन, दीनबधू मित्र याच्यासारख्या आधुनिक लोकप्रिय कवीनीं काव्याची जशी वाढ केली तशीच गिरीशचद्र घोष, डी. एल रॉय, एस सी चाटर्जी, रमेशचंद्र दत्त, राजेन्द्रलाल मित्र, पडित हरप्रसाद शास्त्री, अक्षयकुमार मैत्रेय, राखालदास बानर्जी, रजनीकात गुप्ता व जोगींद्रनाथ समद्धार वगैरे लोकानी गद्याची वाढ करून सर्व देशी भाषामध्यें बगाली भाषेचा दर्जा पहिल्या प्रतीचा केला आहे

सर प्रफुल्लचद्र रॉय, रामेंद्रसुन्दर त्रिवेदी याच्यासारख्या शास्त्रज्ञांनी बगालींत शास्त्रीय ग्रथ लिहिले असून स्वामी विवेकानद व त्याचे अनुयायी यानी धार्मिक तत्त्वे व समाजसुधारणा या विषयावर आपले प्रगल्भ विचार ग्रंथरूपानें वाचकापुढे ठेविले आहेत सर यदुनाथ

सरकारसारख्या पहिल्या प्रतीच्या इतिहासकाराच्या लेखणींतून बंगाली भाषेत ऐतिहासिक ग्रंथ निर्माण झाले आहेत अशा रीतीने ऐतिहासिक, शास्त्रीय, पुराणवस्तुसंशोधन वगैरे सर्व बाजूंनी बंगाली वाङ्मयाची वाढ सुरू आहे. बंगाली भाषेतील राजकारणी लेखकांत कै. सखाराम गणेश देऊस्कर यांचा दर्जा फार मोठा गणला जातो. महाराष्ट्रातील इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचीं व साधुसंतांचीं चरित्रे यांनीं बंगाली भाषेंत लिहिलीं आहेत. "देशेर कथा" हें सखारामबाबूंचे पुस्तक अजून सरकारजमा आहे. सध्याच्या लेखकामध्ये डॉ. रवींद्रनाथ ठाकूर यांनीं "गीतांजली" सारखा जगविख्यात भावनाप्रधान ग्रंथ लिहून बंगाली वाङ्मयाच्या उच्च दर्जाची जाणीव सर्व जगाला करून दिली आहे. बंगाल्यातील मुसलमान बंधूही या भाषेची सेवा करीत आहेत. काझी नुझरुल इस्लाम व नासिमुद्दिन हे नामांकित कवी असून मीर मुझफर हुसेन, मरहूम व मोझमल हक्क हेही उत्तम गद्यलेखक आहेत.

बंगाली मातृभाषा असलेल्या प्रदेशाची चतुःसीमा —

**पूर्वेस** —सिल्हेट, पश्चिम गोआलपारा व मणिपूर संस्थानचा काहीं भाग.

**पश्चिमेस** —पूर्णीया संताल परगणा व बिहारचे मानभूम व सिंगभूम जिल्हे (याबद्दल वाद आहे).

**उत्तरेस** :—दार्जिलिंग

**दक्षिणेस** :—बंगालचा उपसागर

# प्रकरण तेरावें

# व्यापार व उद्यम

## पूर्वेतिहास

इसवी सनाच्या पहिल्या शतकांत लिहिलेल्या काही ग्रीक पुस्तकामध्यें बंगालमधील व्यापाराविषयी पुढील माहिती मिळते पूर्व दिशेस गगा नावाची नाइलसारखी मोठी नदी असून तिच्या किनाऱ्यावर मोठाली व्यापारी शहरे आहेत तेथून मोती, तलम कापड, जटामांसी (एक प्रकारची वनस्पति) वगैरे वस्तू परदेशात जातात चीनमध्यें होणारें रेशमी कापड प्रथम गगेच्या किनाऱ्यावरील शहरातील बाजारात येऊन तेथून तें मिसर देशात जाते

## पोर्चुगीझ लोकांची माहिती

इ स. १४९८ साली वास्को-द-गामा याने बगाल्यातील व्यापार व सपत्ति याबद्दल पुढील माहिती पोर्चुगालला धाडली होती "बेंगुल्यांत मूर जातीचा राजा असून तेथें मूर व ख्रिस्ती धर्माची मिश्र प्रजा आहे राजाचें सैन्य सुमारें २४,००० असून त्यापैकी १०,००० घोडेस्वार व बाकीचें पायदळ आहे सैन्यात ४०० हत्तीपण आहेत. येथून गहू व मौल्यवान सुती कापड परदेशात जातें. देशात चादी पुष्कळ असावी असें वाटते" इ. स. १५६७ साली सेझार-द-फेडेरेची हा हुगळी गावीं आला होता त्याच्या प्रवासवर्णनात तो लिहितो की, "बेटूर (हल्लीचे शिवपूरजवळ) पावेतों पोर्चुगीझ लोकाची मोठालीं व्यापारी जहाजे येत असून पुढें सातगावपर्यंतची वाहतूक लहान जहाजानीं होई. सातगावाहून तांदूळ, कापड, लाख, साखर, हिरडे, वगैरे व्यापारी माल परदेशात जातो" पोर्चुगीझ लोकाच्या भर-भराटीच्या काळात म्हणजे इ स १६२८ मध्ये मानरिक हा बगालमध्यें आला होता. त्यानें बगालमधील व्यापाराचे वर्णन दिले आहे जरीचा रेशमी कपडा, साटीण, लवगा, जायफळें, कापूर, वगैरे माल मलाक्का व सुमात्रा

बेटातून पोर्तुगीझ व्यापारी बंगाल्यात आणीत मालदिव बेटातून कवड्या व कारोमांडेलच्या किनाऱ्यावरून शख बंगाल्यात येत सोलर व टिमोर (मलाक्का बेटें) येथून स्वेतव रक्तचंदन येत असे जवळजवळ शभर जहाजे भरून निरनिराळ्या तऱ्हेचा माल प्रतिवर्षी बंगालमधून परदेशीं जात असे. त्या वेळचे मानरिक यानें दिलेले व्यापारी भाव पुढीलप्रमाणे आहेत —

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तांदूळ एका खंडीस (सुमारें १२०० रत्तल) | | | .. | ३ | रु. |
| लोणी एक कटारोस (७५ रत्तल) | | ... | ... | २ | रु. |
| साखर सुमारे ४०० रत्तलास .. | | ... | .. | १ | रु. |
| एका गायीची किंमत ... | ... | .... | ... | १ | रु |
| २५ कोंबड्यास ... | ... | ... | ... | २ | रु |

## कापडाचा धंदा

### पूर्वस्थिति

जुन्या काळापासून डाक्याची मलमल तलमपणाकरिता फारच प्रसिद्ध होती इतकी उत्तम मलमल दुसरीकडे न पाठविता दिल्लीच्या बादशहाच्या दरबारांतच गेली पाहिजे म्हणून या बाबतींत नजर ठेवण्यासाठी डाक्यास बादशाही अमलदार नेमलेले असत तेथें निघणाऱ्या कापडाच्या तलमपणाची अशी कहाणी सांगतात कीं, एकदा डाक्याच्या सुभेदारानें एका आब्याच्या कोयींतून बादशहास सर्व पोषाख पाठविला होता हल्लीच्या यांत्रिक युगात सर्व तऱ्हेच्या शास्त्रीय साधनाची मदत असूनही इतकें तलम कापड अजूनही निघत नाहीं. अति तलम कापड विणण्याचे दुष्परिणाम विणकरावर फार होत वयाच्या १६ ते ३० वर्षांपर्यंतच त्याना हा धंदा करता येई. मग त्यांचे डोळे या कामाला निरुपयोगी होत त्या वेळी येथें होणाऱ्या सुती कापडाच्या मुलमुल, खासा, टेरिंडम, डोसेस (दोरिया), कॅलिको आणि हमहम वगैरे निरनिराळ्या जाती असत बंगाल्यांतून मुख्यत सुती व रेशमी कापड, कच्चें रेशीम व सोरा हे जिन्नस निर्गत होत डाक्याच्या मलमली पहिल्यानें १६६६ मध्ये इंग्लंडला गेल्या व त्यानंतर त्या फारच लोकप्रिय झाल्या त्या तयार करण्या-

करिता कपनीने कासीमबझार व माल्डा येथे कारखाने काढले या मुळे तेथील कारखान्यांवर अनिष्ट परिणाम होऊ लागल्याने इ स. १७०० ते १७२० पर्यंतच्या काळांत आयात मालावर निर्बंध घालणारे निरनिराळे कायदे करण्यांत आले. याही परिस्थितीत १७८० पर्यंत सुती व रेशमी कापड हाच मुख्य निर्यात माल होता इ. स १७८६ साली मात्र इग्लडात एका नवीन कायद्यानें बगालचें कापड व सूत येणें कायमचे बद करण्यांत आलें. येथील विणकर लोकाना त्याच्या धद्यापासून परावृत्त करण्यासाठी आगाऊ पैसे देऊन त्यांचेकडून वाटेल ती कामें कपनी सरकारने करवून घेतली. या सर्वांचा परिणाम असा झाला की, येथील कापडाचा धदा जवळजवळ बसून इंग्लंडमधून यान्त्रिक साहाय्याने तयार झालेलें स्वस्त कापड येथे येऊ लागलें अशा रीतीनें येथील कापडाचा जो काय धदा शिल्लक होता त्याचा नायनाट झाला. बंगालची राज्यसत्ता जरी ईस्ट इडिया कपनी-कडे होती तरी प्रजेच्या हितावद्दल राज्यकर्त्यांत दिसणारी कळकळ व राष्ट्रीय भावना त्याच्यात कधींच नव्हती कपनीच्या डोळ्यांपुढें सदैव लँकेशायरचें हित असे

## सद्य:स्थिति

हातमागाचा धदा बसल्याबर परदेशातून यत्रसामग्री आणून हा धंदा सुरू करण्याचा प्रयत्न इ स १९०५ पावेतों बगाल्यात कोणीही केला नाही स्वदेशी चळवळीमध्यें बगाल्यात कापडाच्या गिरण्या सुरू करण्याचे प्रयत्न झाले व अद्यापिही होत आहेत तरीही बंगालमध्ये खपणारें कापड अजूनही या प्रांतात होत नाही इ स १९३६–३७ सालीं बंगालमध्ये सुती कापड विणण्याचे ७८७१ माग व सूत काढण्याच्या २,७८,१६४ चात्या सुरू होत्या एकदर प्रांतांत कापड तयार करणाऱ्या लहान मोठ्या २४ गिरण्या आहेत

## तागाचा धंदा

### लागवड व पूर्वेतिहास

तागाच्या झाडाच्या दोन जाती आहेत यांपैकी एकाची लागवड मुख्यत्व बगाल, बिहार, आसाम, व ओरिसा या प्रांतात करितात दुसरीचें पीक

मुख्यत मद्रास इलाख्यात काढतात तागाची लागवड हिंदुस्थानबाहेर कोठें होत नसल्याने या धंद्याचा मक्ता हिंदुस्थानाला व मुख्यत्वेंकरून बंगाल प्रांतालाच आहे असे म्हणण्यास हरकत नाही. गंगा व ब्रह्मपुत्रा या नद्यांच्या त्रिभुज प्रदेशात (डेल्टा) पुराचे वेळीं जो गाळ पसरतो, तेवढ्या खतावर तागाची लागवड होते मार्चपासून मेपावेतों पेरणी होते व जुलई, सप्टेंबर यात पीक येते एकदां बी रुजले म्हणजे त्याकडे लक्ष देण्याची जरूरी नाहीं तागाचे पीक १० ते १२ फूट व क्वचित् याहूनही जास्त उंच होतें तागाला फळ येण्यापूर्वींच झाडें उपटून किंवा बुंढाजवळ कापून त्याच्या जुड्या बांधतात व पाण्यांत कुजवितात कुजल्याने तंतू मोकळे होतात त्यानंतर मधील काड्यांच्यापासून साल सोडवितात, व बाहेरील तंतूचे जुडगे चांगले कुस-करून हापटून धुतात, व वाळवितात हे तंतू ८–९ फूट लांब व केंसा-सारखे बारीक असतात तागाचा धंदा बंगालमध्ये फार पूर्वींपासून चालत आला असून प्रत्येक ठिकाणीं तेथील जरूरीपुरती तागाची लागवड करीत तागाच्या वाखाचा मुख्य उपयोग दोऱ्या करण्याकडे होई अठराव्या शतकात हातमागावर या तंतूपासून गोणपाट तयार करण्यात येऊं लागलें ऐने-इ-अकबरीत देखील बंगालमधील गोणपाट विणण्याच्या धंद्याचा उल्लेख आहे इ स १७९३ साली इंग्रजी सैन्याच्या उपयोगासाठी कलकत्याहून मुंबईस गोणपाट धाडण्यात आलें पुढें मद्रासमध्येंही त्याचा उपयोग होऊं लागला याप्रमाणे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत या धंद्याची वाढ चांगली झाली पुढें यांत्रिक साहाय्यानें चालणारे माग यूरोपात सुरू झाल्यानें येथील हातमागावर गोणपाट तयार करण्याचा धंदा मंदावला, व येथून नुसता तागच परदेशात नेऊन तेथें कापड विणण्याचें काम सुरू झाले

अठराव्या शतकापर्यंत ज्या देशातून तागाचें कापड परदेशी जात असे त्याच देशाला तेथे तागाची लागवड होत असून इ स १८५० ते ५१ साली २१५,९,७८२ रुपयाचे तागाचे कापड बाहेरून विकत घ्यावे लागले हा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे तथापि ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं कारण येथून ताग नेणें व पुन्हा येथें तयार गोणपाट धाडणें यांत फार खर्च होऊं लागल्यानें इ स १८५४ सालीं सिलोनमधील जॉर्ज ऑक्लंड या इंग्रज गृहस्थानें हुगळी जिल्ह्यात श्रीरामपूरजवळ रिसरा गावीं तागाचें

कापड विणण्याची गिरणी काढली हल्ली या गिरणीला विलिंग्डन् ज्यूट मिल्स् असें म्हणतात इ स १८५७ सालीं बोनियो कपनीने बारानगर (कलकत्त्याचे उत्तरेस) येथें बारानगर ज्यूट मिल्स काढली १८६३–६४ सालीं गौरीपूर ज्यूट फॅक्टरी सुरु झाली त्यानतर मात्र या धद्याची वाढ फार झपाट्याने होऊ लागल्यानें हातमागावर गोणपाट विणण्याचा धंदा कायमचा बुडाला

## वाढ व सद्य स्थिति

इ स १९०७ सालीं येथें तागाच्या गिरण्याची सख्या ४२ होती. १९२० सालीं ती ७२ असून १९३५ मध्यें ९५ च्या वर गेली कलकत्त्याला लागूनच असलेल्या हावरा, हुगळी व चोवीस परगणा या तीन जिल्ह्यां-मिळून गगेच्या किनाऱ्यावर वरील सर्व गिरण्या आहेत इ स १९२० साली बगाल्यातील ७२ व इतर प्रातातील ४ मिळून ७६ गिरण्यांमध्ये १४,०७,१४,६८० रुपये व २,२०९,७१६ पाउड इतकें भाडवल अडकले होतें या ७६ गिरण्यांपैकी १४ गिरण्या १९१९–२० सालीं स्थापन झाल्या. यावरून त्या वेळी या धद्याची किती चागली स्थिति होती हें सहज लक्षात येईल इ स १९२९ पावेतों अशीच भरभराट राहिली १९३० सालीं जगात जी एक व्यापारी मदीची मोठी लाट आली त्यात या धंद्याचें बरेच नुकसान झाले. कित्येक गिरण्यानी दिवाळीं काढली, कित्येक विकल्या गेल्या व बद पडल्या, आणि ज्या कांहीं चालू होत्या त्या देखील आठवड्यातून कांहीं दिवसच चालत ही स्थिति येण्याला दुसरे असें एक कारण सागतात की, त्या वर्षीं तागाची लागवड फार झाल्याने ताग स्वस्त झाला, तागाच्या कापडाचे भावपण उतरले, व त्यामुळें गिरण्याना नुकसान आले गरीब शेतकरी वर्ग पैशाच्या आशेनें जमिनीचा बराचसा भाग तागाच्या लागवडीकरितां वापरी अशा तऱ्हेनें तागाचें पीक अमाप होऊन भाव इतका उतरे की, शेतकऱ्यास जमिनीचा सारा देणें सुद्धां कठिण होई या अडचणींतून शेतकऱ्याला वाचविण्यासाठी १९३७ साली बगाल सरकारनें तागाच्या लागवडीवर निर्बंध घातला इ स १९३४–३५ मध्यें तागासाठी वापरलेल्या जमिनीपैकी $\frac{1}{६}$ जमीन १९३७ नतर तागासाठी वापरू नये

असा नियम केला इ स १९३२ पासून परदेशातील तागाची मागणी मात्र सारखी वाढत आहे.

| इ. स. | टन |
| --- | --- |
| १९३२–३३ . . . | ५६३००० |
| १९३३–३४ . . . . .. | ७४८००० |
| १९३५–३६ .. .... .... | ७७१००० |
| १९३६–३७ .... . . | ८२१००० |

बाहेरच्या मागणीबरोबर देशातील मागणीही वाढू लागली व इंडियन ज्यूट मिल्स् असोसिएशननें तागाचें कापड करण्याबाबत गिरण्यावर घातलेलें नियंत्रण काढून घेऊन प्रत्येक गिरणीला लागेल तितका माल करण्याची मुभा दिली इ. स १९३५–३६ पेक्षा १९३६–३७ सालीं देशातील तागाचा खप जवळजवळ दोन लाख टनानी वाढला आहे. ताग काढण्याच्या पद्धतीत सुधारणा करण्यासाठीं व तागाचे दुसरे उपयोग शोधून काढण्यासाठी गेल्या वर्षी इंडियन ज्यूट मिल्स् असोसिएशननें एक प्रयोगशाळा स्थापन केली तज्ज्ञांच्या नेमणुका झाल्या असून संशोधन कार्य सुरू आहे प्रयोगशाळेची इमारत कलकत्याच्या टालिगंज उपनगरात आहे तागाची लागवड बंगाल प्रांतात होत असून त्याचीं गोणपाटें कलकत्याजवळील जिल्ह्यांत विणलीं जातात, व त्याची खरेदीविक्री कलकत्याच्या बाजारपेठेंत चालते

## चहा

### पूर्वेतिहास

अठराव्या शतकाचे शेवटीं ईस्ट इंडिया कंपनी चहाचा व्यापार फार मोठ्या प्रमाणात करीत असे चीनमधून चहा विकत घेऊन तो इंग्लंडच्या बाजारांत नेऊन विकावयाचा हा व्यापार चिनी अधिकाऱ्याचे मर्जीवर असल्याने तो केव्हां बंद पडेल याचा नेम नव्हता. म्हणून १७८८ साली वॉरन हेस्टिंग्स् याचे कारकीर्दींत कर्नल कीड यानी शिवपूर येथील सरकारी बागेंत हिंदुस्थानात चहाच्या लागवडीचे प्रयत्न केले पण पुढें या बाबतीत विशेष कांहीं झाले नाहीं. नंतर लॉर्ड विलियम बेंटिंक यानी चहाचे लागवडीकडे लक्ष घातले.

आसाममध्ये चहाची झाडें आहेत याची जाणीव सरकारला नसल्यानें येथून १८३४ सालीं चीनमध्ये सरकारी अधिकारी पाठवून तेथून चहाचे बी व त्याच्या लागवडीची माहिती असलेले शेतकरी हिंदुस्थानात आणले हा इतका अवाढव्य खर्च केल्यानतर चीन व आसाममधील चहाचीं झाडें एकाच प्रकारची आहेत असें समजलें इ स. १८३८ सालीं प्रथम लडन शहरीं आसाममधील चहा गेला बरींच वर्षे प्रयोग केल्यानतर असें दिसून आलें कीं हिंदुस्थानातील चहा चीनमधील चहाइतकाच उत्तम असून लडनच्या बाजारपेठेंत तो त्याची बरोबरी करू शकतो. त्यानतर राजाश्रयाची जरूरी नसल्यानें या बाबतींतून सरकारने आपलें लक्ष काढून घेतले आसाम-मध्यें काचार, सिल्हेट, ब्रह्मपुत्रा व सुरमा याची खोरी या ठिकाणी चहाची लागवड होते दार्जिलिंग, तराई, चितगाव, वडूर या भागातही चहाची लागवड सुरू आहे. १८६६ मध्ये या धंद्याला बरीच मदी आली होती, त्यानतर याची वाढ सारखी सुरूच आहे

## सद्यःस्थिति

इ. स १९१९ मध्यें जगातील चहाच्या पैदाशीपैकी ४३ २ टक्के चहा निव्वळ बगाल व आसाममध्यें झाला १९३७ सालीं बगाल्यांत ३४५ चहाचे मळे असून १९८००० एकर जमीन या लागवडीसाठीं वापरली गेली इडियन टी असोसिएशनच्या विनतीवरून इ स १९०३ मध्यें सरकारने " इंडियन टी सेस ॲक्ट " हा कायदा केला या कायद्यान्वयें प्रत्येक रत्तला-मागें ¼ पै याप्रमाणें चहाच्या उत्पन्नावर कर बसविण्यात आला. इ. स. १९२३ मध्यें हा कर शभर रत्तलावर ६ आणेप्रमाणें वाढवून १९३५ साली १२ आणे करण्यात आला हें कराचे रूपानें होणारें उत्पन्न सरकारी तिजोरीत न जाता देशात व परदेशात चहाचा प्रसार करण्याकरिता व चहाच्यासबधी सशोधन करण्याकरिता खर्च करतात. हा खर्च एका कमेटीमार्फत होतो. कलकत्त्यातील चहाचा व्यापार म्हणजे येथून देशांत व परदेशात चहा रवाना करणे येवढाच होय आसाम व बगाल-मध्यें होणारा चहा रेल्वेने किंवा बोटीने कलकत्त्यास येतो. विक्री होईतों चहाच्या पेट्या किदरपुरच्या वखारीत ठेवतात. ही विक्री आठवड्यांतून

एकदांच लिलावाने होते ती साधारण मेमध्यें सुरू होऊन पुढील वर्षाच्या जानेवारीपर्यंत चालते काहीं मळेवाले आपला चहा कलकत्त्यास न धाडता थेट लंडनला पाठवितात व त्याची विक्री मिनसिंग लेनमध्यें होते

| इ स | हिंदुस्थानातील चहाचें उत्पन्न | |
|---|---|---|
| १८७८ | ३,८६,६५००० | रत्तल |
| १८९८ | १५,५२,५१००० | ,, |
| १९१८ | ३८,०३,४८००० | ,, |
| १९३६ | ३९,३९,४७००० | ,, |

## चहाचे प्रकार

चहाचें झाड लावल्यानंतर तीन वर्षांनी तें चहाला लागणारीं योग्य पानें देण्यास तयार होतें या सुमारास त्याला नवीन पानाचे धुमारे फुटू लागतात हे धुमारे आणि त्याच्या खालची तीन किंवा चार पानें याचाच उपयोग चहा तयार करण्यात होतो धुमारे बरेच फुटावे म्हणून झाडांना मधूनमधून छाटतात तोडिलेल्या पानाची वर्गवारी केल्यानंतर त्यांना लाकडी फळयांवर मोकळ्या हवेंत कांहीं काळ ठेवल्यानंतर तीं मुरूं लागतात पानें योग्य प्रमाणांत मुरली म्हणजे तीं भाजतात व वाळवितात मुरण्याच्या प्रमाणावर चहा हिरवा किंवा काळा होणें अवलंबून आहे हिरव्या चहाचा खप फार नसल्यानें बंगाल व आसाममध्ये फक्त काळा चहाच तयार करतात पानांच्या कोंवळेपणावर चहाच्या जाती ठरवितात निव्वळ पानांच्या धुमाऱ्याच्या चहाला "फ्लॉवरी ऑरेंज पीको" म्हणतात धुमाऱ्यानंतरच्या पहिल्या पानाला "ऑरेंज पीको", दुसऱ्याला "पीको" व तिसऱ्याला "पीको सुचाग" अशी व्यापारी भाषेंतील नावें आहेत तीन पानाच्या खालच्या जून पानापासून तयार केलेल्या चहाला "सुचाग" किंवा "काम्स्" असें म्हणतात पानाचे प्रथम तुकडे करून मग त्याचा चहा केला तर कषाय चांगला निघतो म्हणून वर दिलेल्या निरनिराळ्या जातींत "ब्रोकन" (तुकडे केलेला) ऑरेंज पीको", "ब्रोकन पीको" असे आणखी पोटभेद आहेत

## नीळ

बंगालमध्ये तागाइतकाच निळीचा धंदा पण महत्त्वाचा व जुना होता. इ. स. १८९७ मध्ये रासायनिक रीतीनें डांबरापासून नीळ तयार करण्याची कृति जर्मनींत सिद्ध झाल्यामुळें व कृत्रिम निळीच्या आयातीला संरक्षक जकाती बसवून आळा न घातल्यानें बंगालमधल्या या धंद्याला उतरती कळा लागली, व आतां तर तो बंद पडला. निळीच्या उत्कृष्ट जाती शोधून काढून संरक्षक जकातीची जोड दिल्यास हा धंदा अद्यापि ऊर्जितावस्थेस येईल. बंगाल्यात अठराव्या शतकाच्या शेवटपर्यंत निळीच्या धंद्याला फारच भरभराटीचे दिवस गेले. ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारामध्यें नीळ हा एक महत्त्वाचा जिन्नस असे व त्यामुळें चहाप्रमाणेंच युरोपियन लोकांचे येथें निळीचे मळे असत.

## कलकत्ता बंदराचें महत्त्व व त्याचीं कारणें

बंगाल, आसाम, ओरिसा, बिहार व संयुक्त प्रांताचा परदेशाशीं होणारा आयात व निर्गत व्यापार कलकत्ता बंदरांतून होत असल्यानें कलकत्त्याच्या बाजारपेठेला फार महत्त्व आहे. ताग, रेशीम, लोंकर, चहा, गळिताचीं व इतर धान्यें, लाख, चामडीं मँगनीज, लोखंड व कोळसा वगैरे कच्चा माल येथून परदेशांत जातो, आणि सुती व लोंकरी कापड, खनिज तेलें, पेट्रोल, व साखर, मीठ, मशिनरी, रेल्वेला लागणारा माल, मोटार गाड्या, निरनिराळें लोखंडी सामान, वगैरे माल परदेशांतून कलकत्त्याचे बंदरांत येतो. व्यापाराप्रमाणेंच कलकत्त्याची औद्योगिक वाढही झपाट्यानें होत असून या वाढीचीं मुख्य तीन कारणें आहेत —

(१) कलकत्ता शहर हें उत्तर व पूर्व हिंदुस्थानांतील व्यापाराचें केंद्र असल्यानें येथें जवळपास तयार होणारा माल बाजारपेठेंत आणण्यास जास्त खर्च किंवा वेळ लागत नाहीं.

(२) कलकत्त्यापासून जवळजवळ वीस मैलपावेतों हुगळी नदीच्या दोन्ही तीरावर कारखाने चालविण्याकरितां विजेच्या कंपनी-कडून वीज फार स्वस्त दरानें दिली जाते व त्यामुळें

कलकत्त्यांतील खर्चिक राहणीचा परिणाम कारखान्याच्या आर्थिक परिस्थितीवर होत नाही

(३) कारखान्यास लागणारा कच्चा माल व तेथें तयार झालेला पक्का माल कलकत्त्याच्या बाजारपेठेंत आणण्यास किंवा नेण्यास हुगळी नदीच्या सान्निध्यामुळें वाहतुकीचा खर्च फार कमी लागतो

या सर्व सोयीमुळे गेल्या १०–१२ वर्षांत नित्य लागणाऱ्या व्यवहारोपयोगी वस्तू तयार करण्याचे लहान मोठे अनेक कारखाने निघाले असून नवीन नवीन निघत आहेत. यातील बरेच कारखान हिंदी भाडवलावर निघाले आहेत प्रांतातील बेकार सुशिक्षित तरुणाना थोड्या भाडवलावर घरीं बसून करता येण्यासारख्या धद्यांचें शिक्षण देण्याचे स्तुत्य प्रयत्न बगाल सरकारचें औद्योगिक खातें करीत आहे

## कलकत्ता येथें देशी वस्तू तयार करणाऱ्या कंपन्यांचीं नांवें व पत्ते

(कलकत्ता नगर सभेनें प्रसिद्ध केलेल्या " व्हेअर टु बाय " या पुस्तकावरून)

### आम्लें (Acids)

(१) बेंगॉल केमिकल अँड फार्मास्यूटिकल वर्क्स.

(२) बी. के पाल अॅण्ड को १–३ बोनफील्ड लेन.

(३) कलकत्ता केमिकल वर्क्स, ३५ पडितिया रोड, बालीगज

### एनॅमलचीं भांडीं

(१) बेंगॉल एनॅमल वर्क्स, पालटा, पो. ऑ इच्छापूर, कलकत्ता ऑफिस, १ ब्रिटिश इडियन स्ट्रीट

(२) सूर एनॅमल अॅण्ड स्टॅंपिग वर्क्स, ९ मिडलरोड

### औषधें

(१) बेंगॉल इम्युनिटी कपनी, १५३ धर्मताला स्ट्रीट

(२) बी के पाल अॅण्ड को १ बोनफील्ड लेन

(३) इडियन हेल्थ इन्स्टिटच्यूट अॅण्ड लॅबोरेटरी लि ५–२ बेलियाघाट रोड, कलकत्ता

(४) लिस्टर अँटिसेप्टिक् अॅण्ड ड्रेसिग कपनी, काशीपूर

(५) नॅशनल लॅबोरेटरीझ लि १८ डमडम रोड

(६) स्टर्लिंग फार्मास्यूटिकल प्रॉड-

क्टस् कंपनी, ७२/२ शंभुनाथ पंडित स्ट्रीट

(७) वर्क्स इन्स्टिट्यूट अँण्ड लॅबोरेटरी लि,
१४ मोहन बागन लेन.

## कंदील व स्टोव्ह

(१) धार अधिकारी अँण्ड को.
९–२ नर्सिंग लेन

(२) केमिकल इंडस्ट्रीज अँण्ड इंजिनियरिंग कंपनी,
४५ धर्मताला स्ट्रीट

(३) ओरिएंटल मेटल इंडस्ट्रीज् लि अगरपारा २४ परगणा; कलकत्ता ऑफिस, २९ कुलुतोला स्ट्रीट

(४) शिल्पपीठ, १०० गोपाळलाल ठाकूररोड अलमबझार.

(५) भिकम लाइट फॅक्टरी,
८८ बुरतोला स्ट्रीट.

(६) कोहिनूर मेटल वर्क्स,
३० चाटावाला गल्ली.

## कागद

(१) टिटाघर पेपर मिल्स् कंपनी चार्टर्ड बँक बिल्डिंग.

## कागद (हाताने तयार केलेला)

(१) ऑल इंडिया इंडस्ट्रीज असोसिएशन,
२४९ डी बाऊबझार स्ट्रीट

## कागदाचे जाडे बोर्ड

(१) कुबर अँण्ड कंपनी,
८५ क्लाइव्ह स्ट्रीट

(२) पायोनियर पेपर अँण्ड पल्प कंपनी, ३ लायन्स् रेंज

## काड्यांच्या पेट्या

(१) कलकत्ता मॅच अँण्ड इंडस्ट्रियल वर्क्स, ११–१ कॅनॉल रोड

(२) इसावी इंडिया मॅच मॅन्युफॅक्चरिंग कंपनी,
४६–४७ मुरारीपुकुर रोड

(३) इस्लामिया मॅच फॅक्टरी,
१६ डमडम रोड.

(४) पायोनियर मॅच फॅक्टरी,
१०७ उलटाडांगा मेनरोड

## कांच व कांचेचें सामान

(१) बेंगॉल ग्लास वर्क्स,
डमडम, कँटोनमेंट

(२) भारत ग्लास वर्क्स,
बेलघुरिया, ई बी रेल्वे

(३) न्यू इंडिया ग्लास वर्क्स,
१०१ उलटाडांगा रोड.

(४) सायंटिफिक ग्लास वर्क्स,
४४ कैलास बोस स्ट्रीट

(५) युनायटेड ग्लास वर्क्स,
३२ मुरारीपुकुर रोड

(६) शिवाजी ग्लास वर्क्स,
३३ कुसडिया रोड, हावरा

## कार्बन पेपर व टाइपरायटरच्या रिबन्स्

(१) भारत कार्बन पेपर अण्ड रिबन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी,
८ एस्प्लनेड रोड ईस्ट

(२) बेंगॉल इंडस्ट्रियल कंपनी

२१७ गोपाळचंद्र बोस लेन, काशीपूर

### कुलपें व किल्ल्या

(१) बेंगॉल आयर्न सेफ अँड लॉक वर्क्स, १७० शोवा बझार
(२) बेंगॉल लॉक फॅक्टरी, गोपाळपूर २४ परगणा
(३) दास लॉक अँड सेफ मॅन्युफॅक्च-रिंग कंपनी
७७ बी राशबिहारी ॲव्हेन्यू.

### चामड्याचें सामान

(१) बेंगॉल सरकारचें औद्योगिक खातें, ७ कौन्सिल हाऊस स्ट्रीट
(२) मॉडेल लेदर वर्क्स पी ९ ए लेक रोड
(३) पन्नालाल सील विद्यामंदिर ५।१ ओलाइ चांदी रोड, बेल-गाछिया

### चिनी मातीचें सामान

(१) आर्ट पॉटरी कंपनी बेलघुरिया, २४ परगणा
(२) बेंगॉल पॉटरी, ४५ टागरा रोड
(३) बर्न ॲण्ड कंपनी ११ मिशन रो
(४) कलकत्ता सिमेंट पॉटरी वर्क्स ५२ एफ तेलंग बगान रोड, उलटा डांगा
(५) हिंदुस्थान पॉटरीझ लि २० स्ट्रँड रोड

### छत्र्या

(१) महेन्द्रलाल दत्त अँड सन्स् ४९ हॅरिसन रोड
(२) बेंगॉल सरकारचें औद्योगिक खातें, ७ कौन्सिल हाऊस स्ट्रीट.

### जवाहिर (दागिने)

(१) गोल्ड स्मिथ ॲण्ड कंपनी ११–१ राजा लेन.
(२) इंडियन एनॅमलिंग सिंडिकेट, ८९ साउथ सिंथी रोड, डमडम
(३) एम बी सरकार ॲण्ड सन्स्, १२४ बाऊबझार स्ट्रीट

### टोप्या (सोलाहॅट)

(१) बेंगॉल हॅट मॅन्युफॅक्चरिंग कंपनी ६ सनातन सील लेन
(२) चुनिलाल बॅनर्जी, ई ८६–१ कॉलेज स्ट्रीट मार्केट

### मोरांबे, जेली, मसाले व डब्यांत बंद केलेलीं फळें

(१) बेंगॉल कॅनिंग ॲण्ड कँडिमेंट वर्क्स, ३ गुरुदास दत्त गार्डन लेन उलटा डांगा
(२) बेंगॉल लक्ष्मी कनफेक्शनरी वर्क्स, ४४–१ कॅनॉल ईस्ट रोड.
(३) ग्रेट ईस्टर्न हॉटेल कँडिमेंट फॅक्टरी, ८३ सी साउथ रोड, एंटॅली

### मशिनरी

(१) बेलिया घाटा इंजिनीयरिंग वर्क्स ११ राधा महातब दत्त गार्डन लेन, बेलिया घाटा
(२) गोविंद शीट मेटल वर्क्स, ७४ नारकेल डांगा मेन रोड

(३) स्मॉल मशिनरी मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, २२ आर जी कार रोड

## रबराच्या वस्तू

(सायकलीचे टायर्स, टच्यूब्स, रिक्षा टायर्स, रबराचे होज पाइप व गॅसच्या रबरी नळया)

(१) एशियाटिक रबर वर्क्स, ५४।१० चिंगरीहाटा रोड
(२) इंडिया रबर गुड्स् मॅन्यु-फॅक्चरिंग कंपनी, ४७ मुरारी-पुकुर रोड
(३) आर बी एस जैन रबर मिल्स, ज्वाला प्रसाद लेन, लिलवा
(४) डनलोप रबर कंपनी (इंडिया) लि शहागंज, हुगळी

( रबरी जोडे )

(१) भट्टाचार्य रबर वर्क्स, १८ सुरा रोड.
(२) सेन ब्रदर्स ॲण्ड कंपनी, १०८ प्रिन्स अनवरशा रोड, टॉलिगंज
(३) बाटा शू कंपनी, बाटानगर, २४ परगणा

## विजेचे दिवे (बल्ब्स)

(१) भारत इलेक्ट्रिक वर्क्स, उमाकांत सेन लेन, डमडम
(२) इंडियन इलेक्ट्रिक लँप कंपनी १ स्वीन हो स्ट्रीट,
(३) बेंगॉल इलेक्ट्रिक लँप वर्क्स १३४ मोलापारा रोड, जादवपूर

## विजेचे पंखे

(१) कलकत्ता फॅन वर्क्स, ७ हिंदुस्थान पार्क.
(२) क्लाईड फॅन कंपनी, ३ अधुरवा मित्र रोड
(३) एव्हरेस्ट इंजिनीयरिंग कंपनी, २९४।२।१ अपर सर्क्युलर रोड
(४) इंडिया इलेक्ट्रिक वर्क्स, २५ साऊथ रोड इटाली.
(५) विद्युत् फॅन वर्क्स, २०३ लोअर सर्क्युलर रोड

## विजेचें निरनिराळें सामान

(१) कलकत्ता इंजिनीयरिंग कॉलेज, २६८ राशबिहारी ॲव्हेन्यू
(२) इंडिया इलेक्ट्रिक वर्क्स, २५ साऊथ रोड, इटाली

## वाटरप्रूफ कपडा.

(रबरी कपडा, टारपुलीन, मेणकापड, पाण्यानें न भिज-णारे कागद, गरम पाण्याच्या पिशव्या, रबरी हातमोजे वगैरे)

(१) बेंगॉल वॉटरप्रूफ वर्क्स, लि
(२) पनिहाटी ई. बी रेल्वे

## व्हार्निशें व तेलाचे रंग

(१) कलकत्ता पेन्ट, कलर, ॲण्ड व्हार्निश वर्क्स, १४ कांइबट-पारा लेन, सालकिया, हावरा
(२) मुरारका पेन्ट ॲण्ड व्हार्निश वर्क्स, १० क्लाइव्ह रो.
(३) नेपियर पेन्ट वर्क्स, ३ मोतिलाल सील स्ट्रीट
(४) रॉयल एनॅमल ॲण्ड व्हार्निश वर्क्स, ७८ बिडन स्ट्रीट.
(५) शालिमार पेन्ट कलर ॲण्ड व्हार्निश क० गोबरिया हावरा.

## शाई (छापखान्याची), बूट पॉलिश, मेटल पॉलिश

(१) बेंगॉल इंडस्ट्रियल कंपनी, २१ गोपाळचंद्र बोस लेन नॉर्थ सिंथी, काशीपूर.
(२) कोलाईड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, १३ ए माणिकताला स्ट्रीट
(३) लेदर ड्रेसिंग कंपनी, ५ पंचानन घोष लेन
(४) गुलटूस मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, २५ ए रॉड स्ट्रीट

## शाई (लिहिण्याची)

(१) केमिकल असोसिएशन लि ६१ बेलगाछिया रोड
(२) इकॉनॉमिकल मिसलेनी ८५ ए शंभू बाबू लेन
(३) एम वाघ अँण्ड कंपनी १२ जॉकसन रोड
(४) ओरिअन अँण्ड कंपनी, ७ ए मुसलमान पारा लेन

## शिवण्याचें मशीन

(१) जय इंजिनीयरिंग वर्क्स, २५ लॅन्स्डाऊन रोड

## नकाशे व पृथ्वीचे गोल

(१) ए के दास गुप्ता ६ ई कायानोला रोड
(२) ईगल लिथोग्राफिक कंपनी २६ क्रिस्टोफर रोड.

## पट्टे (यंत्राचे)

(१) बेंगॉल बेल्टिंग वर्क्स लि, श्रीरामपूर हुगळी

## पंप (पाण्याचे)

(१) बेलियाघाटा इंजिनीयरिंग वर्क्स, ११ राधामाधव दत्त गार्डन लेन, बेलियाघाटा, कलकत्ता
(२) डालिंग पंप मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, बन्सातोला, हावरा
(३) माया इंजिनीयरिंग वर्क्स, रायबहादूर रोड, बेहाला.
(४) इंडियन पंप कंपनी, प्रिन्स अनवरशहा रोड टॉलीगंज

## पातीं (सेफ्टी वस्त्र्याचीं)

(१) बेंगॉल कटलरीज, १५१ हॅरिसन रोड
(२) जे. बी इंजिनीयरिंग कंपनी १५७ बी धरमताला स्ट्रीट

## पाट्या (लिहिण्याच्या)

(१) आचार्य स्लेट फॅक्टरी, १४।२ क्लाइव्ह स्ट्रीट
(२) औरोरा स्लेट मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, २७५ ए. कालीघाट रोड.

## फर्निचर (लोखंडी)

(१) बंग प्रतिष्ठान १२।२ सर्क्युलर गार्डन रिच रोड, किदरपूर
(२) इंडियन पंप कंपनी, ८ प्रिन्स अनवरशहा रोड, टॉलीगंज

## फोटोच्या प्लेटस्, कागद व फिल्म्स्

ट्रॉपिको सेन्सटायझिंग कॉर्पोरेशन, पी ४५२ राशबिहारी अॅव्हेन्यू

## बेकेलाइटच्या वस्तू

(१) इंडिया मोल्डिंग कपनी, भारत भुवन चित्तरजन ॲव्हेन्यू

(२) स्वदेशी इंडस्ट्रीज लि पानिहाटी, सोदेपूर (ई बी रेल्वे) ऑफिस —जयपुरिया हाऊस, बीडन स्ट्रीट

## बॅटरीज ( स्टोरेज व ड्राय सेल्स )

(१) ऑटो स्टोरेज बॅटरी कपनी, ३६ धर्मताला स्ट्रीट

(२) भारत बॅटरी मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, पी १ ए राशबिहारी ॲव्हेन्यू, बालीगज

(३) सेंट्रल इलेक्ट्रिक कपनी लि, १३२ धर्मताला स्ट्रीट

(४) इलेक्ट्रो केमिकल इंडस्ट्रीज लि २६ ए अशुतोष मुकर्जी रोड

(५) फ्लॅश लाइट (इंडिया) लि १३५ प्रिन्सेस स्ट्रीट

(६) इंडिया बॅटरी मॅन्युफॅक्चरिंग कपनी, ५८ सी. चौरंगी रोड

## ब्रश ( दाढीचे, तोंड धुण्याचे व कपड्याचे )

(१) पी बी. रॉय आणि कपनी, ८६ कालाबगान वस्ती, न्यू रोड

(२) बेंगॉल ब्रश फॅक्टरी १ नवीन घोष रोड, बाली गज

(३) कलकत्ता ब्रश ॲण्ड फायबर कपनी, १७२ बाऊबझार

(४) शालिमार पेंट, कलर ॲण्ड व्हार्निश कंपनी, ६ लायन्स् रेंज

(५) झेनिथ रबर—सेट प्रॉडक्टस्. घारिआल डांगा, गपूर

## बटनें

(१) कलकत्ता बटन फॅक्टरी, ३९ एन्टॅली रोड

(२) कलकत्ता हॉर्न मॅन्युफॅक्चरिंग कपनी, १८ आनद पलित स्ट्रीट.

## बिस्किटें

(१) ब्रिटानिया बिस्किट कंपनी, बिरपारा लेन, डमडम

(२) लिली बिस्किट कंपनी, रमाकात सेन लेन, उलटा डांगा.

(३) बेंगॉल बिस्किट फॅक्टरी २ बी बागमारी लेन

## साबू

(१) बंगलक्ष्मी सोप वर्क्स, २८ पोला स्ट्रीट

(२) कलकत्ता सोप वर्क्स, तिलजा ताला

(३) हिमानी सोप वर्क्स, . ५९ बेलगाछिया रोड.

(४) कलापी सोप फॅक्टरी, १०८ कॅनिंग स्ट्रीट

(५) लिस्टनर ॲंटिसेप्टिक ॲण्ड ड्रासिंग कंपनी, ९०, रमाकांत सेन लेन

(६) नॅशनल सोप फॅक्टरी, प्रिन्स अनवरशहा रोड, टॉलीगज.

(७) नॉर्थ वेस्ट सोप कंपनी लि. ६२ गार्डनरिच.

## सुऱ्या, चाकू, काऱ्या, वगैरे

(१) बंगाल सरकारचें औद्योगिक खातें, ७ कौंसिल हाऊस स्ट्रीट.
(२) न्यू रॉयल शार्पनिंग वर्क्स, ६३/२ डी मिर्झापूर स्ट्रीट
(३) पन्नालाल सील विद्यामंदिर ५–१ ओलाईचंदी रोड बेल-गाछीया।

## सेल्युलाइडच्या वस्तू

(१) बेंगॉल सेल्युलाइड वर्क्स, ७२ हॅरिसन रोड.
(२) कलकत्ता सेल्युलाइड वर्क्स लि बालीगंज

## होझियरी (गंजिफ्रॉक वगैरे विणलेला माल)

(१) कलकत्ता होझियरी मिल, २ चर्च लेन
(२) डी एन बोसची होझियरी फॅक्टरी, ३६–१ ए सरकार लेन
(३) नेपियर होझियरी वर्क्स, ७० तालपुकुर रोड.
(४) कांत होझियरी, २२ बी अशुतोष ड लेन
(५) एन बोसची होझियरी १ कनाल ईस्ट बाय लेन

# प्रकरण चौदावें

# कलकत्त्याच्या आसपासचीं प्रेक्षणीय स्थळें

## १ शांतिनिकेतन

कलकत्त्यापासून शंभर मैल वायव्येकडे शांतिनिकेतन हे ठिकाण असून येथें डॉ रवींद्रनाथ ठाकूर याचें आंतरराष्ट्रीय विश्वभारती विद्यापीठ आहे सुरुवातीला या ठिकाणीं काहींच नव्हतें एकदा कवि ठाकूर याचे वडील महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर हे फिरत फिरत या ठिकाणीं आले आजूबाजूचें निसर्गसुंदर दृश्य बघून ईश्वरविषयक विचार व प्रार्थना करण्यास ही जागा उत्तम वाटून त्यांनी आपला तंबू तेथेंच ठोकला थोडेच दिवसांत शांतिनिकेतन आश्रमाची सुरुवात झाली या आश्रमात महर्षींनीं एक घर व देवालय बांधले, आणि नाना प्रकारचे संप्रदाय व धर्ममतें यापासून अलिप्त अशा लोकांना ईश्वरविषयक विचार करण्याकरिता ही जागा दिली यानंतर ३० वर्षांनी ( म्हणजे १९०१ सालीं ) पित्याच्या संमतीनें रवींद्रनाथांनीं येथेंच ब्रम्हविद्यालय नावाची एक शाळा सुरू केली विद्यार्थ्यांना राहण्याची व जेवणाची सोय शाळेंतच असे निसर्गाचे सान्निध्यात राहून स्वैरपणें व आनंदानें शिक्षण घेता यावें अशा प्रकारची एक संस्था स्थापण्याचा रविबाबूंचा विचार होता कारण दूर अरण्यांत गुरुगृही जाऊन विद्यार्थ्यांनी शिक्षण घेण्याची कल्पना त्यांना फार पटत असे विश्वभारतीची कल्पना ही एक या विचाराची पूर्तीच होय

अशा रीतीनें १९२१ सालीं विश्वभारतीची स्थापना झाली पौर्वात्य व पाश्चात्य विचाराची सांगड घालून त्यातून जागतिक शांततेची मूलतत्त्वे शोधणें हा विश्वभारतीचा मुख्य हेतु आहे त्याचप्रमाणें येथें दुसऱ्याही काही शिक्षणसंस्था आहेत आश्रमापासून दोन मैल दूर ग्रामसुधारणा करणारी एक संस्था असून त्या ठिकाणीं विद्यार्थ्यांना निरनिराळे व्यवहारोपयोगी धंदे-शिक्षण देणाऱ्या तिच्या बऱ्याच शाखा आहेत शिक्षकवर्गाचे देखरेखी-खालींच शांतिनिकेतन येथें विद्यार्थ्यांची राहण्याची सोय केलेली आहे

नारीभवननामक वेगळ्या संस्थेत मलींच्या शिक्षणाची सोय असून त्यांचेवर देखरेख करण्याकरितां एक स्त्री व्यवस्थापक नेमल्या आहेत स्वयंपाक, शिवणकाम, शुश्रूषा व गृहव्यवस्था या विषयांचें शिक्षण मुलींना देण्यात येतें मुलामुलींच्या प्रकृतीची काळजी घेण्याकरिता एक डॉक्टर येथें सदैव राहतात. शक्य असेल त्या वेळी उघड्या हवेत निसर्गसुंदर मैदानात शिक्षणाचे वर्ग भरवितात लहान मुलांना शिक्षण देण्याकरिता शिशुविभागाची योजना आहे कलकत्ता विद्यापीठाला हे विद्यापीठ सेकंडरी कॉलेज म्हणून जोडले आहे ज्याना कलकत्ता विद्यापीठाच्या परीक्षाना जावयाचें नसेल त्यांनी विश्वभारतीच्या डिप्लोमा (पदवीपत्र) करितां अभ्यास करावा ज्यांना पुढें संशोधनकार्य करावयाचे असेल त्याची सोय विद्याभवनात केली जाते विश्वभारतींत ज्या विषयाच्या शिक्षणाची सोय आहे त्या विषयातील जगविख्यात तज्ज्ञांना मधून मधून येथें बोलावतात. डॉ सिल्वियन लेव्ही, प्रो विंटरनिट्झ्, प्रो स्टेन्-कोनो, प्रो फोर्मीची, वगैरे विद्वान् याच कारणास्तव शांतिनिकेतनांत राहिले होते येथील शिक्षकवर्ग अनुभवी व उच्च शिक्षण घेतलेला आहे त्याचप्रमाणे जर्मनी, फरान्स, इटली, ईजिप्त व निरनिराळी हिंदी संस्थानें यांतून मिळविलेला बराच मोठा ग्रंथसंग्रह येथील वाचनालयात आहे

येथल्यासारखा कलाविभाग हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठेंही नाही. कलाभवनामध्ये कला व उद्यम यांचें शिक्षण देतात हिंदी चित्रकला शिकविण्याकरिता येथे प्रसिद्ध चित्रकाराची नेमणूक केलेली असल्याने हिंदुस्थानातील निरनिराळ्या भागातील विद्यार्थी कलेचें शिक्षण घेण्याकरितां शांतिनिकेतनाल येतात त्याचप्रमाणें संगीतकलेचें ज्ञानही येथें चांगल्या रीतीनें दिलें जातें शांतिनिकेतन हें ग्रामसुधारणा करणाऱ्या संस्थांचें केंद्र असल्यानें यासंबंधीं योग्य असें शिक्षण येथें दिलें जातें खेड्यांतील लोकाना आरोग्याचीं तत्त्वें समजावींत म्हणून चित्रदीपाचे (मॅजिक लॅन्टर्न) साहाय्यानें गावोगाव आरोग्यावरील व्याख्याने होतात. जवळपास भरणाऱ्या यात्रातून येथील विद्यार्थी तेथे स्वयंसेवक म्हणून कामे करतात खेड्यापाड्याच्या मुलात बालक संघ (Boy-scout) स्थापन केलेला असून दलितवर्गाकरितां रात्रीची शाळा, फिरते वाचनालय व एक

मुलींची शाळा, इतक्या संस्था येथे चालविल्या जातात औषधोपचाराचे सोयीकरिता एक दवाखाना व छोटीशी प्रयोगशाळाही येथेच आहे

## २. दार्जिलिंग

कलकत्त्यापासून ३८६ मैल उत्तरेकडे हिमालय पर्वतातील उन्हाळ्यात हवा खाण्याचें ठिकाण म्हणून दार्जिलिंगची प्रसिद्धि आहे उन्हाळ्यात बंगाल सरकारची कचेरी येथे असते व दुसरे बडे बडे लोकही येथें येतात येथील हवा नेहमींच साधारण थंड असून पाऊस सरासरी १२० इंच पडतो हिंवाळ्यात हिम पुष्कळदा पडतें, परंतु हिमवृष्टि क्वचित् प्रसगीं होते

हें गाव [illegible] वसलें [illegible] ने १७५०० फूट आहे उंची-च्या भागात सधन लोकांची वस्ती, खिस्ती देवालयें, सार्वजनिक इमारती, दुकानें, हॉटेले, वगैरे असून सखल भागांत बाजार आहे येथें दिसणाऱ्या सृष्टिसौंदर्याला दुसरीकडे कोठें तोड असेल किंवा नाहीं याची शंकाच वाटते विशेषत· वेधशाळेच्या टेंकडीवरून थेट कांचनगगा शिखरपर्यंतचा सूर्यकिरणानीं चकाकणारा हिमधवल प्रदेश व मधें मधें दिसणारीं हिमाच्छादित शिखरें यांचा देखावा अवर्णनीय दिसतो स्वित्झर्लंडमधील आल्प्स् पर्वताच्या रागा हिमालयाच्या पासंगाला सुद्धां लागणार नाहीत येथून पंचेचाळीस मैल दूर असलेल्या कांचनगंगा शिखरावर उगवत्या किंवा मावळत्या सूर्याची किरणे ज्या वेळी पडतात, तेव्हा इंद्रधनुष्याप्रमाणें सर्व प्रकारच्या रगाची प्रभा जिकडे तिकडे पडून जो चित्ताकर्षक देखावा दिसतो तो पाहात असताना मन गुग होऊन जाते, आणि ईश्वरी कृतीचे कौतुकच करीत राहावें असें वाटू लागतें जगांतील सर्व पर्वतात उंच असणारें हिमालयाचें " एव्हरेस्टगिरि " हें शिखर येथून १०७ मैल दूर आहे. तें दार्जिलिंगहून दिसत नाही घूमजवळ असलेल्या टायगर हिलवरून सूर्योदयाचे वेळीं हवा स्वच्छ असल्यास तें दिसतें

दार्जिलिंग हें नाव वाचताच येथें एकादे शंकराचें स्थान असावें की काय असा एक विचार आपल्या मनात येतो पण तसे मळीच नाही— " डोर्जे + लिंग " अशा दोन तिबेटी शब्दाचें हें नाव आहे आता याची

आख्यायिका अशी आहे कीं, " डोर्जे " म्हणजे " इंद्रदड " म्हणजे वीज आणि " लिंग " म्हणजे ' जागा " म्हणून " डोर्जेलिंग " म्हणजे " विजेच्या कडकडाटाची जागा " असे नाव बनले डोर्जेलिंगचा अपभ्रंश दार्जिलिंग झाला आहे.

## ३. पहाडपूर

हे ठिकाण राजशाही जिल्ह्यातल्या ईशान्य कोंपऱ्यात असून कलकत्याचे उत्तरेस ईस्टर्न बंगाल रेल्वेचा मुख्य फाटा दार्जिलिंगकडे जातो, त्यावर १८९ मैलावर असलेल्या जमालगड नावाच्या स्टेशनपासून ३ मैलावर आहे सपाट व सुपीक अशा बंगाल प्रांतांत हा प्रदेश विशेष सुपीक असून रस्त्यावर दुतर्फा ऊंस, ज्यूट, मोहरी, भात, इत्यादि पिकांनीं नेहमीं शोभा आलेली दिसते अशा या सपाट प्रांतात काहीं अंतरावरून एकदम उच्च आणि हल्ली उघडाबोडखा पण पूर्वी वृक्षाच्छादित असा सुळका दिसू लागतो, तोच विहारचा अग्रभाग होय हल्ली सुमारें ७०–७५ फूट व एक वेळी १०० फुटाहून अधिक उंच असलेलें हें शिखर बंगालसारख्या कटाळवाण्या सपाट प्रदेशात " पहाड " ऊर्फ डोंगर या नावानें प्रसिद्ध असल्यास नवल नाही कारण " निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते "

या " पहाडा " वरूनच आजूबाजूच्या आधुनिक वस्तीस पहाडपूर हें नाव पडलें. खणण्यापूर्वी पहाड सुमारे ७०० फूट परिघाचा असून त्याचे बाजूला लहान मोठी झुडपें व टोंकाजवळ पिंपळ, सावरी, बेल, इत्यादि वृक्ष वाढले होते कोणत्याही दिशेनें पहाडाजवळ गेल्यास १०–१५ फूट उंचीची आणि ३०–४० फूट रुंदीची अशीं चतुष्कोणाकृती टेंकाडें ओलांडून पुढें जावें लागतें. सुमारें ११०० चौरसफूट अशा या प्रचंड चौकाच्या माथ्यावर पहाड असल्यानें मुख्य मंदिर मध्यभागीं, व भिक्षू आणि इतर लोक यांच्या राहण्याच्या ओंवऱ्या बाजूला अशी कल्पना तात्काळ येते उत्खननाचें कार्य मुख्य मंदिरात जवळजवळ पूर्णपणें व भोंवताली निम्मेशिम्मे झालें आहे

हिंदुस्थानात उपलब्ध झालेल्या प्राचीन इमारतींत पहाडपूर येथील मंदिर अनेक दृष्टींनी असामान्य गणले जाईल मंदिराची विस्तीर्णता व

उच्चता, शिल्पकलेची अपूर्वता व बृहत्तरभारतीय कलेशीं तिचा संबंध, निरनिराळ्या धर्ममताचें वैचित्र्य व सहिष्णुता, भिंतीत बांधून काढलेल्या दगडाविटांच्या मूर्तीचें विविधत्व आणि सौंदर्य, या गोष्टीचा विचार केला तर या प्रकारची कोणतीही इमारत प्राचीन हिंदुस्थानात संशोधकांस सापडल्याचे दिसून येत नाही. पहाडपूर येथील देवळांची सोंगट्याच्या पटासारखी रचना, एकावर एक असे चार मजले असून टोंकावर मुख्य देऊळ असणें, व भिंतीत असलेल्या देवदेवताच्या मूर्ती या सर्व बाबतींत याच हिंदुस्थानांतील कोणत्याही प्रसिद्ध मंदिराशीं साम्य नसून जावा बेटातील चंडीसेव्, बोरो बुदुर, चंडी लोरो जोंग्रंग इत्यादि अवशेषांशी मात्र तत्काळ नातें असल्याचें नजरेंत भरतें. मंदिराची उत्तर-दक्षिण लांबी ३६ फूट व पूर्वपश्चिम रुंदी ३१८ फूट असून उंची ७५ फूट आहे. मंदिरांतील भिंतींत बसविलेल्या सुंदर प्रस्तर मूर्ती व इष्टक चित्रे या दोन गोष्टी डोळ्यांत भरण्याजोग्या आहेत. मूर्ती पाहतांच त्या गुप्तकालीन असून बंगालमधील सर्वांत जुन्या शिल्पाचे नमुने आहेत, यांत शंका नाही. शिवाय बंगालचा गुण म्हणजे उत्कट भावना ही पण पहाडपूर येथें सापडलेल्या मूर्तिशिल्पात चांगली दृग्गोचर होते. इतरत्र कोठेंही न सापडलेली अशी एक राधाकृष्णाची मूर्ति पाहून सहाव्या शतकाचे सुमारास येथे राधाकृष्णाची भक्ति रूढ होती असें दिसतें. येथील चित्रांवरून आणि मूर्तीवरून कोणत्या एका पंथाला किंवा एका धर्माला हें मंदिर वाहिलें असावें असें वाटत नाही.

पहाडपूर येथे सर्वांत जुनी एक वस्तु सांपडली आहे. ती गुप्त शक १५९ (ख्रिस्ती स. ४७८) या वर्षी एका ब्राह्मण जोडप्यानें वट-गोहाली येथील जैनविहारास गंध-धूप दीप इत्यादि पूजासामग्रीनिमित्त सरकारकडे पैसे भरून जमीन लावून दिली त्याचा ताम्रपट होय. पहाडपूरलगतच गोआल-भिरा म्हणून गाव आहे. हेंच पूर्वीचें वट-गोहाली असू शकेल. एकंदरींत सहाव्या, सातव्या शतकाच्या सुमारास हें मोडकळीस आलेलें मंदिर पूर्ण भरभराटींत असावें व त्या काळीं बौद्ध धर्म, ब्राह्मणधर्मांतील शैव वैष्णवादि पंथ यांपैकीं कोणासही येथें मज्जाव नसावा असें वाटलें. ख्रिस्ती शकाच्या बाराव्या शतकानंतर मुसलमानी अमदानीच्या धामधुमीत हा जैन, हिंदु, बौद्ध, इत्यादि स्थित्यंतरांतून गेलेला व सुमारें ६–७ शतकें

भरभराटींत असलेला उत्तुंग विहार मोडकळीस येऊन तेथून बौद्ध भिक्षूंनी पलायन केलें असावें पडझडीनंतर नैसर्गिक घडामोडींनी विटामातीचे ढीग बनून त्यावर जंगल वाढून "पहाड" बनला, तो उत्खनन होईपर्यंत त्याच स्थितीत होता.

## ४. भुवनेश्वर

कलकत्त्याच्या दक्षिणेस सुमारें २५० मैलावर भुवनेश्वर नावाचें एक ठिकाण आहे येथे त्रैलोक्याचा स्वामी जो शंकर त्याचे देवालय असून शिवाय लहानमोठीं ५०० देवलयें आहेत हीं सर्व एकाच धर्तीची व एकाच प्रकारच्या दगडाचीं असून त्यानीं सुमारें दोन चौरसमैल जागा व्यापिली आहे येथील "बिंदुसागर" नावाच्या तलावात हिंदुस्थानांतील सर्व पवित्र नद्यांचें पाणी आलेले असून यात स्नान केल्यास सर्व पापाचे क्षालन होतें अशी यात्रेकरूंची श्रद्धा आहे. देवळाला खालपासून वरपर्यंत मजले मजले असून जसजसें वर जावें तसतसें दळ निमुळतें होतें वरील कळस छत्रीच्या आकाराचा आहे देवालयांत कलाकौशल्य व कोरीव काम अपूर्व दिसतें. मुख्य देवालयाचा कळस ५५ फूट उंच असून वरील छत्री-सारख्या कळसास वाघ सिंहाचे घिरे आहेत, व टोंकावर त्रिशूल आहे गाभाऱ्यात मूर्ति नसून आठ फूट उंचें व आठ फूट व्यासाचें ग्रेनाइटच्या दगडाचें लिंग आहे मुख्य देवळाचे भोंवती छोटे छोटीं अनेक देवळें असून सर्वांचे भोंवतीं सात फूट जाडीचा एक तट आहे.

येथें दूधकुंड नांवाचे एक पाण्याचे कुंड आहे येथील पाणी दुधासारखें भुरकट दिसते हे पाणी आरोग्यदृष्ट्या फार गुणकारी असल्यानें जगन्नाथ-पुरीस राहणाऱ्या क्षयरोग्याकरिता तें येथून घेऊन जातात भुवनेश्वराहून ८–१० मैलावर असलेल्या एका डोंगरांत "उदयगिरि", "खंडगिरि" व "नीलगिरि" अशीं तीन लेण्यासारखीं जैनांची देवालयें आहेत हीं देवालयें ख्रिस्ती शकापूर्वी तीन चार शतकें बांधल्याचें कळतें

## ५. जगन्नाथपुरी

जगन्नाथपुरी हें हिंदूंच्या चार धामांपैकीं एक धाम असल्यानें धार्मिक दृष्ट्या याचें फार महत्त्व आहे पूर्व, पश्चिम व उत्तर हिंदुस्थानातील यात्रे-

करूंना पुरीला जाण्यासाठीं प्रथम कलकत्त्यास येणें सोयीचें पडतें कलकत्ता-मद्रास या रेल्वेमार्गावरील खुर्दारोड स्टेशनपासून पुरीला जाण्यास एक रेल्वेचा फाटा आहे कलकत्त्याहून पुरी जवळजवळ ३०० मैल असून पुरी एक्सप्रेसनें गेल्यास खुर्दारोड स्टेशनवर उतरण्याची जरुरी पडत नाहीं पंडे लोक यात्रेकरूंची राहण्याची सोय आपले घरी करतात. परंतु स्वतंत्र-पणें राहावयाचें असल्यास देवालयाजवळ मारवाड्याच्या दोन धर्मशाळा आहेत तेथें स्वच्छता चांगली असून धर्मशाळेंतील व्यवस्थापक मंडळी यात्रेकरूंना शक्य ती मदत करतात

जगन्नाथाचे देवालयाबद्दल तेथील पंडे लोक अशी एक दंतकथा सांगतात की, द्वारका बांधल्यानंतर श्रीकृष्ण परमात्म्यानीं भुवनेश्वराला राहण्याचा विचार केला आणि आपल्यासाठीं व आपल्या बरोबरच्या देवांसाठीं एका रात्रीत एक लक्ष देवालयें बांधण्याची आज्ञा विश्वकर्म्याला केली सर्वं देवालयें बांधलीं गेलीं, परंतु खुद्द श्रीकृष्णाचें देवालय पूर्ण होण्याचे आधींच सूर्योदय झाला आपलें देवालय पूर्ण झालें नाहीं हें पाहून श्रीकृष्ण रागावून पुरीला निघून गेले तेथें त्यांचेकरितां नवीन देवालय बांधलें भुवनेश्वरास एका विशिष्ट बांधणीची आज जी लहान मोठीं ५०० देवालयें दिसतात त्याच पद्धतीचें फक्त जगन्नाथाचे एकच देऊळ पुरीला आहे पुरीचें देवालय ८०० वर्षांपूर्वी बांधलेलें असावें असें पुराणवस्तुसंशोधनज्ञाचें मत आहे कोठेंही पहा, कृष्णाच्या देवालयात राधाकृष्णांच्याच मूर्ती असतात परंतु जगन्नाथाच्या मंदिरांत मात्र कृष्ण, बळराम आणि सुभद्रा या तिघांच्याच मूर्ती दिसतात हिंदुस्थानातील सर्व प्राचीन देवालयांत हें एकच देवालय असें आहे कीं जेथें अस्पृश्यता मानली जात नाहीं सरसकट सर्व हिंदूंना देवालयात जाण्याची मुभा आहे. देवालयाचा प्राकार ६५२ फूट लांब व ६०३ फूट रुंद असून त्याच चहूंबाजूस २० फूट उंचीचा कोट आहे. देवालयाचे चारी दिशांस चार दरवाजे असून पूर्वेकडील दरवाजा रात्रंदिवस उघडा असतो देवालयाच्या मागच्या बाजूला एका जाळीच्या दरवाजाच्या आंत एकादशीचे देऊळ आहे तिला येथें बंदिवासात ठेवल्यानें जगन्नाथ-पुरीस कोणी एकादशी करीत नाहीं असें तेथील पंडे लोक सांगतात. देवालयाच्या आत व बाहेर फारच सुंदर कोरीव काम आहे

आषाढी एकादशीला देव रथात बसून मामाच्या घरीं जातात. हा रथ ३५ फूट लांब, ३५ फूट रुंद व ४५ फूट उंच असून त्याला ७ फूट व्यासाचीं १६ चाकें आहेत बळराम व सुभद्रा यांचे रथ जगन्नाथाच्या रथापेक्षां लहान आहेत हे रथ देवालयाच्या सिंहद्वाराजवळ आणून त्यात देवाच्या मूर्ती वाजत गाजत ठेवतात या वेळीं दर्शनास जमलेले लक्षावधि यात्रेकरू भाविकपणाने जमिनीला डोकें लावून नमस्कार करताना जें दृश्य दिसतें ते पाहून नास्तिक-ही तात्पुरते आस्तिक बनल्यावाचून राहणार नाहीत यानतर भक्तमडळी हा रथ ओढीत ओढीत बडादडा रस्त्यावरून एक मैलावर असलेल्या एका बगिच्यात नेतात रथ ओढण्यासाठी लावलेला दोर मांडीएवढा जाड असतो रथ ओढण्यास मिळाला नाही तर निदान दोरास हात लावण्यास मिळावा म्हणून तरुण, वृद्ध, स्त्री, पुरुष, श्रीमंत, भिकारी, अशक्त, सशक्त यांच्यामध्ये सारखी चढाओढ चाललेली असते या असंख्य समुदायात हिंदुस्थानातील सर्व प्रांतातील स्त्रिया व पुरुष दिसतात.

10639

REFBK-0005831

# वेस्टर्न इंडिया

## लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, सातारा.

**उभ्या भारतवर्षांत अत्यंत प्रगतिपर म्हणून नांवाजलेली राष्ट्रीय संस्था.**

हप्त्याचे माफक दर, निरनिराळ्या आकर्षक योजना, भरपूर नफा, आणि सेवेची तत्परता यांमुळें लोकादरांस पात्र झाली आहे. अशा लोकप्रिय संस्थेकरितां काम मिळविणें एजंटांस सोपें जात असल्यानें पुष्कळांनीं या कंपनीची एजन्सी घेऊन आपला उत्कर्ष साधला आहे.

माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा.

| | |
|---|---|
| मेसर्स दासरॉय आणि कंपनी,<br>चीफ एजंटस्,<br>२१ ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट,<br>ग्रास-व्हेनर हाऊस, कलकत्ता | मॅनेजर,<br>वेस्टर्न इंडिया लाईफ<br>इन्शुअरन्स कंपनी,<br>सातारा |

# मायर्स पंपाचे

हिंदुस्थानांतील सोल एजंट्स

## दि वॉटर सप्लाय स्पेशिॲलिस्ट्स लिमिटेड

| मुंबई | कलकत्ता | मद्रास |
| --- | --- | --- |
| पोस्ट बॉक्स ६८४ | पोस्ट बॉक्स ४२४ | पोस्ट बॉक्स २०२ |